# आंबेडकरी
# ळवळ

म. ग्रं. सं. ठाणें.
म.
विषय निबंध
क्र. 33८८



य. दि. फडके



REFBK-0026127

संदर्भ निबंध
3308
२६१२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

10 OCT 1992

10 OCT 1992

25 NOV 1992

19 OCT 1996

26 OCT 1996

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

# आंबेडकरी चळवळ

यशवंत दिनकर फडके

REFBK-0026127

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार
पुणे ४११०३०

© डॉ. वासंती यशवंत फडके

प्रथमावृत्ती : १५ फेब्रुवारी १९९०

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य : साठ रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे ४११०३०

डॉ. बाबा आढाव यांना स्नेहपूर्वक—

# प्रस्तावना

विसाव्या शतकातील महाराष्ट्राचा राजकीय इतिहास लिहिण्याच्या दृष्टीने मी गेली पंधरा वर्षे ठिकठिकाणच्या पुराभिलेखागारातील अप्रकाशित अस्सल कागदपत्र, राजकीय नेत्यांचा खासगी पत्रव्यवहार, जुन्या वृत्तपत्रांच्या संचिका आणि विविध सार्वजनिक ग्रंथालयातील तसेच खासगी संग्रहातील पुस्तके वगैरे साधनांचा शोध घेत आहे. आतापर्यंत अशा साधनांच्या चिकित्सेवर आधारलेले विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाचे दोन खंड प्रकाशित झाले आहेत. या दोन खंडांमध्ये १९०१ ते १९२० या पहिल्या दोन दशकांतील मराठी भाषिकांच्या राजकीय कर्तृत्वाचा आढावा घेण्यात आला आहे. त्यापुढील कालखंडाचा इतिहास लिहिण्याची पूर्वतयारी म्हणून १९२१ ते १९४७ या काळातील प्रमुख राजकीय नेते, विविध राजकीय चळवळी यांच्यासंबंधीचे विवेचन शक्यतो अस्सल व अप्रकाशित कागदपत्रांच्या साहाय्याने करण्याचा प्रयत्नही मी करीत आहे. ‘आंबेडकरी चळवळ’ हे पुस्तक या प्रयत्नांचेच एक फलित आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निधन झाले त्यालाही आता तेहेतीस वर्षे होऊन गेली. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतरच्या काळात त्यांचा एक महान ऐतिहासिक पुरुष म्हणून अभ्यास न केला जाता आराध्यदैवत म्हणून त्यांची पूजा केली जात आहे. मूर्तिपूजकांच्या या देशात नेत्यांना देव मानून त्यांना माणसातून उठवण्याच्या कलेत त्यांचे निष्ठावंत अनुयायी पारंगत असतात. बाबासाहेब तर त्यांच्या हयातीतच नुसते एक राजकीय नेते राहिले नव्हते तर लाखो दलितांचे स्फूर्तिस्थान आणि शक्तिकेंद्र बनले होते. १९२७ साली ते अवघे पस्तीस वर्षांचे असतानाच त्यांचा वाढदिवस त्यांच्या निष्ठावंत अनुयायांनी सार्वजनिकरीत्या साजरा करण्यास सुरुवात केली होती. माणसाला देव मानणे किंवा

अवतारी पुरुष म्हणून त्याची पूजा करणे हे बाबासाहेबांना मुळीच आवडत नसे. वाढदिवसानिमित्त दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या सार्वजनिक सभांना पंधरा वर्षांत एकदाही हजर न राहिलेले बाबासाहेब १९४२ च्या एप्रिलमध्ये त्यांच्या एक्कावन्नाव्या वाढदिवसानिमित्त भरलेल्या सत्कारसभेत हजर राहिले आणि त्यांनी आपल्या अनुयायांना सांगितले, " तुम्ही माझा वाढदिवस गेली पंधरा वर्षे साजरा करीत आहात. माझा नेहमीच या प्रकाराला विरोध असल्याने मी आजवर अशा समारंभाला कधीही हजर राहिलो नाही. तुम्ही आता माझा सुवर्णमहोत्सव साजरा केला आहे. इतके पुरे झाले. यापुढे माझ्या वाढदिवसाचे समारंभ साजरे करू नका. नेत्याविषयी अपार भक्ती बाळगली की जनतेचा आत्मविश्वास नाहीसा होतो. एखाद्या कसोटीच्या प्रसंगी असा नेता नसेल किंवा कशाचाच विधिनिषेध न बाळगणाऱ्या पुढाऱ्यांच्या तावडीत जनता सापडली तर तिला निराधार असल्यासारखे वाटू लागते. मुक्तीसाठी तुम्ही कोणत्याही एका व्यक्तीवर विसंबून राहू नका. तुमची मुक्ती तुमच्या हाती आहे आणि ती तुम्हीच प्रयत्न करून मिळवली पाहिजे." [ **सोर्स मटेरिअल ऑन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द मुव्हमेंट ऑफ अनटचेबल्स : खंड १ : १९८२, पृ. २५१** ] जेव्हा जेव्हा भारतात धर्माला ग्लानी येते तेव्हा तेव्हा आपण अवतार घेतो या श्रीकृष्णाच्या हवाल्यावर विसंबून राहिल्याने हिंदू समाज संकटाच्या वेळी कसा अगतिक बनतो त्याचीही त्यांनी श्रोत्यांना आठवण करून दिली. " मी मूर्तिपूजक नाही. उलट मूर्तिभंजनावर माझा विश्वास आहे." असे ' रानडे, गांधी आणि जिना ' यांच्यासंबंधी १८ जानेवारी १९४३ रोजी दिलेल्या व्याख्यानाच्या पुस्तिकेच्या प्रस्तावनेत बाबासाहेबांनी म्हटले होते. भारताची राज्यघटना मंजूर झाली त्या दिवशी घटनापरिषदेत केलेल्या संस्मरणीय भाषणातही त्यांनी विभूतिपूजेच्या प्रवृत्तीपासून भारतीय लोकशाहीला धोका असल्याचा इषारा दिला होता.

दुर्दैवाने भारतीयांच्या हाडीमाशी खिळलेल्या विभूतिपूजेच्या प्रवृत्तीचा प्रसाद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही मिळाल्याशिवाय राहिला नाही. त्यांच्या मृत्यूनंतर नागपूरच्या दीक्षाभूमीला आणि दादर चौपाटीवरच्या दहनभूमीला तीर्थक्षेत्रांचे रूप प्राप्त झाले आणि तेथे दरवर्षी लाखो लोकांच्या जत्रा भरू लागल्या. भक्तिभावाने बाबासाहेबांची चरित्रे लिहिण्यात आली. त्यांच्या सहवासात आलेल्या त्यांच्या अनुयायांनी रंगतदार आठवणी सांगून त्यात आणखी भर घातली. कादंबरीकारांनी, नाटककरांनी आणि कवींनी आपल्या तल्लख कल्पनाशक्तीच्या साहाय्याने बाबासाहेबांच्या ' मिथ ' मध्ये इतके रंग बेमालूम मिसळले की आता फक्त त्यांच्यासंबंधी ' पांडवप्रताप ' किंवा ' भक्तिलीलामृत ' सारख्या पोथ्या तेवढ्या लिहावयाच्या शिल्लक राहिल्या आहेत. " परमेश्वरा, माझ्या मित्रांपासून मला वाचव, माझ्या शत्रूंचा बंदोबस्त करावयास मी समर्थ आहे " असे जॉर्ज कॅनिंग म्हणाल्याचे सांगतात. बाबासाहेब आज हयात असते तर त्यांनाही " माझ्या भक्तांपासून माझे संरक्षण करा " अशी प्रार्थना करावी लागली असती.

ज्या चिकित्सक, निर्भय आणि तर्ककठोर वृत्तीने बाबासाहेब आंबेडकरांनी न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक या आपल्या पूर्वसूरींच्या तसेच गांधीजी, जिना, जवाहरलाल नेहरू या समकालीनांच्या कार्याचे मूल्यमापन केले त्या वृत्तीनेच वस्तुतः बाबासाहेबांचा वारसा सांगणाऱ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्याचे, त्यांच्या चळवळीच्या यशापयशाचे, ज्या परिस्थितीत त्यांनी चळवळी केल्या त्या परिस्थितीमुळे स्वाभाविकरीत्या त्यांच्यावर पडलेल्या मर्यादांचे अवधान ठेवून विश्लेषण करावयास हवे. बाबासाहेब कितीही महान असले तरी अखेर ते एक माणूसच होते आणि सर्वच माणसे चुका करतात त्याप्रमाणे त्यांनीही काही चुका केल्या आणि त्यांपैकी काहींची जाहीररीत्या त्यांनी कबूलीही दिली. उदाहरणार्थ, पुणे करारावर सही करण्यात आपली चूक झाली असे ते वारंवार म्हणत असत. राजकीय नेता म्हणून त्यांनी वेळोवेळी जी रणनीती अवलंबिली आणि डावपेच लढवले त्यांचे परिणाम, त्यांच्या चळवळीवर कोणते झाले याचीही चिकित्सा व्हावयास हवी. बाबासाहेब आंबेडकरांचे समकालीन असलेले अन्य राजकीय पक्षांचे नेते तसेच त्या वेळचे इंग्रज राज्यकर्ते बाबासाहेबांच्या चळवळीकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहात होते त्याचाही विचार व्हावयास हवा. बाबासाहेब ज्या अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीत जन्मले आणि ज्या परिस्थितीत त्यांनी राजकीय चळवळ करण्याचे प्रयत्न केले तिच्यामुळे त्यांच्या कार्याला काही मर्यादा पडणे अटळ ठरले. या मर्यादा ओलांडून आपल्या चळवळीला व्यापक रूप देण्याचे त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. त्यांच्या यशापयशाचीही चिकित्सा होणे आवश्यक आहे.

गेल्या तीस वर्षांत बाबासाहेब आंबेडकरांसंबंधीच्या ठिकठिकाणच्या पुराभिलेखागारात धूळ खात पडलेल्या फायली अभ्यासासाठी संशोधकांना उपलब्ध झाल्या आहेत. सत्तांतराच्या वेळचे कागदपत्र ब्रिटिश सरकारनेच अनेक खंडांत प्रसिद्ध केले आहेत. सरदार पटेल, राजेन्द्र प्रसाद यांच्यासारख्या कॉंग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांचा खासगी पत्र-व्यवहार अनेक खंडांमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. नव्याने उपलब्ध झालेल्या या साधनांचा मराठीत आंबेडकरांसंबंधी लेखन करणाऱ्यांनी जितका उपयोग करून घ्यावयास हवा होता तितका अद्याप करून घेतलेला नाही. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. तो आंबेडकरी चळवळीबद्दल आस्था असणाऱ्यांना तसेच चळवळीच्या अभ्यासकांना उपयुक्त वाटला तरी त्यासाठी केलेले परिश्रम फुकट गेले नाहीत असे मला वाटेल.

३, आनंदवन, साहित्यसहवास,
वान्द्रे ( पूर्व ), मुंबई ४०००५१ — य. दि. फडके
२८ नोव्हेंबर १९८९

# ऋणनिर्देश

या पुस्तकातील ' डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह ' हा पहिला विभाग महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठानच्या ' पुरोगामी सत्यशोधक ' या त्रैमासिक मुखपत्राचा ( जुलै ते डिसेंबर १९८६ ) जोडअंक म्हणून प्रकाशित झाला होता. या नियतकालिकाच्या वर्गणीदारांची संख्या फार मोठी नसल्यामुळे हा जोडअंक अनेकांच्या पाहण्यात आला नसल्याचे दिसून आले. त्यामुळे त्या शोधनिबंधाचा या पुस्तकात समावेश केलेला आहे. ' डॉ. आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष ' हा दुसरा विभागही ' पुरोगामी सत्यशोधक ' या नियतकालिकात प्रथम प्रकाशित करण्याचे ठरले होते; पण त्याचा विस्तार आधी वाटले होते त्यापेक्षा जास्त झाल्याने वाढत्या पृष्ठसंख्येचा विचार करून तो ' पुरोगामी सत्यशोधक ' नियतकालिकात प्रथम प्रकाशित करण्याचा इराद बदलावा लागला. तो या पुस्तकाच्या रूपाने प्रथमच प्रकाशित होत आहे.

या दोन्ही विभागांचे लेखन मी पूर्ण करावे यासाठी डॉ. बाबा आढाव मला वारंवार आठवण करून देत असत. सत्यशोधक, ब्राह्मणेतर आणि दलित चळवळींच्या अभ्यासाची अस्सल साधने मिळवून ती अन्य अभ्यासकांना उपलब्ध करून देण्यावर त्यांचा नेहमीच भर असतो. कष्टकरी जनतेच्या हक्कासाठी सतत संघर्ष करीत असलेले डॉ. बाबा आढाव यांनी वयाची साठ वर्षे नुकतीच पुरी करून एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यांच्या आजवरच्या सामाजिक कार्याबद्दल मला वाटणाऱ्या आदराचे प्रतीक म्हणून हे पुस्तक मी त्यांना अर्पण केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या चळवळीसंबंधीचे अस्सल व अप्रकाशित कागदपत्र मला दिल्लीच्या राष्ट्रीय अभिलेखागारात तसेच महाराष्ट्र शासनाच्या मुंबईतील पुराभिलेखागारात आढळले. अभ्यासासाठी ते उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांच्या

संचालकांचा मी ऋणी आहे. दिल्लीच्या जवाहरलाल नेहरूस्मृती ग्रंथालयात राजकीय पक्षांचे कागदपत्र तसेच अनेक राजकीय नेत्यांचा खासगी पत्रव्यवहार आहे. श्री. बाळासाहेब खेरांचा खासगी पत्रव्यवहार तसेच ऑल इंडिया ट्रेड युनियनचे दप्तर यांचा मला अभ्यास आणि उपयोग करता आला, तो नेहरूस्मृती ग्रंथालयाचे संचालक डॉ. रवींद्रकुमार यांनी दिलेल्या अनुमतीमुळे. त्यांच्या या साहाय्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे काही वाचकमित्र आहेत. त्यांचा खासगी ग्रंथसंग्रहही मोठा आहे. आपल्या संग्रहातील दुर्मिळ पुस्तके, खासगी पत्रव्यवहार वगैरे महत्त्वाची साधने मला मिळवून देण्यात हे वाचक-मित्र नेहमीच तत्परतेने साहाय्य करीत असतात. हे पुस्तक लिहिताना श्री. रमेश शिंदे यांनी आपल्या खासगी ग्रंथसंग्रहालयातील पुस्तके मला उपलब्ध करून दिलीच. शिवाय अमृतराव रणखांबे यांच्या खासगी पत्रव्यवहारातील काही महत्त्वाच्या अप्रकाशित पत्रांची टिपणे करून घेण्याची अनुमतीही त्यांनी आनंदाने दिली. श्री.विजय गंगाराम सुरवाडे यांनी त्यांच्या संग्रहातील महत्त्वाच्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मला आणून दिल्या. श्री. सुहास सोनवणेही असे साहाय्य मला नेहमीच करीत असतात. मध्यप्रांत-वऱ्हाडातील बिडी कामगारांच्या संघटनेचे आपल्या संग्रहातील एक पत्रक मला उपयुक्त होईल हे जाणून श्री. वसंतराव मून यांनी मला ते आणून दिले. आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक म्हणून श्री. वसंतराव मून यांचा परिचय अनेकांना आहे. त्यांच्या-प्रमाणेच श्री. रमेश शिंदे, श्री. सुहास सोनवणे आणि श्री. विजय सुरवाडे यांनीही दलित मुक्ती आंदोलनाचा बारकाईने अभ्यास केलेला आहे. या सर्वांनी तत्परतेने केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

१९३७ च्या मुंबई विधानसभेचे सदस्य असलेले श्री. राजाभाऊ भोळे आणि कॉंग्रेस नेते श्री. नानासाहेब कुंटे तसेच प्रसिद्ध कम्युनिस्ट विचारवंत श्री.प्रभाकर वैद्य यांच्याशी चर्चा करून काही घटनांचा उलगडा करून घेता आला. त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

माझे ज्येष्ठ बंधू डॉ. भालचंद्र फडके हे दलित साहित्याचे समीक्षक म्हणून दलित मुक्ती आंदोलनाबरोबर गेली तीस-पस्तीस वर्षे एकरूप झाले आहेत. या आंदोलनाच्या विविध अवस्था, त्यातील प्रवाह आणि त्यात सहभागी झालेली लहानमोठी माणसे यांच्या मूल्यमापनाबाबत त्यांचे आणि माझे नेहमीच एकमत असते असे नाही. काही वेळा मतभेदही होतात. डॉ. आंबेडकर आणि दलित मुक्ती आंदोलन हा त्यांच्या विशेष जिव्हाळ्याचा व आवडीचा विषय असल्याने त्याच्याशी संबंधित दुर्मिळ वृत्तपत्रे आणि पुस्तके मला त्यांच्या संग्रहात हमखास मिळतात. कोहिनूर आणि पतितपावन या नाशिकच्या वृत्तपत्रांचे काही अंक त्यांनी मला दिले, तसेच हे पुस्तक लिहिताना जे संदर्भग्रंथ हाताशी असणे आवश्यक होते तेही त्यांच्या संग्रहातून मला मिळाले.

डॉ. आंबेडकरांचे आद्यचरित्रकार चांगदेवराव खैरमोडे यांनी आंबेडकर चरित्र लिहिताना जमवलेले साहित्य मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात आहे. 'जनता' पत्राच्या फायली त्या संग्रहात आहेत. त्या अभ्यासासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रंथपाल श्री. अरविंद टिकेकर आणि त्यांचे सहकारी यांचे मनःपूर्वक आभार. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या ग्रंथपाल श्रीमती सुनंदा गुंडे आणि त्यांचे सर्व सहकारी तसेच नायगावच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातील श्रीमती लतिका जोशी आणि श्री. पारायणे यांनीही वेळोवेळी मला हवी होती ती पुस्तके तावडतोब मिळवून दिली. त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार.

आपले अध्यापनाचे व संशोधनाचे काम सांभाळून माझ्या पत्नीने– डॉ. वासंतीने – या पुस्तकाची मुद्रणप्रत नेहमीप्रमाणे झपाट्याने करून दिली. तिचे असे साहाय्य मला मिळाले नसते तर माझ्या हातून आजवर जे विपुल संशोधनपर ग्रंथलेखन झाले ते मला करता आले नसते.

प्रकाशक श्री. मधुकाका कुलकर्णी आणि त्यांचे चिरंजीव श्री. उपेन्द्र व कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर आणि चित्रकार कमल शेडगे यांनीही तत्परतेने आपले काम केल्याने हे पुस्तक आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध होत आहे. या सर्वांचे माझ्यावरील ऋण असेच वाढत राहो.

या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी माझे हे सर्व सहाय्यकर्ते सहमत आहेत असा समज कोणीही करून घेऊ नये. वाचकांना पुस्तकात जे चांगले आहे असे वाटेल त्याच्या श्रेयाचे हे सारे वाटेकरी आहेत. या पुस्तकात ज्या चुका, उणिवा किंवा विवाद्य विधाने आढळतील त्यांची सर्वस्वी जबाबदारी अर्थात माझ्यावरच आहे.

३, आनंदवन, साहित्य-सहवास,
वान्द्रे (पूर्व) मुंबई ४०००५१ — य. दि. फडके
२८ नोव्हेंबर १९८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3304
दा. क्र. 26920
निबंध 27/7/80

# अनुक्रमणिका

प्रस्तावना पाच

ऋणनिर्देश नऊ

## विभाग पहिला

डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह ३

## विभाग दुसरा

डॉ. आंबेडकर आणि स्वतंत्र मजूर पक्ष

१. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना ८३

२. स्वतंत्र मजूर पक्षाचा कामगार-चळवळीतील सहभाग १०८

३. स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेतकऱ्यांचे प्रश्न १२९

४. पक्षबांधणीतील समस्या १४६

५. स्वतंत्र मजूर पक्ष आणि भारतीय राजकारण १६२

साधनांची सूची १८८

विषय-सूची २०९

नाम सूची २११

# आंबेडकरी चळवळ

# विभाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३३५७
२६९२८
निर्देश
२८/७/९०

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# आणि
# नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १९२७ साली महाड येथे झालेल्या धर्मसंगराबद्दल आजवर जितके लिहिले गेले आहे तितके त्यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाखाली १९३० पासून सुरू झालेल्या नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी झालेल्या सत्याग्रहासंबंधी लिहिले गेलेले नाही. बाबासाहेबांच्या चरित्रकारांपैकी चांगदेवराव खैरमोडे यांनी पन्नास-साठ पानांत बाबासाहेबांची काही अस्सल खासगी पत्रे उद्धृत करून या सत्याग्रहाची हकीकत सांगितली आहे. धनंजय कीर व भालचंद्र फडके या अन्य चरित्रकारांनी तर या सत्याग्रहाबाबत फारच त्रोटक लिहिले आहे. मूळ साधने धुंडाळून त्यांच्या आधारे बाबासाहेबांबद्दल लिहिणाऱ्या रत्नाकर गणवीर यांच्यासारख्या साक्षेपी अभ्यासकाचे लक्ष नाशिक-सत्याग्रहाकडे अद्याप गेलेले दिसत नाही. नाशिक येथे झालेला सत्याग्रह बाबसाहेबांच्या संघर्षमय राजकीय जीवनातील एक महत्त्वाचे पर्व आहे. या सत्याग्रहासंबंधीचे अस्सल सरकारी कागदपत्र आता अभ्यासकांना उपलब्ध करून दिले जातात. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांनी जिद्दीने दीर्घकाळ दिलेल्या लढतीचा साधार व सविस्तर इतिहास तत्कालीन मुंबई सरकारच्या गृहखात्याच्या विशेष शाखेच्या कागदपत्रांच्या, तसेच त्या वेळच्या वृत्तपत्रांच्या संचिकांच्या आधारे सांगणे आता शक्य आहे.

चांगदेवराव खैरमोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार नाशिकच्या कार्यकर्त्यांनी १९२९ च्या ऑक्टोबरमध्ये बाबासाहेबांशी प्रथम मुंबईत विचारविनिमय केला. मंदिरात प्रवेश करण्यासाठी सत्याग्रह करण्यापेक्षा आपण राजकीय हक्कांना जास्त महत्त्व देतो असे जरी नाशिककरांना बाबासाहेबांनी बजावले, तरी नाशिक-सत्याग्रहाचे पुढारीपण

त्यांनी स्वीकारले.[1] १७ ऑक्टोबर १९२९ रोजी महाड-प्रकरणात शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांची साक्ष नोंदवण्यासाठी बाबासाहेब नाशिकला गेले असताना त्यांनी सत्याग्रहाची रणनीती व डावपेच यांच्याबद्दल नाशिकच्या कार्यकर्त्यांची मते अजमावली असावीत. त्याआधी अवघे दोन-चार दिवस आधी म्हणजे १३ ऑक्टोबर १९२९ रोजी पुण्याला पर्वतीवरील देवळात प्रवेश मिळावा म्हणून शिवराम जानबा कांबळे, पांडुरंग नथूजी ( बापूसाहेब ) राजभोज, विनायकराव भुस्कुटे, काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे, एस. एम. जोशी वगैरेंनी सत्याग्रह केला होता. तेव्हा सनातनी सवर्ण हिंदूंनी सत्याग्रहींना केलेल्या मारहाणीमुळे व दगडफेकीमुळे राजभोज, देशदास रानडे वगैरे जबर जखमी झाले होते. या पर्वती सत्याग्रह प्रकरणात पर्वती देवस्थानचे पंच आणि अस्पृश्यांबद्दल कळवळा दाखवणारे ढोंगी कैवारी यांचे कसे संगनमत झाले आहे त्यावर प्रकाश टाकून बाबासाहेबांनी १५ नोव्हेंबर १९२९ च्या 'बहिष्कृत भारता'-तील अग्रलेखात मतपरिवर्तनावर भर देणाऱ्या स्पृश्य मध्यस्थांना इशारा दिला, "सर्वच स्पृश्य हिंदू जनतेचे मतपरिवर्तन झाल्याशिवाय अस्पृश्यांना मंदिरप्रवेश नसावा असे जर त्यांचे मत असेल तर अस्पृश्यांना अनंत कालपर्यंत थांबावे लागणार आहे व तेवढ्याच कारणावरून हे मत अव्यवहार्य म्हणून सोडून दिले पाहिजे... ज्यांचे मत-परिवर्तन झाले नाही अशा स्पृश्य हिंदूंनी जर अस्पृश्यांस मंदिरप्रवेशाच्या बाबतीत अडथळा करण्याचे मनात आणले तर त्यांच्याविरुद्ध तरी अस्पृश्यांना सत्याग्रह हा करावाच लागणार आहे."[2] हा मजकूर लिहीत असताना बाबासाहेबांच्या डोळ्यां-समोर नाशिकचे कर्मठ भटभिक्षुक असावेत. नाशिकला सत्याग्रह समिती स्थापन झाली होती आणि तिने काळाराम मंदिराच्या पंचांना रीतसर नोटीसही पाठवली होती. देवस्थानच्या पंचांनी ताबडतोब उत्तर न देता मौन धारण केले होते.

१९२९ साली नाशकात नारायण चिदंबर ऊर्फ बाबूराव गाडगीळ हे 'कोहिनूर' नावाचे दैनिक चालवीत असत. या पत्राच्या ९ नोव्हेंबरच्या अंकात काळाराम मंदिराचे पंच कदाचित अस्पृश्यांना प्रवेश देण्यास तयार होतील अशी शक्यता असल्याचे सूचित करण्यात आले होते. तेव्हा पंचांनी तसे काही करण्यापूर्वीच स्पष्ट विरोध केलेला बरा या विचाराने काळाराम मंदिराच्या पुजाऱ्यांनी जाहीर खुलासा केला, "श्रीकाळाराम मंदिर पंचवटी या मंदिराचे व त्यातील देवाचे मालक किंवा वहिवाटदार पंच नाहीत व पूर्वापारचे देवस्थानचे व्यवस्थेत फेरबदल करण्याचा पंचांस कोणत्याच प्रकारचा अधिकार नाही .. श्रीचे मंदिर स्थापना वगैरे झाल्यानंतर श्रीस चौघडा असावा त्याप्रमाणे श्रीमंत रास्ते सरकारातून नेमणूक चौघड्याची होऊन त्याबद्दल त्या नेमणुकीवर पंच नेमले आहेत. मंदिर किंवा मंदिरातील श्रीच्या मूर्तीवर रास्ते यांचा कोणताही हक्कसंबंध नाही व नव्हता. अर्थात त्या बाबतीत पंचांनाही कोणत्याच प्रकारचा हक्क पोहोचत नाही. श्रीचे मंदिरात स्पृश्यासमुद्धा आतील गाभाऱ्यात

सोवळ्याने गेल्याशिवाय दर्शनाचा लाभ होत नाही. हे मंदिर सार्वजनिक नाही... आम्ही पुजारी असोन हे देवस्थान आमच्या ताब्यात आहे. पंचांचा या मंदिराशी किंवा देवस्थानाशी कमीजास्त करण्याचा अगर कोणास मंदिरात सोडण्याचा अगर मज्जाव करण्याचा अधिकार नाही. कदाचित स्वार्थबुद्धीने अस्पृश्यांस आपले अधिकाराचा दुरुपयोग करून पंच मंदिरप्रवेश करण्याची परवानगी देतील तर ते करणे निरर्थक ठरून प्रतिकार केला जाईल हे लक्षात ठेवावे."[३] मंदिराचे पुजारी प्रतिकाराची भाषा करीत दंड थोपटून उभे राहिल्याने मंदिरप्रवेशाचा प्रश्न सहजासहजी सुटण्यासारखा नाही हे १९२९ च्या नोव्हेंबरमध्ये स्पष्ट झाले होते.

नाशिक जिल्ह्यातल्या बाबासाहेबांच्या निष्ठावंत अनुयायांनी सत्याग्रहाची पूर्वतयारी करण्यास प्रारंभ केला होता. नाशिकच्या गोऱ्या जिल्हाधिकाऱ्याने गृहखात्याकडे पाठविलेल्या अहवालात ठिकठिकाणचे महार सभा भरवीत असल्याचे नोंदवलेले आहे. १७ नोव्हेंबर १९२९ रोजी देवळाली येथे झालेल्या सभेत नाशिक जिल्ह्यातील महारांचा एक संघ स्थापन झाल्याची नोंद सरकारी कागदपत्रात आढळते. नांदुरचे संभाजी येसू रोकडे हे त्याचे अध्यक्ष होते तर चिटणीस होते भाऊराव कृष्णाजी ऊर्फ दादासाहेब गायकवाड. प्रत्येक खेडेगावातील महार समाजाने किमान दहा रुपये वर्गणी द्यावी असे ठरविण्यात आले होते. नाशिक सत्याग्रहासाठी निधी जमवण्याचे काम नाशिकलगतच्या जिल्ह्यांतही चालले होते असे दिसते. २५ जानेवारी १९३० रोजी त्र्यंबकेश्वराला भरलेल्या निवृत्तिनाथांच्या यात्रेच्या वेळी सभा झाली. या सभेचे नियोजित अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभेला येऊ न शकल्याने अमृतराव रणखांबे यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पाडली. या सभेत भाऊराव गायकवाड, देवराव नाईक, शिंदे पाटील, शंकरदास बुवा वगैरेंची भाषणे झाली. जिल्ह्यातील वातावरण हळूहळू तापत होते. सत्याग्रहींची नोंदणी, निधीची जमवाजमव, तसेच प्रचार करण्यात भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, केशव नारायण देव ऊर्फ पतितपावनदास, शंकरदास बुवा वगैरेंनी पुढाकार घेतला होता.

नाशिकचा सत्याग्रह दोन मार्च १९३० रोजी सुरू करण्याचे आरंभी ठरले होते. त्यासाठी एक हजार स्वयंसेवकांनी नावे नोंदवली असल्याचे नाशिकच्या जिल्हा पोलिस अधीक्षकाने एक फेब्रुवारी १९३० ला सरकारला कळवल्याचे आढळते. मंदिराचे पुजारी व त्यांचे पाठीराखे यांनीही सभा भरवल्या होत्या. अशा एका सभेनंतर सखाराम अनंतबुवा पूजाधिकारी यांनी गव्हर्नरसाहेबांस तार ठोकून विनंती केली होती, "महारांच्या बेकायदेशीर कृत्यांना मनाई करण्यासाठी हुकूम द्यावेत."[४] १३ फेब्रुवारीला सवर्ण हिंदूंची एक जाहीर सभा झाली, त्या सभेस नाशिक जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष व्ही. बी. आकूत वकील, नीळकंठ पांडुरंग पाटणकर वकील वगैरे कॉंग्रेसचे कार्यकर्तेही हजर होते. या सभेत श्रीधर अण्णाशास्त्री आणि गोपाळशास्त्री पुराणिक

या दोघा शास्त्रीबुवांनी मंदिरात प्रवेश करण्याचा महारांना हक्क नाही असे प्रतिपादन केले तर नीळकंठराव पाटणकरांनी अस्पृश्यांची बाजू उचलून धरली. जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष आकूत वकील मात्र तटस्थ राहिले. काळाराम मंदिराच्या विश्वस्तांमध्ये रघुनाथ हरी गद्रे हे प्रसिद्ध कॉंग्रेसनेतेही होते. ते अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशास अनुकूल असल्याने मंदिराचे पुजारी त्यांना प्रखर विरोध करीत होते.

नाशिकचे काळाराम मंदिर हे महाराष्ट्रातील एक सुंदर देवालय आहे. १७८२ साली सरदार रंगराव ओढेकरांनी सुमारे तेवीस लाख रुपये खर्च करून हे देऊळ बांधले. वनवासात राम ज्या ठिकाणी राहिला त्या जागी हे देऊळ बांधले असल्याची भाविकांची समजूत आहे. देवळात सुवर्णालंकारांनी मढविलेली रामाची मूर्ती आहे. दरवर्षी रथयात्रा निघत असे तेव्हा किमान पाऊण लाख भाविक गर्दी करीत असल्याची नोंद बॉंबे गॅझेटियरने घेतलेली आहे. माधवराव पेशव्यांच्या मातोश्री गोपिकाबाई यांनी या देवस्थानास दोन रथ दिले. तेच रामनवमीनिमित्त होणाऱ्या उत्सवाच्या वेळी शहरभर मिरवीत नेले जातात. गोपिकाबाई सरदार रास्त्यांच्या कुटुंबात जन्मलेल्या असल्याने या रथांच्या देखभालीची व दुरुस्तीची जबाबदारी सरदार रास्त्यांच्या वंशजाकडे येणे क्रमप्राप्त होते. देवळाच्या भोवती सतरा फूट उंचीची भिंत असल्याची तसेच तीस फूट उंचीवर नगारखाना असल्याची नोंदही सापडते. उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम असे चार दरवाजे मंदिरात प्रवेश करण्यासाठी वापरले जात असत. त्यांपैकी पूर्वेकडचा दरवाजा हे मुख्य प्रवेशद्वार मानले जात असे.

२ मार्च १९३० रोजी सुमारे आठ हजार महार महारवाड्यात जमल्याचे नाशिकचे जिल्हाधिकारी आर. जी. गॉर्डन यांनी मध्यविभागाचे आयुक्त जे. घोषाळ (रवीन्द्रनाथ टागोरांचे मेहुणे) यांना कळवलेले आढळते. हे सारे लोक केवळ नाशिक जिल्ह्यातील निरनिराळ्या गावांतून आलेले नसून त्यांच्यामध्ये रत्नागिरीसारख्या दूरच्या भागातून आलेल्यांचाही समावेश होता. त्यांत महारांची संख्या नजरेत भरण्याजोगी असली तरी चांभार आणि मातंगही होते. ३ मार्च रोजी काय घडले ते कळवताना गॉर्डनने म्हटले आहे, "रेल्वे संपामुळे पोलिसांची संख्या फारच मर्यादित होती. म्हणून अहमदनगरहून पन्नास जादा पोलिसांची कुमक मागवली होती. देवळाचे दरवाजे बंद करण्याचा मी हुकूम दिला. अस्पृश्यांनी काढलेली जंगी मिरवणूक फार व्यवस्थित आणि शांततापूर्ण होती. दुपारी बारा वाजेपर्यंत सत्याग्रह सुरू झाला नव्हता. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली तीनशे सत्याग्रह्यांचे पथक होते. जोपर्यंत देवळाचे दरवाजे बंद आहेत तोपर्यंत सत्याग्रही दरवाज्याजवळ ठाण मांडून बसतील असे डॉ. आंबेडकरांनी मला सांगितले. कोणी दरवाज्यातून आत जाण्याचा प्रयत्न केला तर रांगेत जो पहिला त्याने आधी जावे या नियमानुसार सत्याग्रही आपल्या आधी देवळात शिरू पाहणाऱ्या इसमास प्रतिबंध करतील आणि शांततापूर्ण रीतीने पुढे घुसतील असेही ते म्हणाले. इतरांना

रोखणे आणि त्यांना मंदिरात जाऊ न देणे हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा होत नाही काय असे मी म्हणताच तसे करणे म्हणजे फौजदारी स्वरूपाचा गुन्हा करणे होय हे त्यांनी मान्य केले. मी भारतीय दंडसंहितेच्या १४४ कलमाखाली हुकूम दिला आणि महारांना तेथे बसण्यास मनाई केली तर काय कराल असे मी डॉ. आंबेडकरांना विचारले तेव्हा आपण व आपले सहकारी असा हुकूम पाळणार नाही असे ते म्हणाले. आता काय करावयाचे ?"

"नागरी अधिकार धाब्यावर बसवणाऱ्या महारांना भक्तांसाठी देवळाचे दरवाजे महिनाभर बंद करू देण्यास आपण परवानगी देता कामा नये, तसेच कायदा मोडण्याची डॉ. आंबेडकर धमकी देत असताना आपल्याला गप्प बसता येणार नाही. एक-दोन दिवसांनंतर आपण देवळाचे दरवाजे उघडावेत असे मला वाटते. महारांनी त्यात अडथळा आणला तर त्यांचा बंदोबस्त करावा लागेल. या साऱ्याचा माझ्यावर, डी. एस. पी. वर तर ताण पडला आहेच. मॅजिस्ट्रेटवरही फार ताण पडला आहे."[५]

तीन मार्चलाच रात्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखाली सवर्ण हिंदूंनी सभा घेतली. या सभेत नीळकंठराव पाटणकर वकिलांनी तडजोड करावी असे सुचवले तेव्हा कडव्या सनातन्यांनी सभेत हुल्लड माजवली. सनातन्यांनी सुधारणेस अनुकूल असणाऱ्या ब्राह्मणांवर दगड व जोडे फेकले. शंकराचार्यांनी तडजोड घडवून आणण्याच्या भानगडीत न पडता अलिप्त राहावे असे सनातन्यांचे म्हणणे होते. प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राने जरी अस्पृश्यांना मंदिरात येऊ द्यावे असे सनातन्यांना सांगितले तरी ते अस्पृश्यांना देवळात प्रवेश करू देणार नाहीत असे म्हणून अध्यक्ष डॉ. कुर्तकोटींना त्यांचे भाषण आवरते घ्यावे लागले.

३ मार्च १९३० रोजी सुरू झालेल्या या नाशिक-सत्याग्रहात डॉ. आंबेडकरांना सहाय्य करण्यासाठी सहस्रबुद्धे, देवराव नाईक, डी. व्ही. प्रधान या त्यांच्या सहकाऱ्यांखेरीज बाळासाहेब खेर व स्वामी आनंद हे कॉंग्रेस नेतेही नाशकात आले होते. नाशिकचे कॉंग्रेसचे कार्यकर्ते व पत्रकार बाळकृष्ण जनार्दन मराठे हेही बाबासाहेबांच्या बाजूला होते. देवळाचे दरवाजे जिल्हाधिकाऱ्यांच्या हुकमावरून बंद करण्यात आल्यावर चारी दरवाज्यांपाशी ठाण मांडून बसलेल्या सत्याग्रह्यांच्या पथकांचे नेतृत्व पतितपावनदास ( उत्तर दरवाजा ), श्री. कचरू मथुजी साळवे ( पूर्व दरवाजा ), पांडुरंग नथूजी राजभोज ( दक्षिण दरवाजा ), आणि शंकरदास नारायणदास बर्वे ( पश्चिम दरवाजा) हे चौघेजण करीत होते. खुद्द बाबासाहेब आणि भाऊराव गायकवाड ही सर्व व्यवस्था पाहात होते. दरवाजापाशी धरणे धरून बसलेल्या सत्याग्रह्यांमध्ये सदतीस स्त्रिया होत्या. नाशिक सत्याग्रहानंतर सुरू झालेल्या मिठाच्या कायदेभंगाच्या चळवळीत स्त्रियांनी देशभर फार मोठ्या प्रमाणात भाग घेतला याचे श्रेय महात्मा गांधींना दिले जाते ते योग्यच आहे. मात्र त्या आधी सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मुळशी सत्याग्रहात

मावळ्यांच्या स्त्रियांनी आणि बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली झालेल्या नाशिक सत्याग्रहात अस्पृश्य स्त्रियांनी भाग घेतला होता याचीही आठवण ठेवावयास हवी.

गांधीजींनी वेळोवेळी केलेले देशव्यापी सत्याग्रह परक्या राजवटीविरुद्ध होते तर बाबासाहेबांनी केलेले सत्याग्रह स्वकीयांविरुद्धचे लढे होते. एकाअर्थी परक्या राजवटी-विरुद्ध लढणे सोपे असते, कारण अशा लढ्यात बहुसंख्य स्वकीय प्रत्यक्ष लढ्यात उतरले नाहीत तरी त्यांचा मूकपाठिंबा व सहानुभूती लढणाऱ्यांच्या बाजूला असते. बाबासाहेबांची वाट बिकट होती. ते लढत होते बहुसंख्य देशबांधवांविरुद्ध आणि या लढाईत उच्च स्तरावरच्या इंग्रज अधिकाऱ्यांची सहानुभूती बाबासाहेबांना मिळत असली तरी हे परके राज्यकर्ते एका विशिष्ट मर्यादेपलीकडे बहुसंख्य प्रजाजनांना दुखविण्याचा धोका पत्करावयास तयार नसत. १८५७ सालच्या अनुभवांनी पोळलेल्या राज्यकर्त्यांनी त्या उठावानंतर धार्मिक व सामाजिक बाबतीत तटस्थपणाची भूमिका स्वीकारली. अस्पृश्यता नष्ट व्हावी असे व्यक्तिशः बऱ्याच उदारमतवादी इंग्रज अधि-काऱ्यांचे मत असले तरी त्यासाठी कायदे करून त्यांची कडक अंमलबजावणी करण्यास ते तयार नव्हते. तसे केले तर बहुसंख्याकांच्या नाजूक धर्मभावना दुखावल्याने ते बिथरतील असे त्यांना वाटत असे आणि तो धोका पत्करण्यास ते तयार नसत.

स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी किंवा पोलिस अधीक्षक यासारख्या ज्या अधि-काऱ्यांना सत्याग्रहासारख्या चळवळीमुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळावी लागत असे ते बहुधा या प्रश्नांकडे कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टिकोणातून पाहात असत. त्यांच्या या दृष्टिकोणाचा फायदा सवर्ण हिंदूंना मिळत असे. शेकडो वर्षे पडलेल्या प्रथा मोडण्याचा अस्पृश्यांनी प्रयत्न केला तर कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल या धास्तीने कासावीस झालेले इंग्रज अधिकारी बाबासाहेबांना आणि त्यांच्या अनुया-यांना शिष्टाचाराने वागा असा उपदेश करीत असत. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी असाच उपदेश करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना उद्देशून बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारता'तील ६ मे १९२७ च्या अग्रलेखात म्हटले होते, "आमचे इंग्रज सरकार प्रतिगामी जरी नसले तरी बरेच धीमे आहे. 'मार्च ऑन' करण्याऐवजी होता होईल तो 'मार्क टाइम' करण्याचे अवलक्षण त्यांच्या अंगी अगदी खिळून गेले आहे व सामाजिक प्रश्न आला की त्याचे पायच लटके पडतात."[६] त्यामुळे अस्पृश्यांनी स्पृश्यां-विरुद्ध जरी सत्याग्रह सुरू केला तरी अखेर त्याची परिणती इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध उभे राहण्यात होत असे. मग अर्थातच स्पृश्यांबरोबर लढताना इंग्रज राज्यकर्त्यांचेही वैर पत्करावयाचे काय असा पेच बाबासाहेबांसमोर उभा राहात असे. एकाच वेळी दोन शत्रूंबरोबर लढणे अस्पृश्यांना शक्य नव्हते. त्यामुळे सत्याग्रह स्थगित करून त्यानिमित्त झालेली लोकजागृती हा लाभ मानावयाचा आणि पुढच्या लढाईची तयारी करावयाची असे बाबासाहेबांना करावे लागत असे. किंवा न्यायालयात दीर्घकाळ

चालणाऱ्या खटल्यांचा निर्णय अस्पृश्यांचे बाजूने लागेल अशी आशा बाळगून तेथे आपल्या हक्कांचा प्रश्न त्यांना धसाला लावावा लागत असे. देशव्यापी सत्याग्रह-चळवळी करणाऱ्या गांधीजींच्या मार्गात या अडचणी नव्हत्या याचे भान ठेवावयास हवे. काळाराम मंदिराच्या सत्याग्रहासंबंधीचे तत्कालीन सरकारी कागदपत्र पाहताना बाबासाहेबांसमोर असलेल्या अडचणींची चांगली कल्पना येते.

नाशिकचे जिल्हाधिकारी गॉर्डन सत्याग्रहाने निर्माण झालेल्या परिस्थितीकडे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहात होते. २ मार्च रोजी आपण देवळाचे दरवाजे बंद करण्याचा हुकूम का दिला याचे स्पष्टीकरण देताना त्यांनी म्हटले आहे, "देवळा जवळच्या घरांमध्ये स्वयंसेवक (सवर्ण हिंदूंच्या बाजूचे) लपून बसले होते. जर महारांनी देवळात शिरण्याचा प्रयत्न केला असता तर लाठ्याकाठ्या घेऊन ते धावले असते. देवळाचे दरवाजे बंद केल्याने भीषण दंगलीचा धोका टाळता आला. दरवाजे पुन्हा उघडण्याचा प्रश्न आपल्याला फार काळ लांबणीवर टाकता येणार नाही."[७] गॉर्डनने पाठवलेल्या पत्राबाबत आयुक्त घोषाळ आणि गृहमंत्री अर्नेस्ट हॉटसन यांच्यामध्ये चर्चा झाली आणि घोषाळ यांनी नाशिकला भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी असे ठरले. नाशिकला जाण्याआधी घोषाळसाहेबांनी गॉर्डनला सूचना दिल्या, "(१) आपण पूर्णतया निःपक्षपाती असले पाहिजे. आपण प्रगत वर्गाची (सवर्ण हिंदूंची) किंवा अस्पृश्यांची कोणाचीच बाजू घेता कामा नये. आपण महारांनाही मदत करू नये तसेच महारांना देवळाबाहेरच ठेवू पाहणाऱ्या इतरांनाही साहाय्य करू नये, हे मुख्य तत्त्व लक्षात ठेवावे. (२) शांतताभंग होऊ नये यासाठी जी पावले उचलणे तुम्हाला आवश्यक वाटत असेल ती उचलणे तुमच्या हाती आहे. माझ्या माहितीप्रमाणे महार सत्याग्रही वर्तुळ करून किंवा भक्कम फळी तयार करून अडथळा आणणार नाहीत. लहान लहान गट करून ते रांगेत उभे राहतील; (दरवाजे उघडल्यावर प्रवेश करण्याचा) आपला हक्क इतरांबरोबर बजावतील. हे तुम्ही कसे थांबवू शकाल हे मला समजत नाही. शक्यतो मनाईहुकूम काढणे टाळावे असे हॉटसनना आणि मला वाटते."[८] वरिष्ठांच्या सूचनेनुसार गॉर्डनने सनातन्यांशी बोलणी करून काही तोडगा निघतो का ते पाहण्याचा प्रयत्न केला. सत्याग्रहामुळे निर्माण झालेल्या तंग परिस्थितीचे पडसाद नाशिकच्या परिसरात उमटू लागले. नाशिकजवळच्या पाथर्डी गावी सवर्ण हिंदूंनी केलेल्या तक्रारीमुळे दहा महारांना पोलिसांनी अटक केली.

नाशकात ६ मार्चला घडलेल्या एका घटनेची नोंद टाइम्स ऑफ इंडियाच्या ८ मार्च १९३० च्या अंकात घेतलेली दिसते. काळाराम मंदिराच्या दरवाज्यापाशी धरणे धरून बसलेल्या महार सत्याग्रहींना पाहून एका वृद्ध ब्राह्मणाचे अंतःकरण इतके हेलावले की त्याने सत्याग्रह्यांना साहाय्य म्हणून आपल्या जवळच्या थैलीतील सर्व पैसे देऊन थैली रिती केली. महार सत्याग्रहींची निष्ठा पाहून राममंदिराच्या दगडी भिंतींना पाझर

फुटेल पण सनातन्यांची हृदये द्रवणार नाहीत असा अभिप्रायही या वृद्ध ब्राह्मणाने दिला.

मंदिरप्रवेशाच्या प्रश्नाची झालेली कोंडी फोडण्यासाठी सनातन्यांनी न्यायालयाकडे धाव घ्यावी आणि तात्पुरता का होईना मनाईहुकूम मिळवावा असा एक उपाय गॉर्डनने सनातनी भटभिक्षुकांना सुचवला. पण त्यांनी ही सूचना फेटाळली. महारांनीच वाटल्यास न्यायालयात जावे असे सनातन्यांचे म्हणणे होते.[१] ८ मार्चला आयुक्त घोषाळसाहेब नाशिकला आले. या प्रकरणात वाजवी तडजोड होण्यासारखी असेल तर ती आपण मान्य करू असे डॉ. आंबेडकरांनी आयुक्तांना सांगितले. या बोलण्याच्या वेळी बाबासाहेबांच्या बाजूने गायकवाड, प्रधान आणि बाळासाहेब खेरही हजर होते. [काळाराम मंदिर खासगी मालकीचे आहे असा पुजाऱ्यांचा दावा होता तर त्याला दर वर्षी एक हजार रुपये अनुदान सरकारकडून मिळत असल्याने ती सार्वजनिक मालमत्ता ठरते असे अस्पृश्यांच्या वतीने सांगण्यात येत होते आणि ते खरेही होते. आकूत वकिलांच्या नेतृत्वाखाली सनातन्यांच्या शिष्टमंडळाने जेव्हा घोषाळसाहेबांची भेट घेतली तेव्हा मंदिर खासगी मालकीचे असल्याचे सिद्ध करण्यास आवश्यक असा कोणताही कागदोपत्री पुरावा त्यांना सादर करता आला नाही.

नाशिकला जाऊन आल्यानंतर आयुक्त घोषाळांनी हॉटसनसाहेबांस लिहिले, "मी आताच नाशिकहून परतलो. मला आधी वाटत होते त्यापेक्षा हे प्रकरण खूपच गंभीर आणि गुंतागुंतीचे आहे. देवळाला सरळसरळ वेढा घालण्यात आला आहे. सकाळी मला तेथे डॉ. आंबेडकर भेटले तेव्हा त्यांनीही ते कबूल केले. शंभर महार तेथे गीते गात असून अधूनमधून उंच आवाजात युद्धघोषणा देत आहेत. तेथे बऱ्याच स्त्रियाही आहेत. खाकी पोषाख केलेले आणि हातात काठी घेतलेले लोक पहारा देत आहेत. सत्याग्रह्यांचा वेश खादीचा होता आणि त्यांच्या डोक्यावर गांधी टोप्या होत्या. त्या त्यांना नुकत्याच देण्यात आल्या होत्या. दर पाच-दहा मिनिटांनी सत्याग्रह्यांनी भरलेल्या लॉऱ्या येत होत्या. [आपल्या मार्गात अडथळा आणणारा कोणताही हुकूम पाळला जाणार नाही हे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले. गॉर्डन, रेनॉल्डस (जिल्हा पोलिस अधीक्षक) आणि मी सकाळी जेव्हा तेथे गेलो तेव्हा धरणे धरून बसलेल्या महारांपैकी कोणीही उठून उभा राहिला नाही. त्यांच्यापैकी बरेचजण खेड्यातून आलेले वतनदार महार आहेत. मी त्यांच्याशी बोलत असतानाही ते उठून उभे राहिले नाहीत. आंबेडकर येताक्षणीच ते आनंदाने उड्या मारू लागले, त्यांना सलाम करू लागले. 'गांधीजी की जय' अशा घोषणाही काहींनी दिल्या. सत्याग्रहाची मोहीम कोणालाच आवडत नाही. केवळ ब्राह्मणच नव्हे तर मराठे, खरे म्हणजे सर्व हिंदूंचाच सत्याग्रहास विरोध आहे... नाशिक परिसरातल्या खेडेगावातील महारांवर तेथील सवर्णांनी बहिष्कार घातलेला आहे. अशा परिस्थितीत महारांना उत्तेजन देणे म्हणजे त्यांची खरी सेवा करण्यासारखे ठरणार नाही. या चळवळीचे स्वरूप धार्मिक असण्यापेक्षा जास्त

प्रमाणात सामाजिक व राजकीय आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १४७ व्या कलमानुसार गॉर्डनने ताबडतोब कारवाई करावी असे मला वाटते."[१०] खेड्यातले वतनदार महारही आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक यांना डरत नव्हते. त्यांच्याकडून मुजरे घेण्याची सवय झालेल्या गोऱ्या व काळ्या साहेबांना महारांचे वागणे कसे आवडत नव्हते हे घोषाळांच्या पत्रावरून स्पष्ट दिसते. आंबेडकरी चळवळीने जागविलेल्या स्वाभिमानाची अशी प्रचिती आल्यानंतर वरिष्ठ अधिकारी अस्वस्थ झाले होते.

१४७ कलमाखाली कारवाई करण्याची घोषाळांची सूचना मुंबई सरकारने फेटाळली. नाशिक सत्याग्रहाबाबत घेतलेला आक्रमक पवित्रा त्यांच्या वरिष्ठांना पसंत न पडल्यामुळे असेल कदाचित २६ मार्च १९३० रोजी त्यांची बदली करण्यात आली आणि त्यांच्या जागी मध्यविभागाचे आयुक्त म्हणून ए. डब्ल्यू. डब्ल्यू. मॅकाय काम पाहू लागले. काळाराम मंदिराच्या पुजाऱ्यांनी घेतलेले आक्षेप सरकारला ग्राह्य वाटत नसल्याचे त्यांनी अधिकारसूत्रे हाती घेताच पुजाऱ्यांना कळवले. दरम्यान पुजारी आणि त्यांचे पाठीराखे एक नवीच चाल खेळले. त्यामुळे धरणे धरून बसलेले सत्याग्रही आणि त्यांचे विरोधक यांच्यामधील तणाव अधिकच वाढला. काळाराम मंदिराच्या उत्तर दरवाज्यालगत पुजाऱ्याचे निवासस्थान होते. पुजाऱ्याच्या घरी जाण्याचे निमित्त करून सवर्ण हिंदू त्या घरातून देवळात जाऊ लागले. तेव्हा पुजाऱ्याच्या घरासमोर सत्याग्रह करावा असा पर्याय पुढे आला. याबाबतच चर्चा करावी म्हणून भाऊराव गायकवाडांनी जिल्हाधिकारी गॉर्डनची भेट मागितली. १६ मार्च १९३० रोजी गॉर्डनने गायकवाडांना चिठ्ठी पाठवून कळवले, "या प्रकरणात तुम्हाला भेटण्यास मी नकार देत आहे. मी डी. एस. पी. बरोबर सहमत आहे. नवीन कोणताही सत्याग्रह सुरू होता कामा नये. कोणी केला तर अशा सत्याग्रहात भाग घेणाऱ्यांना दूर हटवण्यात येईल."[११] गायकवाडांनी ही हकीगत बाबासाहेब आंबेडकरांना कळवली. त्यानंतर बाबासाहेबांनी गव्हर्नरसाहेबांस पत्र लिहिले.

"...ज्या दिवशी आम्ही सत्याग्रह सुरू केला त्या दिवशी पुजाऱ्याच्या घरचा दरवाजा आम्ही जाणूनबुजून रोखला नाही. त्या खासगी दरवाज्याचा वापर लोकांना करू देऊन त्यांना देवदर्शन घडविले जाणार नाही असे आम्ही गृहीत धरले होते. अलीकडे देवळात शिरण्यासाठी या दरवाज्याचा सार्वजनिकरीत्या उपयोग केला जात आहे. हे चालू दिले तर सत्याग्रहाचे मुख्य उद्दिष्टच संपूर्णतया फसेल. तसे होऊ नये म्हणून सत्याग्रह समितीने या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी, समितीचे हेतू समजावून सांगण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांना भेटण्याचा प्रयत्न केला. पुजाऱ्यांच्या घराच्या दरवाज्यातून फक्त त्यांच्या कुटुंबियांना येऊ जाऊ द्यावयाचे. इतरांना या खासगी मालकीच्या दरवाज्याचा सार्वजनिक प्रवेशद्वारासारखा उपयोग करू द्यावयाचा नाही असे सत्याग्रह समितीने ठरविले. जिल्हाधिकाऱ्याने मात्र

समितीच्या सभासदांना भेटण्यास नकार दिला आणि त्यांना चिठ्ठी पाठवून घालवून दिले. जिल्हाधिकाऱ्याचे हे वागणे शहाणपणाचे आहे की नाही याबद्दल मी काही मत देत नाही. पण जिल्हाधिकाऱ्याचा दृष्टिकोण असाच राहिला तर त्यामुळे सरकार आणि दलित यांच्यामध्ये ताबडतोब संघर्ष सुरू होईल. आमचा खरा लढा स्पृश्य हिंदूबरोबर आहे, ज्यामुळे स्पृश्य हिंदू बाजूला पडून सरकार व दलित असा सामना सुरू होईल अशी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका टाळण्याचा मी सारखा प्रयत्न करीत आहे. सरकार विरुद्ध संघर्ष करण्याचा आमचा उद्देश असता तर पहिल्याच दिवशी देवळाबाहेर पोलिसांनी उभ्या केलेल्या अडथळ्याबाहेर उभे राहण्यास सत्याग्रहींनी नकार दिला असता आणि देवळाच्या दरवाज्यालगत बसण्यासाठी त्यांनी पोलिसांची साखळी तोडून घुसण्याबाबत आग्रह धरला असता, असे आम्ही केले नाही. कारण ही लढत आमच्या व सरकारच्या मधे व्हावी अशी आमची इच्छा नाही. मात्र या प्रकरणात निःपक्षपाती राहण्याचा मूळ हेतू सोडून जर सरकारने पुजाऱ्याच्या घराच्या दरवाज्याचा सार्वजनिक वापर होऊ दिला आणि अशा तऱ्हेने आमच्या सत्याग्रहाचे उद्दिष्टच विफल केले तर सरकारबरोबरची लढत अटळ आहे. कोणत्याही परिस्थितीत आम्ही पुजाऱ्याचा हा स्टंट चालू देणार नाही: आमचा सत्याग्रहच निष्फळ ठरावा म्हणून केले जाणारे प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. मग त्यासाठी सरकारबरोबर संघर्ष करावा लागला तरी आम्हाला त्याची पर्वा नाही."[१२]

जिल्हाधिकारी गॉर्डन यांची कृती सवर्णांच्या बाजूने पक्षपात करणारी आहे असे गृहमंत्री हॉटसन यांना वाटले आणि टिप्पणी करताना त्यांनी स्पष्ट अभिप्राय दिला. "ते स्पृश्यांची बाजू घेत आहेत असे दिसते. पुजारी आणि त्यांचे कुटुंबीय यांना घरच्या दरवाज्यातून ये-जा करण्यास जोपर्यंत अस्पृश्य हरकत घेत नाहीत तोपर्यंत कायदेशीर मार्ग वापरून ते जर इतरांना तो दरवाजा वापरण्यास मनाई करतील तर त्यांना तसे करण्यास प्रतिबंध करण्याचा जिल्हाधिकाऱ्यास अधिकार नाही." गॉर्डनवर ठपका ठेवणारा हा अभिप्राय गृहसचिव कॉलिन्स यांनी आयुक्त मॅकाय यांच्यामार्फत गॉर्डनला कळवला. तेव्हा उत्तरादाखल गॉर्डनने लिहिले, "माझी बाजू ऐकून घेण्यापूर्वीच माझ्यावर ठपका ठेवला जात आहे. डॉ. आंबेडकरांनी पत्रात सांगितलेली हकीकत बव्हंशी बरोबर आहे. पुजाऱ्याने निमंत्रण दिल्यामुळे बाहेरचा कोणीही इसम पुजाऱ्याच्या घराच्या दरवाज्यातून जाऊ लागला तर त्याला मनाई करण्याचा कोणालाही अधिकार नाही. जे असा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करतील ते 'रॉंगफूल रिस्ट्रेंट' हा दखलपात्र गुन्हा करतील. असे दखलपात्र गुन्हे कोणीही करू नये यासाठी खबरदारी घेणे हे जिल्हाधिकारी म्हणून माझे एक कर्तव्य आहे. मात्र या प्रकरणात मला अधिकृत आदेश दिले जावेत. डॉ. आंबेडकरांच्या पत्राचा सूर धमकीचा आहे. त्याबद्दल त्यांना समज दिली नाही, आणि त्यांना अशीच दमदाटी करू दिली तर मला माझे काम

करणे कठीण होईल."[१३] 'रॉंगफूल रिस्ट्रेंट'संबंधीची तरतूद भारतीय दंडसंहितेच्या ३४१ कलमात केलेली आहे. तिचा गॉर्डनने लावलेला अर्थ चुकीचा आहे असे त्यांच्या वरिष्ठांचे मत होते. पुजाऱ्याच्या कुटुंबियांनी किंवा त्याच्या मित्रांनी पुजाऱ्याच्या घरच्या दरवाज्याचा वापर करणे आणि सर्व जनतेने तो दरवाजा वापरणे यामध्ये फार फरक होता. तो गॉर्डन लक्षात घ्यावयास तयार नव्हते.

काळाराम मंदिर—सत्याग्रहाबाबतचे वृत्त देताना आठशे शीख यात्रेकरू सत्याग्रहात सामील झाल्याचे टाइम्स ऑफ इंडियाने म्हटले होते. सत्याग्रह्यांसाठी असलेले दोनशे बिल्ले त्यांना देण्यात आले आणि त्यांनी पंधरा रुपये सत्याग्रह-निधीला दिले असेही टाइम्सच्या वार्ताहराचे म्हणणे होते.[१४] हे वृत्त अतिरंजित व चुकीचे होते. नाशिकला यात्रेकरू म्हणून नव्हे तर प्रवासी म्हणून गेलेल्या शिखांच्या वतीने सरदार अमरसिंग आणि प्राध्यापक सिंग यांनी टाइम्समधील वृत्ताचा इन्कार केला. शिखांनी काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला नाही, तसेच त्यांनी आपल्या मागोमाग येण्याचे अस्पृश्यांना आवाहनही केले नाही असा खुलासा करण्यात आला. सच्चा शिखाला हिंदू मंदिरात जाण्याचे काहीच कारण नसते असेही या खुलाशात म्हटले होते.[१५] काळाराम मंदिरप्रवेशाबाबतच्या तंट्यात तोड काढण्यासाठी डॉ. नारायणराव सावरकर, डॉ. मा. भै. उदगावकर आणि भालचंद्र धडफळे या तिघा हिंदुमहासभेच्या कार्यकर्त्यांनी एक सूचना केली. स्पृश्यांना जेवढ्या अंतरावरून देवदर्शन घेता येते तेवढ्याच अंतरावरून अस्पृश्यांनाही देवदर्शन घेता यावे असे त्यांनी सुचवले. स्पृश्यांसही हिंदू देवालयाच्या गाभाऱ्यात जाऊन देवदर्शन घेण्याची परवानगी दिली जात नाही. मात्र मंदिरात त्यांना विशिष्ट हद्दीपर्यंत येऊ दिले जाते. तेथपर्यंत अस्पृश्यांना येऊ देण्याची सावरकर, उदगावकर व धडफळे या त्रयीची सूचना सनातन्यांनी ताबडतोब फेटाळली.

रामनवमी जवळ आली म्हणून १ एप्रिल १९३० रोजी पुजाऱ्यांनी काळाराम मंदिराचे दरवाजे उघडले, तेव्हा सत्याग्रहास पुन्हा सुरुवात झाली. सत्याग्रहींची धरपकड करण्यास सुरुवात झाली. बापूसाहेब राजभोज यांच्यासकट बारा सत्याग्रह्यांना ३ एप्रिल रोजी अटक करण्यात आली. त्यांपैकी दोन स्त्रियांना लगेच सोडून देण्यात आले. गॉर्डनच्या वरिष्ठांनी यावर टिप्पणी करताना लिहिले, "जोपर्यंत न्यायालय प्रतिकूल निर्णय देत नाही तोपर्यंत स्पृश्यांप्रमाणेच अस्पृश्यांनाही मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार आहे अशीच गॉर्डनने भूमिका घ्यावयास हवी." याउलट रामनवमीच्या दिवशी दंगल होण्याचा धोका असल्याचा गॉर्डन वरिष्ठांना इशारा देत होते. रामनवमीच्या दिवशी ७ एप्रिल १९३० रोजी काळाराम मंदिरात प्रवेश करणाऱ्यांना त्यांच्या जातिपातीची चौकशी करून आत सोडण्यात येत होते. 'कोहिनूर' पत्रात एकाने लिहिले, "ता. ७ एप्रिल १९३० रोजी शेकडो अस्पृश्य आत गेले परंतु ते जात

सांगत असूनही 'बुवा, रागावू नका, तुम्हास कोण महार म्हणतो पण आम्हास विचारावे लागते, येथे अस्पृश्यांचा सुळसुळाट झाला आहे म्हणून विचारतो. रागावू नका. बुवा, या; असे एक एक जा!' म्हणून पाठविले. त्या वेळी बॅजेस मात्र लावलेले नव्हते. शेवटी रामाचे देवळात रामजन्माचे वेळी ६ अस्पृश्य तरुण आत बसले असता त्यांपैकी २ इसमांस ओळखून जात विचारताच त्यांनी महार म्हणून सांगितले. पुढे त्यांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येऊन पूर्वदरवाज्यावर असलेल्या पोलिस-अधिकारी तंबूकडे नेले... नावे लिहून सत्याग्रही महार सखाराम तात्याबा जाधव, रामचंद्र गवळे यांना सोडून देण्यात आले. एका अस्पृश्य मुलीस पुजाऱ्याने मागे लोटताच तिने फाडकन पुजाऱ्याच्या तोंडात भडकावली. तोंडात खाऊन पुजारी कसे स्पृश्य राहिले!"[१६] त्याआधी ४ व ५ एप्रिलला भाऊराव गायकवाडांसकट ६८ महार सत्याग्रहींना पोलिसांनी पकडल्याचे गॉर्डनने आयुक्त मॅकाय यांना कळवले. तेव्हा गृहसचिव जी. एफ. एस. कॉलिन्स यांनी आयुक्तांना लिहिले, "कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कारवाई करतानाही ज्यामुळे एका पक्षाला दुसऱ्या पक्षाविरुद्ध सरकार साहाय्य करीत आहे असे वाटेल अशी कोणतीही कारवाई जिल्हाधिकाऱ्याने करू नये. देवळाच्या पुजाऱ्यांना आणि अन्य अधिकाऱ्यांना दिवाणी न्यायालयात जावयास सांगितले पण त्यांनी तसे करण्यास नकार दिला आहे."[१७] ७ एप्रिलला दोनशे महारांचे पथक डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली मिरवणुकीने पुजाऱ्याच्या घराजवळून गेले. रामनवमीच्या दिवशी शांतताभंग झाला नाही तरी ९ एप्रिलला निघणारी रथयात्रा शांततेने पार पडेल याची सरकारी अधिकाऱ्यांना आणि सत्याग्रहींना खात्री वाटत नव्हती.

रथयात्रेत रथ ओढून नेण्याच्या कामात स्पृश्यांबरोबर अस्पृश्यही भाग घेत असत. ही प्रथा अनेक वर्षांपासून रूढ होती. पण ७ एप्रिल रोजी काही अस्पृश्यांनी मंदिरात प्रवेश केल्याने देऊळ भ्रष्ट झाले, बिटाळले, असे सनातन्यांना वाटले. त्यामुळे ९ तारखेस निघणाऱ्या रथयात्रेच्या वेळी अस्पृश्यांना धडा शिकवायचा मंदिर-प्रवेश प्रतिबंधक समितीने निर्धार केला होता. सनातन्यांनी प्रकरण हातघाईवर नेल्यास आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तर देण्याचा सत्याग्रहींचा हक्क आहे अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. महात्मा गांधींनी मांडलेले सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान आणि डॉ. आंबेडकरांनी विशद केलेले सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान या दोहोंमध्ये काही मूलभूत महत्त्वाचे फरक होते. जेथे सत्याग्रह करणाऱ्याकडून हिंसेचा अवलंब केला जातो, तेथे जे घडते त्याला सत्याग्रह म्हणता येणार नाही असे गांधीजी सांगत असत. याउलट "हिंसा किंवा अहिंसा ही केवळ आग्रहाच्या सिद्धीची साधने" असल्याने हाती घेतलेले "कार्य जर सत्कार्य असेल तर त्याबाबतीत धरलेल्या आग्रहास सत्याग्रह म्हटलेच पाहिजे" असे बाबासाहेब म्हणत होते. "शक्य असेल तोवर अहिंसा, जरूर पडेल तर हिंसा असे

धोरण सत्याग्रही माणसांनी ठेवणे हे सिद्धीच्या दृष्टीने रास्त आहे इतकेच नव्हे तर नीतीच्या दृष्टीनेही ते प्रशस्त आहे," असे बाबासाहेब सांगत असत.[१८] त्यामुळे वेळ आली तर वापर करता यावा म्हणून अस्पृश्य सत्याग्रह्यांनी लाठ्याकाठ्याही जवळ ठेवलेल्या होत्या. उभयपक्षी प्रकरण हातघाईवर येऊ नये म्हणून ९ एप्रिलला रथयात्रा निघण्यापूर्वी श्री. पांडेप्रभृतींच्या खटपटीने तडजोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. "रथ ठेवण्याच्या जागेपासून श्रीराम मंदिराच्या पूर्व दरवाज्यापर्यंत स्पृश्य हिंदूंनी रथ आणावयाचा व तेथून पुढे विमान सर्वस्वी अस्पृश्यांनी न्यावयाचे व रथ मात्र स्पृश्य व अस्पृश्य यांनी मिळून न्यावयाचा असे ठरले."[१९] या तडजोडीनुसार अस्पृश्य मंडळींनी श्रीरामनाम आधाराश्रमाच्या पूर्वेस असलेल्या चरणपादुकांच्या आसपास जमावयाचे असेही ठरले होते. ही तडजोड मंदिरप्रवेश प्रतिबंधक समितीस मान्य झाली नाही. त्या समितीच्या धुरिणांनी रथाच्या मिरवणुकीशी आपला कसलाही संबंध नाही असे सरकारास कळवले.

९ एप्रिलला ठरल्याप्रमाणे अस्पृश्यांसह रथाची मिरवणूक श्रीराम मंदिरापासून निघावयाची होती. परंतु सनातन्यांनी ठरलेल्या वेळेच्या आधीच रथ व विमान घाई-घाईने ओढत नेण्यास सुरुवात केली. तेव्हा चरण-पादुकांजवळ थांबलेल्या अस्पृश्यांनी विमान व रथ अडवला आणि मिरवणुकीत भाग घेण्याचा हक्क प्रस्थापित केला. बोलाचालीचे पर्यवसान मारामारीत झाले. रथाची मिरवणूक बाजूस राहून ठोकाठोकी आणि दगडफेक होऊ लागली. त्यातून पोलिसही सुटले नाहीत. नगरकर आडनावाच्या पोलिस उपनिरीक्षकाने पोलिसांना बाजूला घेतले. हे त्याचे कृत्य शेळके आडनावाच्या पोलिस उपनिरीक्षकास पसंत पडले नाही. "त्याने आपली तुकडी घेऊन सर्व अस्पृश्यांस एकजात सीतागुंफेकडे रेटीत नेऊन त्यांच्या सुमारे २००० लोकसमुदायास कोंडून धरले. या वेळी नाबरसाहेब व इतर पोलिस यांना बराच मार लागला."[२०]

९ एप्रिलच्या दंगलीची माहिती जिल्हाधिकारी गॉर्डनने ९ व १० एप्रिलला आयुक्तास पत्रे पाठवून कळविली. ९ एप्रिल रोजी लिहिलेल्या पत्रात गॉर्डनने म्हटले आहे, "आज दुपारी नाशिकमध्ये दंगल झाली. दोन रथांची मिरवणूक काढली जाते. रथ ओढण्याबाबतच्या महारांच्या हक्काबद्दल मी डॉ. आंबेडकरांशी विचारविनिमय केला होता. त्यांचे मत लक्षात घेऊन रथयात्रा काढण्यास परवानगी दिली गेली. मी आणि डी. एस. पी. चहा प्यावयास गेलो होतो. २६ जणांना दुखापती झाल्या. त्यांपैकी बहुतेक महार आहेत. जखमा फार खोल नसून वरवरच्या आहेत. अर्धा डझन सनातन्यांना अटक केली आहे. मी डॉ. आंबेडकरांना भेटलो. या सर्व प्रकाराचे त्यांना काहीच वाटलेले दिसले नाही. असे काही तरी घडेल अशी त्यांना अपेक्षा होती असे ते म्हणाले. दुःखकष्ट सोसल्यानंतरच आपण हाती घेतलेले कार्य तडीस जाईल असे ते म्हणाले. आपल्या कृतींच्या परिणामाविषयी ते फार बेदरकार आहेत असे वाटते. काही

महारांच्या झोपड्या जाळल्या गेल्या."[२१]

९ एप्रिलची दंगल कशी झाली हे गॉर्डननी सांगितले आहे. "नेहमीच्या रस्त्याने मोठा रथ देवळाकडे आणला गेला नाही तर तो बराच वळसा घालून आणला गेला. अपेक्षा होती त्यापेक्षा कितीतरी आधी तो आणला गेला म्हणून जे पोलिस अधिकारी रथाबरोबर आरंभापासून जाणार होते ते नियोजित जागी आले तेव्हा रथ आधीच तेथून नेल्याचे त्यांना आढळले. महारांना रथयात्रेत भाग घेण्याची संधी न देता सनातन्यांनी रथ ओढीत नेला. महार पुढे धावले आणि त्यांनी रथाचे दोरखंड घट्ट पकडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तंट्याला सुरुवात झाली. महारांचे सर्वमान्य हक्क लबाडीने हिरावून घेण्याची सनातनी ब्राह्मणांची ही युक्ती होती. दगड आणि अन्य हत्यारे घेऊन महारांवर योजनापूर्वक हल्ला चढविण्याच्या आरोपातून सनातन्यांना दोषमुक्त ठरवले पाहिजे. महारांवरील हल्ला पूर्वनियोजित होता यात कसलाच पुरावा नाही. दंगलीत दोन सायकली आणि एका मोटारीचे नुकसान झाले. चार छोटी दुकाने जाळली गेली. एकूण ६७०० रुपयांचे नुकसान झाले असावे असा अंदाज आहे. दोन हजार महारांना मोठ्या महारवाड्याकडे कूच करावे लागले...सत्याग्रहाची कल्पना सोडून देण्याबाबत डॉ. आंबेडकरांना सल्ला द्यावयास हवा."

"विधानमंडळसदस्य डॉ. आंबेडकर यांना इतरांबरोबर एका मोकळ्या घराचा आश्रय घ्यावा लागला. मोठ्या मुश्किलीने ते घर सोडण्याबाबत त्यांचे मन वळवता आले. आंबेडकरांनी पोलिसांवर पक्षपाताचा आरोप केला. फक्त मुसलमान व महार पोलिस बंदोबस्तासाठी ठेवावयास हवे होते असे ते म्हणाले. गेले काही दिवस देवळाजवळ आपण बरेच पोलिस बंदोबस्तासाठी ठेवल्याने ते आणि त्यांचे अनुयायी वाचले. नाहीतर यापेक्षा वाईट हल्ल्यांना त्यांना तोंड द्यावे लागले असते. हे लक्षात घेतले तर डॉ. आंबेडकरांची वरील मते त्यांच्या अंगी कृतज्ञतेचा अभाव असल्याचे दर्शवितात. अस्पृश्यांची वाजवीपेक्षा जास्त वेगाने प्रगती साधण्याची इच्छा हे खरे या दंगलीचे प्रत्यक्ष कारण आहे. अस्पृश्यांना सोसाव्या लागणाऱ्या अडचणींमुळे मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटत असली तरी डॉ. आंबेडकर आणि त्यांचे सहकारी फार लवकर सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत असे मला वाटते. रक्तपात टाळावयाचा असेल तर नाशिकचा सत्याग्रह यापुढे चालू देऊ नये असे मला वाटते."[२२]

गॉर्डनसाहेब अस्पृश्यांविषयी आपणास सहानुभूती आहे असे म्हणत असले तरी त्यांच्या कृती सनातन्यांना अनुकूल होत्या. सामाजिक क्रांतीबद्दल त्यांना आस्था नव्हती. कायदा आणि सुव्यवस्थेस ज्यामुळे धोका पोचेल असा कोणताच कार्यक्रम त्यांना नको होता. म्हणून सरकारने डॉ. आंबेडकरांना सांगून सत्याग्रह स्थगित करावयास लावावा असे त्यांनी आपल्या वरिष्ठांच्या मागे टुमणे लावले होते. वरिष्ठ अधिकारी त्यांच्या कृतीवर सारखी टीका करीत होते, तेही गॉर्डनना आवडत नव्हते.

प्रत्यक्ष जागेवर जो असतो त्याने घेतलेल्या निर्णयास संपूर्ण पाठिंबा देण्याचे इंग्रज सरकारचे धोरण असे. हा संकेत आपल्या बाबतीत पाळला जात नाही असे गॉर्डनना वाटत होते. १० एप्रिलला कॉलिन्स या गृहसचिवास लिहिलेल्या पत्रात गॉर्डननी वैतागाने म्हटले, "रेनॉल्डस (डी. एस. पी.) आणि मी थकलो आहोत. आणि हे असेच चालू राहिले तर आम्हाला यापुढे काम करता येणार नाही. आम्ही रात्रंदिवस बाहेर असतो. आम्ही जे जे करतो त्यावर टीका केली जाईल अशी भावना आमच्या मनात सारखी घर करून असते. आमच्या शारीरिक आणि मानसिक सहनशीलतेलाही मर्यादा आहे. हे कधी कोणी लक्षात घेईल की नाही याची मला शंका वाटते."[२३] १० एप्रिलला संध्याकाळी सत्याग्रह केला जाणार या बातमीने गॉर्डनसाहेब अस्वस्थ झाले. त्यांनी मुंबईस तार केली, "आणखी दंगल टाळावयाची असेल तर सत्याग्रह ताबडतोब थांबवला पाहिजे. अधिकारी आणि पोलिस आता फार दमले आहेत." या तारेला सरकारने तारेने उत्तर पाठवले ते असे, "कालच्या (९ एप्रिलच्या) दंगलीला सनातनी संपूर्णतया जबाबदार आहेत असे सरकारला वाटते."[२४] गॉर्डनसाहेबांच्य सुदैवाने डॉ. आंबेडकरांना तातडीच्या कामानिमित्त नाशिक सोडून जावे लागले म्हणून त्यांनी सत्याग्रह करावयाचा नाही असे ठरवले आणि त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांना हायसे वाटले. त्यांनी ती आनंदाची वार्ता सरकारला ताबडतोब तारेने कळवली.

९ एप्रिलच्या दंगलीत डॉ. आंबेडकर आणि भास्करराव कद्रेकर जखमी झाल्याचे वृत्त टाइम्स ऑफ इंडियाने १० एप्रिल १९३० च्या अंकात प्रसिद्ध केले होते. टाइम्सच्या वृत्तानुसार जखमींची संख्या शंभराहून जास्त होती. अनेक महार स्त्रियांना सनातन्यांनी बेदम मारहाण केली. त्यांपैकी एका स्त्रीला जिल्हाधिकारी गॉर्डननी वाचवले आणि मोटारीत घालून इस्पितळात पोचवले असे टाईम्सच्या वार्ताहराचे म्हणणे होते. मात्र खुद्द गॉर्डननी याबाबत मौन बाळगलेले दिसते. ११ एप्रिल १९३० रोजी आयुक्त मॅकायना धाडलेल्या पत्रात गॉर्डननी लिहिले, "आपल्याला काहीजणांनी रामकुंडाजवळ फेकून दिले असे काल एक जखमी महार तरुण मला म्हणाला. त्याला त्यांना ओळखता आले नाही. महारांनी सत्याग्रह करावयाचा नाही असे ठरवल्याने प्रथम पकडले गेलेल्या आणि जामीन देण्यास नकार देणाऱ्या दहा सत्याग्रह्यांच्या विरुद्ध भरलेला खटला आज काढून घेण्यात आला आणि त्यांना मुक्त करण्यात आले. मात्र उद्या जेव्हा डॉ. आंबेडकर येथे येतील तेव्हा ते त्यांचे मन वळवतील आणि पुन्हा सत्याग्रह सुरू करण्याचा प्रयत्न करतील अशी शक्यता आहे. तसे झाल्यास मी १४४ कलमाखाली दिलेले आदेश तसेच जारी ठेवावयाचे की रद्द करावयाचे याबद्दल निर्णय घ्यावा लागेल."[२५]

डॉ. आंबेडकरांनी मुंबईस जाऊन गृहमंत्री अर्नेस्ट हॉटसन यांची भेट घेतली असे

दिसते. या भेटीनंतर हॉटसनसाहेबांनी १३ एप्रिलला फायलीत नोंद केली, " जिल्हाधिकाऱ्यांच्या हुकमानुसार निदान काही दिवस आपण सत्याग्रह लांबणीवर टाकू असे शुक्रवारी डॉ. आंबेडकर म्हणाले. सत्याग्रह मागे घेण्याचाही ते कदाचित निर्णय घेतील पण डॉ. आंबेडकर सत्याग्रह चालू ठेवण्याच्या दृष्टीने आपले वजन वापरतील अशी शक्यता आहे." नाशिकचा सत्याग्रह चालूच राहिला. फक्त जिल्हाधिकाऱ्यांनी १४४ कलम जारी केल्यामुळे देवाच्या दरवाज्यापाशी धरणे देणे किंवा तेथे घुटमळणे शक्य नसल्याने सत्याग्रह्यांनी एका नव्याच तंत्राचा अवलंब केला. पाचाहून कमी जणांच्या छोट्या तुकड्यांमध्ये सत्याग्रहींची विभागणी करून देवळाभोवती सारखे घिरट्या घालीत राहावयाचे आणि गस्त घालावयाची असे धोरण स्वीकारले गेल्यामुळे पुजाऱ्यांना देवळाचे दरवाजे बंदच ठेवावे लागले.

Imp. [डॉ. आंबेडकरांनी नाशिकचा सत्यग्रह मागे घ्यावा असे मुंबई सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाटत होते याचे एक महत्त्वाचे कारण होते. १२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधींनी मिठाचा कायदा मोडण्यासाठी ७९ सहकाऱ्यांसह दांडीयात्रा सुरू केली. एप्रिल १९३० मध्ये गांधीजींना सरकारने पकडले नसले तरी अन्य कॉंग्रेस-नेत्यांची व कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली होती. गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनामुळे देशभर निर्माण झालेली परिस्थिती हाताळावी कशी या चिंतेत चूर असलेल्या मुंबई इलाख्यातील इंग्रज राज्यकर्त्यांना, नाशिकच्या सत्याग्रहाची अडचण होऊ लागली होती. नाशिकचा सत्याग्रह सुरू झाला तेव्हा बाळासाहेब खेर, स्वामी आनंद वगैरे गांधीवाद्यांनी आंबेडकरांना दिलेली साथ, सत्याग्रह्यांचा खादीचा वेष, सत्याग्रह्यांनी केलेला महात्मा गांधींचा जयजयकार वगैरे बाबी मुंबई सरकारला आवडल्या नव्हत्या. याउलट सविनय कायदेभंगाचे आंदोलन जोर पकडू लागताच नाशिकच्या सत्याग्रहास आधी पाठिंबा देणारे कॉंग्रेस कार्यकर्तेही महात्मा गांधींची चळवळ चालू असेपर्यंत अस्पृश्यांनी मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह करू नये असे म्हणू लागले. १२ एप्रिलला नाशिकच्या डी.एस.पी.ने तारेने सरकारला कळवले, " भाऊराव गायकवाडांना तार पाठवून डॉ. आंबेडकरांनी मुंबईला बोलावून घेतले आहे. नाशिकचा सत्याग्रह मागे घेण्यास आणि आपली सर्व साधनसामग्री गांधींच्या हवाली करण्यास देवरुखकर हे मुंबईचे पुढारी अनुकूल आहेत अशी बोलवा आहे." देवरुखकरांनी अशी सूचना बाबासाहेबांना केली किंवा नाही हे आज निश्चित सांगता येत नाही. जरी त्यांनी असे बाबासाहेबांना सुचविले असे मानले तरी बाबासाहेबांनी ही सूचना धुडकावून लावल्याचे नंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट दिसते.

१३ व १४ एप्रिल १९३० रोजी आयुक्त मॅकाय यांनी नाशिकला भेट दिली. गॉर्डनबरोबर झालेल्या चर्चेनंतर त्यांनी गृहसचिव कॉलिन्सना कळवले, " ज्या आणीबाणीच्या परिस्थितीमुळे १४४ कलम जारी करावे लागते ती परिस्थिती आता राहिलेली

नाही, हे गॉर्डननी कबूल केले. मात्र इतर बाबतींत ते आपल्या कल्पनांना अद्याप चिकटून आहेत हे त्यांच्या स्वभावानुसारच आहे. विशेषतः पुजाऱ्याच्या घराच्या दरवाज्यासमोर पुजाऱ्यास आधी तशी कल्पना देऊन सत्याग्रह करू देण्याबाबतची आपली मते बदलण्याचे ते टाळीत आहेत. म्हणूनच सरकारच्या कायदेविषयक सल्लागाराचे मत घ्यावे असे ते या कल्पनेला मी विरोध केला असतानाही सुचवीत आहेत. सरकारने घालून दिलेली धोरणाची पायाभूत तत्त्वे उघडउघड स्वीकारण्यास त्यांच्या मनाची अजून तयारी दिसत नाही. ”[२६] गॉर्डनच्या सूचनेनुसार कायदेविषयक सल्लागारांचे मत अजमावले गेले तेव्हा त्यांनी पुजाऱ्याच्या घराच्या दरवाज्यासमोर निरोधने करण्यास पोलिस अनुमती देऊ शकणार नाहीत हे गॉर्डनचे मत उचलून धरले.

गृहविभागाने याबाबत जे टिपण तयार केले त्यात मात्र पुजाऱ्याच्या घराच्या दरवाज्यासमोर सत्याग्रह करण्यास मनाई करण्याची जिल्हाधिकाऱ्याची कारवाई त्या दरवाज्याने देवळात शिरू पाहणाऱ्या सनातन्यांना सहाय्य करणारी असल्याचे मत नोंदविलेले आढळते. पुजाऱ्याचे घर हा देवळाचा भाग नाही किंवा त्याच्या घराच्या ज्या दरवाज्याने देवळात जाता येते तो खासगी मालकीचा आहे असे मानण्यास सबळ पुरावा नाही असेही या टिपणात म्हटले होते. खेरीज पुजारी ही त्रयस्थ व्यक्ती नसून देवळाचा नोकर आहे यावर टिपणात भर दिला होता. तरीही तत्कालीन राजकीय परिस्थितीमुळे डॉ. आंबेडकरांनी सत्याग्रह थांबवावा असे गृहमंत्री हॉटसन यांना वाटत होते. त्यांनी १९ एप्रिल १९३० ला शेरा मारला, “ डॉ. आंबेडकरांना बोलावून त्यांना आपण सत्याग्रहास अनुमती देणार नाही आणि म्हणून त्यांनी तो थांबवावा असे आपण सांगितले पाहिजे. ”

२८ एप्रिलला सत्याग्रह पुन्हा सुरू झाला. त्या दिवशी देवळाच्या उत्तर, दक्षिण व पश्चिम दरवाज्यापाशी सत्याग्रहींवर दगडफेक करण्यात आली. त्यांच्या डोक्यावर घाण पाणी ओतण्यात आले. त्याआधी २७ एप्रिलला रक्तबंबाळ झालेला एक महार पोलिसांकडे आला आणि त्याने नाशिकपासून सुमारे पाच मैल अंतरावर पिंपळगावला सवर्ण हिंदूंनी महारांवर हल्ला केल्याचे वृत्त सांगितले. ज्यांच्यावर हल्ला करण्यात आला त्या सहा महारांमध्ये एक म्हातारा, दोन स्त्रिया आणि एक लहान मुलगा होता. आपल्याला घरातून बाहेर ओढीत नेऊन हंटरने फोडून काढण्यात आले अशी एका स्त्रीने तक्रार केली.[२७] ९ एप्रिलच्या सत्याग्रहातही स्त्रियांना मारहाण करण्यात आली होती, पण त्याबाबत बहुतेक वृत्तपत्रांनी मौन बाळगले होते. ‘इंडियन सोशल रिफॉर्मर’-सारख्या समाजसुधारकांचे मुखपत्र असलेल्या वृत्तपत्रानेही या घटनेची साधी दखल घेतली नव्हती. मग त्यावर टीका करण्याचे बाजूलाच राहिले.

सनातन्यांच्या विरोधामुळे आणि सुधारक म्हणवणाऱ्यांच्या उदासीनतेमुळे अस्पृश्यांच्या मनावर जे परिणाम झाले होते त्यांचाही कोणी विचार करीत नव्हते. [पन्नास

अस्पृश्यांनी हिंदू धर्माचा वीट आल्याने धर्मांतर करण्याचे आणि मुसलमान बनण्याचे ठरवले. तेव्हा प्राध्यापक सबनीस व रा. वि. ओतूरकर या दोघांनी त्यांची विनवणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही भाऊराव गायकवाडांमार्फत या मंडळींना संदेश पाठवला "सत्याग्रहामुळेही सवर्ण हिंदूंचे हृदयपरिवर्तन होत नाही हे पाहून हिंदू धर्माचा अस्पृश्यांना त्याग करावासा वाटला तर ते मी समजू शकतो. माझ्या बांधवांनी आणखी थोडे थांबावे आणि त्यांच्या प्रयत्नामुळे हिंदू धर्माचा उद्धार होतो का ते पाहावे अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे." बाबासाहेबांच्या या संदेशामुळे पन्नास जणांपैकी ४३ जणांनी धर्मांतराचा बेत सोडून दिला.[२८] सात जणांनी मात्र आधी ठरविल्याप्रमाणे इस्लामचा स्वीकार केला.

नाशिक सत्याग्रहातील सवर्ण हिंदूंच्या वर्तनाने वैतागून मुसलमान झालेल्यांमध्ये एक ब्राह्मणही होता. त्याची अवस्था धर्मांतर केल्यावरही कशी झाली होती याबद्दलची हकीगत नाशिक सत्याग्रहाचे एक नेते केशव नारायण देव ऊर्फ पतितपावनदास यांनी चालवलेल्या 'पतितपावन' या वृत्तपत्रात दिलेली आढळते. ३० ऑगस्ट १९३०च्या 'पतितपावन' पत्राच्या अंकात खालील मजकूर आढळला. "श्री. गणेश आबाजी कुलकर्णी देशस्थ ब्राह्मण हे बरेच दिवसांपासून अस्पृश्य मानलेल्या लोकांत राहून अस्पृश्यता निवारणाची चळवळ करीत असत. इतकेच नव्हे तर ते नेहमीच अस्पृश्य मानलेल्या मोहल्ल्यात राहात असून तेथेच आपले आयुष्य घालवीत असत. ५–६ महिन्यांपूर्वी अस्पृश्य मानलेल्या हिंदूंनी पंचवटीतील श्रीकाळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह आरंभिला होता. श्री. कुलकर्णी हे अगदी सुरुवातीपासून या सत्याग्रहात पडले होते. इतकेच नव्हे तर अस्पृश्यतेचा हिंदू धर्मास लागलेला डाग धुऊन टाकण्याची जबाबदारी सर्वस्वी ब्राह्मणांवरच आहे अशा विचारसरणीचे ते होते. परंतु सत्याग्रह चालू असताना त्या दरम्यान गावात 'रामलीलेनिमित्त होणारे हिंदूंचे धार्मिक खेळ पाहण्यास गेले असता काही स्पृश्य गुंडांनी त्यांना बेदम मारले व ते ज्या वेळी काही कामानिमित्त गेले असता कधी शिव्या तर कधी मार याशिवाय श्री. कुलकर्णी यांना हिंदू धर्मीयांनी येऊ दिले नाही. स्पृश्य हिंदूंच्या या अरेरावी वर्तनास कंटाळून शेवटी त्यांनी मुसलमानी धर्माचा स्वीकार केला व गणेश आबाजी कुलकर्णी यांचे खानमहंमद झाले. हे मि. खानमहंमद परवा देवळालीस काही कामानिमित्त गेले असता येथे असलेल्या एका हॉटेलात जेथे मुसलमानांना बसण्यास स्वतंत्र सोय केलेली आहे अशा ठिकाणी बसले व हॉटेलवाल्याजवळ चहा मागितला. हॉटेलवाल्यांनी मि. खानमहंमद यांना शिव्या हासडून आपल्या हातातील काठीने यथेच्छ झोडपले असल्याचे समजते."[२९] आपण मुसलमान झाल्यास आपल्या मागे मुसलमान समाज उभा राहील आणि आपले रक्षण केले जाईल या कल्पनेने धर्मांतर करण्यास व इस्लामचा स्वीकार करण्यास काही हिंदू तयार होत होते. असुरक्षित वाटल्यामुळे किंवा सवर्ण हिंदूंबद्दलच्या संतापा-

मुळे आजही अशा घटना घडताना दिसतात.

२५ मे १९३० रोजी सत्याग्रहाची चळवळ स्थगित करण्यात आली तोपर्यंत जिल्हाधिकारी गॉर्डन यांना स्वस्थता लाभलेली नव्हती. आधीच मिठाच्या कायदेभंगामुळे निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीत त्यांनी बाळकृष्णपंत मराठे, गोविंद हरी देशपांडे वगैरे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या धरपकडीचे सत्र सुरू केल्याने वातावरण गरम होते. त्यात काळाराम मंदिराच्या दरवाज्यापासचे अस्पृश्य सत्याग्रही गॉर्डनसाहेबांची डोकेदुखी वाढवीत होते. नाशिकचा सत्याग्रह चालू ठेवून डॉ. आंबेडकर आपल्या अडचणींत भर टाकीत आहेत असे गॉर्डनना वाटत होते. बाबासाहेबांबद्दल त्यांच्या मनात खदखदत असलेला राग आयुक्त मॅकाय यांना १० मे १९३० रोजी पाठवलेल्या अहवालात उमटलेला दिसतो. गॉर्डनसाहेब म्हणतात, "आपला सामाजिक दर्जा सुधारावा अशी महारांना इच्छा झाल्यास प्रत्येकाला सहानुभूतीच वाटली पाहिजे. मात्र व्यावहारिक दृष्टीने पाहिल्यास सत्याग्रहासारख्या मार्गाने आपली उद्दिष्टे साध्य करणे त्यांनाच कितपत जमेल याबद्दल दाट शंका आहे. डॉ. आंबेडकर त्यागातून मुक्ती मिळवण्याची भाषा बोलत असले तरी सगळा त्याग इतर करीत आहेत, आणि ते स्वतः काहीच त्याग करीत नाहीत असे मला दिसून आले आहे. खरे म्हणजे खेड्यापाड्यातील ज्या महारांचा सार्वत्रिक छळ केला जात आहे त्यांच्याविरुद्धची भावना अधिक तीव्र होण्यातच सध्याच्या सत्याग्रहाची परिणती होत आहे आणि खेड्यापाड्यांतील महारांना हे परवडण्यासारखे नाही. फार त्रास होत असल्यामुळे नाशिकचे काही महार सत्याग्रह थांबवावा म्हणून माझी विनवणी करीत आहेत. पोलिसांच्या संरक्षणाखाली होणाऱ्या सत्याग्रहामुळे इष्ट परिणाम कसा होईल हे मला समजत नाही."[३०] गॉर्डनसाहेबांच्या सुदैवाने डॉ. मुंजे, खापर्डे वगैरेंनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून काही महिने सत्याग्रह स्थगित करण्याचा निर्णय सत्याग्रह समितीने घेतल्यामुळे गॉर्डनसाहेबांची डोकेदुखी काहीशी कमी झाली.

२ ऑगस्ट १९३० रोजी पतितपावनदास यांनी नाशिकला 'पतितपावन' साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाचे फक्त पाचशे अंक छापले जात असत.[३१] पहिल्याच अंकात आपण वृत्तपत्र का सुरू केले हे सांगताना संपादकांनी म्हटले होते, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'बहिष्कृत भारत' सांपत्तिक मदतीच्या अभावामुळे बंद पडल्यापासून अशा एका वर्तमानपत्राची फार जरूर भासू लागली आहे. कोणतेही दुःख वेशीवर टांगल्याशिवाय त्याची दाद लागत नाही हे तर खरेच, पण अस्पृश्यांची चारी बाजूंनी अशी मुस्कटदाबी होते की, त्यांच्या दुःखाला कोठे तोंडच फुटत नाही. म्हणून अस्पृश्यांच्या परिस्थितीचे निवेदन करणे हे एक या पत्राचे ध्येय राहील."[३२] मे अखेर डॉ. मुंज्यांच्या आवाहनानुसार सत्याग्रह स्थगित केल्यानंतर 'बहिष्कृत सहाय्यक मंडळ' नावाचे एक मंडळ स्थापन करण्यात आले होते. त्याची अवस्था कशी झाली याचे

यथार्थ वर्णन पतितपावनने पहिल्याच अंकात केले होते : " डॉ. मुंजे येथे होते तोपर्यंत काही वकील मंडळी व प्रोफेसर मंडळी यांनी थोडे हातपाय हलविले पण एकदा ती लाट जाताच सर्वच थंडगार पडले. भिक्षुक मंडळ तर दुरूनच मौज पाहण्याचा खेळ खेळत आहे... एकीकडे अस्पृश्यांना पायाखाली तुडवत असता दुसरीकडे गांधी टोपी चढवून आपण स्वातंत्र्यवीर आहो असे मिरवणारे लोक जगातील दहावे आश्चर्य म्हणून नमुन्यादाखल दाखविण्यास हरकत नाही."

बाबासाहेब आंबेडकरांना मात्र 'पतितपावन' वृत्तपत्र सुरू करण्याचा पतितपावनांचा विचार मुळीच आवडला नव्हता. भाऊराव गायकवाडांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली नाराजी स्पष्ट शब्दात व्यक्त केली. " पतितपावनदासबुवा 'पतितपावन' नावाचे वृत्तपत्र काढणार आहेत असे ऐकतो. हे खरे असेल तर मात्र ही गोष्ट चांगली नाही. अशा गोष्टीचा निषेध केला पाहिजे. माझ्याबद्दल तुमचा गैरसमज होऊ देऊ नये पण आपल्यात जर स्पृश्यांसारखी दुही व दुरावा होऊ लागला तर आपल्या संघटनेला धोका आहे. जर पतितपावनदासबुवा किंवा तुमच्यापैकी कुणालाही वर्तमानपत्र काढण्याची इच्छा असेल तर तुम्ही आपले बंद पडलेले 'बहिष्कृत भारत' हेच वर्तमानपत्र चालवायला का घेत नाही ? "[३३]

८ व ९ ऑगस्टला नागपूरच्या व्यंकटेश नाट्यगृहात अखिल भारतीय दलित परिषद भरली. या परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आंबेडकरांनी सायमन आयोगाच्या शिफारशी अस्पृश्यांना देऊ केलेल्या प्रतिनिधित्वाच्या संदर्भात निराशाजनक असल्याचे म्हटले. कॉंग्रेसने १९२९ अखेर संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी करणारा ठराव मंजूर केला असला तरी ती मागणी अव्यवहार्य असून देशाच्या तेव्हाच्या स्थितीत विनाशकारक ठरेल असा अभिप्राय बाबासाहेबांनी दिला आणि त्यांनी साम्राज्यांतर्गत वसाहतीच्या स्वराज्याची मागणी उचलून धरली. दीर्घकाळ कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात इंग्रजांनी मिळवलेल्या यशाबद्दल प्रशंसा करताना इंग्रजी राजवट ही अत्यंत महागडी असून ती जाणूनबुजून भारतातील व्यापार व उद्योगधंदा यांची वाढ होऊ देत नाही अशी टीका बाबासाहेबांनी केली. इंग्रजांच्या धोरणामुळे भारत हा कंगाल लोकांचा देश बनला आहे असे सांगून इंग्रजांनी अस्पृश्यांसाठी काहीही केले नाही असेही ते म्हणाले. सवर्ण व अस्पृश्य यांच्यासाठी एकच पाणवठा असावा, अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करता यावा, तसेच त्यांना पोलिसात व लष्करात दाखल होण्याची संधी मिळावी यासाठी इंग्रजांनी काहीही केले नाही याची बाबासाहेबांनी दलितांना आठवण करून दिली.

गांधीजींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीलाही त्यांनी विरोध केला. गोलमेज परिषदेत वाटाघाटी करून शांततामय मार्गांनी प्रश्न सोडविण्याची संधी आलेली असताना ती लाथाडून सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्यात कॉंग्रेसने

घोडचूक केली असे बाबासाहेबांना वाटत होते. दलितांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करता सविनय कायदेभंगाची चळवळ अनिष्ट ठरेल असेही ते म्हणत होते. महात्मा गांधींची चळवळ घटनेला धरून नाही ही मवाळांची टीका मात्र आपल्याला मान्य नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आणि नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाची अप्रत्यक्ष रीत्या आठवण करून देत बाबासाहेबांनी दलितांना विचारले, "तुमची मंदिर प्रवेशाची चळवळ घटनेस धरून नाही असे सनातनी सांगू लागले तर तुम्ही काय म्हणाल ? प्रत्यक्ष कृतीऐवजी सनातन्यांकडे अर्ज करणे, न्यायालयात दावे दाखल करणे आणि कायदा बदलून घेण्याचा प्रयत्न करणे हीच योग्य पद्धत आहे असे कोणी म्हटले तर तुम्ही काय म्हणाल ? सनातन्यांविरुद्ध तुम्ही चालवलेल्या स्वातंत्र्ययुद्धात तुमच्यावर कोणी अशा मर्यादा घातल्या तर तुमचे समाधान होईल काय ? जर सर्वांना मान्य असलेली घटना अस्तित्वात नसेल तर घटनात्मक मार्ग वापरण्याचा उपदेश ऐकण्यास फारच थोडे लोक तयार होतील."[३४] याचा अर्थ असा की मिठाचा कायदा मोडण्याची गांधीजींची चळवळ डॉ. आंबेडकरांना अकाली व निष्कारण सुरू केलेली वाटत असली तरी सत्याग्रहासारखे जनआंदोलन करण्यास त्यांचा विरोध नव्हता. नाशिकचा सत्याग्रह त्यांनी डावपेच म्हणून तात्पुरता स्थगित केला असला तरी तो मागे घेतला नव्हता. सत्याग्रहासारख्या कृती कायद्यास किंवा घटनेस धरून नाहीत हा मवाळ पक्षाचा आक्षेप त्यांना ग्राह्य वाटत नव्हता.

त्यामुळे नाशिकच्या त्यांच्या अनुयायांनीही मंदिरप्रवेश सत्याग्रहासंबंधी सभा भरवून प्रचार करणे चालूच ठेवले. ४ ऑगस्ट १९३० रोजी मौजे एरंडगाव येथे अमृतराव धोंडिबा रणखांबे यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा झाल्याचे वृत्त 'पतित-पावन'ने दिले आहे.[३५] तुळशीराम संभाजी काळे, राणूजी वाघ, जयराम सखाराम अहिरे आणि भाऊराव गायकवाड या बाबासाहेबांच्या अनुयायांची भाषणे होऊन मंदिरप्रवेश सत्याग्रहाला पाठिंबा देण्यात आला. याच दिवसांत मुंबई सरकारने अस्पृश्य व आदिवासी यांच्या उन्नतीचे उपाय सुचविण्यासाठी स्टार्ट यांच्या अध्यक्षते-खाली नेमलेल्या दहा सभासदांच्या समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला होता. समितीत एल. एम. देशपांडे हे एकच दक्षिणी ब्राह्मण सदस्य होते आणि त्यांनी अहवालास भिन्नमतपत्रिका जोडली होती. स्टार्ट समितीच्या शिफारशी अस्पृश्य व आदिवासी यांना शैक्षणिक सुविधा व सवलती देण्यासंबंधी होत्या. त्या सरकारने शक्य तितक्या लवकर अंमलात आणाव्यात असे बाबासाहेबांना आणि त्यांच्या अनुयायांना वाटत होते. ऑगस्ट १९३० रोजी मुंबईचे गव्हर्नर सर फ्रेडरिक साईक्स यांनी सहकुटुंब नाशिकला भेट दिली तेव्हा नाशिक जिल्हा अस्पृश्य संघामार्फत त्यांना मानपत्र देण्यात आले, त्यात स्टार्ट समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या मागणीस अग्रस्थान दिले होते. नाशिकच्या श्रीशाहू छत्रपती वसतिगृहाला मिळणारे अनुदान वाढवावे, नाशिक

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अस्पृश्यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व द्यावे पुणे जिल्ह्याप्रमाणेच नाशिक जिल्ह्यातही अस्पृश्यांतील सुशिक्षितांस बेंच मॅजिस्ट्रेट, नेमावे, अस्पृश्यांना पेरणीसाठी जंगलजमिनी दिल्या जाव्यात वगैरे मागण्या या मानपत्रात केल्या होत्या.[३५] मानपत्रावर अध्यक्ष म्हणून संभाजी येसू रोकडे आणि उपाध्यक्ष म्हणून अमृतराव रणखांबे आणि रावबा पुंजाजी ठेंगे यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. नाशिकच्या या पहिल्याच भेटीत गव्हर्नरसाहेबांनी काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाबाबत जिल्हाधिकारी वगैरे अधिकाऱ्यांशी चर्चा करणे स्वाभाविक होते.

सप्टेंबर १९३० च्या पहिल्या आठवड्यात गोलमेज परिषदेसाठी सरकारने निमंत्रित केलेल्या मंडळींची नावे प्रसिद्ध झाली. त्यांत डॉ. आंबेडकरांचेही नाव होते. ६ सप्टेंबर १९३० रोजी बाबासाहेबांनी भाऊराव गायकवाडांना लिहिलेल्या पत्रात तसा स्पष्ट उल्लेखही केलेला आढळतो. ६ सप्टेंबरलाच अस्पृश्य मानलेल्या मंडळींनी विंचूर येथे गणपती विसर्जनानिमित्त सभा भरवली आणि "काळाराम मंदिर-प्रवेश सत्याग्रहाचे लढ्यात तडजोड घडवून आणण्यासाठी नेमलेले 'बहिष्कृत सहाय्यक मंडळ' ज्या अर्थी काही तडजोड घडवू शकत नाही त्याअर्थी अस्पृश्य मानलेल्या वर्गांनी आपल्या पायावर उभे राहून मंदिरप्रवेश सत्याग्रहाचा लढा लवकरच सुरू करावा असे सर्वानुमते ठरले."[३६] गोलमेज परिषदेसाठी प्रतिनिधी म्हणून सरकारने बाबासाहेबांना निमंत्रित केले याबद्दल सरकारचे तसेच बाबासाहेबांचे अभिनंदन करण्यासाठी नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी सभा घेण्यात आल्या.

२८ सप्टेंबर १९३० रोजी सायंकाळी नाशिक रोड येथे दंगल उसळली. दंगलीचे कारण किरकोळ वाटण्याजोगे होते. केशव माधव सोनवणे नावाचा एक महार मुलगा मदाऱ्याचा जादूचा खेळ पाहात "मराठे मंडळींच्या पुढे बसलेला पाहून मराठ्यांना बराच राग आला व सदर मुलास तेथून उठून जाण्यास मराठे सांगू लागले." मुलाने उठून जाण्यास नकार दिल्याने त्याला शिवीगाळ तर केली गेलीच, शिवाय मुलाला वहाणेने मारण्यात आले. मराठे व महार दोघेही शिवीगाळ करू लागले. पतितपावनने दिलेल्या बातमीनुसार "शिव्यांचे रूपांतर मराठ्यांनी महारांवर दगड फेकण्यात केले. महारांची संख्या सुमारे ३००–४०० होती तर मराठ्यांची सुमारे २–३ हजार होती. शेवटी महारांना दगडांचा मारा असह्य झाल्याने स्वसंरक्षणार्थ त्यांनी प्रतिकार केला. अकरा महारांना अटक करण्यात आली असून दोन मराठ्यांना अटक केली आहे."[३८] नाशिक रोडच्या या दंगलीचे प्रकरण न्यायालयात जाणे अटळ होते. अखेर ४ ऑक्टोबरला सर्व आरोपींनी गुन्हा कबूल केल्यामुळे त्यांना प्रत्येकी दहा ते वीस रुपये दंड करण्यात आला.

२९ सप्टेंबर १९३० रोजी मुंबईत परळ भागात बाबासाहेबांचे अनुयायी आणि बाळकृष्ण जानूजी देवरुखकर व त्यांचे पाठीराखे कॉंग्रेस कार्यकर्ते यांच्यामध्ये चकमक

उडाली होती. त्या आधी काही दिवसांपूर्वी बाळकृष्ण देवरुखकर यांनी मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये बाबासाहेब भाषण करीत असताना त्यांची सभा उधळण्याचा प्रयत्न केला होता. डॉ. आंबेडकर व रावबहादूर श्रीनिवासन हे दोघे गोलमेज परिषदेला जाणार असल्याने त्यांचा निषेध करण्यासाठी देवरुखकरांनी कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या मदतीने कामगार मैदानावर सभा भरवण्याचे ठरवले आणि सभेबाबतच्या हस्तपत्रिका वाटून आगाऊ जाहिरातही केली होती. टाऊन हॉलमधील सभा उधळण्याच्या प्रकाराचा वचपा काढण्यासाठी म्हणून बाबासाहेबांचे सुमारे एक हजार अनुयायी हातात सोटे तसेच चाबूक घेऊन जय्यत तयारीनिशी दामोदर हॉलमागच्या बाबासाहेबांच्या कार्यालयासमोरील पटांगणात संध्याकाळी जमा झाले. देवरुखकरांनी आयोजित केलेली सभा रात्री आठ वाजता सुरू होणार होती. तेथे बाबासाहेबांचे हे अनुयायी मिरवणुकीने आले. त्यांनी कॉंग्रेसच्या स्वयंसेवकांची फळी फोडली आणि ते आत घुसले. एफ वॉर्ड कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस स. बा. महाडेश्वर यांनी शांतता प्रस्थापित करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. कोलाहल वाढत गेला आणि अध्यक्ष वीरचंद पानाचंद शहा यांच्या अंगावर दगड येऊन पडला. पाली भाषेचे व बौद्ध धर्मग्रंथांचे गाढे अभ्यासक म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवलेले धर्मानंद कोसंबी हे प्रकांड पंडित कॉंग्रेसचे कार्यकर्ते म्हणून सभेस हजर होते. अध्यक्ष वीरचंद शहा यांनी सभा चालू ठेवावी असा कोसंबींनी आग्रह धरला पण अध्यक्षांनी सभा बरखास्त केली.

देवरुखकर आणि त्यांचे पाठीराखे कॉंग्रेस कार्यकर्ते यांची सभा उधळल्यानंतर बाबासाहेबांचे अनुयायी “ विजयाने प्रफुल्लित होऊन ” पुनः दामोदर हॉलच्या मागील पटांगणात मिरवणुकीने गेले. त्यांच्यासमोर भाषण करताना बाबासाहेब म्हणाले, “ हिंदुस्थानातील सात कोटी अस्पृश्यांसाठी कॉंग्रेसने काय केले ? महाड, नाशिक, पर्वती वगैरे ठिकाणी मी अस्पृश्यांच्या हक्कांसाठी भांडत होतो परंतु त्या वेळी ही कॉंग्रेस कुठे होती ? उलट नाशकाला मी केलेल्या चळवळीला जर कोणी सर्वांत जास्त विरोध केला असेल तर तो तेथील कॉंग्रेस कमिटीच्या सनातनी अध्यक्षांकडून होय. अशी ही कॉंग्रेस आम्ही का मानावी ? आम्हा अस्पृश्यांतील पुढारी कोण याची निवड करण्याचा कॉंग्रेसला काय हक्क ? मी तुमचा पुढारी आहे हे तुम्ही जाणताही. रा. टे. परिषदेला जाण्याच्या बाबतीत कॉंग्रेसशी माझा मतभेद आहे आणि मी माझ्या जातीसाठी तेथे जातो आहे हे मी तुम्हाला बजावून सांगत आहे.”[३१] कॉंग्रेसची सविनय कायदेभंगाची चळवळ चालू असताना आणि गोलमेज परिषदेवर कॉंग्रेसने बहिष्कार घातलेला असता डॉ. आंबेडकरांनी सरकारी आमंत्रण स्वीकारून लंडनला परिषदेसाठी जाणे हे कॉंग्रेस कार्यकर्त्यांना निषेधार्ह कृत्य वाटत होते. म्हणूनच देवरुखकरांनी भरवलेल्या सभेस वीरचंद शहा, धर्मानंद कोसंबी, महाडेश्वर वगैरे मुंबई प्रांतिक कॉंग्रेस समितीचे कार्यकर्ते हजर राहिले होते.

२ ऑक्टोबर १९३० रोजी दामोदर हॉलमागच्या पटांगणात बाबासाहेबांना मानपत्र व थैली अर्पण करण्याचा समारंभ डॉ. सोळंकी यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्या वेळी केलेल्या भाषणात परिषदेपासून निदान अस्पृश्यवर्गाचा तरी फायदा झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास व्यक्त करून त्यांनी परिषदेवर बहिष्कार घालणाऱ्या कॉंग्रेसवाल्यांना विचारले, " जर दोन पक्षांत लढाई जुंपली तर तहाची भाषा बोलणे काय वाईट ? आज सरकार व कॉंग्रेस यांच्यामध्ये निकराचा लढा चालू आहे. कॉंग्रेसच्या चळवळीमुळे सरकारचे नुकसान होत असता, दोन्ही पक्ष हट्टास पेटले असता कोणीतरी मध्यस्थी करून तडजोडीचा मार्ग काढून भांडण मिटविणे अवश्य आहे. हा तडजोडीचा मार्ग रा. टे. कॉन्फरन्सद्वारा निघू शकेल."[४२]

४ ऑक्टोबरला बाबासाहेब विलायतेस गेले. नाशिक रोड येथे झालेल्या दंगलीतून उद्‌भवलेल्या खटल्याचा त्या दिवशी निकाल लागला; पण ते विलायतेच्या वाटेवर असल्याने त्यांना तो कळला नाही. घार आकाशात उंच उडत असली तरी तिचे लक्ष नेहमी घरट्यातील पिलांवर असते असे म्हणतात. बाबासाहेबांचीही तशीच स्थिती होती. ११ ऑक्टोबर १९३० रोजी भाऊराव गायकवाडांना बोटीवरून लिहिलेल्या पत्रात नाशिक रोडवरच्या प्रकारातून उद्‌भवलेल्या फौजदारी खटल्याचे काय झाले हे लवकर कळविण्याविषयी त्यांनी लिहिले. २९ ऑक्टोबर रोजी लंडनहून लिहिलेल्या पत्रातही ' नाशिक रोड दंगल खटल्याचे काय झाले हे समजून घेण्यास उत्सुक आहे ' असे त्यांनी पुनः म्हटलेले आहे. विलायतेहून बाबासाहेबांनी पाठवलेल्या पत्रांपैकी अर्धीअधिक पत्रे भाऊराव गायकवाडांना पाठविलेली आहेत आणि त्यांत सारखा नाशिक सत्याग्रहाचा निर्देश केलेला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. नाशिकच्या सत्याग्रहाचे संघटक म्हणून भाऊराव गायकवाड आणि अमृतराव रणखांबे हे दोघे या काळात एकजुटीने काम करीत होते. अमृतराव रणखांबे हे नाशिक जिल्ह्यातल्या निफाड तालुक्यातील विंचूर गावचे एक सधन गृहस्थ होते. त्यांच्या मालकीचा जमीन-जुमला होता. त्यांना इंग्रजीचा गंध नव्हता म्हणून "इंग्रजीचे अज्ञान आपणास सार्वजनिक कार्यात पदोपदी नडेल." असा बाबासाहेबांनी त्यांना एका खासगी पत्रात इशाराही दिला आहे. रणखांबे, सावळाराम बापूजी दाणी, तुळशीराम संभाजी काळे आणि भाऊराव गायकवाड या नाशिकच्या नेत्यांचे परस्परांशी नात्याचे संबंधही होते. सावळाराम दाणी हे रणखांबे यांच्या बहिणीचे यजमान व व्याही होते तर गायकवाडांचे चुलत सासरे होते. १९३६ सालच्या अखेरीस रणखांबे व गायकवाड या दोघांनाही नाशिक जिल्ह्यातील राखीव जागेवर निवडणूक लढवायची होती. त्या वेळी त्यांच्यामध्ये फूट पडली आणि बाबासाहेबांनी या वादात भाऊराव गायकवाडांची बाजू घेतल्याने रणखांबे आंबेडकरी चळवळीतून बाहेर पडले आणि त्यांनी १९३८ साली कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. मात्र नाशिक सत्याग्रहाच्या काळात गायकवाड व रणखांबे हे

दोघेही एकोप्याने काम करीत होते. नाशिकचे सत्याग्रह आंदोलन अधूनमधून धगधगत ठेवण्यात गायकवाडांप्रमाणेच रणखांब्यांचाही मोठा वाटा होता हे लक्षात ठेवावयास हवे.

लंडनमध्ये गोलमेज परिषदेत भाग घेत असतानाही बाबासाहेबांच्या मनात नाशिकच्या काळाराम मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाचा विचार घोळत होताच. १५ डिसेंबर १९३० रोजी अमृतराव रणखांब्यांना लिहिलेल्या पत्रात बाबासाहेबांनी म्हटले, "गेल्या साली आरंभिलेला सत्याग्रह चालू करणार किंवा नाही हे कळविणे. आमची परिषद जानेवारीच्या १५ तारखेस संपेल असा अंदाज आहे. सत्याग्रहसमयी मी मुंबईत असेन. नसल्यास सत्याग्रह करावा असा माझा सल्ला आहे." १७ डिसेंबरला भाऊराव गायकवाडांना लिहिलेल्या पत्रात मात्र "रामनवमीला मी परत येईन असे निश्चित सांगता येत नाही. आपण सत्याग्रह करणार आहात का?" असा बाबासाहेबांनी प्रश्न विचारलेला आहे. स्थगित केलेले सत्याग्रहाचे आंदोलन पुनः सुरू करण्याची बाबासाहेबांची इच्छा लक्षात घेऊन नाशिकच्या त्यांच्या अनुयायांनी रामनवमीच्या वेळी लढा सुरू करण्याचा निर्णय घेतला. "नाशिकचा सत्याग्रह लौकरच सुरू होणार" असल्याची बातमी २० डिसेंबर १९३० च्या पतितपावनच्या अंकात झळकली. गायकवाडांनी जिल्हाधिकारी गॉर्डनना भेटून पूर्वसूचना दिली.

या भेटीत भाऊरावांशी काय बोलणे झाले हे गॉर्डननी मॅकायना कळवले. आंबेडकरांचा या चळवळीस जोरदार पाठिंबा असून काय वाटेल ते झाले तरी ती चालवली जाईल असे मला सांगण्यात आले. महारांना हौतात्म्य हवे आहे असे गायकवाडांनी मला सांगितले. आपल्याला सनातन्यांच्या हातून मरण आले काय किंवा सरकारच्या हातून आले काय सारखेच असेही ते म्हणाले. ज्या प्रश्नांना उत्तरे नाहीत असल्या प्रश्नांपैकी हा एक प्रश्न आहे. आपली स्थिती इकडे आड तिकडे विहीर अशी झाली आहे."[४२] सत्याग्रह सुरू केला जाऊ नये असे गॉर्डनना वाटत होते. गायकवाडांनी बाबासाहेबांना पत्र लिहून जिल्हाधिकाऱ्याचे म्हणणे कळवल्यानंतर लंडनहून बाबासाहेबांनी लिहिले, "आपल्या सत्याग्रहाच्या कार्यक्रमाप्रमाणे तुम्ही पावले टाकावीत. त्यात कलेक्टरच्या भूमिकेमुळे बदल करू नये. अधिकाऱ्यांच्या मर्जीनुरूप आपल्या कार्यक्रमात बदल करावयाचा म्हटल्यास आपल्याला व मला कार्यात कसलीच प्रगती करता येणार नाही. आपण जेव्हा सत्याग्रह कराल तेव्हा मी हिंदुस्थानात असेन."[४३] भाऊराव गायकवाडांनी ८ फेब्रुवारीस नाशिकमध्ये आमदार डॉ. सोळंकी यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेऊन १५ मार्च १९३१ हा दिवस सत्याग्रहाचा शुभारंभाचा दिवस म्हणून मुक्रर केला. १४ फेब्रुवारीस सत्याग्रहाच्या कार्यक्रमाचा तपशील ठरवण्यासाठी ५० सभासदांची एक समिती नियुक्त करण्यात आली. याखेरीज नऊ सभासदांची एक कार्यकारिणीही नेमण्यात आली.

२५ जानेवारी १९३१ रोजी गांधीजी आणि कॉंग्रेस कार्यकारिणीचे सभासद यांची मुक्तता करण्यात आली. सर तेजबहादूर सप्रू आणि मुकुंदराव जयकर यांनी केलेल्या शिष्टाईमुळे कॉंग्रेस व सरकार यांच्यामध्ये समेट घडून आला होता. १७ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत गांधीजी व व्हाइसरॉय अर्विन यांच्यामध्ये वाटाघाटी होऊन ५ मार्चला गांधी-अर्विन करारावर सह्या करण्यात आल्या. करारानुसार गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ स्थगित केली. गांधीजी तुरुंगातून सुटल्यावर भाऊराव गायकवाडांनी त्यांना एक पत्र लिहिले आणि मार्चमध्ये सुरू होणाऱ्या काळाराम मंदिर-प्रदेश सत्याग्रहास गांधीजींनी आशीर्वाद द्यावेत अशी त्यांना विनंती केली.[४५] बाबा-साहेबांची त्यासाठी आधी संमती घेऊन भाऊराव गायकवाडांनी हे पत्र लिहिले होते की स्वतःच विचार करून गांधीजींना पत्र लिहिण्याचा हा उपक्रम त्यांनी केला होता हे पुराव्याअभावी आज निश्चित सांगणे कठीण आहे. गांधीजींना पत्र लिहून ते मंदिर-प्रवेशासाठी केलेल्या सत्याग्रहास पाठिंबा देतात की नाही, तसेच त्यास अग्रक्रम देतात की नाही याची कसोटी पाहण्यासाठी हे पत्र गायकवाडांनी लिहिले असावे. काळाराम मंदिरप्रवेशास विरोध करणाऱ्यांमध्ये कॉंग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते असल्याने गांधीजींचे आशीर्वादपर लेखी पत्र मिळवून नाशकातील सनातनी कॉंग्रेस नेत्यांना पेचात धरण्या-चीही गायकवाडांनी चाल खेळली असण्याची शक्यता आहे. गाजराची पुंगी वाजली तर वाजली, नाहीतर मोडून खाल्ली असा हा प्रकार होता. गांधीजींनी लेखी पाठिंबा दिला असता तर सनातनी कॉंग्रेसवाल्यांची पंचाईत झाली असती आणि गांधीजींनी पाठिंबा दिला नाही तर ते अस्पृश्यता-निवारणाची भाषा करीत असले तरी त्या प्रश्नाला अग्रक्रम द्यावयास ते तयार नाहीत हे पुराव्यानिशी म्हणण्याची मोकळीक मिळणार होती. मंदिरप्रवेशाचा प्रश्न हाती घेण्याची ती वेळ नव्हे असे उत्तर देऊन गांधीजींनी निसटण्याचा प्रयत्न केला खरा पण त्यामुळे स्वराज्याच्या तसेच चरख्याच्या प्रश्नाइतका मंदिरप्रवेशाचा प्रश्न त्यांना महत्त्वाचा व निकडीचा वाटत नव्हता ते उघड झाले.

२७ फेब्रुवारी १९३१ रोजी बाबासाहेब मायदेशी परतले. तोपर्यंत १५ मार्चच्या सत्याग्रहाची पूर्वतयारी जवळजवळ पुरी होत आली होती. गॉर्डन व आयुक्त मॅकाय सवर्ण हिंदूंना सोयीची अशी कृती करतील असा रागरंग दिसत होता. त्यांनी तसे काही करू नये म्हणून खुद्द गव्हर्नरसाहेबांनी फायलीतील टिप्पणीत अभिप्राय नोंदविला, "सरकारच्या हुकमाबाबत गैरसमज करून घेण्याचा आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी पण केलेला दिसतो. आपल्या हुकमांचा कायदेशीरपणा किंवा त्यांचा अर्थ याबद्दल खरोखर शंका येण्याचे मला काहीच कारण दिसत नाही. प्रगत वर्गांची जिल्हाधिकाऱ्यांनी बाजू घेणे हा अर्थातच सर्वांत सोपा मार्ग आहे. आपण कायद्यानुसार तसे करतो आहोत असे आजवरच्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसते. मात्र आपली स्थिती सुधारण्यासाठी आणि हिंदू म्हणून असलेले हक्क बजावण्यासाठी मागासवर्गीयांनी प्रयत्न

केले तर त्यांना विरोध करावा असे सरकारचे धोरण नाही. काळाराम मंदिराची मालकी किंवा व्यवस्था सरकारच्या हाती नाही. (पर्वतीवरील देवालयात) आहे ती वहिवाट चालू ठेवण्याचे तरी सरकारवर बंधन होते तशी स्थिती नाशिकच्या देवळाबाबत नाही. भांडणाऱ्या दोन्ही पक्षांपैकी कोणत्याही पक्षाने दिवाणी न्यायालयात जाऊन आपल्याला अनुकूल निकाल मिळवला तर सर्वच चित्र स्पष्ट होईल. सध्या दोन्ही पक्ष हा मार्ग टाळीत आहेत. म्हणून सरकारने या तंट्यात तटस्थ राहिले पाहिजे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असले तरच हस्तक्षेप केला पाहिजे."

"वरील मजकूर लिहिल्यानंतर माझे डॉ. आंबेडकरांशी बोलणे झाले... १२ मार्चला सत्याग्रह म्हणजे केवळ निदर्शन होईल. निश्चित काय करावे हे त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी अद्याप ठरवलेले नाही. मी आपल्या अडचणी त्यांना समजावून सांगितल्या. त्यांना सरकारला किंवा जिल्हाधिकाऱ्यास दुखवावयाचे नाही. मात्र गतवर्षीपेक्षा कॉंग्रेस-वाल्यांकडून जास्त मदत मिळेल अशी त्यांची अपेक्षा आहे."[४१] खुद्द गव्हर्नरसाहेबांनी स्पष्ट केलेल्या धोरणानुसार आयुक्त मॅकाय यांनी जिल्हाधिकाऱ्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक इतकाच हस्तक्षेप करण्याच्या सूचना दिल्या.

१५ मार्च १९३१ रोजी सत्याग्रह सुरू झाल्यानंतर देवळाचे चारी दरवाजे बंद झाले तरी पुजाऱ्याच्या घरच्या खासगी दरवाज्याचा उपयोग देवळात जाण्यासाठी केला गेला तर काय करावयाचे हा सरकारपुढे प्रश्न होता. १९३० सालीही हा प्रश्न निर्माण झाला होताच. त्याबाबत दिनशा मुल्ला या ॲक्टिंग ॲडव्होकेट जनरलचा सरकारने सल्ला घेतला होता. दिनशा मुल्ला हे नामवंत कायदेपंडित होते. त्यांनी मत दिले ते असे, "प्रथमदर्शनी पुजाऱ्याच्या घरात जाण्याची वाट ही खासगी वाट आहे असे वाटते. पुजाऱ्याच्या घरातून देवळात जाता येते ही वस्तुस्थिती असली तरी त्यामुळे पुजाऱ्याच्या घरचा दरवाजा हे सार्वजनिक प्रवेशद्वार ठरत नाही. एका प्रसंगी देवळात जाण्यासाठी पुजाऱ्याने पंधरा हजार सनातन्यांना आपल्या घरच्या दरवाज्यातून प्रवेश दिला यामुळेही त्यास सार्वजनिक प्रवेशद्वार ठरवता येणार नाही. त्या सर्व पंधरा हजार लोकांना किंवा कोणालाही पुजारी प्रवेश नाकारू शकला असता."[४६] कायदेपंडितांच्या या सल्ल्यामुळे सरकारला सावधपणे पावले उचलणे आवश्यक होते.

पुजाऱ्याच्या घरातील वाटेचा देवळात जाण्यासाठी उपयोग केला जाईल असे गृहीत धरून आयुक्त मॅकाय यांनी जिल्हाधिकारी गॉर्डनना सूचना दिल्या : "जर पूर्वीप्रमाणे पुजाऱ्याने लोकांना त्याच्या घरच्या दरवाज्यातून देवळात येऊ दिले तर त्याच वाटेने देवळात शिरण्याचा इतर लोकांप्रमाणे महारांनाही समान हक्क आहे असे समजावे. पुजाऱ्याने तक्रार करेपर्यंत तुम्ही हस्तक्षेप करू नये. त्याने तक्रार केल्यास आपल्या घराच्या खासगी प्रवेशद्वाराचा सार्वजनिक प्रवेशद्वारासारखा उपयोग करू दिल्याबद्दल पुजाऱ्याला 'कारणे दाखवा' अशी नोटीस द्यावी. त्याच्या घराच्या प्रवेशद्वारातून तो

निवडेल त्यांनाच देवळात प्रवेश करण्याचा अधिकार आहे; अन्य व्यक्तींना नाही असा त्याला न्यायालयातून मनाई हुकूम मिळेपर्यंत पुजाऱ्याच्या घराचे प्रवेशद्वार हे सार्वजनिक प्रवेशद्वार आहे असे समजण्यास हरकत नाही. गेल्या वर्षीपेक्षा तुम्ही या वर्षी कमी सक्रिय भूमिका वठवावी असा माझा तुम्हाला सल्ला आहे. त्यामुळे हे प्रकरण लवकरच मारामारीवर जाईल आणि मग तुम्हाला हस्तक्षेप करणे शक्य होईल."[४७] याचा अर्थ मारामारी टाळणे हा सरकारचा उद्देश नव्हता, उलट प्रकरण हातघाईवर गेले तर ते सरकारच्या पथ्यावर पडणार असल्याने मारामारी व्हावी अशी सरकारची इच्छा होती.

१५ मार्चला सरकारला हवे होते तसेच घडले. सत्याग्रहास अनुकूल असलेल्या पाच हजार लोकांची मिरवणूक दुपारी निघाली. या मिरवणुकीत भाऊराव गायकवाड, बापूसाहेब राजभोज, देवराव नाईक वगैरे पुढारी होते, तसेच दिनकर शंकर जवळकर हे ब्राह्मणेतर पक्षातून काँग्रेसमध्ये शिरलेले आणि नुकतेच कारावास भोगून मुक्त झालेले नेतेही होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मात्र या मिरवणुकीत नव्हते. आदले दिवशी त्यांनी नाशकात जाहीर सभेत मोठे ओजस्वी भाषण केले होते, पण सोळा मार्चला सकाळी ठाण्याच्या न्यायालयात चिरनेर गोळीबार खटल्याची सुनावणी सुरू होणार असल्याने १५ तारखेसच त्यांना मुंबईत परतणे भाग पडले. २५ सप्टेंबर १९३० रोजी पनवेलजवळच्या चिरनेर गावात काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलेल्या जंगल सत्याग्रहाच्या वेळी गोळीबार करण्यात आला होता. नंतर सरकारने काँग्रेस कार्यकर्त्यांवर भरलेल्या खटल्यात आरोपी क्र. ८, ९ व १० यांच्या वतीने बाबासाहेबांनी वकीलपत्र घेतले होते. त्यामुळे १५ मार्चच्या मिरवणुकीत बाबासाहेब नव्हते. मिरवणूक निघताच ते मुंबईकडे निघाले. पाच हजार लोकांची ही मिरवणूक रामकुंडाजवळील भव्य पटांगणात आली. तेथे मिरवणुकीतल्या मंडळींनी जेवण केले. सवर्णांनी जोरदार दगडफेक केली. त्यामुळे काहीजण जखमी झाले. ज्यांना बेदम मारहाण करण्यात आली त्यांच्यामध्ये दिनकरराव जवळकरही होते. मारहाणीला अस्पृश्यांनीही प्रत्युत्तर दिले.

१५ मार्चच्या मारामारीची माहिती जिल्हाधिकारी गॉर्डननी गृहसचिवास कळवली. "काल संध्याकाळी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नऊ जखमी लोकांवर उपचार करण्यात आले. त्यांपैकी पाचजण महार होते तर उरलेले चार अन्य जातींचे होते. एका पोलिस उपनिरीक्षकाच्या मुलाला एका महाराने काठीने झोडपले. जेथे मिरवणुकीतील महार जेवत होते त्या ठिकाणालगत असलेल्या धर्मशाळेतून त्यांची हेटाळणी केली जात होती. तेथूनच दगडफेकीस सुरुवात झाली असे सांगितले जाते. नेमक्या कोणत्या दिशेने दगड आले हे सांगणे कठीण आहे. नंतर महारांनी हातात काठ्या घेतल्या. जवळच बांबूच्या साहाय्याने उभारलेली छोटी दुकाने होती. काहींनी ते बांबू उपसून हाती घेतले. सनातन्यांच्या प्रक्षोभक भूमिकेमुळेच मारामारी झाली म्हणून झाल्या प्रकारास

सनातनीच जबाबदार आहेत. मुख्यतः महारांचे हित लक्षात घेऊन मी १४४ कलम जारी केले ते एक महिनाभर जारी राहील. हस्तक्षेप न करण्याचे धोरण अनुसरणे व्यवहारतः अशक्य आहे ... मुख्य पोलिस ठाण्यापासून देऊळ दोन मैलांवर असल्याने पोलिस तेथे पोचेपर्यंत नुकसान होतेच. या प्रकरणात कोणतीही तडजोड शक्य नाही. २० तारखेस रामनवमीच्या उत्सवास सुरुवात होईल... अखेर या झगड्यात महारांचेच नुकसान होणार आहे."[४८] रामनवमीच्या उत्सवास आरंभ होण्यापूर्वी काळाराम मंदिरच तात्पुरते आपल्या ताब्यात घेण्याचा गॉर्डनसाहेबांचा इरादा होता.

जिल्हा पोलिस कायद्याच्या ४३ व्या कलमान्वये देऊळ तात्पुरते ताब्यात घ्यावे आणि सर्व प्रकरणाची चौकशी करण्याकरिता एक समिती नेमावी असे गॉर्डननी तारेने सुचवले तेव्हा हा फार टोकाचा उपाय झाला आणि तो इष्ट असला तरी त्यामुळे पुष्कळ व्यावहारिक अडचणी येतील असे मुंबई सरकारला वाटत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यास तारेने कळवण्यात आले.[४९] १९ मार्च १९३१ रोजी गृहसचिवांनी गॉर्डनना सूचना दिल्या, "तुम्ही १४४ कलमान्वये काढलेल्या आदेशाचे काय परिणाम होतात ते पाहण्यासाठी काही काळ थांबावे. देवळासमोर बंदोबस्तासाठी मोठ्या संख्येने पोलिस ठेवण्याची गरज नाही. ते तेथून शक्य तितक्या, जवळ मोकळी जागा असेल तेथे ठेवावेत. दंगलीच्या जागी ताबडतोब पोलिसांना आणण्यासाठी लॉऱ्या भाड्याने घ्याव्यात. तुम्ही देवळापाशी हजर राहिले पाहिजे असे नाही; तुम्ही नाशिकमध्ये असलात तरी पुरेसे आहे. तुम्ही डॉ. आंबेडकर किंवा महारांचा अन्य कोणी जबाबदार पुढारी यांच्याबरोबर सतत संपर्क साधीत आहात असे सरकारने गृहीत धरलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी नाशिकला जाण्यासाठी मुंबईहून प्रयाण केल्यापासून सरकारचा त्यांच्याशी संपर्क नाही आणि १६ मार्चला नाशिकहून निघून ते ठाण्यास आले त्यानंतरच्या त्यांच्या हालचालींची सरकारला काहीच माहिती नाही."[५०] १६ मार्चनंतर डॉ. आंबेडकर नाशिकलाही आले नाहीत तसेच त्यांनी आपली भेटही घेतलेली नाही, असे सांगून स्थानिक परिस्थिती लक्षात घेता देऊळ तात्पुरते ताब्यात घेण्याच्या आपल्या योजनेची अंमलबजावणी करण्यास आपल्याला अनुमती द्यावी अशी गॉर्डननी मुंबई सरकारला विनंती केली, पण ती मान्य झाली नाही. रामनवमीच्या उत्सवाच्या दिवसात देवळाचे दरवाजे बंद ठेवण्याचा देवस्थानच्या पंचांनी निर्णय घेतला. एका सनातन्याने उत्तर दरवाजा ठोठावून जबरदस्तीने आत घुसण्याचा प्रयत्न केला. त्याला पकडण्यात आले.

१८ मार्चला गृहमंत्र्यांनी डॉ. आंबेडकरांशी बोलणे केले. त्याबद्दल दुसरे दिवशी लिहिलेल्या टिपणात गृहमंत्र्यानी म्हटले, "नाशिकमधील सद्यःस्थितीबद्दल डॉ. आंबेडकरांना पूर्ण समाधान वाटते. जोपर्यंत स्पृश्यांना देवळात जाता येत नाही तोपर्यंत देवळापासून महारांना दूर ठेवले तरी त्याची त्यांना पर्वा नाही. जोपर्यंत देवळाचे

दरवाजे बंद ठेवण्यात येत आहेत आणि कोणालाच आत शिरता येत नाही, तोपर्यंत महार आपल्या छावणीतच राहतील आणि काही करणार नाहीत. मात्र दरवाजे उघडले गेले आणि स्पृश्य देवळात जाऊ लागले की महार निरोधने करतील आणि देवळात शिरण्याचा प्रयत्न करतील. देवळाच्या दरवाज्यापाशी पोलिस ठेवण्यास डॉ. आंबेडकरांचा आक्षेप नाही... स्थानिक नेते गायकवाड यांच्यामार्फत डॉ. आंबेडकर नाशकातील परिस्थिती कशी आहे ते सतत समजावून घेत आहेत आणि सध्या आहे तशीच स्थिती जोपर्यंत राहील तोपर्यंत नाशिकमध्ये देवळासमोर सत्याग्रहाच्या ठिकाणी हजर राहण्याची डॉ. आंबेडकरांना गरज वाटत नाही."[५१] रामनवमी जसजशी जवळ येऊ लागली तसतशी परिस्थिती तणावाची होण्याची शक्यता जिल्हाधिकारी गॉर्डनना वाटू लागली.

नागपूर, धुळे, जळगाव, मुंबई वगैरे ठिकाणचे हजारो महार नाशिकला येत असल्याबद्दल गॉर्डननी २४ मार्च रोजी गृहसचिव कॉलिन्सना कळवले. देवस्थानचे पंच तसेच पुजारी यांनी देवळाचे दरवाजे बंद ठेवण्याचा निर्धार केला होता. २८ मार्च १९३१ रोजी रामनवमीस दंगल होण्याची गॉर्डनना दाट शक्यता वाटत होती. त्यामुळे २८ ते ३० मार्च या तीन दिवसासांठी त्यांनी शंभर सशस्त्र पोलिसांची जादा कुमक मागवली, आणि ती त्यांना देण्याची व्यवस्था करण्यात आली. याखेरीज दोनशे पोलिस नाशिकमध्ये मुख्य ठाण्यावर होतेच. रामनवमीच्या दिवशी अस्पृश्यांच्या सभेत देवराव नाईक, बापूसाहेब राजभोज, भाऊराव गायकवाड, गोविंद अहिलाजी मिंढे यांच्याबरोबर महम्मद झकेरिया मणियार आणि मौलाना नाझिर अहमद यांची भाषणे झाली. पंचवटीतल्या श्रीधर पद्माकर दीक्षितांच्या घरी सनातन्यांची खासगी सभा झाली. महम्मद झकेरिया मणियार हे कडवे सनातनी मुसलमान होते. मंदिरप्रवेशासाठी अस्पृश्यांनी चालविलेल्या सत्याग्रहामुळे सवर्ण हिंदू व अस्पृश्य यांच्यामधील वैमनस्य वाढणे त्यांना मुसलमानांच्या फायद्याचे वाटत होते. सवर्ण हिंदूंच्या प्रतिगामी धोरणाला कंटाळून काही अस्पृश्यांनी इस्लामचा स्वीकार केलेला त्यांना हवाच होता. १९३० च्या मंदिर-प्रवेश सत्याग्रहानंतर काही अस्पृश्य व ब्राह्मण मुसलमान झाल्याने नाशिक जिल्ह्यातील सनातनी मुसलमान मुल्लामौलवींच्या आशा पालवल्या होत्या. झकेरिया मणियारनी आपला एक बंगलाच अस्पृश्यांना वापरण्यासाठी दिला होता.

३० मार्चला पूजाधिकाऱ्यांनी गव्हर्नरला तार ठोकली आणि प्राचीन परंपरेनुसार आपण रथयात्रा काढणार असल्याचे कळवले. १४४ कलम मागे घेऊन रथयात्रा काढण्यास साहाय्य करावे अशी विनंतीही करण्यात आली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी रथयात्रेस मनाई केलेली नसून सर्व सनातन्यांनी दुपारी रथ बाहेर काढण्यासाठी देवळाजवळ जमावे अशा आशयाचे एक पत्रकही पुजाऱ्याने काढले होते आणि ते गावात वाटण्यात आले होते. हे वृत्त समजताच गॉर्डन देवळाजवळ गेले आणि तेथे जमाव जमणार

नाही याची त्यांनी काळजी घेतली. मोठा रथ बाहेर काढणे त्यामुळे अशक्य झाले. १४४ कलमाचा भंग न करता देवाची छोटी मूर्ती स्नानासाठी गंगेवर नेण्याची पुजाऱ्यास परवानगी देण्यात आली. त्याप्रमाणे हातात मूर्ती घेऊन दोन-तीन माणसांच्या सोबतीने एका आडवळणी लांबच्या रस्त्याने पुजारी गंगेवर गेला. तेथे गोरा राम मंदिराच्या पुजाऱ्यांनी आधीच आणलेल्या तीन-चार फूट उंचीचा एक छोटा रथ त्यांना वापरता आला. काय होते हे पाहण्यासाठी सुमारे दहा हजार लोकांनी गंगेवर गर्दी केली होती, पण काहीही गैरप्रकार घडला नाही.

भारतीय दंडसंहितेच्या १४७ व्या कलमान्वये चौकशी करून उभयपक्षांपैकी कोणा तरी एका पक्षास न्यायालयाकडे धाव घेण्यास भाग पाडावे असे गॉर्डनने सुचवले, पण सरकारने आजवरचे धोरण बदलावे असे काहीही घडले नसल्याचे सरकारचे मत त्यांना कळविण्यात आले.[५२] १५ मार्चचा सत्याग्रह म्हणजे केवळ निदर्शन होईल हे डॉ. आंबेडकरांनी गव्हर्नरना दिलेले आश्वासन त्यांनी पाळले. त्यानंतर रामनवमीचा उत्सव संपेपर्यंत म्हणजे मार्चअखेरपर्यंत देवळाचे दरवाजे बंद ठेवले गेले आणि रथयात्रा निघाली नाही. शांतताभंग होण्यासारखे काही घडलेही नाही. १९३१ साली नोव्हेंबरमध्ये सिंहस्थानिमित्त नाशिकला हजारो यात्रेकरू जमणार होते. त्या वेळी पुनः सत्याग्रह करण्याचा निर्णय ऑगस्टच्या आरंभी नाशिकच्या बाबासाहेबांच्या अनुयायांनी घेतला. हे कळताच गॉर्डनसाहेब भडकले. त्यांनी वरिष्ठांना लिहिले, "जाणूनबुजून गडबड-गोंधळ करण्याचा महारांचा इरादा आहे असे मला वाटते. त्यांनी या वेळी आपल्या बळावर जोखीम पत्करून काय करायचे ते करावे असे त्यांना स्पष्ट सांगितले पाहिजे. केवळ कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर सत्याग्रहींचे घोळके म्हणजे बेकायदेशीर जमाव ठरतात."[५३] सत्याग्रहांबाबत गॉर्डनना सहानुभूती वाटत नसली तरी मुंबई सरकारचे सचिव-स्तरावरील वरिष्ठ अधिकारी सत्याग्रहास विरोध करीत नव्हते.

मुंबई प्रदेश काँग्रेस समितीने अस्पृश्यता निवारणासाठी आखावयाच्या कार्यक्रमाबद्दल शिफारशी करण्यासाठी एक उपसमिती नेमली होती. या समितीच्या वतीने तिचे चिटणीस राठोड यांनी केलेले निवेदन २२ जुलै १९३१ च्या बॉंबे क्रॉनिकलच्या अंकात प्रसिद्ध झाले. मंदिर-प्रवेशासाठी सत्याग्रहाचा अवलंब केला तर स्पृश्यांमधील सनातनी आणि अस्पृश्य यांच्यामध्ये वैमनस्य वाढते म्हणून मंदिर-प्रवेशासाठी सत्याग्रह न करता काँग्रेस सनातन्यांचे हृदयपरिवर्तन करण्यावर भर देईल असे राठोड यांनी जाहीर केले. राठोड यांचे हे निवेदन अनधिकृत होते, आणि उपसमितीच्या सर्व सभासदांनी ते स्वीकारलेले नव्हते. सुप्रसिद्ध नाट्यसमीक्षक पु. रा. लेले हे या उपसमितीचे एक सभासद होते. त्यांनी नाशिकच्या मंदिरप्रवेश सत्याग्रहास बाळासाहेब खेर, जमनालाल बजाज यांच्यासारख्या काँग्रेस नेत्यांनी पाठिंबा दिला होता याचे राठोडना स्मरण करून दिले आणि सत्याग्रहासारख्या प्रत्यक्ष कृतीस मुंबई प्रदेश काँग्रेस समितीने विरोध केला

तर आपण उपसमितीच्या सभासदत्वाचा राजीनामा देऊ असे २३ जुलै १९३१ च्या बॉंबे क्रॉनिकलमध्ये पत्र प्रकाशित करून जाहीर केले.[५४] नाशिकच्या काळाराम मंदिर-प्रवेशाच्या सत्याग्रहामुळे अशा स्वरूपाची कृती काँग्रेसने करावी की नाही, अन्य कोणी केली तर काँग्रेसने तिला पाठिंबा द्यावा की नाही याबद्दल काँग्रेसमध्येच तीव्र मतभेद निर्माण झाले होते.

खुद्द महात्मा गांधींची याबाबतची भूमिका प्रत्यक्षतः सनातन्यांच्या पथ्यावर पडण्यासारखी होती. मंदिर-प्रवेशासारख्या प्रश्नावर सत्याग्रह करण्याची वेळ अद्याप आली नव्हती असे गांधीजी म्हणत होते. त्यांच्या दृष्टीने आधी संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळवण्यावर सर्वांनी लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते. मंदिरप्रवेशासारख्या प्रश्नावर सत्याग्रहाचा अवलंब करण्यास त्यांचा आक्षेप नव्हता. मात्र तो अस्पृश्यांनी करण्याऐवजी स्पृश्यांनी आपल्या पापक्षालनासाठी करावा असे गांधीजींना वाटत होते. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व देवळे अस्पृश्यांना खुली केली जातील असे गांधीजी, जवाहरलाल नेहरू म्हणत असले तरी त्यांचा हा फार पुढच्या तारखेचा वायदा अस्पृश्यांना आकृष्ट करू शकत नव्हता. राजकीय परिवर्तनाबरोबरच सामाजिक परिवर्तन व्हावयास हवे असे हे काँग्रेस नेते म्हणत असले तरी राजकीय परिवर्तनाइतकेच सामाजिक परिवर्तनास महत्त्व देण्यास ते तयार नव्हते. परकीयांच्या हातची राजकीय सत्ता एकदा का स्वकीयांच्या हाती आली की अस्पृश्यता निवारणासारखे प्रश्न सोडवण्याची गुरुकिल्ली हाती लागेल असे अनेक काँग्रेस नेत्यांना वाटत होते. म्हणून स्वराज्य मिळेपर्यंत कळ सोसा असा उपदेश ते अस्पृश्यांना करत होते. अस्पृश्यता निवारण्याच्या प्रश्नाला अग्रक्रम दिला तर बहुसंख्य काँग्रेसजन त्या कार्यक्रमाला विरोध करणार हे स्पष्ट दिसत होते. त्यामुळे सत्याग्रहाच्या मार्गाने मंदिर प्रवेशाचा प्रश्न धसाला लावण्याचा डॉ. आंबेडकरांचा प्रयत्न काँग्रेस नेत्यांना अडचणीचा वाटत होता. ज्या प्रश्नावर काँग्रेसमध्ये फाटाफूट होऊन स्वराज्याची चळवळ कमकुवत होईल असा प्रश्न धुमसत राहणे इंग्रज राज्यकर्त्यांच्या फायद्याचे होते. काँग्रेसच्या चळवळीपासून इंग्रजी राजवटीला जेवढा धोका होता तेवढा अन्य पक्षांच्या चळवळीपासून नव्हता. त्यामुळे काँग्रेसला अडचणीत टाकणाऱ्या चळवळींबद्दल उच्च स्तरावरील इंग्रज अधिकाऱ्यांना सहानुभूती वाटत असे. १९३१ च्या जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रासाठी निमंत्रित केलेल्या सहकाऱ्यांची नावे जाहीर झाली. त्यात डॉ. आंबेडकरांचा समावेश केलेला होता. अशा परिस्थितीत गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रात हजर राहण्याचा निर्णय घेण्यापूर्वी गांधीजींना डॉ. आंबेडकरांची भेट घेऊन त्यांची बाजू ऐकून घ्यावी आणि वडिलकीच्या नात्याने त्यांना सल्ला द्यावा असे वाटले आणि मजुरांचे पुढारी नारायण मल्हार जोशी आणि आदिवासींची सेवा करणारे अमृतलाल ठक्कर यांच्यामार्फत डॉ. आंबेडकरांशी संपर्क साधला गेला.

६ ऑगस्ट १९३१ रोजी गांधीजींनी रात्री ८ वाजता बाबासाहेबांना भेटण्याची तयारी असल्याचे त्यांना पत्राने कळवले. बाबासाहेब त्या दिवशी सांगलीचा दौरा आटोपून परतले होते आणि त्यांच्या अंगात फ्ल्यूमुळे ताप होता; तरीही आपण मणिभवन या मुंबईतील गांधीजींच्या निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी येऊ असे बाबासाहेबांनी उत्तर पाठवले. मात्र संध्याकाळपर्यंत ताप अतिशय वाढल्याने ताप उतरल्यानंतर आपण गांधीजींच्या भेटीला येऊ असे त्यांनी गांधीजींना कळवले. प्रकृती बरी झाल्यानंतर बाबासाहेब व गांधीजी यांची भेट १४ ऑगस्ट १९३१ रोजी दुपारी दोन वाजता मणिभवनमध्ये झाली. या भेटीच्या वेळी बाबासाहेबांबरोबर देवराव नाईक, कद्रेकर, अमृतराव रणखांबे, भाऊराव गायकवाड, गणपतबुवा जाधव, पुंजाजी जाधव, बी. व्ही. प्रधान, शिवतरकर वगैरे मंडळी होती.

डॉ. आंबेडकरांचा जन्म अस्पृश्य मानल्या गेलेल्या महार जातीत झालेला आहे हे गांधीजींना डॉ. आंबेडकरांची व त्यांची पहिली भेट झाली तोपर्यंत माहीत नव्हते असे दिसते. पुढे १९३२ साली गांधीजी येरवडा तुरुंगात असताना १ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकरांचा विषय निघाला तेव्हा गांधीजी महादेवभाई देसाईंना म्हणाले, "मी इंग्लंडला जाईपर्यंत आंबेडकर हे हरिजन आहेत हे मला माहीत नव्हते. हरिजनांच्या प्रश्नाबाबत विलक्षण आस्था असलेले ते एक ब्राह्मण आहेत आणि म्हणून ते असे अतिरेकी बोलतात अशी माझी समजूत होती."[५५] महादेवभाई देसाईंनी रोजनिशीत नोंदवलेले गांधीजींबरोबरचे हे संभाषण वाचले म्हणजे आंबेडकरांसारख्या मुंबई प्रांतातील नेत्यांविषयीचे महात्मा गांधींसारख्या अखिल भारतीय कीर्तीच्या नेत्याचे गाढ अज्ञान पाहून धक्का बसल्याशिवाय राहात नाही. सायमन आयोगाबरोबर केलेले सहकार्य, गोलमेज परिषदेच्या पहिल्या सत्रात अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून घेतलेला भाग, १९२७ चा महाडचा आणि १९३०–३१ चा नाशिकचा सत्याग्रह यामुळे बाबासाहेब आंबेडकर १९२७ ते १९३१ पर्यंत अनेक वृत्तपत्रांच्या टीकेचे लक्ष्य बनले होते. असे असताना आंबेडकर हे ब्राह्मण जातीत जन्मलेले पण अस्पृश्यांचा कळवळा असलेले गृहस्थ आहेत असे गांधीजींना का व कसे वाटले कोण जाणे! सबंध देशाचे राजकारण करणाऱ्या महान नेत्याचे हे अज्ञान अक्षम्य म्हटले पाहिजे. आंबेडकर हरिजन आहेत हे आपल्याला माहीत होते असे सरदार पटेल म्हणाल्याचा उल्लेख महादेवभाईंनी रोजनिशीत केला आहे. सरदार पटेलांनीही आंबेडकर ब्राह्मण असल्याबद्दलचा गांधीजींचा गैरसमज दूर केला नव्हता असे दिसते.

अस्पृश्यांविषयी कळवळ्याने बोलणारे ब्राह्मण नेहमीच भडक व बेफाट बोलतात अशी गांधीजींची समजूत होती. त्यामुळे बाबासाहेबांचे जळजळीत बोलणेही त्याच प्रकारातले असेही गांधीजी समजत असावेत. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या भारत सेवक समाजातील गोपाळराव देवधर, श्रीनिवास शास्त्री आणि गोखल्यांचे स्नेही कादंबरीकार

हरी नारायण आपटे यांच्याबरोबर १९१५ साली झालेल्या संभाषणाची हकीगत गांधीजींनी डॉ. आंबेडकरांविषयी १ एप्रिलला बोलणे चालले असताना सांगितली होती. अस्पृश्यांच्या सभेत भाषणे करून त्यांना त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करून देणे असा एक कार्यक्रम अस्पृश्यता निवारणाबाबत गोपाळराव देवधरांनी तयार केलेल्या टिपणात समाविष्ट केलेला होता. तो वाचून गांधीजी म्हणाले, "मी तुम्हाला भाकरी मागितली तर तुम्ही मला धोंडा देता आहा. अशा रीतीने आपल्याला हरिजनांची सेवा करता येणार नाही. ही सेवा नसून त्यांच्यावर सरळसरळ केलेला अनुग्रह आहे. अस्पृश्यांचा उद्धार करणारे आपण कोण? आपल्याला फक्त आपल्या पापाचे परिमार्जन करता येईल. भाषणे करून ते साधणार नाही." गांधीजींचे बोलणे ऐकून हरिभाऊ आपटे संतापले तेव्हा गांधीजी त्यांना म्हणाले, "तुम्ही हरिजनांना हिंदू समाजाविरुद्ध बंड करावयास प्रवृत्त कराल अशी मला भीती वाटते." त्यावर हरिभाऊ आपट्यांनी ताडकन उत्तर दिले, "होय, करू दे त्यांना बंड. मला तेच हवे आहे."[५६] अस्पृश्यता निवारणासाठी बंडाची भाषा बोलणाऱ्या हरिभाऊ आपटे यांच्या-सारख्या ब्राह्मणांपैकी डॉ. आंबेडकर एक आहेत अशी गांधीजींची समजूत होती.

हे लक्षात घेतले म्हणजे ज्या तऱ्हेने पहिल्याच भेटीत गांधीजींनी डॉ. आंबेडकरांना वागवले आणि त्यांच्याशी बोलणे केले त्या तऱ्हेचा काहीसा उलगडा होतो. आपल्या हास्याने, तल्लख विनोदबुद्धीने, संभाषणकुशल महात्माजी त्यांच्यावर चिडलेल्या विरोध-कांनाही सहज वश करून घेत असत. मात्र १४ ऑगस्ट १९३१ रोजी डॉ. आंबेड-करांबरोबरच्या पहिल्या भेटीत महात्माजी जसे वागले व बोलले असे सांगितले जाते ती तऱ्हा त्यांच्या महात्मतेला शोभण्यासारखी नव्हती असे या भेटीबद्दलचे उपलब्ध वृत्तान्त वाचल्यावर वाटते. प्रथम काही वेळ गांधीजींनी डॉ. आंबेडकरांची व त्यांच्या सहकाऱ्यांची दखलच घेतली नाही. ते मीराबेन आणि काही सहकाऱ्यांबरोबर बोलत राहिले. काही वेळाने ते बाबासाहेबांकडे वळून बोलू लागले. बाबासाहेब म्हणजे अस्पृश्यां-बाबत अतिरेकी भाषणे करणारे एक ब्राह्मण आहेत या समजुतीने गांधीजींनी सुरुवाती-लाच चढाईचा पवित्रा घेतला आणि केवळ भाषणे करून नव्हे तर ठोस कृती करून आपण अस्पृश्यतानिवारणाचा कसा अनेक वर्षे प्रयत्न करीत आहोत हे त्यांना सांगितले. गांधीजी बाबासाहेबांना म्हणाले, "माझ्याविरुद्ध आणि कॉंग्रेसविरुद्ध तुमची काही गाऱ्हाणी असल्याचे मला कळले. मी शाळकरी विद्यार्थी असल्यापासून अस्पृश्य-तेच्या प्रश्नाचा विचार करतो आहे. तेव्हा तुमचा जन्मही झाला नव्हता."[५७] वस्तुतः यावरून गांधीजी बाबासाहेबांच्या आधी कितीतरी वर्षे जन्मले एवढेच सिद्ध होत होते. त्यामुळे सर्व वडीलधारी माणसे नेहमीच आपल्या वयाची आठवण करून देऊन महत्त्व प्रस्थापित करू पाहतात हा बाबासाहेबांनी पटकन दिलेला जबाब योग्यच म्हटला पाहिजे. आपल्यामुळे कॉंग्रेसने अस्पृश्यतेच्या प्रश्नाची दखल घेतली आणि वीस लाखां-

हून जास्त रक्कम अस्पृश्योद्धारासाठी खर्च केली असा गांधीजींनी दावा करताच औपचारिकरीत्या अस्पृश्यतेच्या प्रश्नाची दखल घेण्याखेरीज काँग्रेसने अस्पृश्यांसाठी काहीही केले नाही असे बाबासाहेबांनी सडेतोड उत्तर दिले. काँग्रेसचे सभासद बनण्यासाठी खादी वापरण्याची अट होती; अस्पृश्यतानिवारणासाठी प्रयत्न करणाऱ्यांनाच काँग्रेसचे सदस्य होता येईल अशी तरतूद काँग्रेसपक्षाच्या घटनेत केलेली नव्हती.

गांधीजी व बाबासाहेब यांच्या या पहिल्या भेटीत नाशिकच्या सत्याग्रहाचा उल्लेख केला जाणे स्वाभाविक होते. " महाड येथील तलावाच्या व नाशिक येथील देवालयात प्रवेश करण्याच्या सत्याग्रहामध्ये काँग्रेसच्या अनुयायांनीच आम्हाला जोराचा विरोध केला. नाशिक डिस्ट्रिक्ट काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हेच तेथल्या सनातनी सभेचे अध्यक्ष असून सत्याग्रहाला विरोध करण्यात प्रमुख होते. आम्ही काँग्रेसच्या चळवळीला विरोध केलेला नाही. परंतु काँग्रेसवाले मात्र आमच्या मार्गात आड येतात." असे बाबासाहेबांनी गांधीजींना सांगितले. " डॉ. आंबेडकरांबरोबरच्या एका गृहस्थाने नाशिकच्या येत्या सत्याग्रहात ( म्हणजे नोव्हेंबर १९३१ मध्ये व्हावयाच्या सत्याग्रहात ) भाग घेण्याला महात्माजींना आमंत्रण दिले." अशी या भेटीची हकीगत बाबासाहेबांचे एक स्नेही रामभाऊ तटणीस यांच्या विविधवृत्त साप्ताहिकाने १६ ऑगस्ट १९३१ च्या अंकात प्रसिद्ध केली होती.[५८] नाशिक सत्याग्रहाला विरोध करावयाचा की पाठिंबा द्यावयाचा या प्रश्नावरून नाशिक जिल्हा काँग्रेसमध्ये फूट पडली होती. जिल्हा काँग्रेसचे भूतपूर्व अध्यक्ष आकूत आणि १९३१ साली अध्यक्ष असलेले आर. जे. पांडे नाशिक सत्याग्रहास विरोध करीत होते. याउलट रघुनाथराव गद्रे, गोविंदराव देशपांडे आणि बाळकृष्णपंत मराठे यांचा सत्याग्रहास पाठिंबा होता. नाशिक नगरपालिकेत सनातन्यांचे बहुमत होते. सिंहस्थ पर्वणीच्या वेळी सत्याग्रह सुरू झाला तर देवळाचे दरवाजे बंद करावे लागणार, अशांत परिस्थितीमुळे यात्रेकरूंच्या संख्येत घट होणार, आणि त्यामुळे यात्राकरापासून नगरपालिकेला मिळणारे उत्पन्न बुडणार अशी नगरपालिकेतल्या सनातन्यांना धास्ती वाटू लागली. सिंहस्थात महारांना सत्याग्रह करण्यास मनाई केली जाईल असे आश्वासन नाशिक नगरपालिकेने ठराव करून सरकारकडे मागितले, पण सरकारला असे आश्वासन कसे काय देता येईल हे आपल्याला समजत नाही, असा मध्यविभागाच्या आयुक्तांनी त्या ठरावावर शेरा मारला.[५९] सिंहस्थात सत्याग्रह होऊ नये म्हणून सनातन्यांनी चालवलेल्या कारवायांची कल्पना डॉ. आंबेडकरांना असल्याने १५ ऑगस्ट १९३१ रोजी गांधीजींबरोबर झालेल्या पहिल्या भेटीत बाबासाहेबांनी काँग्रेसवाले नाशिकच्या सत्याग्रहाला विरोध करतात ही वस्तुस्थिती गांधीजींच्या नजरेला आणून दिली होती.

गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्राला हजर राहण्यासाठी बाबासाहेब १५ ऑगस्ट १९३१ रोजी विलायतेस गेले. गोलमेज परिषदेच्या संघराज्यविषयक उपसमितीचे ते

सभासद होते. या समितीची बैठक ७ सप्टेंबरला सुरू झाली तेव्हा गांधीजी लंडनमध्ये पोचलेले नव्हते. १४ सप्टेंबरला गांधीजी लंडनला पोचले. आपण काँग्रेसचे एकमेव प्रतिनिधी आहोत आणि काँग्रेस अस्पृश्यांसकट सर्व हिंदू तसेच मुसलमान, ख्रिस्ती वगैरे धर्मांचे, स्त्रीपुरुष यांचे प्रतिनिधित्व करीत असल्याने आपण सर्व भारतीयांचे प्रतिनिधी आहोत असे गांधीजींनी उपसमितीच्या बैठकीत १७ सप्टेंबर रोजी केलेल्या भाषणात सांगितले. गोलमेज परिषदेला आलेले सर्व प्रतिनिधी लोकांनी निवडलेले नसून इंग्रज सरकारने नेमलेले असल्याबद्दल गांधीजींनी खेद व्यक्त केला. काँग्रसने आपली एकट्याचीच निवड केल्याने प्रतिनिधी म्हणून आपल्याला बोलावण्याखेरीज सरकारला पर्याय राहिला नाही. याउलट अन्य प्रतिनिधी सरकारच्या मेहेरबानीमुळे आले होते असा गांधीजींच्या म्हणण्याचा रोख होता. काँग्रेसने मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असण्यास मान्यता दिलेली असली तरी अस्पृश्यांना वेगळे प्रतिनिधित्व द्यावयास काँग्रेस तयार नसल्याचे गांधीजींनी स्पष्ट केले. तेव्हा अस्पृश्यांविरुद्ध गांधीजींनी व काँग्रेसने युद्ध जाहीर केले असे डॉ. आंबेडकरांना वाटल्याशिवाय राहिले नाही. गोलमेज परिषदेच्या अल्पसंख्याकांबाबतच्या समितीतही गांधीजी अस्पृश्यांच्या मागण्यांना विरोध करणार हे दिसू लागले. हिंदुस्थानचा प्रश्न म्हणजे केवळ हिंदु–मुसलमान–शीख असा तिरंगी सामना नसून भारतीय ख्रिश्चन व अस्पृश्य समजले गेलेले लोक यांचाही वेगळा विचार करावयास हवा अशी बाबासाहेबांची भूमिका होती.

दरम्यान नाशिकच्या परिसरात भाऊराव गायकवाडांनी नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या सत्याग्रहाची पूर्वतयारी करण्यास आरंभ केला होता. वीस सप्टेंबर १९३१ रोजी विंचूर येथे भरलेल्या सभेत पतितपावनदास यांची सत्याग्रहसमितीचे अध्यक्ष आणि भाऊराव गायकवाड यांची समितीचे चिटणीस म्हणून निवड करण्यात आली. त्या वेळी चालू असलेल्या गणेशोत्सवात स्थानिक काँग्रेस नेत्यांच्या आमंत्रणावरून गायकवाडांनी ठिकठिकाणी सत्याग्रहाबाबतची भूमिका स्पष्ट करणारी भाषणेही दिली. डॉ. आंबेडकर विलायतेत असल्यामुळे त्यांच्याऐवजी देवराव नाईक यांनी सत्याग्रहींच्या मिरवणुकीचे नेतृत्व करावयाचे असे ठरवण्यात आले.[६०] या साऱ्या हालचालींचा वृत्तान्त भाऊरावांनी बाबासाहेबांना कळवला तेव्हा उत्तरादाखल २३ सप्टेंबरला बाबासाहेबांनी लिहिले, "सत्याग्रह व्यापक स्वरूपावर चालू होणार आहे हे ऐकून समाधान वाटले. सध्या नाशिक जिल्ह्याचा कलेक्टर कोण आहे ? मि. गॉर्डन यांची बार्डोली कुळांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्यासाठी नेमणूक झाल्याचे मी वाचले आहे. ज्या वेळी व्यापक स्वरूपाचा सत्याग्रह सुरू होणार आहे, त्या वेळी कोण कलेक्टर असेल त्याच्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत, याची आपल्याला जाणीव आहेच."[६१] सत्याग्रहाबाबतीत गॉर्डनच्या कारवाईमुळे प्रत्यक्षतः सनातन्यांचा फायदा होतो हे बाबासाहेबांच्या केव्हाच लक्षात आले होते. त्यामुळे बार्डोली चौकशी समितीच्या कामामुळे काही काळ गॉर्डन-

साहेब नाशिकबाहेर अन्यत्र कोठे गुंतले तर सुंठीवाचून खोकला गेला असे नाशिक सत्याग्रहाच्या धुरिणांना वाटत असले तर त्यात नवल नाही. गॉर्डनसाहेब ३० सप्टेंबर-पर्यंत नाशिकमध्ये होते. त्यांच्या जागी एल. एन. ब्राऊन हे जिल्हाधिकारी म्हणून काम पाहू लागले.

२३ सप्टेंबर १९३१ रोजी येवल्यापासून दहाबारा मैलांवर असलेल्या मुखेड या गावी मराठा विरुद्ध महार अशी मध्यरात्री चकमक झाली.[६२] मुखेड गावच्या वस्तीत मराठे बहुसंख्य होते. २३ सप्टेंबरला 'पांडवप्रताप' या लोकप्रिय ग्रंथाच्या पारायणाच्या समाप्तीच्या निमित्ताने मुखेडच्या महारांनी त्या ग्रंथाची पालखीतून मिरवणूक काढली. सवर्ण हिंदूंनी ती अडवली तेव्हा मिरवणुकीतील अस्पृश्यांनी ठाण मांडले. तेव्हा सवर्णांनी महात्मा गांधी की जय असा जयघोष करीत त्यांच्यावर हल्ला चढविला. या हल्ल्यात भाऊराव गायकवाडांसकट अनेक महार जखमी झाले. दंगलीची हकीगत जिल्हाधिकारी ब्राऊन यांना कळवताना गायकवाडांनी लिहिले, "रणखांबे, दाणी, पतितपावनदास आणि मी मुखेडला हजर होतो. मराठे आपला हट्ट सोडेनात. रणखांबे आणि मी मोटारीने दुपारी चार वाजता येवल्यास गेलो आणि संध्याकाळी सुमारे साडे-सहापर्यंत साध्या वेषातील एक हेड पोलिस कॉन्स्टेबल आणि २ कॉन्स्टेबल यांना घेऊन मामलेदारांना भेटण्यासाठी रणखांबे पुनः मोटारीने येवल्यास गेले. प्रत्यक्ष दंगलीच्या ठिकाणी रात्री एक वाजेपर्यंत एकच पोलिस तेथील मराठ्यांबरोबर पत्ते खेळत बसला होता आणि नंतर तोही दिसेनासा झाला. मराठ्यांनी आमच्यावर दगड फेकले आणि आम्हाला काठ्यांनी झोडपले."[६३] गायकवाडांच्या पत्रातली हकीगत अचूक असल्याचा निर्वाळा देऊन जिल्हाधिकारी ब्राऊन यांनी गृहसचिवांना कळवले, "२३ सप्टेंबरला मुखेडला रात्री दंगल झाल्यानंतर येवल्याचे मामलेदार श्री. बडवे पहाटे तीन वाजता मुखेडला पोचले. दुसरे दिवशी सकाळी त्यांनी दंगलीबद्दलची निवेदने नोंदवून घेतली. पण या प्रकरणाची त्यांनी तपशीलवार चौकशी केली नाही. दहा ते बारा महारांना दुखापती झाल्या, पण त्या गंभीर स्वरूपाच्या नव्हत्या. खुद्द गायकवाडांना मार बसला आहे. मराठ्यांपैकी कोणीही जखमी झालेले नाही. मराठ्यां-विरुद्ध भारतीय दंड संहितेच्या ३४१ व १४७ या कलमानुसार खटले भरले आहेत. २४ सप्टेंबर रोजी मामलेदार श्री. बडवे ज्या निष्काळजीपणाने वागले त्यामुळे सरकारला वाटलेले तीव्र असमाधान त्यांच्या कानी घातलेले आहे."[६४] मुखेडला मराठ्यांनी मध्यरात्री मिरवणुकीवर हल्ला केल्याने मोडलेली मिरवणूक ११ ऑक्टोबरला पुन्हा काढण्याचा गायकवाड, पतितपावनदास वगैरेंनी निर्धार केला.

३० सप्टेंबर १९३१ रोजी गॉर्डन आणि एल. एन. ब्राऊन या जुन्या व नव्या दोन्ही जिल्हाधिकाऱ्यांनी गायकवाडांची भेट घेतली. ११ ऑक्टोबरला निघणाऱ्या मिरवणुकीस पोलिस-संरक्षण देण्याचे त्यांनी गायकवाडांना आश्वासन दिले. ११ तारखेस

मुखेडला सकाळी दहा वाजता मिरवणूक निघेल आणि त्या मिरवणुकीत पाचशे लोक असतील असे गायकवाडांनी सांगितले.[६५] प्रत्यक्षात तीन हजार महार मुखेडला येतील, त्यांपैकी दोनशे नाशिक रोडच्या सरकारी मुद्रणालयातील कर्मचारी असतील असे पोलिस निरीक्षक आणि येवल्याचे मामलेदार या दोघांनी जिल्हाधिकाऱ्यांना ८ ऑक्टोबर रोजी भेटून सांगितले. मिरवणूक पार पडताच पोलिस बंदोबस्त काढून घ्यावा असे ब्राऊननी गृहसचिवांना सुचवले.[६६] मुखेडच्या दंगलीनंतर पतितपावनदासांनी दिनकरराव जवळकरांना पत्र लिहून नाशिक जिल्ह्याचा दौरा करण्याबद्दल त्यांना विनंती केली. जवळकर तेव्हा नागपूरला होते. प्रक्षोभक भाषणे करण्याबद्दल जवळकरांची ख्याती होती. त्यांनी दौरा करून भाषणे केली तर अस्पृश्यांना अधिक चेव येईल असे पतितपावनदासांना वाटले असावे म्हणून त्यांनी जवळकरांना आमंत्रण दिलेले दिसते.

११ ऑक्टोबर १९३१ रोजी मुखेडला पुनः मिरवणूक निघाली तेव्हा जिल्हाधिकारी ब्राऊन, सहाय्यक पोलिस अधीक्षक चुडासमा, पोलिस निरीक्षक कर्णिक व शिंदे हजर होते. कुलकर्णी आडनावाच्या सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेटने जिल्हा पोलिस कायद्याच्या ४२ व ४४ कलमान्वये मिरवणुकीतील माणसांनी किंवा अन्य कोणीही हातात काठी घेण्यास मनाई केली होती. किमान पंधराशे महार मिरवणुकीत सामील झाले होते. मुखेडचा रेव्हेन्यू पाटीलच सवर्ण हिंदूंचे नेतृत्व करीत होता. त्याने सवर्ण हिंदूंच्या जमावाला पांगवले आणि मिरवणुकीपासून दूर काही अंतरावर उभे राहण्यास गावकऱ्यांना सांगितले. पाच सवर्णांना पोलिसांनी पकडले होते. नंतर त्यांना जामिनावर सोडण्यात आले. पोलिसांच्या बंदोबस्तामुळे मिरवणूक निर्विघ्न पार पडली. मिरवणुकी-नंतर भरलेल्या सभेत बडवे मामलेदार आणि पोलिस अधिकारी २३ सप्टेंबरच्या रात्री ताबडतोब मुखेडला आले नाहीत म्हणून त्यांचा निषेध करण्यात आला. तसेच गोलमेज परिषदेत महात्मा गांधींनी घेतलेल्या भूमिकेचाही धिक्कार करण्यात आला.

मुखेडची ११ ऑक्टोबरची मिरवणूक व सभा आटोपून आपापल्या गावी चाललेल्या आठ महारांवर पन्नास मराठ्यांनी वाटेत हल्ला चढवून दोघांना जखमी केल्याची बातमी टाइम्स ऑफ इंडियाने १३ ऑक्टोबर १९३१ च्या अंकात प्रसिद्ध केली.[६७] ती बातमी चुकीची असल्याचे ब्राऊनसाहेबांनी मध्य विभागाच्या आयुक्तांना कळवले. जिल्हा पोलिस अधीक्षक रॉबिन्सन यांच्या रोजनिशीतील नोंदीनुसार मुखेडहून नाशिकला परतणाऱ्या तीन-चारशे महारांनी वाटेत हुल्लड माजवल्यामुळे देशमाने गावचे मराठे आणि महार यांच्यामध्ये चकमक उडाली. गंगाराम गोपाळ महार या चकमकीत जखमी झाला. भारबस, दहेगाव, गोंदेगाव आणि गुंजाळवाडी या गावातही महारांनी काही सवर्णांना मारहाण केली असे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी वृत्त दिले होते.[६८] १३ ऑक्टोबरच्या अंकात टाइम्सने दिलेल्या चुकीच्या बातमीत नाशिकचे टाइम्स ऑफ इंडियाचे वार्ताहर जे. लाल यांनी नाशिकचे पोलिस अधिकारी नाबर यांच्या सांगण्या-

वरून दुरुस्ती केली.

मुखेडच्या दंगलीबाबत डॉ. आंबेडकरांना तारा करून माहिती देण्यात येत होती. मारहाणीची पर्वा न करता कसल्याही परिस्थितीत लढा देण्याची आपल्या अनुयायांची तयारी पाहून बाबासाहेबांना आनंद झाला आणि तो त्यांनी भाऊराव गायकवाडांना १४ ऑक्टोबर रोजी लिहिलेल्या पत्रात व्यक्तही केला. ५ नोव्हेंबरला नाशिकला सत्याग्रह सुरू करण्याचे ठरले होते. त्याआधी मध्यविभागाचे आयुक्त एच. बी. क्लेटन यांनी गायकवाडांशी बोलणे केले होते. क्लेटनसाहेब डॉ. आंबेडकरांना पत्र लिहून नाशिकचा सत्याग्रह थांबवावा अशा आशयाचे पत्र लिहिणार असल्याचा गायकवाडांना सुगावा लागला होता. गायकवाडांनी तसे बाबासाहेबांना कळवले आणि गायकवाडांनी अंदाज केल्याप्रमाणे आयुक्तांनी आपल्याला पत्र पाठवल्याचे बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबरला पत्र लिहून गायकवाड़ांना कळवले, “मी अद्याप त्यांच्या पत्रास उत्तर पाठविलेले नाही पण आजच्या डाकेने पाठवणार आहे. आम्ही सत्याग्रह थांबवू शकत नाही असे मी त्यांना सांगणार आहे. सत्याग्रह चालू ठेवावा असे तुम्ही आपल्या लोकांना सांगावे. आपण जसे सनातनी हिंदूंचे हुकूम स्वीकारू नयेत तसेच सरकारचेही स्वीकारू नयेत. राज्यकर्ते अस्पृश्यता निवारण करतील या आशेने आपण त्यांच्यावर बराच काळ विश्वास ठेवला; पण त्यांनी या बाबतीत काहीही केलेले नाही. आपण सत्याग्रह थांबवावा हे सांगण्याचा त्यांना कसलाही अधिकार नाही... तुम्हाला मदत करण्यासाठी मी तेथे नाही याचे मला दुःख वाटते. पण प्रत्येक ठिकाणी आपल्या लोकांना मी हजर असणे आवश्यक वाटत नाही हे मी जाणतो.”[६९] नाशिकच्या आपल्या सहकाऱ्यांच्या आणि अनुयायांच्या कर्तृत्वाबाबतचा बाबासाहेबांना वाटणारा विश्वास अनाठायी नव्हता. ५ नोव्हेंबरच्या सत्याग्रहाची त्यांनी जय्यत तयारी चालवलेली होती. सत्याग्रहाबाबतची माहिती देण्यासाठी काढण्यात आलेल्या पत्रकावर ‘अप्रतिष्ठा सहन करण्यापेक्षा मरण पत्करलेले बरे’ असे ब्रीदवाक्य छापलेले होते. २ मार्च १९३० पासून झालेल्या चळवळीची संक्षिप्त माहिती देऊन ५ नोव्हेंबर १९३१ रोजी सर्व सत्याग्रहींच्या भोजनाची व्यवस्था करण्याची तसेच त्यांचा नाशिक रोड स्टेशनपासून नाशिक शहरात मोटारीने येण्याचा खर्च सोसण्याची जबाबदारी नानाजी रावबा चंद्रमोरे पळसेकर यांनी एकट्याने उचलली असल्याचे पत्रकात नमूद करण्यात आले होते.

अस्पृश्यांनी चालवलेली तयारी पाहून ५ नोव्हेंबर १९३१ रोजी मिरवणुकीच्या वेळी दंगल होईल असे अनुभवी पोलिस अधिकाऱ्यांनी भाकित करण्यास सुरुवात केली. ३१ ऑक्टोबर १९३१ रोजी गव्हर्नरसाहेबांच्या घरी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीला खुद्द गव्हर्नरसाहेब, गृहमंत्री, गृहसचिव आणि मध्यविभागाचे आयुक्त हजर होते. महारांविरुद्ध कारवाई करणे आवश्यक असल्यास ती काही प्रमाणात बदलण्याची

पद्धत शोधावी असे गव्हर्नरसाहेबांचे म्हणणे पडले. शक्यतो आपण तटस्थतेच्या धोरणास चिकटून राहावे असेही त्यांनी सांगितले. मुंबई सरकारने दिलेल्या सूचना लक्षात घेऊन जिल्हाधिकारी ब्राऊन यांनी १४४ कलम जारी केले. या कलमान्वये काढलेल्या आदेशानुसार मिरवणुका काढण्यास मनाई केली नव्हती. पण विशिष्ट प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला होता. ५ नोव्हेंबर १९३१ रोजी पाच हजार अस्पृश्यांची मिरवणूक शांततेने पार पडली. सवर्णांनी काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करू नये यासाठी अस्पृश्य सत्याग्रहींनी देवळाभोवती पहारा करण्यास सुरुवात केली.

६ नोव्हेंबर १९३१ रोजी पुजाऱ्याच्या घरासमोर दाजी पुराणिक, सखाराम काशिनाथ दीक्षित, पंडित आत्माराम रणछोड या सनातन्यांनी चार महार सत्याग्रहींना रोखले. ७ नोव्हेंबरला देवळाच्या उत्तर दरवाज्याजवळ घुटमळल्याबद्दल बावीस महारांना अटक करण्यात आली.[६८] पुजाऱ्याच्या घराच्या दरवाज्याचा वापर देवळात शिरण्यासाठी केला जात आहे हे पाहताच महार सत्याग्रहींनी त्या दरवाज्यातून घुसण्याचा प्रयत्न केला तेव्हा ८ नोव्हेंबरला ४१ महारांना अटक करण्यात आली. याच सुमारास नाशिकच्या मंदिरप्रवेश सत्याग्रह समितीला अखिल भारतीय काँग्रेसच्या अस्पृश्यता-निवारक समितीचे चिटणीस स्वामी आनंद यांच्या सहीचे पत्र आले. त्यावरून काँग्रेस नाशिकच्या सत्याग्रहास नैतिक पाठिंबा व्यक्त करण्याखेरीज अन्य काही करणार नाही हे उघड झाले. या पत्रात स्वामी आनंद यांनी गायकवाडांना लिहिले होते, "स्वराज्यात अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा ठरवण्यास आपण मागेपुढे पाहणार नाही असे काँग्रेसच्या वतीने गांधीजींनी नुकतेच इंग्लंडमध्ये केलेल्या भाषणात सांगितले...तुम्ही आणि तुमच्या मित्रांनी नाशिकला घेतलेली खंबीर भूमिका असमर्थनीय आहे असे काँग्रेसला वाटत नाही. कारण तुमची ठाम भूमिका ही सनातनी आडमुठेपणाचा अटळ परिणाम आहे असे काँग्रेसला वाटते...नाशिकच्या सत्याग्रहाबाबत माझ्या समितीने आणि शेठ जमनालाल बजाज यांनी यापूर्वी जे म्हटले त्याचीच पुनरुक्ती मला करावी लागत आहे याचा खेद होतो. देश सध्या ज्या अवस्थेतून जातो आहे त्या अवस्थेमुळे सामुदायिक सत्याग्रहाचे अपूर्व शस्त्र भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीच केवळ वापरणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे तत्त्वतः नाशिक सत्याग्रहास संपूर्ण नैतिक पाठिंबा व्यक्त करण्यापलीकडे माझी समिती अन्य साहाय्य करण्यास असमर्थ आहे. ज्यामुळे जनतेची शक्ती तंट्याबखेड्यात खर्ची पडेल आणि परिणामतः राष्ट्रीय शक्ती वाया जाईल असे काहीही करण्यास माझी समिती तयार नाही."[६९] अखिल भारतीय काँग्रेसच्या अस्पृश्यतानिवारण समितीच्या तुलनेने मुंबई प्रांतिक समितीने तुरुंगवास पत्करणाऱ्या नाशिकच्या सत्याग्रहींचे अभिनंदन करणारा आणि काळाराम मंदिराच्या पंचांचा व पुजाऱ्यांचा कडक शब्दात निषेध करणारा ठराव मंजूर केला. महाराष्ट्र

प्रांतिक कॉंग्रेस, नाशिक जिल्हा कॉंग्रेस आणि नाशिकची मंदिरप्रवेश सत्याग्रह समिती यांच्याशी संपर्क साधून ठोस कृती करण्याची भाषाही या ठरावात केली गेली पण प्रत्यक्षात मुंबई प्रांतिक कॉंग्रेसने तसे काहीही केले नाही.

८ नोव्हेंबरला मंदिरप्रवेश सत्याग्रहाला एक नवे वळण देण्यात आले. त्या दिवशी अस्पृश्य सत्याग्रहींनी रामकुंडात स्नान करण्याचा प्रयत्न केला. धनुष्य, राम, लक्ष्मण व सीता ही गोदावरीची चार कुंडे पवित्र मानली जातात आणि यात्रेकरू त्या कुंडांत स्नान करून पुण्य संपादन करीत असतात. रामकुंडाचा वापर कोणी, कसा करावा हे ठरविण्याचा फक्त आपणासच हक्क आहे हा सनातन्यांचा दावा १९२९ साली न्यायालयाने मान्य केला होता. रामकुंडात स्नान करण्याचा हट्ट अस्पृश्यांनी धरला तर देशभराचे स्पृश्य हिंदू बिथरतील अशी धास्ती नाशिकच्या गोऱ्या पोलिस अधीक्षकास वाटत होती.[७२] पोलिसांच्या कोठडीत डांबलेल्या ४१ अस्पृश्य सत्याग्रहींना जामिनावर सोडवून आणण्याची व्यवस्था करण्यास आपण तयार नसल्याचे भाऊराव गायकवाडांनी आपल्याला सांगितल्याचे जिल्हाधिकारी ब्राऊन यांनी मध्यविभागाचे आयुक्त क्लेटन यांना कळवले.[७३] या सत्याग्रहींनी गायकवाडांची आज्ञा पाळली नसल्या मुळे त्यांना जामिनावर सोडवून आणण्याची जबाबदारी आपल्यावर नाही असे गायकवाडांचे म्हणणे होते. त्या वेळी सत्याग्रह समितीत डावपेचाबद्दल मतभेद निर्माण झाले होते असा सरकारी कागदपत्रांवरून अभ्यासकाचा ग्रह होतो.

१२ नोव्हेंबरला लहाविट येथे चिमा मुथाडे नावाच्या मराठ्याने तुळाजी महार, त्याची पत्नी व मुलगा यांना काठीने झोडपले. तुळाजीने नाशिक सत्याग्रहात भाग घेतला होता, हा चिमा मुथाडेच्या मते त्याचा गुन्हा होता. मारहाणीतून नवऱ्याला वाचवण्यासाठी धावलेल्या तुळाजीच्या पत्नीला बेदम मारामुळे जबर दुखापती झाल्याने तिला नाशिकला इस्पितळात दाखल करावे लागले.[७४] ६ व ७ नोव्हेंबरला मारामारीबद्दल पकडल्या गेलेल्या सवर्ण हिंदूंना तीन महिन्यांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली तर अकरा महारांना एक महिन्याची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली. ८ नोव्हेंबरला अटक करण्यात आलेल्या ४१ सत्याग्रहींवर भरलेल्या खटल्याचा निकाल जेव्हा १९ नोव्हेंबरला सांगण्यात आला तेव्हा शौकतअली झिंदाबादच्या घोषणांनी न्यायालयाचा परिसर दणाणला.

अस्पृश्य सत्याग्रही तुरुंगवास सोसण्यास सिद्ध असलेले पाहून सनातन्यांनी काळाराम मंदिरप्रवेश प्रतिबंधक समितीचे पुनरुज्जीवन करण्याचे ठरवले. गंगाधर वासुदेव गायधनी यांच्या घरी, श्रीधर गोपाळ उद्धारे यांच्या घरी, लोकसत्ता या वृत्तपत्राच्या कार्यालयात तसेच गुलालवाडी व्यायामशाळेत १३ ते १८ नोव्हेंबर या काळात सनातन्यांच्या बैठका भरल्या. मंदिरप्रवेशास प्रतिबंध करण्यासाठी नव्याने कंबर कसलेल्या समितीचे अध्यक्ष होते वासुदेव बापूजी आकूत वकील. लक्ष्मण गोपाळ बर्वे आणि

रामचंद्र केशव तळाजिया हे या समितीचे उपाध्यक्ष होते. नारायण बळवंत अंधृटकर हे खजिनदार होते आणि वासुदेव वामन पंचाक्षरी हे समितीचे चिटणीस होते.[७५] मंदिर-प्रवेशास अनुकूल असलेल्या सवर्ण हिंदूंनीही जनार्दन पांडुरंग अभ्यंकरांच्या अध्यक्षते-खाली बैठक घेऊन विचारविनिमय केला. गोविंदराव हरी देशपांडे, पांडुरंग जिवाजी सबनीस, प्राध्यापक राजाराम विनायक ओतूरकर, रामचंद्र विठ्ठल वंडेकर, आर. जी. प्रधान, चिंतामण नीळकंठ पाटणकर वगैरेंनी या बैठकीत भाग घेतला होता.

गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रासाठी विलायतेला गेलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिषदेच्या कामकाजात गुंतल्याने नाशिकच्या सत्याग्रह–समितीला डावपेचाबाबत वारंवार सूचना देणे त्यांना शक्य नव्हते. काळाराम मंदिराच्या पुजाऱ्याने आपल्या घरच्या दरवाज्यातून सवर्णांना देवळात प्रवेश देण्यास सुरुवात केल्यानंतर पुजाऱ्याच्या घरासमोर सत्याग्रह करावयाचा की नाही हा प्रश्न उभा राहिलाच. सत्याग्रह समितीने एक पत्रक काढून सत्याग्रहाबद्दलची भूमिका पुन्हा स्पष्ट केली. सरकारचे कायदे मोडून सरकारची अवज्ञा करणे हा सत्याग्रहाचा हेतू नसून दुष्ट रूढींचे पालन न करणे हे उद्दिष्ट असल्याचे समितीने जाहीर केले. मात्र कायदा मोडल्याशिवाय आपल्या ध्येयाशी एकनिष्ठ राहणे अशक्य आहे अशी परिस्थिती निर्माण झाली तर कायदेभंग करण्यास आपण मागेपुढे पाहणार नाही असा समितीने या पत्रकात इशारा दिला होता.[७६] पुजाऱ्याच्या घरच्या दरवाज्याचा उपयोग करून सवर्ण मंदिरात जाऊ लागल्याने तो दरवाजा रोखणे हा उपाय योजणे भाग होते. मात्र सत्याग्रहींनी खासगी वाट अडवून सवर्णांना त्या वाटेने देवळात जाण्यास प्रतिबंध केला तर तो दखलपात्र गुन्हा समजला जाईल आणि अस्पृश्य सत्याग्रहींना अटक करून त्यांच्यावर खटला भरला जाईल अशी जिल्हाधिकारी ब्राऊन यांनी भाऊराव गायकवाडांना लेखी तंबी देण्याबद्दल पोलिस अधीक्षक रॉबिन्सन यांना बजावले होते.[७७] त्यामुळे पुजाऱ्याच्या घरासमोर सत्याग्रह करून सत्याग्रह दीर्घकाळ चालवायचा की काळाराम मंदिराप्रमाणेच भद्रकाली मंदिर, कपालेश्वराचे देऊळ वगैरे अन्य मंदिरांसमोरही एकाच वेळी सत्याग्रह करून मंदिरप्रवेशाचा प्रश्न धसाला लावायचा या प्रश्नावर पतितपावनदास, अमृतराव रणखांबे, गायकवाड, तुळशीराम महार वगैरे नेत्यांमध्ये वाद उसळला होता. पतितपावनदासांनी दिनकरराव जवळकरांना नाशिकला येण्याबद्दल लिहिले होते. जवळकरांची प्रकृती ढासळली होती. तरीही जरा बरे वाटताच आपण नाशिकला सत्याग्रह करण्यासाठी येऊ असे त्यांनी कळवले होते.

नाशिक सत्याग्रहातील पेचप्रसंगावर काही तोड काढता येते का ते पाहावे असा विचार मुंबई प्रांतिक कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष बॅ. के. एफ. नरीमन, सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वामी आनंद या कॉंग्रेसनेत्यांच्या मनातही घोळत होता. त्यांनी काळाराम मंदिराचे एक विश्वस्त आणि नाशिकचे कॉंग्रेस नेते रघुनाथ हरी गद्रे यांना विचार-

विनिमयासाठी मुंबईला बोलावून घेतले. २१ नोव्हेंबर १९३१ रोजी झालेल्या भेटीत गद्र्यांनी सरदार पटेल व स्वामी आनंद यांना सावधगिरीची सूचना दिली. काँग्रेसने नाशिकच्या मंदिरप्रवेशाचा प्रश्न हाती घेतला तर काँग्रेस नेते सनातन्यांची सहानुभूती व पाठिंबा गमावतील असे गद्र्यांना वाटत होते. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या मोहिमेत भाग घेऊन तुरुंगवास सोसणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील काँग्रेसजनांमध्ये बहुसंख्य सनातनी होते. वासुदेवराव आकूत, पांडे, आत्माराम रणछोड वगैरे ज्येष्ठ काँग्रेस कार्यकर्त्यांनी मंदिरप्रवेशाला नैतिक पाठिंबा देण्याच्या काँग्रेसच्या धोरणाचा निषेध म्हणून काँग्रेसच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला होता. गद्रे मंदिरप्रवेशाला अनुकूल म्हणून त्यांची विश्वस्तपदावरून हकालपट्टी करावी अशा आशयाचा ठरावही सनातन्यांनी मंजूर केला होता. अशा परिस्थितीत काँग्रेसने काळाराम मंदिरप्रवेशाचा प्रश्न हाती घेतला तर काँग्रेसला अपयश येईल असे गद्र्यांचे म्हणणे होते.[९८] २९ नोव्हेंबर १९३१ रोजी विलेपार्ले येथे मुंबई प्रांतिक काँग्रेसची बैठक भरणार होती. त्या बैठकीत गद्र्यांनी नाशिकमधील परिस्थितीबाबत निवेदन करावे असे ठरले. बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांची चौकशी करण्यासाठी २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर १९३१ या काळात वल्लभभाई पटेलांनी पश्चिम खानदेशाचा तसेच बागलाण तालुक्याचा दौरा केला; पण दौऱ्यातील भाषणात वल्लभभाईंनी नाशिक सत्याग्रहाबाबत कसलेच भाष्य केले नाही.

२७ नोव्हेंबर १९३१ रोजी दिनकरराव जवळकर आपल्या दुसऱ्या पत्नीसह नाशिकला आले. जवळकर मुंबई प्रांतिक काँग्रेस समितीचे सभासद होते. मोठ्या महारवाड्यात तुळशीराम संभू महार यांच्या घरी जवळकर पति-पत्नींचा मुक्काम होता. रघुनाथ हरी गद्रे यांनी काळाराम मंदिराच्या विश्वस्तपदाचा राजीनामा द्यावा असे जवळकरांनी सुचवले ते बरोबर होते. गद्रे अस्पृश्यता विरोधक मंडळाचे उपाध्यक्ष होते. ते पद आणि काळाराम मंदिराचे विश्वस्तपद एकाच वेळी भूषविणे योग्य नव्हते. जवळकरांनी काळाराम मंदिराची पाहणी केली. रामकुंडावर सत्याग्रह करण्यास अग्रक्रम द्यावा असे जवळकरांचे मत होते. आपण किती दिवस येथे राहणार असा एका पोलिस-निरीक्षकाने त्यांना प्रश्न केला तेव्हा ही चळवळ यशस्वी झाली नाही तर पकडले जाईपर्यंत किंवा मरण येईपर्यंत येथेच राहणार असा जवळकरांनी जबाब दिला.[९९] जवळकर मनाने मजबूत असले तरी शरीराने फार खचले होते. जेमतेम तिशी उलटलेल्या जवळकरांना गाठीक्षयाने ग्रासले होते. मृत्यू त्यांच्याभोवती घिरट्या घालीत होता. रामकुंडाच्या रणकुंडात उडी घेण्याची त्यांची तयारी होती, पण क्षयाने पोखरलेले शरीर त्यांना साथ देत नव्हते. रामकुंडावरील सत्याग्रहाची तयारी झाली आणि एकदम प्रकृती फार बिघडल्यामुळे जवळकरांना नाशिकच्या इस्पितळात दाखल करावे लागले.

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात गॉर्डनने ब्राऊनकडून जिल्हाधिकारीपदाची सूत्रे

पुनः हाती घेतली. १३ डिसेंबर १९३१ रोजी दोन हजार अस्पृश्य सत्याग्रहींनी मिरवणुकीने रामकुंडावर जाऊन तेथे स्नान करावे असे गायकवाडांनी ठरवले होते. पण हा बेत गायकवाडांना बदलावा लागला. कारण १२ डिसेंबरला जिल्हाधिकारी गॉर्डननी मिरवणूक काढण्याची कल्पना सोडून देण्याबद्दल गायकवाडांना सांगितले होते. आधीचे जिल्हाधिकारी ब्राऊन अणि नंतर पुन्हा अधिकारसूत्रे घेणारे जिल्हाधिकारी गॉर्डन यांच्या दडपणामुळे गायकवाड डावपेचात बदल करीत आहेत हे सत्याग्रहींच्या छावणीतील काही जणांना आवडत नव्हते. मुंबईहून सत्याग्रहात भाग घेण्यासाठी आलेले अकरा स्वयंसेवक गायकवाडांशी भांडण झाल्याने ३० नोव्हेंबर रोजी छावणी सोडून निघाले आणि मुंबईला पायी चालत परतले.[६०] ३ डिसेंबरला रात्री नाशिकमध्ये कारंजाजवळ सत्याग्रह प्रतिबंधक समितीने जाहीर सभा घेतली. सभेत सत्याग्रहाला अनुकूल असणाऱ्या गोविंदराव देशपांड्यांना सनातन्यांनी मारहाण केली. उभय पक्षांवर आक्रमक धोरण स्वीकारावे असे म्हणणाऱ्यांचा वाढता दबाव येत होता. ३ डिसेंबरला सनातन्यांची रात्रीची सभा संपल्यानंतर अस्पृश्यांनी वाकडी बारवलगत एक बस अडवली आणि पुरुषोत्तम विश्वनाथ दीक्षित यांना भोसकले असे वृत्त 'स्वातंत्र्य' या नाशिकच्या वृत्तपत्राने ५ डिसेंबर १९३१ च्या अंकात प्रकाशित केलेले आढळते. ३ डिसेंबरच्या सभेनंतरच्या दंगलीत एका महाराच्या तडाख्यातून एका वृद्धास सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज या कॉलेज विद्यार्थ्यास जखमी करण्यात आले. कविवर्य कुसुमाग्रजांचे एक नातेवाईक महादेव वामन जानोरकर वकील यांनी या प्रकाराबाबत वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या पत्रात म्हटले होते, "कोणी महार बंधूने येथील कॉलेजमधील एक विद्यार्थी कवी कुसुमाग्रज शिरवाडकर यांच्या मानेवर ते एका म्हाताऱ्यास सोडवीत असता चाकूसारख्या एखाद्या तीक्ष्ण धारेच्या वस्तूने प्रहार केला. जखम बरीच मोठी असून रक्तस्रावही फार झाला. ताबडतोब डॉक्टर आणून त्यांना त्यांच्या घरी पोचविण्यात आले."[६१] गावातील तंग वातावरण लक्षात घेऊन आणि सरकारी अधिकाऱ्यांचे दडपण लक्षात घेऊन भाऊराव गायकवाडांनी मोठी मिरवणूक काढून रामकुंडावर सत्याग्रह करण्याची योजना सोडून दिली.

१३ डिसेंबरला रामकुंडाभोवती सनातन्यांनी सत्याग्रहींना रोखण्यासाठी कडे तयार केले होते; सनातन्यांचे ते कडे तोडून एक अस्पृश्य सत्याग्रही घुसला आणि त्याने रामकुंडात उडी घेतली. त्याला सनातन्यांनी मारहाण सुरू केली तेव्हा खुद्द गॉर्डननी त्याला वाचविले आणि मारहाण करणाऱ्या एका इसमास ताब्यात घेतले.[६२] काळाराम मंदिर बंदच होते तेथे पोलिसांचा पहारा होता तसाच रामकुंडाजवळही ठेवण्यात आला. १४ डिसेंबरपासून रामकुंडाभोवतीही १४४ कलम लागू करण्यात आले. रामकुंडाच्या सत्याग्रहामुळे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षक यांना नाशिक सोडून बाहेर दौऱ्यावर जाता येत नव्हते. अन्य जिल्ह्यातून खास मागविण्यात आलेले दोनशे जादा

पोलिस बंदोबस्तात गुंतले होते. त्यांचा खर्चही सरकारला करावा लागत होता. त्यामुळे महारांचे संरक्षण करण्यासाठी यापुढे पोलिस बंदोबस्त करता येणार नाही आणि यापुढे अस्पृश्यांना जे काही करावयाचे असेल ते त्यांनी स्वतःच्या जोखमीवर करावे असे सत्याग्रहाच्या नेत्यांना सांगण्याची अनुमती गॉर्डनने वरिष्ठांकडे मागितली. गृहसचिव, गृहमंत्री आणि गव्हर्नर यांनी गॉर्डनची सूचना मान्य केली. मुंबईच्या 'प्रभात' या मराठी दैनिकाचे प्रतिनिधी सदाशिव नारायण मोडक व त्यांचे मित्र सप्रे यांनी १८ डिसेंबरला नाशिकला येऊन लक्ष्मण हरिशास्त्री गर्गे यांची भेट घेतली. पण मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या या दोघांना सनातन्यांनी चांगली वागणूक दिली नाही; मग त्यांनी सुचविलेली तडजोड मान्य करणे दूरच राहिले. सतातन्यांच्या वतीने प्रयागशेठ आणि बिहारीदास बैरागी यांनी भाऊराव गायकवाड आणि दिनकरराव जवळकर यांची भेट घेतली. मूठभर सनातन्यांनी स्थापन केलेल्या वर्णाश्रमधर्म स्वराज्य संघ या नव्या संघटनेची दखल घेण्यास आपण तयार नसल्याचे जवळकरांनी पत्र लिहून त्यांना कळविले.

जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेले १४४ कलम काळाराम मंदिराच्या परिसरात मागे घेतले जाताच उभयपक्षांत चकमक होणार हे सरकारला अपेक्षित होते. ४ जानेवारी १९३२ रोजी संध्याकाळी सुमारे दीडशे अस्पृश्य काळाराम मंदिराजवळ गेले. त्यांच्यावर सनातन्यांनी दगडफेक करताच त्यांनीही दगडफेक करून जोरदार प्रत्युत्तर दिले. "गायकवाड आपल्या अनुयायांना काबूत ठेवण्यास असमर्थ आहेत" असे भाष्य करून गॉर्डनने या चकमकीचे वृत्त मध्यविभागाच्या आयुक्तांना कळविले.[८३] रामकुंडाभोवती मात्र १४४ कलम जारी होते. त्याची मुदत फेब्रुवारीत संपणार होती. २९ जानेवारी १९३२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या सत्रास हजर राहून विलायतेहून मुंबईत परतले. त्याच्याआधी एक महिन्यापूर्वी म्हणजे २७ डिसेंबर १९३१ रोजी महात्मा गांधी मुंबईत परतले होते तेव्हा बाबासाहेबांच्या अनुयायांनी गांधीजींना काळी निशाणे दाखवून गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांबाबत स्वीकारलेल्या धोरणाचा निषेध केला होता. गांधीजी भारतात परतताच ४ जानेवारी १९३२ रोजी सरकारने त्यांना अटक केली. गांधी-अर्विन करार संपुष्टात येऊन सविनय कायदेभंगाच्या मोहिमेस पुनः सुरुवात झाली होती. २९ जानेवारीस मायदेशी परतल्यावर बाबासाहेबांना नाशिक सत्याग्रहाबाबत तावडतोब निर्णय घेणे जरूर होते.

३० जानेवारी १९३२ रोजी नाशिक नगरपालिकेने रामकृष्ण भाऊ अंधृटकर या सनातनी ब्राह्मणास, धनुष्य, राम, लक्ष्मण, सीता या चारी पवित्र कुंडांभोवतीची जागा सहा महिन्यांसाठी नाममात्र भाड्याने देण्याबाबत ठराव केला. दर महिन्यास एक आणा या दराने नगरपालिकेने भाडे आकारले होते, म्हणजे चारी कुंडांभोवतीची जागा सहा

महिने जवळ जवळ फुकट वापरण्यासाठी दिली होती. चारी कुंडांभोवती तारेचे कुंपण घालण्यासाठी नगरपालिकेने अनुमती दिली होती. ३० जानेवारीलाच मुंबईचे सॉलिसिटर नानाभाई यांच्या नेतृत्वाखालच्या एका शिष्टमंडळाने मुंबईत गव्हर्नरची भेट घेतली होती. गोविंद आबाजी शौचे, सखाराम आबाजी शुक्ल, रघुनाथ अनंत बेले, लक्ष्मण गोपाळ बर्वे, रामचंद्र केशव तळाजिया वगैरे सनातनी या शिष्टमंडळात होते. अस्पृश्यांना रामकुंडात स्नान करण्यास सरकारने मनाई करावी अशी विनंती या शिष्टमंडळाने गव्हर्नरना केली.

रामकुंडाच्या परिसरात जारी असलेल्या १४४ कलमाची मुदत १४ फेब्रुवारीस संपताच तेथे सत्याग्रह सुरू करण्याचा डॉ. आंबेडकरांनी निर्णय घेतला. ५ फेब्रुवारी १९३२ रोजी नगरपालिकेच्या सभेत जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र वाचून दाखविण्यात आले. चारी कुंडांभोवतीची जागा सरकारच्या परवानगीशिवाय भाड्याने देण्याचा नगरपालिकेला अधिकार नाही हे त्या पत्रात स्पष्ट करण्यात आले होते.[८४] रामकुंडाभोवती तारेने कुंपण घालण्यास मनाई केली तरी सनातनी कुंडाभोवती कडे करून अस्पृश्यांना प्रतिबंध करणार हे गॉर्डनना दिसत होते, सनातन्यांनी तसे केल्यास अस्पृश्यांपैकी कोणी तरी बेकायदेशीररीत्या आपल्याला अडवल्याबद्दल न्यायालयात फौजदारी खटला दाखल करावा आणि त्याचा निकाल लागेपर्यंत रामकुंडापासून दूर राहावे असे अस्पृश्यांना सांगण्याची गॉर्डनने वरिष्ठांकडे अनुमती मागितली.[८५] अस्पृश्यांपैकी कोणीतरी न्यायालयात धाव घ्यावी असे गॉर्डनना वाटत होते. सनातन्यांनी अस्पृश्यांना रामकुंडापाशी रोखले तर तो दाखलपात्र गुन्हा मानण्यास पोलिस तयार नव्हते. न्यायालयात जाऊन दाद मागण्यास अस्पृश्य तयार झाले नाहीत तर रामकुंडाजवळ त्यांनी फिरकू नये असे त्यांना स्पष्ट सांगावे अशी गॉर्डनने सूचना केली होती. अस्पृश्य जर रामकुंडापासून दूर राहिले नाहीत तर त्यांच्याविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १०७ व्या कलमान्वये कारवाई करण्यास गॉर्डन तयार होते.

याचा अर्थ एखाद्या अस्पृश्याने फौजदारी खटला दाखल केलाच तर आपल्यावर अन्याय होत असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध करण्याची जबाबदारी त्याच्यावर येत होती. अस्पृश्यांना दिवाणी न्यायालयात दावा गुदरण्यास सांगावे आणि या प्रश्नाचा कायमचा निकाल लावून घेण्यास सांगावे असे मनमोहनदास रामजी व अन्य सनातन्यांनी सरकारच्या मागे सारखे टुमणे लावले होते. तंटा करीत असलेल्या दोन्ही पक्षांपैकी जो पक्ष प्रथम न्यायालयात जाईल त्याच्यावर पुराव्यानिशी सर्व काही सिद्ध करण्याची जबाबदारी पडणार होती म्हणून दोन्ही पक्ष प्रथम न्यायालयात जाण्यास उत्सुक नव्हते. शक्यतो दुसऱ्यास न्यायालयाकडे जाणे भाग पडेल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न चाललेला होता. याउलट सरकारी अधिकारी कधी अस्पृश्यांवर दडपण आणून तर कधी सनातन्यांवर दबाव आणून प्रश्न अखेर

न्यायालयात धसाला लावला जाईल या दृष्टीने प्रयत्न करीत होते. गॉर्डनच्या गैरहजेरीत जिल्हाधिकारी म्हणून काम करणाऱ्या ब्राऊनसाहेबांनी सनातन्यांना न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला होता; पण सनातन्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले होते.[८५] गॉर्डननी केलेल्या सूचना मान्य केल्या तर अस्पृश्य अडचणीत येणार आणि प्रत्यक्षात सनातन्यांचे पारडे जड होणार याची जाणीव गृहसचिवांना होती. शतकानुशतके परंपरेने रामकुंडात अस्पृश्यांना स्नान करण्यास मनाई करण्यात आली होती. ही परंपरा मान्य करणे सरकारवर बंधनकारक नाही असे गृहसचिवांना वाटत होते. याउलट अस्पृश्यांविषयी आपल्याला सहानुभूती वाटत असली तरी शेकडो वर्षांच्या वहिवाटीनुसार सनातन्यांना मिळालेले हक्क मान्य करणे सरकारवर बंधनकारक आहे असे मत जी. ए. थॉमस या अधिकाऱ्याने नोंदविलेले आढळते.[८६] या पेचप्रसंगातून सुटण्याचा मार्ग निश्चित होईपर्यंत रामकुंडाच्या परिसरातील १४४ कलमाची मुदत वाढवीत राहणे याखेरीज सरकारपुढे पर्याय उरला नव्हता.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १४७ व्या कलमानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई करण्यास हरकत नाही असे मत सरकारच्या कायदेविषयक सल्लागाराने दिल्यानंतर गृहसचिव आर. एम. मॅक्सवेल यांनी डॉ. आंबेडकरांचे एक सहकारी डॉ. पी. जी. सोळंकी यांना ८ मार्चला पत्र लिहून त्यांच्यामार्फत डॉ. आंबेडकरांनी काय ठरवले आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सोळंकींनी ताबडतोब उत्तर न पाठवल्याने १४७ कलमान्वये कारवाई करण्याविषयी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात असे गृहसचिवांना वाटले. डॉ. आंबेडकरांशी बोलणे केल्यानंतर सोळंकींनी सत्याग्रहाची चळवळ मागे घेणार असल्याचे मॅक्सवेलना सांगितले. आपल्याला हे सारे लेखी द्यावे असा मॅक्सवेलनी आग्रह धरला. १४७ कलमान्वये नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई केल्यास अस्पृश्यांची हरकत असणार नाही असे सोळंकीबरोबरच्या बोलण्यावरून मॅक्सवेलचे मत झाले.[८८] १४ मार्च १९३२ रोजी १४४ कलमाची मुदत एक महिन्याने वाढविण्यात आली. ही मुदत संपल्यावर लगेच १५ एप्रिलला रामनवमी असल्याने आणि १७ एप्रिलला रथयात्रा निघणार असल्याने संभाव्य दंगलीची टांगती तलवार जिल्हाधिकाऱ्यांच्या शिरावर लटकत होतीच.

महारांना न्यायालयात जाऊन आपल्यावर अन्याय होत असल्याचे सिद्ध करण्यास सांगणे म्हणजे प्रत्यक्षात सनातन्यांची बाजू घेणे असा अर्थ होत असल्याने गॉर्डनची सूचना सरकारला मान्य करता येत नाही असे मॅक्सवेलनी गॉर्डनना कळविले. दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधींनी एका आठवड्याच्या आत समझौता केला नाही तर १४७ व्या कलमानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी रीतसर चौकशी करावी असे त्यांना सांगण्यात आले.[८९] भाऊराव गायकवाडांचे वडील कृष्णराव यांचे निधन झाल्याने तेराव्या दिवशी करण्यात आलेल्या धार्मिक विधीसाठी आंबेडकरी चळवळीतील ठिकठिकाणचे

कार्यकर्ते नाशकात आले होते. त्यानिमित्ताने नाशिकपासून पंधरा मैलावरच्या अंबा खेड्यात पाच हजार अस्पृश्यांची एक मोठी सभा झाली. डॉ. आंबेडकरांचे उजवे हात समजले जाणारे देवराव नाईक या सभेचे अध्यक्ष होते. काळाराम मंदिराप्रमाणेच रामकुंडापाशीही सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय या सभेत घेण्यात आला. एप्रिलच्या आरंभी गॉर्डनची बदली झाल्यामुळे त्यांच्या जागी एल. एन. ब्राऊन पुन्हा जिल्हाधिकारी म्हणून काम पाहू लागले. ३ एप्रिल १९३२ रोजी चांदूर तालुक्यातील खडकजांब या गावी सबनीस वकिलांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यांची सभा झाली. जिल्हा-लोकल बोर्डाच्या मालकीची गावात एक विहीर होती. त्या विहिरीतील पाणी शेंदून घेण्याचा अधिकार सभेनंतर अस्पृश्यांनी बजावला. तेव्हा गावातल्या मराठ्यांनी कसलाही अडथळा आणला नाही.[१०] ८ एप्रिलला जिल्हाधिकारी ब्राऊनने गायकवाडांशी बोलणे केले. काळाराम मंदिर प्रवेशाबाबत किंवा रामकुंडात स्नान करण्याच्या प्रश्नाबाबत कसलीही तडजोड होण्याची आशा नसल्याचे गायकवाडांनी स्पष्ट केले. ब्राऊन साहेबांनी १८ एप्रिलपर्यंत प्रतिपक्षाबरोबर तडजोड करण्यासंबंधी गायकवाडांना मुदत दिली.

रामकुंडाच्या परिसरात जारी असलेल्या १४४ कलमाची मुदत १३ मे १९३२ पर्यंत वाढवण्यात आली. मात्र १५ एप्रिलला म्हणजे रामनवमीला पुजाऱ्याच्या घरातील दरवाजाने सनातन्यांना देवळात जाण्यास मुभा देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेतला. त्यासाठी पुजाऱ्याच्या घराच्या दोन्ही बाजूला अडथळे उभे करून अस्पृश्य सत्याग्रहींना अडवण्याची सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केली; पण गृहखात्याने तसे करण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांना तारेने कळविले.[११] रामनवमीच्या दिवशी सकाळी सात वाजता काळाराम मंदिराच्या विश्वस्तांनी देवळाचा उत्तर दरवाजा उघडला. दरवाज्यालगत आतल्या बाजूस काहीजण उभे होते. महार त्या दरवाज्यातून आत येऊ लागले तर त्यांना अडवण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. सवर्ण हिंदूंना उत्तर दरवाज्यातून आत घ्यावयाचे आणि त्यांनी देवदर्शन घेतल्यानंतर दक्षिण दरवाज्याने त्यांना बाहेर जाऊ द्यावयाचे अशी व्यवस्था करण्यात आली होती. डॉ. आंबेडकरांचे निष्ठावंत सहकारी देवराव नाईक हे ब्राह्मण असल्याने त्यांना मंदिरात प्रवेश करण्यास कसलीच आडकाठी नव्हती. त्यांना सरकारने अटकही केली नाही. रामनवमीस झालेल्या सत्याग्रहाचे मार्गदर्शन देवराव नाईक करीत होते. त्यांनी महार सत्याग्रही स्त्रियांना देवळात शिरण्यास सांगितले. देवळात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चौदा अस्पृश्य स्त्रियांना पोलिसांनी अटक केली. सकाळी साडेअकराच्या सुमारास देवराव नाईक यांनी आणखी तीस सत्याग्रही स्त्रियांची तुकडी देवळालगतच्या छोट्या महारवाड्यात जमवली असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली. ही सबंध तुकडी एकाच वेळी देवळात शिरण्याचा प्रयत्न करणार

असल्याची कुणकुण लागताच मंदिराच्या विश्वस्तांनी दुपारी बारा वाजल्यानंतर देवळाचे दरवाजे बंद केले. सकाळी देवळाचे दरवाजे उघडल्यापासून ते दुपारी बंद केले जाईपर्यंतच्या पाच-सहा तासांत पोलिसांनी दोन सनातन्यांना आणि १४ अस्पृश्य सत्याग्रही पुरुषांना पकडले. अटक झालेल्यांमध्ये भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे आणि सावळाराम दाणी हे तिघे पुढारीही होते.[१२] पकडलेल्या लोकांवर भरलेल्या खटल्याची सुनावणी सिटी मॅजिस्ट्रेटच्या न्यायालयात झाली. भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, सावळाराम दाणी, हरिभाऊ रायाजी जाधव वगैरे अस्पृश्य सत्याग्रहींना दोन महिन्यांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. चौदा सत्याग्रही स्त्रियांपैकी पावली संभू काळे या वयाने पाऊणशेच्या आसपास असल्याने त्यांना पंधरा दिवस साधी कैद अशी शिक्षा सांगण्यात आली आणि उरलेल्या स्त्रियांना एक महिना सक्तमजुरीची शिक्षा फर्मावण्यात आली. ज्या दोन सनातन्यांना पकडण्यात आले होते त्यांनी आपल्या वर्तनाबद्दल दिलगिरी प्रदर्शित केल्याने त्यांना सोडून देण्यात आले.

सत्याग्रह समितीचे अध्यक्ष पतितपावनदास यांनी १८ एप्रिल १९३२ रोजी एक पत्रक काढून पोलिसांच्या पक्षपाती धोरणावर झोड उठवली. सवर्ण हिंदू झुंडीने देवळात प्रवेश करीत असलेले पाहून अस्पृश्यांनी तिघा जणांची एक तुकडी करून देवळात जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा पोलिसांनी त्यांना अडवले. सवर्ण हिंदूंच्या झुंडीच्या झुंडी देवालयात शिरत असताना पोलिसांनी त्यांच्यापैकी कोणासही हटकले नाही. याउलट पोलिस अस्पृश्य सत्याग्रहींबरोबर धसमुसळेपणाने वागले आणि अस्पृश्यांना पोलिसांच्या लाथा खाव्या लागल्या असे पतितपावनदासांचे म्हणणे होते. जिल्हाधिकारी बाऊन देवळापाशी आल्यावर पोलिसांनी स्पृश्य हिंदूंपैकी पुरुषांना देवळात जाण्यास मज्जाव केला आणि ते फक्त स्पृश्य स्त्रियांना मंदिरात प्रवेश करण्याची मुभा देऊ लागले. तेव्हा अस्पृश्य स्त्रियाही देवळात शिरण्याचा प्रयत्न करू लागल्या. त्यांना पोलिसांनी देवळात जाऊ दिले नाही.[६३] नाशिकच्या पोलिसांनी अस्पृश्य सत्याग्रहींना दिलेल्या पक्षपाती वागणुकीबद्दल पतितपावनदासांनी केलेले आरोप खोटे असल्याचे मुंबई सरकारने २७ एप्रिल १९३२ रोजी पत्रक काढून जाहीर केले.

१६ एप्रिल १९३२ रोजी सकाळी काळाराम मंदिराचे दरवाजे बंदच होते. सुमारे सत्तर महार देवळाभोवती गस्त घालीत होते. सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास अस्पृश्यांनी एक-दोन ब्राह्मणांना मारहाण केली. दत्तात्रय दिगंबर दीक्षित नावाचा एकवीस वर्षांचा ब्राह्मण तरुण जबर जखमी झाल्याने त्यास इस्पितळात दाखल करावे लागले. त्याबद्दल दहा महारांना पोलिसांनी अटक केली.[६४] या मारहाणीच्या प्रकारामुळे सवर्ण हिंदू संतापले. मंदिराच्या विश्वस्तांनी दुपारी सव्वाचारच्या सुमारास अचानक देवळाचे दरवाजे उघडले. पण पोलिस बंदोबस्त कडक असल्याने दंगलीचा भडका



३३४५ २६९२५ २५५१७०

उडाला नाही. गृहखात्याचे सचिव आर. एम. मॅक्सवेल यांनी १५ एप्रिलच्या घटनेसंबंधी लिहिलेल्या टिपणात त्या दिवशी जे घडले त्यास अस्पृश्य सत्याग्रही व त्यांचे पुढारी यांचे वागणे कारण असल्याचे म्हटले आहे. सरकारला तटस्थतेचे धोरण राखणे अवघड झाले असे मॅक्सवेलनी जिल्हाधिकारी व पोलिस यांच्या कृतीचे समर्थनही केलेले आढळते. १७ एप्रिलला निघणाऱ्या रथयात्रेस १४४ कलम जारी करून जिल्हाधिकाऱ्यांनी मनाई केल्याने सनातन्यांच्या बाजूने संपूर्णतया झुकलेले सरकारी पारडे पुन्हा काही अंशी अस्पृश्यांच्या बाजूला आणलेले आहे असे भाष्यही मॅक्सवेलने केलेले दिसते.[३५] जिल्हाधिकाऱ्यांनी काळाराम मंदिराच्या परिसरातही १४४ कलम जारी केल्याने १७ एप्रिलला रथयात्रा काढता आली नाही. देवळाच्या चार भिंतीआड श्रीरामाच्या मूर्तीला स्नान घालून सनातन्यांना समाधान मानून घ्यावे लागले.

नाशिकला एवढे सगळे रामायण घडत असताना बाबासाहेब आंबेडकर नाशिकला येऊ शकले नाहीत, कारण १ ते ३ मार्चपर्यंत झालेल्या वाटाघाटींच्या आधारे केल्या गेलेल्या राजा-मुंजे करारामुळे दलित चळवळीत जी दुफळी माजली होती ती वाढू नये म्हणून प्रयत्न करण्याच्या निकडीच्या कामावर लक्ष केंद्रित करणे बाबासाहेबांना आवश्यक बनले होते. रावबहादूर एम. सी. राजांनी ऑक्टोबर १९३१ मध्ये डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी गोलमेज परिषदेत केलेल्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीला जाहीर पाठिंबा दिला होता. १ ते ३ मार्च १९३२ या तीन दिवसांत हिंदू महासभेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांच्याबरोबर बोलणी केल्यानंतर रावबहादूर राजांनी आपली भूमिका बदलली आणि संयुक्त मतदारसंघात अस्पृश्यांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवाव्यात अशी नवी मागणी करण्याचे त्यांनी ठरवले. डॉ. मुंजे व राजा यांच्यात एकमत झाले आणि ६ मार्च १९३२ रोजी राजा-मुंजे करारास दिल्लीत भरलेल्या हिंदू व शीख पुढाऱ्यांच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानंतर ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांना तारेने हे वृत्त कळविण्यात आले. गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकर आणि श्रीनिवासन यांनी अस्पृश्यांच्या वतीने केलेल्या मागण्या आपणास मान्य नसून त्यांनी तेथे अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ वगैरे तरतुदी असलेल्या जो करार केला तो अनधिकृत असल्याचे रावबहादूर राजांनी ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस असोसिएशनचे अध्यक्ष या नात्याने एप्रिल १९३२ मध्ये जाहीर केले. रावबहादूर राजांच्या या भूमिकेला मुंबईचे बाळकृष्ण जानोजी देवरुखकर, पुण्याचे बापूसाहेब राजभोज, वऱ्हाडचे गणेश आकाजी गवई आणि नागपूरचे रावसाहेब जी. एम. ठवरे यांनी जाहीररीत्या पाठिंबा दिला. ७ व ८ मे १९३२ रोजी नागपूरजवळ कामटी येथे ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस काँग्रेसचे दुसरे अधिवेशन मुन्नुस्वामी पिल्ले यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यासाठी ७ मे रोजी बाबासाहेब नागपूरला उतरले तेव्हा राजा, गवई, ठवरे वगैरेंच्या पाठिराख्यांनी त्यांना

काळी निशाणे दाखवली. नंतरच्या धुमश्चक्रीत सोडावॉटरच्या बाटल्या, चाकू व काठ्या यांचा सर्रास वापर करण्यात आला. ८ मे रोजी हरकतीचा मुद्दा उपस्थित करून अधिवेशनात गोंधळ माजवण्याचा बापूसाहेब राजभोजांनी प्रयत्न केला तेव्हा झालेल्या धक्काबुक्कीत राजभोजांना बराच मार बसल्याने त्यांना इस्पितळात दाखल करावे लागले.

बाहेर चाललेल्या या रणधुमाळीत गुंतले असतानाही कामटीचे अधिवेशन संपल्यानंतर नाशिकच्या आपल्या अनुयायांना मार्गदर्शन करण्यासाठी बाबासाहेबांनी सवड काढली. १९ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी ब्राऊननी १४७ व्या कलमानुसार रामकुंडाबाबत एक अधिसूचना काढली. गायकवाड, रणखांबे, दाणी हे सत्याग्रह समितीचे नेते धुळे येथील तुरुंगात शिक्षा भोगीत असल्याने त्यांच्या गैरहजेरीत प्रभाशंकर जनार्दन रोहम हे सत्याग्रह समितीचे प्रतिनिधी म्हणून काम पाहात होते. ब्राऊन यांनी रोहमना रामकुंडाबाबतच्या तंट्यात आपली बाजू मांडण्यास सांगितले तेव्हा त्यांनी ११ मे पर्यंत मुदत मागितली. खुद्द बाबासाहेब आंबेडकरांच्या सल्ल्यानुसारच ही मुदत मागण्यात आली असावी हे उघड दिसते. कारण रोहम यांच्या बरोबरच्या बोलण्याचा वृत्तान्त गृहसचिवांना कळवताना ब्राऊननी लिहिले, "मे महिन्याच्या आरंभी डॉ. आंबेडकर नाशिकला भेट देतील अशी अपेक्षा आहे. त्यांचे याबाबत मार्गदर्शन घेण्याची रोहम वगैरेंची इच्छा आहे."[९६] ११ मे पर्यंत निवेदन देण्यासाठी रोहमना मुदत द्यावयाची तर रामकुंडाच्या परिसरात जारी केलेल्या १४४ कलमाची मुदतही किमान एक महिन्याने वाढवणे जरूर होते. ब्राऊन यांच्यापुढे उभय पक्षांनी आपापली बाजू मांडून निर्णय देण्यास वेळ लागणार हे लक्षात घेऊन मुंबई सरकारने रामकुंडाच्या परिसरात जारी असलेल्या १४४ कलमाची मुदत दोन महिन्यांनी म्हणजे १३ जुलैपर्यंत वाढवण्याची जिल्हाधिकाऱ्यांना अनुमती दिली.

१२ मे १९३२ रोजी अस्पृश्यांच्या वतीने तसेच सवर्ण हिंदूंच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदने सादर करण्यात आली आणि जिल्हाधिकाऱ्यांनी १४ मेपर्यंत या प्रकरणाची सुनावणी स्थगित केली. दरम्यान बाबासाहेबांनी मुंबईच्या गव्हर्नरबरोबर संपर्क साधला असे दिसते. १३ मे रोजी गृहसचिव मॅक्सवेल यांनी बाबासाहेबांना लिहिले, "नाशिक येथील मंदिराजवळ झालेल्या दंगलीच्या संदर्भात शिक्षा झालेल्या अस्पृश्यांविषयी आपण सरकारला काही सूचना करू इच्छिता असे मला गव्हर्नरसाहेबांकडून समजले. यासंबंधी आपल्याबरोबर चर्चा करावी असे त्यांनी मला सांगितले आहे."[९७] मॅक्सवेल व बाबासाहेब यांच्या भेटीत नेमके काय बोलणे झाले हे निश्चित पुराव्याअभावी सांगणे कठीण आहे.

१४ मे १९३२ पासून रामकुंडात स्नान करण्याच्या तंट्याबाबत उभयपक्षांच्या वकिलांनी ब्राऊनसमोर युक्तिवाद करण्यास सुरुवात केली. अस्पृश्यांच्या वतीने

सबनीस वकिलांनी उच्च न्यायालयाच्या काही निवाड्यांचा आधार घेऊन गोदावरी नदीतील रामकुंडात सवर्ण हिंदूंप्रमाणेच अस्पृश्यांनाही आंघोळ करण्याचा अधिकार आहे असे प्रतिपादन केले. सनातन्यांची बाजू वासुदेवराव आकूत मांडीत होते. त्यांनी शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या एका रूढीचा आधार घेतला. रामकुंडात स्नान करणाऱ्या किंवा तेथे श्राद्धासारखे धर्मविधी पार पाडणाऱ्या सवर्ण हिंदूंनाही रामकुंडात स्नान करण्याचा अनिर्बंध अधिकार नव्हता. त्यांना त्यासाठी पैसे मोजावे लागत असत. असे पैसे घेण्याचा अधिकार असलेले पाचशे ते हजार भटभिक्षुक नाशकात तेव्हा होते. रामकुंडात स्नान करण्याबद्दलचे पैसे ज्यांच्याकडून येणे होते त्यांच्याकडून ते वसूल करण्याचे भटभिक्षुकांचा अधिकार आहे असे १८४० साली न्यायालयाने मान्य केले होते. न्यायालयाचा १८४० सालचा तो आदेशच आकूत वकिलांनी ब्राऊनसमोर सादर केला. १९०७ साली तेव्हाचे जिल्हान्यायाधीश बी. सी. केनेडी यांनी तसेच गिरजाशंकर विरुद्ध मुरलीधर या खटल्यात मुंबई उच्च न्यायालयानेही सनातनी ब्राह्मणांच्या बाजूने निर्णय दिले होते. या वस्तुस्थितीकडे आकूत वकिलांनी जिल्हाधिकारी ब्राऊनचे लक्ष वेधले.[१८] मंदिरप्रवेशाच्या प्रश्नाबाबत काय किंवा रामकुंडात स्नान करण्याच्या प्रश्नाबाबत काय, वहिवाट तसेच न्यायालयीन निवाडे सनातन्यांच्या बाजूचे होते आणि त्यात काही नवल नव्हते. कोणत्याही समाजातील कायदा किंवा न्यायालयेही सर्वसामान्यतः त्या त्या समाजातील प्रस्थापितांनाच अनुकूल असतात आणि परंपरानिष्ठही असतात. कायद्यात बदल केल्याशिवाय न्यायालयात जाऊन मंदिर-प्रवेशाचा किंवा नद्या-विहिरींचे पाणी वापरण्याचा हक्क प्रस्थापित करणे अस्पृश्यांना अशक्य होते. या जाणिवेमुळेच आंबेडकरांचे अनुयायी न्यायालयात तंटा नेण्यास उत्सुक नव्हते. न्यायालयीन निर्णय त्यांच्या बाजूने दिला गेला असता तर तीच एक नवलाची गोष्ट ठरली असती. जूनच्या पहिल्या आठवड्यात जिल्हादंडाधिकारी या नात्याने ब्राऊनने निर्णय जाहीर केला. सवर्ण हिंदूंच्या दृष्टीने पवित्र असलेल्या कुंडात अस्पृश्यांना स्नान करण्याचा अधिकार नाही असा निर्णय देण्यात आला होता.

जूनच्या तिसऱ्या आठवड्यात भाऊराव गायकवाड, रणखांबे, दाणी वगैरे नेते कारावासातून मुक्त झाले. १७ जूनला त्यांची नाशकातील मुख्य रस्त्यांवरून मिरवणूक काढावी आणि त्यांचा सत्कार करावा असे नाशिकच्या अस्पृश्यांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक रॉबिन्सन यांच्याकडे रीतसर परवानगी मागितली; पण शहरातील तणावाची परिस्थिती लक्षात घेता परवानगी देता येणार नाही असे त्यांना सांगण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांचा या बाबतीतला मनाईहुकूम मोडण्याचा अस्पृश्यांचा प्रथम विचार होता आणि तसे त्यांनी ब्राऊनला सांगितले होते; पण अधिक विचार केल्यानंतर त्यांनी तो विचार बदलला आणि जिल्हाधिकाऱ्यांची आज्ञा पाळली.[१९] तुरुंगातून सुटल्यानंतर भाऊराव गायकवाड जिल्हाधिकाऱ्यांना भेटले. आपण पुन्हा

सत्याग्रह करणार नाही असे त्यांनी ब्राऊनला सांगितले. मात्र डॉ. आंबेडकरांच्या परवानगीशिवाय सत्याग्रह-समितीचे विसर्जन केले जाणार नाही हेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. आंबेडकर यावेळी विलायतेत होते. ७ व ८ मे रोजी झालेले कामटीचे अधिवेशन संपल्यानंतर बाबासाहेबांनी पुणे-कोल्हापूर भागाचा दौरा करून ठिकठिकाणी राजा-मुंजे करारावर कडक टीका करणारी भाषणे केली होती. हा दौरा चालू असताना विलायतेहून त्यांना तातडीने बोलावणे आले. त्यामुळे २६ मे १९३२ रोजी बाबासाहेब अचानक विलायतेस गेले. ७ ते १४ जूनपर्यंत त्यांनी लंडनमध्ये ब्रिटिश पंतप्रधानासकट ज्येष्ठ मंत्र्यांच्या व मुत्सद्द्यांच्या भेटीगाठी घेतल्या. त्यानंतर महिनाभर प्रकृती सुधारण्यासाठी आणि विश्रांतीसाठी ते जर्मनीत ड्रेसडेन येथे एका सॅनेटोरियममध्ये राहिले. ते तेथून ऑगस्टमध्ये परतणार असल्याने सत्याग्रह-समितीच्या विसर्जनाबाबत निर्णय घेणे गायकवाडांना शक्य नव्हते.

१९३२ साल हे त्रिखंड सिंहस्थ-पर्वणीचे वर्ष होते. ही सिंहस्थ-पर्वणी बहात्तर वर्षांनी आलेली होती. त्यानिमित्त लाखो यात्रेकरू नाशिकला येणार होते. 'आली सिंहस्थ पर्वणी। न्हाव्याभटा झाली धणी।' हे तुकाराम महाराजांच्या काळात म्हणजे सतराव्या शतकात जेवढे खरे होते तेवढेच ते विसाव्या शतकातही खरे होते. १४ ते २५ जून या काळात तीस हजार नंगे साधू नाशिकला आले होते. त्रिखंडी सिंहस्थ-पर्वणीच्या निमित्ताने बहात्तर वर्षांनी नंग्या साधूंची जंगी मिरवणूक १ ऑगस्ट १९३२ रोजी निघाली. ती व्यवस्थित पार पडली. ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्याच्या आरंभी मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल करण्याखेरीज नाशिकच्या अस्पृश्यांनी या काळात अन्य काही कृती केली नाही.

१७ ऑगस्ट रोजी ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनल्ड यांनी अल्पसंख्याकांना प्रतिनिधित्व देण्याची एक तात्पुरती योजना जाहीर केली. जातीय निवाडा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या योजनेनुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले होते. राखीव तसेच सर्वसाधारण मतदारसंघातून निवडणूक लढविण्याचा अधिकार अस्पृश्यांना वीस वर्षांच्या काळासाठी देण्यात आला होता. अस्पृश्यांसाठी केलेली ही तरतूद म्हणजे अस्पृश्यांना हिंदू समाजापासून अलग करण्याची 'फोडा आणि झोडा' या साम्राज्यवाद्यांच्या कूटनीतीची आणखी एक चाल आहे असे अनेकांना वाटले. १८ ऑगस्ट १९३२ रोजी महात्माजींनी तुरुंगातून पंतप्रधान मॅकडोनल्ड यांना पत्र लिहून जातीय निवाड्याचा निषेध म्हणून २० सप्टेंबरपासून आपण प्राणांतिक उपोषण करणार असल्याचे कळविले. पंतप्रधान मॅकडोनल्डनी निर्णय बदलण्यास नकार दिल्यामुळे गांधीजींचे उपोषण अटळ झाले. १३ सप्टेंबर १९३२ रोजी दिवाणबहादूर एम. सी. राजांनी पत्रक काढून जातीय निवाड्याचा धिक्कार केला आणि गांधीजींचे प्राण वाचवण्यासाठी सर्वांनी एकदिलाने प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

डॉ. आंबेडकरांनी मात्र गांधीजींचे उपोषण म्हणजे केवळ एक राजकीय स्टंट असल्याचे मत व्यक्त केले. उपोषणासारखे उपाय बाबासाहेबांना कधीच आवडले नाहीत. तरीही त्यांनी १९ सप्टेंबरला मुंबईत मदनमोहन मालवीयांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हिंदू पुढाऱ्यांच्या परिषदेत भाग घेतला. काहीही झाले तरी गांधीजींचे प्राण वाचवायचे आणि शक्य तितक्या लवकर अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढावयाचा या दोन मुद्द्यांबाबत परिषदेत एकमत झाले.[१००] २० सप्टेंबरला दिवाणबहादूर राजांनी एक जाहीरनामा तयार केला. घटनात्मक बाबींसंबंधी गांधीजींनी निश्चित सूचना केल्या तरच त्यांची चर्चा करता येईल अशी बाबासाहेबांनी भूमिका घेतल्याने परिषदेचे कामकाज स्थगित करण्यात आले.

परिषदेचे एक अध्वर्यू तेजबहादूर सप्रू यांनी अनौपचारिक बैठकीत एक तोडगा सुचवला. संयुक्त मतदारसंघातील काही जागा अस्पृश्यांसाठी राखीव ठेवाव्यात. प्रत्येक राखीव जागेसाठी अस्पृश्य मतदारांनी प्रारंभिक निवडणुकीत चार अस्पृश्य उमेदवारांची निवड करावी. नंतर होणाऱ्या निवडणुकीत सर्व मतदारांनी त्या चौघांपैकी एक अस्पृश्य उमेदवार निवडावा अशी सप्रूंनी योजना सुचवली होती. सप्रूंच्या तोडग्याचे बाबासाहेबांनी स्वागत केले पण त्याबरोबरच पंतप्रधान मॅकडोनल्ड यांनी अस्पृश्यांना कायदेमंडळात दिलेल्या जागांची संख्या कमी असल्याने बाबासाहेबांनी जास्त जागांची मागणी केली. मॅकडोनल्डनी जातीय निवाड्यानुसार ७८ जागा देऊ केल्या होत्या. बाबासाहेबांनी प्रथम १९७ जागा मागितल्या पण वाटाघाटी चालू झाल्या तेव्हा अखेर अस्पृश्यांसाठी १४८ जागांचा सवर्ण हिंदू पुढाऱ्यांचा देकार स्वीकारला. मध्यवर्ती कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी असलेल्या सर्वसाधारण मतदारसंघात १८ टक्के जागा अस्पृश्यांसाठी राखीव असाव्यात असे ठरले. अस्पृश्यांसाठी राखीव असलेल्या जागांबाबतची प्राथमिक निवडणुकीची पद्धत दहा वर्षांनंतर आपोआप नष्ट करावी असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. राखीव जागांबाबतचा प्रश्न मात्र अस्पृश्यांचे सार्वमत घेऊन निकालात काढावा असे त्यांनी सुचवले होते. या सार्वमताच्या प्रश्नावर वाटाघाटींचे घोडे अडले. सार्वमत पाच वर्षांनी घ्यावे असे गांधीजी म्हणत होते तर ते दहा वर्षांनी घ्यावे असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. उपोषणामुळे गांधीजींची प्रकृती झपाट्याने ढासळू लागली. सार्वमताच्या मुद्द्यावर कराराची वाट अडवू नये असे गांधीजींचे चिरंजीव देवदास गांधी यांनी डोळ्यात पाणी आणून बाबासाहेबांना विनविले. आपल्या पित्याचे प्राण वाचवण्याबद्दल देवदास गांधींनी काकुळतीस येऊन केलेल्या विनंतीमुळे बाबासाहेबांचे अंतःकरण हेलावले आणि त्यांनी सार्वमताबद्दलचा आग्रह सोडला. करार करणाऱ्या संबंधित पक्षांनी परस्परांशी विचारविनिमय करून एकमताने निर्णय घेईपर्यंत संयुक्त मतदारसंघातील अस्पृश्यांच्या राखीव जागांची पद्धत तशीच चालू ठेवावी, ही तडजोड बाबासाहेबांनी मान्य केली आणि पुणे करारावर सही करून गांधीजींचे प्राण

वाचविले. पुणे करारातील तरतुदीनुसार इंग्रज राज्यकर्त्यांनी जातीय निवाड्यात आवश्यक ते बदल करण्याचे मान्य केल्याने गांधीजींनी २६ सप्टेंबर १९३२ रोजी उपोषण सोडले.

पुणे करारावर बाबासाहेबांप्रमाणेच रावबहाद्दूर श्रीनिवासन, डॉ. सोळंकी, एम.सी. राजा, गणेश आकाजी गवई, पी. बाळू, देवीदास जाटव आणि बापूसाहेब राजभोज यांनीही अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून सह्या केल्या होत्या. गांधीजींचे उपोषण सुरू होण्यापूर्वी १५ सप्टेंबर १९३२ रोजी बापूसाहेब राजभोजांनी गांधीजींना पत्र लिहून त्यांनी राजा-मुंजे करारास पाठिंबा द्यावा अशी विनती केली होती. २० सप्टेंबर रोजी उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात अस्पृश्यांसाठी कायदेमंडळात जागा राखीव ठेवण्याची तरतूद कायद्यात कोणी केल्यास त्याविरुद्ध आपण उपोषण करणार नाही असे गांधीजींनी लिहिले होते.[13] गांधीजींच्या उपोषणाच्या काळात आणि त्यानंतर काही महिने अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नाची सर्वत्र चर्चा होत होती. त्याचाच एक परिणाम म्हणून काही ठिकाणचे सवर्ण हिंदू अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश द्यावयास तयार झाले. काही शहरात सहभोजनाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले. गांधीजींचे उपोषण सुरू झाले त्याच दिवशी मलबारातील पोन्नानी तालुक्यातल्या गुरुवायुर येथील कृष्णाच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून केलप्पन नावाच्या गांधीवाद्याने उपोषण सुरू केले. कालिकतचे झामोरीन या मंदिराचे विश्वस्त होते. त्यांनी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश देण्यास नकार दिला. केलप्पन यांनी उपोषण स्थगित करावे असे आवाहन करण्याबाबत झामोरीननी गांधीजींना गळ घातली. गांधीजींच्या सूचनेनुसार केलप्पन यांनी १ ऑक्टोबर १९३२ रोजी उपोषण थांबवले आणि झामोरिनना तीन महिन्यांची मुदत देण्यात आली. १ जानेवारी १९३३ रोजी अगर त्यापूर्वी गुरुवायुरचे कृष्ण-मंदिर अस्पृश्यांना खुले केले नाही तर केलप्पन यांच्याबरोबर आपणही उपोषण करू असे ५ नोव्हेंबर १९३२ रोजी एक पत्रक काढून गांधीजींनी जाहीर केले. मंदिर-प्रवेशासाठी उपोषण करण्याची गांधीजींनी प्रथमच तयारी दाखवली होती.

त्यामुळे हुरूप येऊन बापूसाहेब राजभोजांनी ११ नोव्हेंबरला गांधीजींची येरवडा तुरुंगात भेट घेतली. मंदिर-प्रवेशास परवानगी देण्याबाबत सनातन्यांचे हृदयपरिवर्तन करण्यात अपयश आले तर अस्पृश्यांनी देवळात शिरण्यासाठी सत्याग्रह करावा काय असा बापूसाहेबांनी गांधीजींना सवाल केला. पुण्यातल्या पर्वती येथील मंदिराबाबत आपण सर्व प्रकारचे उपाय योजिले असल्याचेही राजभोजांनी गांधीजींना आठवण करून दिली. 'बनारसच्या काशीविश्वेश्वरासारख्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून कोणी उपोषण सुरू केले तर तुम्ही केलप्पन यांच्याबरोबर जसे प्राण पणास लावण्यास सिद्ध झाला आहात तसेच त्या व्यक्तीला पाठिंबा म्हणून प्राणान्तिक उपोषण कराल काय असा राजभोजांनी गांधीजींना एक प्रश्न विचारला होता. राजभोजांनी

विचारलेल्या एकूण सोळा प्रश्नांना गांधीजींनी लेखी उत्तरे दिली.[१३२] सद्यःपरिस्थितीत मंदिर-प्रवेशासाठी सत्याग्रह करण्याची आवश्यकता नाही. सर्वांनी गुरुवायुर येथील मंदिर-प्रवेशाच्या प्रश्नावरच लक्ष केंद्रित करावे, तेथील मंदिरात जे घडेल ते अन्य ठिकाणच्या बऱ्याच मंदिरांबाबतही घडेल असे गांधीजींनी मत दिले. गुरुवायुर येथील मंदिरप्रवेशासाठी उपोषण करण्याचे केलप्पन यांना वचन दिले असल्याने आपण २ जानेवारी १९३३ पासून उपोषण करण्यास बांधलेले असलो तरी दुसऱ्या एखाद्या देवळात प्रवेश देण्याबाबत अन्य कोणी उपोषण केले तर आपण उपोषण करू असे नाही हेही गांधीजींनी स्पष्ट केले. याचा अर्थ उघड होता. पर्वतीचे देवालय किंवा नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले व्हावे म्हणून राजभोज अगर अन्य कोणी उपोषणाचा अवलंब केला असता तर गांधीजींचा त्याला केलप्पन यांना मिळाला तसा पाठिंबा मिळणार नव्हता. गुरुवायुर मंदिराबाबत सार्वमत घेतले तेव्हा बहुसंख्य लोकांनी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देण्यास अनुकूलता दर्शविली. तेव्हा कालिकतच्या झामोरीनने देऊळ खासगी मालकीचे असल्याचा दावा केला. खरे म्हणजे हे देऊळ सार्वजनिक मालकीचे असल्याचा मद्रास उच्च न्यायालयाने निर्णय दिला होता. झामोरीन ट्रस्टसंबंधीच्या कायद्याआड दडून मंदिर खुले करण्यास नकार देत आहे हे पाहताच सी. एस. रंगा अय्यर, हरविलास सारडा, लालचंद नवलराय, बॅ. जयकर वगैरेंनी मध्यवर्ती कायदेमंडळात मंदिरप्रवेशासंबंधी मांडलेले विधेयक आणि डॉ. सुब्बरायन यांनी मद्रास विधान मंडळात मांडलेले विधेयक चर्चेस येऊन मंजूर होईपर्यंत वाट पाहण्याचे ठरले. गांधीजी आणि केलप्पन या दोघांनीही दोन जानेवारी १९३३पासून उपोषण करण्याचा बेत बेमुदत पुढे ढकलला आणि पुढेही अनेक वर्षे गुरुवायुरचे देऊळ अस्पृश्यांसाठी पूर्वीसारखेच प्रतिबंधित क्षेत्र राहिले.

या वेळी गोलमेज परिषदेच्या तिसऱ्या आणि अखेरच्या सत्रात भाग घेण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर विलायतेला गेले होते. पुणे करारावर केलेल्या सह्यांची शाई वाळते न वाळते तोच गांधीजी आणि आंबेडकर यांच्यामध्ये मतभेद होऊ लागले होते. गांधीजींनी उपवास सोडल्यानंतर उद्योगपती घनश्यामदास बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली ३० सप्टेंबरला अस्पृश्यताविरोधी संघ अस्तित्वात आला. त्याचेच पुढे हरिजन सेवक संघ असे नामांतर करण्यात आले. या संघाच्या प्रांतिक व जिल्हा समित्यांमध्ये अस्पृश्य सभासद बहुसंख्य असावेत असे बाबासाहेबांनी १७ ऑक्टोबर १९३२ रोजी गांधीजींची येरवड्याच्या तुरुंगात भेट घेऊन सुचवले, पण गांधीजींनी ती सूचना स्वीकारली नाही. १९३० ते १९३२ या काळात नाशिकला काळाराम मंदिरप्रवेशासाठी बाबासाहेबांनी लढा चालवला होता तेव्हा तत्त्वतः मंदिरप्रवेशास पाठिंबा देण्याव्यतिरिक्त गांधीजींनी आणि काँग्रेसने त्यासाठी कोणतीही ठोस कृती केली नाही. १९३२ सालच्या सप्टेंबरमधल्या उपोषणानंतर गांधीजींना केरळातील गुरुवायुर येथील

मंदिरप्रवेशाच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावेसे वाटू लागले; त्या प्रश्नावर उपोषण करण्याची भाषाही ते बोलू लागले. तेव्हा बाबासाहेब मंदिर-प्रवेशाचा प्रश्न सुटला म्हणजे अस्पृश्यांचे प्रश्न सुटले असे समजण्याचे कारण नाही असा इशारा देऊ लागले. १७ ऑक्टोबरला गांधीजींना भेटून आल्यानंतर वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत गांधीजींनी स्थापन केलेल्या संघटनेने सहभोजन व मंदिरप्रवेश या प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा अस्पृश्यांची आर्थिक व शैक्षणिक प्रगती व्हावी आणि त्यांचा सामाजिक दर्जा सुधारावा यासाठी प्रयत्न करावेत असा बाबासाहेबांनी सल्ला दिला.[१०३]

७ नोव्हेंबर १९३२ रोजी बाबासाहेब विलायतेला गेले. त्याआधी ३ नोव्हेंबरला गांधीजींनी स्थापन केलेल्या अस्पृश्यता निवारक संघाच्या मध्यवर्ती मंडळाच्या सभासदांची यादी प्रसिद्ध झाली होती. एकूण अकरा सभासदांमध्ये आठ सवर्ण हिंदू आणि डॉ. आंबेडकर, एम. सी. राजा व श्रीनिवासन हे तीन अस्पृश्य सभासद होते. या मंडळाचे सरचिटणीस अमृतलाल ठक्कर ऊर्फ ठक्करबाप्पा होते. विलायतेच्या वाटेवर असताना बोटीवरूनच बाबासाहेबांनी ठक्करबाप्पांना १४ नोव्हेंबर १९३२ रोजी एक विस्तृत पत्र पाठवून अस्पृश्यता निवारक संघाचा कार्यक्रम काय असावा यासंबंधीच्या आपल्या कल्पना स्पष्ट केल्या.[१०४] अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांपैकी काही व्यक्तींना विकासाची संधी मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा सबंध सामाजिक वातावरण बदलण्यासाठी अस्पृश्यता निवारक संघाने प्रयत्न करावा असे बाबासाहेबांना वाटत होते. मंदिरप्रवेशाच्या प्रश्नापेक्षा अस्पृश्यांना विहिरीतून पाणी घेण्याचा, शाळेत प्रवेश मिळविण्याचा, सार्वजनिक वाहने किंवा रस्ते यांचा वापर करण्याचा प्रश्न यासारखे नागरी हक्कांचे प्रश्न आपल्याला महत्त्वाचे वाटतात असे त्यांनी पत्रात म्हटले होते. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी महाड व नाशिक येथे आपण जे लढे दिले त्यात आलेल्या अनुभवांच्या आधारे नागरी हक्क प्रस्थापित करण्याच्या मार्गातील अडचणीही बाबासाहेबांनी नमूद केल्या. नागरी हक्क मिळविण्यासाठी प्रयत्न केल्यास सवर्ण व अस्पृश्य यांच्यामध्ये मारामाऱ्या होतात, डोकी फुटतात आणि फौजदारी स्वरूपाचे खटले भरले जातात. पोलिस आणि दंडाधिकारी म्हणून न्यायदान करणारे नेहमी अस्पृश्यांच्या विरुद्ध असल्याचे महाड व नाशिक येथील सत्याग्रहात आढळून आल्याचे बाबासाहेबांनी ठक्करबाप्पांना स्मरण करून दिले. नागरी हक्कासाठी अस्पृश्य लढा देऊ लागले की खेड्यापाड्यात त्यांच्याविरुद्ध सामाजिक बहिष्काराचे शस्त्र उगारले जाते. अस्पृश्यता निवारण संघाने नागरी हक्कासाठी लढावयाचे ठरविले तर त्यात बऱ्याच अडचणी येतील याची जाणीव असल्याने मंदिरप्रवेशासारखा नाजूक व गुंतागुंतीचा प्रश्न आपण कार्यक्रमातून जाणूनबुजून वगळत आहोत असेही बाबासाहेबांनी ठक्करबाप्पांना लिहिले होते. दुर्दैवाने या पत्रातील सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आले. एवढेच नव्हे तर, पत्राची साधी पोच पाठविण्याची तसदीही घेण्यात आली

नाही, असे बाबासाहेबांनी नमूद केले आहे.[१०२] त्यामुळे बाबासाहेबांनी गांधीजींनी स्थापन केलेल्या अस्पृश्यता निवारक संघाबरोबरचे संबंध तोडले.

बाबासाहेब विलायतेत असताना त्यांचे सात अनुयायी गांधीजींना तुरुंगात भेटले आणि त्यांनी बाबासाहेबांनी केलेल्या सूचनांचा अस्पृश्यता निवारक संघाच्या मध्यवर्ती मंडळाच्या बैठकीत साधा उल्लेखही झाला नाही असे गांधीजींना सांगितले तेव्हा या पत्राकडे मध्यवर्ती मंडळाने खरोखरच दुर्लक्ष केले काय अशी गांधीजींनी बिर्लाशेठजींकडे विचारणा केली. उत्तरादाखल लिहिलेल्या पत्रात बिर्लाशेठजींनी डॉ. आंबेडकरांच्या सूचनांचा मध्यवर्ती मंडळाच्या बैठकीत विचार झाला नसला तरी मंडळाने नेमलेल्या तीन सभासदांच्या एका उपसमितीने त्या सूचनांचा विचार करावा असे ठरल्याचे गांधीजींना कळविले.[१०३] बाबासाहेबांच्या पत्राची पोच बहुधा दिली नसावी; कारण अस्पृश्यता निवारक संघाचे सचिवालय कार्यक्षम नसल्याबाबत बिर्लाशेठजींनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात सारख्या तक्रारी केल्या आहेत. त्या लक्षात घेता बाबासाहेबांच्या पत्राची पोच दिली नसण्याची शक्यता जास्त आहे.

गोलमेज परिषदेच्या अखेरच्या सत्रात भाग घेत असताना बाबासाहेबांना गझनवी या बंगाली मुसलमान नेत्याला वर्णाश्रम स्वराज्य संघाच्या सनातनी ब्राह्मण अध्यक्षाने पाठविलेली एक तार पाहावयास मिळाली. अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाच्या चळवळीला विरोध करण्यात मुसलमानांचे सहकार्य मिळावे यासाठी केलेली ती तार होती. सनातनी हिंदूंची बाजू गोलमेज परिषदेत मांडण्याबद्दल गझनवींना विनंती करण्यात आली होती. " 'आम्ही जातीचे ब्राह्मण, आमचे सोयरे मुसलमान' ही म्हण या कट्टर ब्रह्मवृंदांनी सार्थ करून दाखविली" असा अभिप्राय देऊन हिंदुस्थानातील मुसलमानांना सामाजिक सुधारणेचे वावडे असल्याच्या वस्तुस्थितीवर बाबासाहेबांनी नेमके बोट ठेवले. काळाराम मंदिरात प्रवेश करण्यास किंवा रामकुंडातील पाणी काढून स्नान करण्यास सनातनी हिंदूंनी केलेला प्रखर विरोध पाहून चिडलेल्या नाशिकच्या काही अस्पृश्यांनी धर्मांतर करून इस्लामचा स्वीकार केला होता. काहीजणांनी केवळ बाबासाहेबांच्या विनंतीला मान देऊन मुसलमान होण्याचा बेत पुढे ढकलला होता.

आपल्या अनुयायांपैकी एका गटाला इस्लामचे आकर्षण वाटते याची बाबासाहेबांना कल्पना होती. म्हणूनच त्यांनी २४ डिसेंबर १९३२ च्या जनता पत्राच्या अंकात प्रसिद्ध झालेल्या पत्रात इशारा दिला होता. "हिंदू व मुसलमान आपापसात लढू लागले म्हणजे अस्पृश्यांचा ओढा मुसलमानांकडे वळू लागतो. त्यांना वाटते की मुसलमानांशी आपण दोस्ती केली की आपले हित होईल, पण ही गोष्ट दिसते तितकी खरी नाही हे लक्षात ठेवून अस्पृश्यांनी फार सावधगिरीने वागले पाहिजे. शारदा कायद्याच्या बाबतीत मुसलमानी धोरणाचा मला जो अनुभव आला तो काही समाधानकारक म्हणता येण्यासारखा नाही. . .या राउंड टेबल परिषदेच्या वेळीही मुसलमानांची

सामाजिक मनोवृत्ती सनातनी कट्टर हिंदूंप्रमाणेच किती आकुंचित व अधोगामी असू शकते याचा दुसरा अनुभव नुकताच येथे मला आला...हिंदी मुसलमानांच्या धार्मिक दृष्टीला सुधारणा हे तर महत्पाप वाटते."[१०७] बाबासाहेबांनी आपल्या अनुभवाचे हे खडे बोल अनुयायांना ऐकविले त्यालाही पन्नास वर्षांहून जास्त काळ लोटला असला तरी आपण बाबासाहेबांचे सच्चे अनुयायी आहोत असे सांगणारे त्यांचे काही अनुयायी आजही शहाबानो खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी लाखो सनातनी धर्मवेड्या मुसलमानांचा मोर्चा काढणाऱ्या, एके काळच्या तस्कराबरोबर हातमिळवणी करताना दिसतात.

१९३३ च्या जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात बाबासाहेब विलायतेहून परतले. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवून देण्यासाठी उपोषण करून गांधीजींनी आपले प्राण पणास लावू नयेत असे मत त्यांनी वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केले. मद्रास विधानमंडळात डॉ. सुब्बरायन यांनी मंदिरप्रवेशासंबंधी मांडलेल्या विधेयकास, तसेच रंगा अय्यर यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडलेल्या मंदिरप्रवेशाबद्दलच्या विधेयकास व्हाइसरॉयांचा विरोध असण्याचे कारण नाही असेही ते म्हणाले.[१०८] व्हाइसरॉयांच्या आमंत्रणानुसार ते जानेवारी अखेरीस दिल्लीत जाऊन व्हाइसरॉयना भेटले. दिल्लीहून परतल्यानंतर ते ४ फेब्रुवारीस गांधीजींना येरवडा तुरुंगात जाऊन भेटले. मंदिरप्रवेशाचा प्रश्न हा दुय्यम असल्याने अस्पृश्यांना केवळ देवळे खुली केल्याने त्यांचे समाधान होणार नाही हे या भेटीत बाबासाहेबांनी पुन्हा एकदा गांधीजींना सांगितले. अस्पृश्यांना हिंदूंच्या मंदिरात येऊ दिल्याने त्यांचे हिंदू समाजातील सर्वात खालचे स्थान नष्ट होणार नव्हते. अस्पृश्यता नष्ट करावयाची असेल तर जातिजातीमधील उच्चनीचतेच्या भावनेला कारणीभूत असलेली चातुर्वर्ण्य पद्धतीच नष्ट करणे आवश्यक आहे असे बाबासाहेबांनी गांधीजींना बजावले. जातिसंस्थेवर किंवा चातुर्वर्ण्यपद्धतीवर घाव घालण्यास गांधीजींची तयारी नव्हती.

११ फेब्रुवारी १९३३ रोजी गांधीजींच्या हरिजन साप्ताहिकाचा पहिला अंक निघाला. या अंकात जातिव्यवस्था नष्ट झाल्याशिवाय अस्पृश्यता नष्ट होणार नाही या बाबासाहेबांच्या मतावर गांधीजींनी टीका केली. अस्पृश्यता पाळणे हे पाप असले तरी जातिव्यवस्था राखणे हे पाप नाही असे गांधीजींचे म्हणणे होते. १३ फेब्रुवारीस गांधीजींनी राजगोपालाचारींना लिहिलेल्या पत्रात डॉ. आंबेडकरांबरोबर झालेल्या संभाषणाविषयी लिहिले होते. "आंबेडकरांबरोबरची माझी मुलाखत एका तऱ्हेने फारच असमाधानकारक झाली. त्यांची समजूत घालणे शक्य नाही. दुसऱ्या तऱ्हेने पाहिले तर मुलाखत समाधानकारक झाली असे म्हटले पाहिजे. पूर्वीपेक्षा मी त्यांना आता जास्त चांगले ओळखतो."[१०९] मंदिरप्रवेशासाठी चाललेल्या चळवळीला पाठिंबा देण्याविषयी गांधीजींनी बाबासाहेबांना विनंती केली तेव्हा बाबासाहेबांनी मंदिर-

प्रवेशाच्या आंदोलनास पाठिंबा देण्याचे नाकारले. १९३० पासून काळाराम मंदिरप्रवेश करण्यासाठी चाललेल्या लढ्यात सहभागी होऊन त्याला मार्गदर्शन करणारे डॉ. आंबेडकर, रंगा अय्यर यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडलेल्या मंदिरप्रवेशासंबंधीच्या विधेयकाला पाठिंबा द्यावयाला तयार नाहीत आणि रंगा अय्यर यांचे विधेयक मंजूर व्हावे म्हणून प्रयत्नशील असलेल्या गांधीजी, राजाजी, बिर्लाशेठजी यांच्या पाठीशी उभे राहावयास तयार नाहीत हे प्रथमदर्शनी कोणालाही विचित्र वाटण्याजोगे होते.

म्हणून १३ फेब्रुवारी १९३३ रोजी बाबासाहेबांनी आपली भूमिका स्पष्ट व्हावी या हेतूने एक जाहीर निवेदन केले.[११०] कोणत्याही देवळाच्या परिसरात राहणाऱ्या आणि नगरपालिका व लोकल बोर्डांच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क असलेल्या बहुसंख्य मतदारांनी सार्वमताद्वारे एखादे देऊळ अस्पृश्यांना खुले करण्याचे ठरवले तर देवस्थानच्या पंचांनी किंवा व्यवस्थापकांनी लोकेच्छा प्रमाण मानून निर्णयाची अंमलबजावणी करावी अशी तरतूद रंगा अय्यर यांच्या विधायकात केली होती. हे विधायक जहाल किंवा क्रांतिकारक स्वरूपाचे नसून शहाणे असले तर सनातनीही ते स्वीकारतील असे बाबासाहेबांचे मत होते. कारण मंदिरप्रवेशाच्या प्रश्नावर मतदान झाले तर बहुसंख्य मतदारांचा कौल अस्पृश्यांच्या बाजूने दिला जाण्याची शक्यता फारच कमी होती. हे विधेयक मंजूर झाले तरी अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा ठरणार नव्हता. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश द्यावयाचा की नाही हे बहुसंख्य मतदारांच्या मर्जीवर व मेहेरबानीवर अवलंबून राहणार होते. कोणत्याही देवळात शिरण्याचा अस्पृश्यांना अधिकार मिळणार नव्हता. बाबासाहेबांनी म्हटल्याप्रमाणे मंदिरप्रवेशापेक्षा अस्पृश्यांचा स्वाभिमान जास्त महत्त्वाचा आहे असे ज्या स्पृश्य हिंदूंना वाटत असेल त्यांनी वाटल्यास देवळे खुली करावीत पण अस्पृश्यांनी त्यासाठी चळवळ करण्याची गरज नाही असे बाबासाहेबांनी सांगितले. मंदिरप्रवेश हे अस्पृश्यांच्या मुक्ती आंदोलनाचे अंतिम साध्य होऊ शकत नाही. जास्तीत जास्त ते त्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल ठरेल. मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून अस्पृश्य व्याकुळ झाले नसून सर्वांना समान सामाजिक दर्जा देणारा धर्म त्यांना हवा होता. हिंदू धर्माने सामाजिक समतेचे तत्त्व स्वीकारल्या-खेरीज तो धर्म आपला मानावयास अस्पृश्य तयार नव्हते आणि हिंदू धर्मीयांमधील विषमतेचे मूळ चातुर्वर्ण्य पद्धतीत असल्यामुळे ती नष्ट केल्याखेरीज हिंदू धर्माला समतेचे अधिष्ठान लाभणार नव्हते. चातुर्वर्ण्य व्यवस्था व जातिव्यवस्था नष्ट करण्याच्या लढ्यात आपण आमच्याबरोबर असणार की प्रतिपक्षाबरोबर असणार असा बाबा-साहेबांनी गांधीजींना प्रश्न विचारला. त्या मूलभूत स्वरूपाच्या युद्धात महात्माजी प्रतिपक्षाच्या छावणीत राहणार असतील तर मंदिरप्रवेशाबाबतच्या लढाईच्या वेळी आपणास त्यांच्या छावणीत दाखल होणे शक्य नाही असे बाबासाहेबांनी बजावले.

नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी १९३० साली सत्याग्रह सुरू

झाला तेव्हापासूनच मंदिरप्रवेशाला बाबासाहेबांनी केवळ एक साधन मानले होते. २ मार्च १९३० रोजी या लढाईचे शिंग फुंकताना बाबासाहेबांनी सत्याग्रह करणाऱ्यांना सांगितले होते, "मंदिरप्रवेशाने तुमचा सर्वच प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येणार नाही. आपल्या प्रश्नाचे स्वरूप व्यापक आहे. ते राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा स्वरूपाचे आहे. पण आजचा हा आपला काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह हे उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आवाहन आहे...हिंदू आपल्यासारख्या माणसांना माणूस म्हणून किंमत देणार आहेत की नाही?... आम्ही उच्चवर्णी हिंदू मनाची ही एक परीक्षा घेत आहोत... आम्हाला माहीत आहे, मंदिरात दगडाचा देव आहे. त्याचे दर्शन झाल्याने व त्याची पूजा केल्याने आमचा सर्वस्वी प्रश्न सुटणार नाही... हे आम्ही जाणतो. आजचा सत्याग्रह हा हिंदूंच्या मनात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे."[१११] सवर्ण हिंदू बाबासाहेबांनी घेतलेल्या या परीक्षेला उतरले नाहीत. त्यांनी काळाराम मंदिराचे दरवाजे दीर्घकाळ बंद ठेवले. एखाद्याला चोर दरवाज्याने प्रवेश करू द्यावा त्याप्रमाणे पुजाऱ्याच्या घरच्या दरवाज्याने सवर्णांना प्रवेश दिला गेला, मात्र त्याच मार्गाने देवळात येऊ पाहणाऱ्या अस्पृश्य स्त्री-पुरुषांना मारहाण केली गेली.

भास्कर बळवंत भोपटकरांचे 'भाला' हे साप्ताहिक सनातन्यांचे मुखपत्र होते. "भाला पत्र सनातनी मनोवृत्तीचे असून त्याला अस्पृश्यांचा मंदिरप्रवेश, पाणवठ्यांचे सर्वशीकरण, सहभोजन व सहविवाह या चार गोष्टी सर्वस्वी अमान्य आहेत." असे भालाकारांनी संपादकीय धोरण स्पष्ट करताना म्हटले होते.[११२] भालाकार जे उघडउघड लिहीत होते तेच बहुसंख्य सवर्ण हिंदूंच्या मनात होते. सतत तीन वर्षे चळवळ करून, मारहाण सोसून, तुरुंगवास भोगून काळाराम मंदिरात सन्मानाने प्रवेश करता येतच नव्हता. त्यामुळे 'भेटी लागी जीवा, लागलीसे आस' अशी धर्मनिष्ठ अस्पृश्यांचीही अवस्था शिल्लक राहणे शक्यच नव्हते. अशा परिस्थितीत रंगा अय्यर यांचे विधेयक किंवा गांधीजींचा त्याला पाठिंबा यामुळे अस्पृश्यांची मने हरखून गेली नाहीत यात नवल नाही.

त्यात भर पडली होती ती रामकुंडाबाबत रोहम यांनी अस्पृश्यांच्या वतीने केलेले अपील मुंबई उच्च न्यायालयाने नोव्हेंबर १९३२ च्या दुसऱ्या आठवड्यात फेटाळल्यामुळे! जिल्हाधिकारी एल. एन. ब्राऊन यांनी या प्रकरणाची आधी चौकशी करून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १४७ व्या कलमान्वये आदेश दिला होता तो सनातन्यांची बाजू उचलून धरणारा होता. उच्च न्यायालयातील सुनावणीत जिल्हाधिकाऱ्यांना अशी चौकशी करून आदेश काढण्याचा अधिकार आहे का असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मुख्य न्यायाधीश आणि न्यायमूर्ती मर्फी या दोघांनी अपिलाचा निकाल देताना जिल्हाधिकाऱ्यास तसा अधिकार असल्याचे आणि तोच त्यांनी वापर-

त्याचे स्पष्टपणे नमूद केले. त्यामुळे आपलाच अखेर विजय झाला अशा आनंदात नाशकातल्या सनातन्यांनी सर्व घाटावर रोषणाई केली आणि दुर्गादेवीची महापूजा करून प्रसाद व पानसुपारी वाटली. रामकुंडातील पाणी काढून तेथे अस्पृश्यांना स्नान करता येणार नाही या सनातन्यांच्या भूमिकेवर आधी गोऱ्या जिल्हाधिकाऱ्याने आणि नंतर मुंबई उच्च न्यायालयाने अनुकूल निर्णय देऊन शिक्कामोर्तब केले होते. मंदिर-प्रवेशाचा प्रश्न न्यायालयात नेला असता तरी असेच झाले असते. खेरीज १९३२ च्या उत्तरार्धापासून मंदिरप्रवेशासाठी सत्याग्रह करण्यातही बाबासाहेबांना मुळीच रस नव्हता. तरीही सत्याग्रह समितीचे विसर्जन करण्यात आले नाही किंवा सत्याग्रह अधिकृतरीत्या मागे घेतल्याची घोषणाही करण्यात आली नाही.

१९३३ सालच्या एप्रिलमधल्या पहिल्या आठवड्यात रामनवमीच्या वेळी आणि त्यानंतर निघणाऱ्या रथयात्रेच्या वेळी काय करावयाचे या प्रश्नावर मार्चच्या अखेरच्या आठवड्यात नाशिकमधल्या आंबेडकरांच्या अनुयायांमध्ये चर्चा सुरू झाली. रथयात्रेत भाग घेऊन रथ ओढण्याचा आपला हक्क पुनः प्रस्थापित करावा असे काहीजणांना वाटत होते. एखादे निदर्शन करून सनातन्यांना असलेला आपला विरोध पुन्हा प्रगट करावा असे काहींना वाटत होते. सत्याग्रह किंवा निदर्शन यांपैकी कशाचीही बाबा-साहेबांना आवश्यकता वाटत नव्हती म्हणून अशा कार्यक्रमास अनुमती देण्यास ते तयार नव्हते.[११३] रामनवमीचा उत्सव शांततेने पार पडला. जिल्हाधिकाऱ्यांनी रथ-यात्रेच्या वेळी १४४ कलम जारी केल्याने रथ मिरवणुकीने नेणे सनातन्यांना शक्य झाले नाही. चळवळीचा भर ओसरला की मत्सरग्रस्त माणसांच्या कारवायांना ऊत येतो. चळवळीच्या नेत्यांचे चारित्र्यहनन करण्याचा विघ्नसंतोषी माणसे प्रयत्न करतात. बा. जा. देवरुखकर आणि ज्ञानदेव ध्रुवनाक घोलप हे एके काळचे बाबासाहेब आंबेड-करांचे सहकारी आणि नंतरचे विरोधक यांनी 'भारत' नावाच्या वृत्तपत्रात एक लेख प्रसिद्ध करून भाऊराव गायकवाडांवर चिखलफेक केली. नाशिक सत्याग्रहासाठी जमवलेल्या निधीतील पैशांचा घोळ केल्याचा आणि त्यातील काही रक्कम आपल्या दुसऱ्या लग्नाच्या सोहोळ्यासाठी वापरल्याचा आरोप भाऊराव गायकवाडांवर करण्यात आला होता. त्यामुळे भाऊरावांनी या दोघांविरुद्ध अब्रूनुकसानीची फिर्याद दाखल केली. १९३३ च्या ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात नाशिकच्या शहर दंडाधिका-ऱ्याने या खटल्याचा निकाल देऊन घोलप व देवरुखकर यांना दोषी ठरवून शंभर रुपये दंडाची शिक्षा सांगितली.[११४] भाऊराव गायकवाडांनी दुसरे लग्न केले हे खरे असले तरी ते त्यांनी १९२९ सालीच केले होते, त्यामुळे त्यासाठी १९३० साली जमवण्यात आलेला सत्याग्रह निधीतून रक्कम वापरण्याचा प्रश्नच नव्हता.

१९३३ च्या मे अखेर बाबासाहेब विलायतेस गेले ते १९३४ च्या जानेवारीत भारतात परतले. १९ फेब्रुवारी १९३४ रोजी नाशिक रोडला अस्पृश्यांची सभा झाली

तेव्हा २४ मार्च १९३४ रोजी येणाऱ्या रामनवमीस पुन्हा काळाराम मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह सुरू करावा असा विचार बोलून दाखवण्यात आला. काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी पुनः सत्याग्रह सुरू झाल्यास आपण त्यात भाग घेऊ असे पुण्याहून बापूसाहेब राजभोजांनी गायकवाडांना पत्र लिहून कळवले होते.[११५] गायकवाडांची द्विधा मनःस्थिती झाली असावी; कारण नाशकातील अस्पृश्यांपैकी एका मोठ्या गटाला सत्याग्रह सुरू करावा असे वाटत होते. २३ फेब्रुवारीस गायकवाडांनी बाबासाहेबांना पत्र लिहून याबाबत त्यांचे मत विचारले. उत्तरादाखल बाबासाहेबांनी ३ मार्च १९३४ रोजी लिहिले, "या प्रश्नावर सत्याग्रहाची भूमिका मला पसंत नाही. त्याची आता आवश्यकताही नाही. ते ( आंदोलन ) तहकूब करावे एवढेच नाही तर सत्याग्रहाचा विचारच या प्रश्नावर सर्वस्वी रद्द करावा. अर्थात आपल्या आघाडीवरचा हा बदल जाहीर करण्याची मला धास्ती वाटते. मंदिरप्रवेशाच्या मुद्द्याला मी का स्पर्श केला नाही त्याचे कारण असे की आपल्या लोकांनी देवतांची पूजा करावी. का की त्यांना ती आजपावेतो नाकारली गेली होती. मंदिरप्रवेशाने हिंदू समाजात अस्पृश्यांना समानता मिळेल. हिंदू समाजाचा अविभाज्य, एकात्म भाग बनण्यापूर्वी हिंदू धर्मशास्त्र व हिंदू समाज यांची संपूर्णतया पुनर्रचना करण्याचा अस्पृश्य समाजाने आग्रह धरावा असा सल्ला त्यांना द्यावासा वाटतो. अस्पृश्यांना आपल्या हक्काबद्दल जागृत करणे व त्यांच्यात जोम निर्माण करणे हाच सत्याग्रह सुरू करण्यामागे माझा हेतू होता. माझा तो हेतू साध्य झाला आहे यापुढे मला मंदिरप्रवेशाचा उपयोग नाही. यापुढे दलित वर्गाने राजकीय व शैक्षणिक कार्यावर आपली शक्ती पणाला लावावी.[११६] बाबासाहेबांनी दिलेला हा सल्ला स्वीकारून १९३४ च्या रामनवमीस सत्याग्रह करायचा नाही असे नाशिकच्या सत्याग्रह समितीने ठरवले. बापूसाहेब राजभोजांना मात्र हा निर्णय पसंत नव्हता. काळाराम मंदिर प्रवेशासाठी काही झाले तरी सत्याग्रह सुरू करावयाचा बापूसाहेब राजभोजांचा विचार होता. त्यानी त्यास पाठिंबा मिळावा म्हणून गांधीजींना पत्रही लिहिले. या प्रश्नावर सत्याग्रह करण्यास आपण कोणालाच उत्तेजन देणार नाही आणि कोणी तसा विचार केला तर त्याला आपण त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करू, असे गांधीजींनी उत्तर दिले.[११७] सर्व प्रकारच्या रथाच्या यात्रेस मनाई करण्यात आली. कोणत्याही प्रकारची गडबड न होता रामनवमीचा उत्सव साजरा करण्यात आला. मंदिरात प्रवेश करण्याचा अस्पृश्यांपैकी कोणीही प्रयत्न केला नाही.

रामनवमी व रथयात्रा थाटामाटाने पार पाडता यावी म्हणून नाशिकच्या सनातन्यांना साहाय्य करण्यासाठी पुण्याहून विश्वास बळवंत डावरे नाशकात आले होते. डावरे यांचा नाशिकच्या सनातन्यांशी असलेला ऋणानुबंध जुना होता. १९१० साली विश्वासराव डावऱ्यांना नाशिक कट खटल्यात बेकायदा शस्त्रे बाळगल्याबद्दल तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा फर्मावण्यात आली होती. १९३४ साली नाशिकच्या

वर्णाश्रम स्वराज्यसंघाच्या शाखेचे अध्यक्षपद भूषविणारे दामोदर महादेव चंद्रात्रे यांनाही नाशिक कट खटल्यात पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागली होती. डावरे तसेच चंद्रात्रे हे दोघेही सावरकरबंधूंनी स्थापन केलेल्या अभिनव भारत संघटनेचे सदस्य होते आणि दोघांचाही या पहिल्या दशकाच्या अखेरीस नाशकात झालेल्या शतकृत्याशी म्हणजे जॅक्सनच्या खुनाशी संबंध होता. डावरे किंवा चंद्रात्रे राजकीय दृष्ट्या जहाल विचारसरणीचे असले तरी सामाजिक दृष्ट्या जीर्ण मतवादी होते. अस्पृश्यांना मंदिरप्रवेश नाकारण्याच्या प्रयत्नात ते अग्रभागी होते. काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश द्यावा असे रत्नागिरीस तेव्हा स्थानबद्ध असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी अनावृत पत्र लिहून नाशिकच्या आपल्या मित्रांना आवाहन केले होते. अस्पृश्यतेसारख्या प्रथेमुळे हिंदू समाजात फूट पडून तो दुबळा बनतो, त्यामुळे अस्पृश्यतेचे उच्चाटन हे स्वातंत्र्यवीर सावरकरांना सामर्थ्यशाली एकजिनसी हिंदू राष्ट्राच्या निर्मितीसाठी आवश्यक वाटत होते. स्थानबद्ध असताना सावरकरांनी अस्पृश्यता-निवारणासाठी नानाविध उपक्रम हाती घेतले होते. मुसलमानांविरुद्ध सावरकरांनी चालविलेल्या मोहिमेत पुढे त्यांना निष्ठेने साथ देणारे डावरे व चंद्रात्रे अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात त्यांच्याबरोबर यावयास तयार नव्हते. काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून झगडणारे बॅ. बाबासाहेब आंबेडकर आणि 'आम्ही सकल हिंदू बंधू' अशी भावना वाढीस लागावी म्हणून अस्पृश्यांना जवळ घेऊ पाहणारे बॅ. सावरकर हे दोघेही अस्पृश्यांचे 'खरे शत्रू' असे भालाकार भोपटकरांनी जाहीर केले होते.[११८] धर्मवीर म्हणून ओळखले जाणारे विश्वासराव डावरे आणि दामुअण्णा चंद्रात्रे हेही भालाकारांप्रमाणेच अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश देऊ नये या मताचे कट्टे पुरस्कर्ते होते.

रामनवमीच्या उत्सवाच्या अखेरच्या दिवशी म्हणजे २७ मार्चला रथयात्रा काढण्याचा विश्वासराव डावऱ्यांचा इरादा होता पण पोलिसांनी रथयात्रा आयोजित करण्यास अनुमती दिली नाही. ३१ मार्च १९३४ रोजी रथयात्रा आयोजित करण्यास अनुमती द्यावी म्हणून त्यांनी पुनः अर्ज केला. अस्पृश्यांना खूष ठेवण्यासाठी सरकार सवर्ण हिंदूंना त्याचे धार्मिक उत्सव वहिवाटीप्रमाणे साजरे करू देत नाही असे डावरे यांच्यासारखे सनातनी म्हणत होते. ३१ मार्चला रथयात्रा आयोजित करण्याचा सनातन्यांच्या प्रयत्नांना पोलिसांनी जेव्हा हरकत घेतली तेव्हा पंचवीस हजार सवर्ण हिंदूंचा जमाव जमलेला होता. या गर्दीत सामील झालेल्या सवर्ण हिंदू स्त्रियांची संख्या फार मोठी होती. त्या तारस्वरात घोषणा देत होत्या. जमावाने पोलिसावर दगडफेक केली, तेव्हा गर्दी पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीहल्ला केला. देवळाच्या पुजाऱ्याला पकडण्यात आले आणि पोलिसांनी रथही ताब्यात घेतला.[११९] दगडफेकीत लोहोकरे या पोलिस निरीक्षकासकट १८ पोलिस जखमी झाले होते. दगडफेक करण्याबद्दल १३ सनातन्यांना

पकडण्यात येऊन त्यांच्यावर खटले भरण्यात आले. या दंगलीस डावरे चिथावणी देत आहेत याबद्दल सरकारची खात्री झालेली होती. म्हणून नाशिकचे तेव्हाचे जिल्हाधिकारी कोठावाला यांनी मुंबई सरकारने आणीबाणीच्या काळासाठी मंजूर केलेल्या विशेषाधिकाराच्या कायद्याचा बडगा उचलून डावऱ्यांना पंधरा दिवस अटकेत ठेवण्याचा तात्पुरता हुकूम दिला. आणीबाणीतील विशेषाधिकारांचा कायदा सविनय कायदेभंगाची चळवळ करणाऱ्याविरुद्ध किंवा त्या चळवळीतून उद्भवणारी परिस्थिती हाताळतानाच वापरावयाचा असे सरकारचे धोरण होते. त्यामुळे कोठावाल्यांनी डावऱ्यांविरुद्ध केलेली कारवाई सरकारच्या धोरणाविरुद्ध असल्याचे गृहखात्यातर्फे कोठावाल्यांना सांगण्यात आले.[१२०] जिल्हाधिकाऱ्याच्या सुदैवाने डावऱ्यांविरुद्ध आधीच पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी बजावलेल्या मनाई हुकमाची मुदत सोळा सप्टेंबर १९३३ पर्यंत होती. त्या मनाई हुकमाचा भंग केल्याचा आरोप ठेवून विश्वासराव डावऱ्यांना २ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा फर्मावण्यात आली. या शिक्षेविरुद्ध डावऱ्यांनी केलेले अपील नाशिकच्या सत्र न्यायाधीशांनी फेटाळले तरी नंतर मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सर जॉन बोमंट आणि न्यायमूर्ती सेन यांनी सत्र न्यायालयाचा निर्णय फिरवला आणि डावरे निर्दोषी ठरले.

३० मार्च ते १८ जुलै १९३४ या कालावधीत काळाराम मंदिराचे दरवाजे बंदच होते ते १८ जुलैला उघडले. ३१ मार्चपासून देवळाच्या दरवाज्यापाशी पडून राहिलेल्या मूर्तींना दोघा जणांनी एका छोट्या रथात ठेवले आणि त्यांना स्नान घालण्यात आले. २३ ऑगस्ट १९३४ रोजी रंगा अय्यर यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात मांडलेले मंदिरप्रवेशाबद्दलचे विधेयक मागे घेतले तेव्हा देशातील सनातन्यांना आपला विजय झाल्यासारखे वाटले. लोकमत अजमावण्यासाठी रंगा अय्यर यांचे विधेयक प्रस्तुत करण्यास सरकारने पाठिंबा दिला होता. त्याप्रमाणे विधेयकाबाबत लोकांनी मते प्रदर्शित केल्यानंतर ते चिकित्सा समितीकडे पाठवावे असा प्रस्ताव रंगा अय्यर यांना मांडावयाचा होता. इतक्यात मध्यवर्ती कायदेमंडळ विसर्जित करून नव्याने निवडणूक घेण्याची सरकारने घोषणा केली. निवडणुका तोंडावर येताच अस्पृश्यता निवारणासाठी कॉंग्रेसवाल्यांनी आणलेले उसने अवसान गळून पडले. त्यापूर्वी रंगा अय्यर यांच्या विधेयकास पाठिंबा मिळाला म्हणून धरणे धरणाऱ्या राजगोपालाचारी, देवदास गांधी वगैरेंना मंदिरप्रवेशाबाबतचे विधेयक हा निवडणुकीचा प्रश्न होऊ नये असा साक्षात्कार झाला. 'मंदिरप्रवेशाबाबत निवडणूक मोहिमेत मौन पाळले तर अनेक कॉंग्रेस उमेदवारांना बहुसंख्य सनातनी मतदारांचा पाठिंबा मिळणार होता. अखेर निवडणूक जिंकणे त्यांना जास्त महत्त्वाचे वाटत होते. मंदिरप्रवेशाचा आग्रह धरून निवडणूक हरण्याचा धोका पत्करावयास कॉंग्रेसनेते व कार्यकर्ते तयार नव्हते. त्यामुळे विधेयक मागे घेण्याखेरीज रंगा अय्यर यांच्यापुढे पर्याय उरला नव्हता. राजकीय सत्तेवर डोळा ठेवून

सामाजिक व धार्मिक सुधारणेचे प्रश्न डावलण्याची, त्याबाबत एकतर सोयिस्कर मौन धारण करण्याची अगर गुळमुळीत भूमिका घेऊन सनातन्यांना शरण जाण्याची काँग्रेस पक्षाची परंपरा शंभर वर्षांइतकी जुनी आहे. 'काँग्रेस संस्कृती'च्या नव्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीचा हा आविष्कार १९३४ नंतरही होत राहिला. स्वातंत्र्योत्तर काळातली पहिली सार्वत्रिक निवडणूक जवळ आलेली लक्षात घेऊन जवाहरलाल नेहरूंनी बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या हिंदू संहिता विधेयकाबाबतही अशीच कच खाल्ली होती. अगदी अलीकडे शहाबानो खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे भडकलेल्या मुस्लिमांना आणि मुल्लामौलवींना शांत करण्यासाठी आसामची निवडणूक जवळ आलेली असताना मुसलमानांच्या संमतीखेरीज मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात बदल केले जाणार नाहीत असे पंतप्रधान राजीव गांधींनी आश्वासन दिले. नंतर लोकसभेच्या पोटनिवडणुकीत व्यक्त झालेले मुस्लिम मतदारांचे मत लक्षात घेऊन सनातनी मुसलमानांना खूष करण्यासाठी संबंधित फौजदारी कायद्यातही आवश्यक ते बदल केले. हे सारे सामाजिक व धार्मिक सुधारणांचा प्रश्न आला की ऐनवेळी हातपाय गाळण्याच्या शंभर वर्षांइतक्या जुन्या काँग्रेसपक्षाच्या तथाकथित संस्कृतीला शोभणारेच होते.

रंगा अय्यर यांच्या विधेयकाबरोबरच मंदिरप्रवेशाचा प्रश्न गाडला गेला. १९३४ च्या नोव्हेंबरच्या सुरुवातीस अमृतराव रणखांब्यांचे वडील धोंडीबा कालवश झाले. त्यांच्या मृत्यूनंतर अकराव्या दिवशी रणखांब्यांच्या गावी म्हणजे विंचूरला पंधरा हजार अस्पृश्यांची एक जंगी सभा झाली. त्या सभेत १९३२ नंतर दोन वर्षे आपण नाशिकचा सत्यग्रह का तहकूब केला याचे बाबासाहेबांनी कारण सांगितले. मंदिप्रवेशासाठी सत्याग्रह करण्याची आपल्याला गरज वाटत नाही असे ते म्हणाले. मात्र नाशिकच्या त्यांच्या अनुयायांपैकी काहींना तरी सत्याग्रह पुन्हा सुरू करावा असे वाटत होते. १२ एप्रिल १९३५ रोजी रामनवमी होती आणि १४ एप्रिल हा रथयात्रेचा दिवस होता तसाच तो आंबेडकर जयंतीचाही होता. त्या दिवशी सनातन्यांनी रथयात्रा आयोजित करण्याचा प्रयत्न केला तर अस्पृश्यांनी सत्याग्रह करावा असे, विशेषत: दलित युवक संघाच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून ते एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सत्याग्रहाची पूर्वतयारी करण्यासाठी सभाही घेण्यात आल्या असे तत्कालीन वृत्तपत्रांवरून व सरकारी कागदपत्रांवरून दिसते.[१२१]

अस्पृश्य समाजाचे एक पुढारी रोकडे हे दिवंगत झाल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी इगतपुरी तालुक्यातील नांदूरवैद्य येथे जमलेल्या दहा हजार अस्पृश्यांच्या मेळाव्यात दलित युवक संघाच्या कृष्णराव रावबा ढेंगे यांच्या अध्यक्षतेखाली रथयात्रेच्या वेळी सत्याग्रह करण्याचा निर्धार बोलून दाखवण्यात आला. सत्याग्रह्यांचा हा निश्चय लक्षात घेऊन रथयात्रा आयोजित करण्यास परवानगी दिली जाणार नाही असे नाशिकचे

जिल्हाधिकारी एन. ए. फारुकी यांनी उभय पक्षांच्या पुढाऱ्याना बोलावून सांगितले. १४ एप्रिलला आपला रथ बाहेर काढला जाणार नाही अशी दक्षता घेण्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांनी सरदार रास्ते यांना सूचना केली आणि त्यांनी ती मान्य केली. १२ एप्रिलला रामनवमीस काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी आपण सत्याग्रह करणार नाही, पण १४ एप्रिलला रथयात्रा आयोजित करण्याचा सनातन्यांनी प्रयत्न केला तर रथ ओढण्याचा वहिवाटीने दिलेला हक्क पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी आपण सत्याग्रह करू असे गायकवाडांनी जिल्हाधिकाऱ्यास सांगितले.[१२२] रथयात्रेच्या वेळी सवर्ण हिंदू व अस्पृश्य यांच्यामध्ये चकमक उडू नये म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी रामनवमी ते एकादशी या तीन दिवसांच्या कालावधीपुरता रथयात्रेबाबतचा मनाईहुकूम जारी केला.

मनाईहुकूम देण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण होते, १४ एप्रिल हाच मोहरमचाही दिवस असल्याने रस्त्यातून ताबुतांची मिरवणूक निघणार होती. सर्वच मिरवणुकांना मनाई केली असती तर मुसलमानांच्या भावना दुखावल्या असत्या म्हणून फारुकीसाहेबांनी ताबूत मिरवीत नेण्यास परवानगी दिली.[१२३] मुसलमानांना ताबूत मिरवीत नेता येणार आणि आपल्याला मात्र रथ मिरवीत नेण्यास मनाई केली यामुळे सवर्ण हिंदू खवळले. त्यांनी रथ मिरवीत नेता यावा म्हणून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासूनच जय्यत तयारी करण्यास सुरुवात केली होती. सनातन्यांनी विमानरथ नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुजाऱ्याच्या रथाचे नूतनीकरण करण्यास सुरुवात केली होती. चाकांना तेल-वंगण घातले होते. दोरखंड चांगले घट्ट बनवले होते. ४ एप्रिलला पुण्यात सार्वजनिक सभेच्या वतीने अण्णासाहेब भोपटकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत रथयात्रेस परवानगी देण्याची विनंती करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता. रथयात्रेच्या वेळी सवर्ण हिंदूंना मार्गदर्शन करण्यासाठी पुण्याहून धर्मवीर विश्वासराव डावरे आणि पुणे हिंदुसभेचे अध्यक्ष सिद्धेश्वरशास्त्री चित्राव नाशकात आले होते. रथयात्रेस मनाई केल्याने सवर्ण हिंदूंवर अन्याय होतो असे मुंबई सरकारचे तेव्हाचे गृहमंत्री आर. डी. बेल यांना वाटत होते. गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न यांना पाठवलेल्या टिपणात त्यांनी म्हटले आहे, "रथयात्रेबद्दलची परिस्थिती असमाधानकारक आहे. अस्पृश्यांनी सत्याग्रहाची नुसती धमकी दिली तरी रथयात्रेला बंदी घालण्यास ती पुरेशी ठरते. हा प्रश्न कसा सुटेल ते मला समजत नाही. सनातनी हिंदूंचे गाऱ्हाणे मात्र खरे आहे."[१२४] जिल्हाधिकाऱ्यांच्या हुकमासुळे नूतनीकरणासाठी बाहेर काढलेला विमानरथ पुनः एकदा काळाराम मंदिराच्या पूर्वदरवाज्यालगत नेहमी जेथे टेवला जात असे तेथे पुजाऱ्यांना ठेवावा लागला. जिल्हाधिकाऱ्यांच्या या हुकमास गणेश रामचंद्र पुजारी व रामदास काशीनाथ पुजारी या दोघांनी उच्च न्यायालयात अर्ज दाखल करून आव्हान दिले, पण मुंबई उच्च न्यायालयाने पुजाऱ्यांचा अर्ज फेटाळला. मनाई हुकमाची मुदत संपताच कोणत्याही दिवशी रथयात्रा काढण्याचा सनातन्यांचा इरादा

स्पष्ट होताच नाशिकचे नवे जिल्हाधिकारी सय्यद अमीनुद्दीन हे दर महिन्याने मनाई-हुकमाची मुदत वाढवीत राहिले.

मुदत वाढविण्यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीला मान्यता देताना गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न यांनी गृहखात्याला सवाल केला, "सध्याची कोंडी फोडण्यासाठी काही मार्ग काढता येणार नाही का ? डॉ. आंबेडकर आपल्याला मदत करतील का ?"[१२५] नाशिकची चळवळ डॉ. आंबेडकरांनीच सुरू केली असल्याने गायकवाडांपेक्षा आंबेडकरांशीच चर्चा करावी याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांचे एकमत झाले. गायकवाडांपेक्षा डॉ. आंबेडकरांचा नाशिकच्या अस्पृश्यांवर कितीतरी पटीने जास्त प्रभाव असल्याने आंबेडकरांनी जर एकदा सरकारला सत्याग्रह थांबवण्याबाबत सल्ला दिला तर सत्याग्रह करण्याचे प्रयत्न थांबतील असे गृहसचिवांना वाटत होते. गृहमंत्र्यांनी सरदार रास्ते यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा केली होती. अस्पृश्यांनी रथ ओढण्यात भाग घेतला तर त्याला त्यांची हरकत नव्हती. मात्र अस्पृश्यांना मूर्तीस स्पर्श करू देण्यास रास्ते तयार नव्हते. डॉ. आंबेडकरांशी या प्रश्नाबाबत चर्चा करण्यास गृहमंत्र्यांची हरकत नसली तरी या चर्चेतून काही निष्पन्न होईल असे मंत्र्यांना वाटत नव्हते.

या दिवसांत डॉ. आंबेडकरांनी मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करण्यास सुरुवात केली होती. २७ मे १९३५ रोजी त्यांच्या पत्नी रामाबाई यांचे निधन झाले होते. त्यानंतर अवघ्या पाच दिवसांनी सरकारने बाबासाहेबांची प्राचार्य म्हणून नेमणूक केली होती. ९ जुलै १९३५ रोजी गृहसचिव हेन्री नाईट यांनी पुण्याहून त्यांना पत्र लिहिले आणि मुंबई कायदेमंडळाच्या पावसाळी अधिवेशनासाठी पुण्याला याल तेव्हा नाशिकच्या रथयात्रेसंबंधी बोलणे करू असे त्यांनी बाबासाहेबांना कळवले. राजगृह या दादरमधील नव्या निवासस्थानाच्या पत्त्यावर नाईटसाहेबांनी पत्र पाठवले असले तरी बाबासाहेबांना ते मिळाले नाही. नाईटनी पाठवलेले स्मरणपत्र मिळताच बाबासाहेबांनी आपण एखाद्या रविवारी पुण्यात येऊ शकू असे नाईटना कळवले.[१२६] उभयतांच्या सोयीनुसार २ ऑगस्ट १९३५ रोजी पुण्यात बाबासाहेब व गृहसचिव नाईट यांच्यामध्ये बोलणे झाले.

या बोलण्यासंबंधी नाईटनी तयार केलेल्या टिपणात म्हटले आहे, "नाशिकला अस्पृश्यांनी रथयात्रेबाबत चळवळ करण्यात काही अर्थ राहिला नसल्याचे बाबासाहेबांनी सांगितले. रथ ओढण्याबाबतीत स्पृश्य व अस्पृश्य यामध्ये कसलाही भेदभाव पूर्वी केला जात नसे. मंदिरप्रवेशाबद्दलचा वाद पेटल्यानंतर अस्पृश्यांनी रथ ओढू नये असा सनातन्यांनी हट्ट धरला. रथ ओढण्यात भाग घेण्याचे अस्पृश्यांनी बंद केले तर त्याचा अर्थ परंपरेने मान्य केलेल्या वाजवी हक्कासही अस्पृश्य पारखे झाले असे होईल." १९३४ साली चळवळ थांबवावी म्हणून सवर्ण हिंदूंच्या काही प्रतिनिधींनी आपल्याला सांगितले तेव्हा एका अटीवर तसे करण्यास आपण कसे तयार होतो हे बाबासाहेबांनी

नाईटसाहेबांस सांगितले. आपण हिंदू समाजाचे घटक नसून दुसऱ्या एखाद्या धर्मात प्रवेश करू असे अस्पृश्यांच्या वतीने पत्रक काढण्यास सवर्ण हिंदूंची हरकत नसेल तर नाशिकच्या अनुयायांना तार पाठवून चळवळ थांबविण्याची बाबासाहेबांनी तयारी दाखविली होती. तेव्हा त्यांच्याशी बोलणे करण्यासाठी आलेले सवर्ण हिंदूंचे प्रतिनिधी गडबडले. बाबासाहेबांनी असे पत्रक काढू नये असे त्यांनी सांगितले. अस्पृश्य हिंदू धर्माचा त्याग करून बाहेर पडण्यापेक्षा रथयात्रा निघाली नाही तरी चालेल असे १९३४ साली सवर्ण हिंदूंनी ठरवले होते. प्राचार्यपदाच्या नव्यानेच स्वीकारलेल्या जबाबदारीमुळे ८ ऑक्टोबरपर्यंत आपल्याला नाशिकला जाता येणार नाही. मात्र त्यानंतर १९३४ साली धर्मांतराबाबत घोषणा करणारे ज्या प्रकारचे पत्रक आपण काढणार होतो तसे काढून चळवळ थांबण्याबद्दल नाशिकच्या अस्पृश्यांचे आपण मन वळवू असे बाबासाहेबांनी गृहसचिवांना आश्वासन दिले.[१२७] हे टिपण वाचल्यानंतर गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न यांनी त्यावर अभिप्राय दिला. ऑक्टोबर १९३५ पर्यंत रथयात्रेच्या प्रश्नाबाबत काहीच तोडगा निघाला नाही तर पुनः डॉ. आंबेडकरांशी बोलणे करावे असा गव्हर्नरसाहेबांनी आदेश दिला.

रथ स्पृश्य व अस्पृश्य हिंदूंनी ओढण्यापेक्षा तो ओढण्यासाठी घोडे वापरले तर मार्ग निघण्यासारखा होता. सरदार रास्ते व डॉ. आंबेडकर हे दोघेही या तोडग्यास मान्यता द्यावयास तयार होते. बापूसाहेब राजभोज अधूनमधून नाशकात येऊन रथयात्रेच्या वेळी सत्याग्रह करण्याची गर्जना करीत होते. ऑक्टोबरच्या सुरुवातीस गृहसचिव नाईटनी बाबासाहेबांना त्यांनी दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली तेव्हा आपण ते विसरलो नसल्याचे बाबासाहेबांनी उत्तरादाखल लिहिले.[१२८]

या वेळी १३ ऑक्टोबरला नाशिक जिल्ह्यातील येवल्यास भरणाऱ्या मुंबई इलाखा दलित परिषदेत धर्मांतराबाबत घोषणा करण्याचा बाबासाहेबांनी निश्चय केला होता. १३ ऑक्टोबरला येवल्यात त्यांनी "मी हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही." ही ऐतिहासिक महत्त्वाची घोषणा केली.

काळाराम मंदिरप्रवेशासाठी सहा वर्षे चाललेली चळवळ मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. बाबासाहेबांनी धर्मांतर करण्याचा विचार सोडून द्यावा; काही काळ आणखी थांबावे असे गांधीजी, राजेन्द्रप्रसाद, बॅ. सावरकर वगैरेंनी धर्मांतराच्या घोषणेनंतर जाहीर प्रतिक्रिया व्यक्त करून सुचवले. धर्मांतराची कल्पना एम. सी. राजा, देवरुखकर, नारायणराव कांजरोळकर, डॉ. सोळंकी, रावबहाद्दुर श्रीनिवासन्, बापूसाहेब राजभोज या अस्पृश्यांच्या अन्य नेत्यांनाही पसंत नव्हती.

९ डिसेंबर १९३५ च्या मध्यरात्रीनंतर रथ-यात्रेबाबतच्या मनाई हुकमाची मुदत संपली. ती पुढे वाढविण्याचे कारण उरले नव्हते. १० डिसेंबरला सनातन्यांनी रथयात्रा काढण्याचे ठरवले. बापूसाहेब राजभोजांनी त्यात काही अडथळा आणू नये म्हणून

त्यांना नाशिक जिल्ह्यात प्रवेश करण्यास बंदी करण्यात आली. तेव्हा एप्रिल १९३६ मध्ये आपण सत्याग्रह करू असे राजभोजांनी जाहीर केले. राजभोज मुळातले नाशिक जिल्ह्यातले असले तरी नाशिकचे अस्पृश्य, बाबासाहेब आणि गायकवाड यांचे नेतृत्व मानीत तसे राजभोजांचे मानावयास तयार नव्हते. त्यामुळे राजभोजांची सत्याग्रहाबद्दलची गर्जना डिसेंबर १९३५ प्रमाणेच एप्रिल १९३६ मध्येही हवेत विरून गेली आणि १९३६ सालच्या रामनवमीपासून रथयात्रा निर्विघ्नपणे पार पडू लागली. काळाराम मंदिराचे दरवाजे पुन्हा एकदा खुले झाले. मात्र ते सर्व स्पृश्य हिन्दूंना !

सतत सहा वर्षे काळाराम मंदिरप्रवेशाचे हे प्रकरण धुमसत ठेवून बाबासाहेबांनी काय साधले ? त्यांच्या चळवळीमुळे अस्पृश्यांना मंदिर खुले झाले नाही. रामकुंडातील पाणी काढून तेथे स्नान करण्याचा अधिकारही न्यायालयाने अस्पृश्यांना नाकारला एवढेच नव्हे तर रथ ओढण्याचा शेकडो वर्षांच्या परंपरेने दिलेला अधिकारही स्पृश्यांनी अस्पृश्यांना काही वर्षे नाकारला. आपल्या चळवळीमुळे स्पृश्य हिंदूंचे डोळे उघडतील आणि ते अस्पृश्यांना मंदिरात येऊ देतील किंवा रामकुंडातील पाण्याचा वापर करू देतील असा बाबासाहेबांना मुळीच भ्रम नव्हता. उलट तसे स्पृश्यांनी केले असते तरच त्यांना नवल वाटले असते.

अस्पृश्यांमध्ये आपल्या हक्कासंबंधीची जागृती निर्माण करणे आणि त्यासाठी लढा द्यावयास शिकवणे हे बाबासाहेबांचे हेतू होते ते त्यांना बव्हंशी साधता आले. दलितमुक्ती आंदोलनात सहभागी झालेल्यांनी दगडफेक, लाठीमार वगैरेंना तोंड दिले आणि काहींनी कारावास सोसला. दलित चळवळीच्या नेत्यांनी तुरुंगवास सोसण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. या चळवळीत स्त्रियांनी भाग घेतला आणि काही तुरुंगातही गेल्या, हेही दलितमुक्ती आंदोलनात प्रथमच घडले.

काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या आरंभापासून अखेरपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सत्याग्रह समितीला मार्गदर्शन मिळाले आणि काही प्रसंगी खुद्द बाबासाहेब लढ्यात सहभागी झाले. गोलमेज परिषदेच्या तिन्ही सत्रांत भाग घेण्यासाठी बाबासाहेबांना दीर्घकाळ विलायतेत राहावे लागले असतानाही त्यांच्या गैरहजेरीत भाऊराव गायकवाड, अमृतराव रणखांबे, सावळाराम दाणी वगैरे नाशिकच्या नेत्यांनी लढ्याची आघाडी व्यवस्थित सांभाळली. नाशिक जिल्हा हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला असल्याचे काळाराम मंदिरामुळे सिद्ध झाले आणि गायकवाड, रणखांबे वगैरे नेते नावारूपाला आले.

मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाला काही काँग्रेस नेत्यांनी तत्त्वशः पाठिंबा दिला, शाब्दिक सहानुभूती व्यक्त केली पण ब्राह्मणेतर पक्षातून काँग्रेसमध्ये गेलेल्या दिनकरराव जवळकर या मराठा जातीच्या सत्यशोधक पुढाऱ्याचा उज्ज्वल अपवाद सोडला तर अस्पृश्यांच्या संघटना व त्यांच्या प्रभावाखालचे राजकीय पक्ष मंदिरप्रवेशासाठी

झालेल्या सत्याग्रहात सामील झाले नाहीत. काहींनी तर त्यास प्रखर विरोध केला. एरवी ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध कडाडून टीका करणारी ब्राह्मणेतर पक्षातील आणि सत्यशोधक चळवळीतील माणसे हा सत्याग्रह दुरूनच पाहात राहिली. अखेर दलित मुक्तीचा लढा दलितांनाच लढावा लागणार याची सत्याग्रहाच्या नेत्यांना प्रकर्षाने जाणीव झाली.

येवल्याच्या परिषदेत आपण धर्मांतर करणार असल्याची घोषणा करण्यास डॉ. आंबेडकर प्रवृत्त झाले त्यालाही काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या सहा वर्षांच्या काळातील अनुभवांची पार्श्वभूमी होती. कायदा, न्यायसंस्था, पोलिसयंत्रणा, प्रस्थापितांच्या बाजूने असतात हे या काळात बाबासाहेबांना सारखे प्रत्ययास आले. त्यामुळे देश स्वतंत्र झाल्यानंतर बाबासाहेबांनी जवाहरलाल नेहरूंच्या मंत्रिमंडळात जाऊन दलितमुक्ती आंदोलनात अडथळा ठरलेल्या कायद्यातील तरतुदी काढून टाकण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय घटनेतच दलितांचे प्रश्न आणि हित लक्षात घेऊन तरतुदी केल्या. या तरतुदींचे महत्त्व खुद्द बाबासाहेबांनी २५ एप्रिल १९४८ रोजी लखनौ येथे शे. का. फे. तर्फे भरलेल्या एका परिषदेत स्पष्ट केले होते. यापुढे वाईट प्रशासनामुळे आणि विशेषतः सवर्ण हिंदू अधिकाऱ्यांच्या सहानुभूतिशून्य कारभारामुळे दलितांना धोका असला तरी ब्रिटिश राजवटीतील वाईट कायद्यामुळे दलितांची जशी हानी होत होती तशी यापुढे होणार नाही अशी बाबासाहेबांनी ग्वाही दिली. आजही दलितांना स्वकीयांविरुद्ध हक्कासाठी झगडावे लागतेच पण आता त्यांना घटनेतील मूलभूत हक्कांचा आधार घेऊन लढता येते. काळाराम मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाच्या काळात तेही शक्य नव्हते.

## संदर्भ


१. चां. भ. खैरमोडे, **डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र**, खंड ३, १९६४, पृ. ३३४–३३५
२. रत्नाकर गणवीर (संपादक) : **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख**, द्वितीयावृत्ती, १९८५, पृ. ६४१
३. कोहिनूर, २३ नोव्हेंबर १९२९
४. सखाराम अनंतबुवा पूजाधिकारी यांची गव्हर्नरला तार, ४ फेब्रु. १९३०
५. आर. जी. गॉर्डन यांचे मध्यविभागाच्या आयुक्तांना पत्र, ३ मार्च १९३०
६. रत्नाकर गणवीर (संपादक) उपरोक्त,, पृ. २२१
७. आर. जी. गॉर्डन यांचे घोषाळ यांना पत्र, ४ मार्च १९३०

८. घोषाळ यांचे गॉर्डनना पत्र, ५ मार्च १९३०
९. गॉर्डन यांचे घोषाळ यांना पत्र, ७ मार्च १९३०
१०. घोषाळ यांचे हॉटसनना पत्र, ९ मार्च १९३०
११. गॉर्डनचे गायकवाडांना पत्र, १६ मार्च १९३०
१२. डॉ. आंबेडकरांचे गव्हर्नरांस पत्र, २४ मार्च १९३०
१३. गॉर्डनचे कॉलिन्सना पत्र, ३० मार्च १९३०
१४. **टाइम्स ऑफ इंडिया**, २० मार्च १९३०
१५. **कित्ता**, २१ मार्च १९३०
१६. **कोहिनूर**, १० एप्रिल १९३०
१७. कॉलिन्स यांचे मॅकाय यांना पत्र, ६ एप्रिल १९३०
१८. रत्नाकर गणवीर ( संपादक ), **उपरोक्त**, पृ. ३६५–३६७
१९. **कोहिनूर**, १० एप्रिल १९३०
२०. **कित्ता**
२१. गॉर्डन यांचे मॅकायना पत्र, ९ एप्रिल १९३०
२२. गॉर्डन यांचे मॅकायना पत्र, १० एप्रिल १९३०
२३. गॉर्डन याचे कॉलिन्सना पत्र, १० एप्रिल १९३०
२४. गॉर्डन यांची तार, १० एप्रिल १९३०
२५. गॉर्डन यांचे मॅकायना पत्र, ११ एप्रिल १९३०
२६. मॅकायचे कॉलिन्सना पत्र, २४ एप्रिल १९३०
२७. **टाइम्स आफ इंडिया**, २९ एप्रिल १९३०
२८. **कित्ता**, १० एप्रिल १९३०
२९. **पतितपावन**, ३० ऑगस्ट १९३०
३०. गॉर्डनचे मॅकाय यांना पत्र, १० मे १९३०
३१. ' बादळाचे वंशज ' या पुस्तकात पतितपावनदासाविषयी लिहिताना प्रा. गंगाधर पानतावणे यानी म्हटले आहे, " पतितपावनदासांनी वृत्तपत्रसृष्टीत प्रवेश केला तो ' पतितपावन ' नावाचे साप्ताहिक वर्तमानपत्र आरंभ करून. नागपूरहून प्रकाशित होणाऱ्या या साप्ताहिकाचा पहिला अंक शनिवार तारीख बारा सप्टेंबर एकोणिसशे छत्तीस साली प्रकाशित झाला." पानतावणे यांचे हे विधान चुकीचे ठरते; कारण ' पतितपावन'चा पहिला अंक २ ऑगस्ट १९३० रोजी नाशिकला काढण्यात आला. बाबासाहेबाचे चरित्रकार चांगदेव खैरमोडे यानी चौथ्या खंडात तेव्हा प्रकाशित होणाऱ्या ' पतितपावन ' पत्रातील उतारेही उद्‌धृत केले आहेत, ते पानतावणे यांच्यासारख्या साक्षेपी अभ्यासकाच्या नजरेतून कसे निसटले कोण जाणे ! १९३६ साली नागपूरला पतितपावनदासांच्या पतितपावन

पत्राचा पुनर्जन्म झाला असावा !

३२. **पतितपावन**, २ ऑगस्ट १९३०

३३. भालचंद्र फडके : **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**, १९८५ पृ. १७४–१७५. 'जनता' पत्र कसेबसे चालले होते म्हणून बाबासाहेबांनी 'पतितपावन' सुरू झाले तेव्हा नाराजी व्यक्त केली असे भालचंद्र फडके सांगतात ते चुकीचे आहे. कारण 'जनता' पाक्षिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला तो २४ नोव्हेंबर १९३० रोजी. २ ऑक्टोबर १९३० रोजी बाबासाहेबाना मुंबईत थैली देण्यात आली तेव्हा तिचा विनियोग 'बहिष्कृत भारत' पत्र 'जनता' या नव्या नावाने सुरू करण्यासाठी केला जाईल असे जाहीररीत्या त्यांनी सांगितले होते.

३४. चां. भ. खैरमोडे, **डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र**, खंड ४, १९६६, पृ. ५५

३५. **पतितपावन**, ९ ऑगस्ट १९३०

३६. **कित्ता**, २३ ऑगस्ट १९३०

३७. **कित्ता**, १३ सप्टेंबर १९३०

३८. **कित्ता**, ४ ऑक्टोबर १९३०. 'विलायतेहून डॉ. बाबासाहेबांची पत्रे' या रत्नाकर गणवीर यांनी संपादित केलेल्या पुस्तकात बाबासाहेबांनी विलायतेच्या वाटेवर असताना ११ ऑक्टोबर १९३० रोजी भाऊराव गायकवाडांना लिहिलेले पहिले पत्र छापले आहे. त्यात "नाशिक रोडवर झालेल्या प्रकारातून निष्पन्न झालेल्या फौजदारी खटल्याचे काय झाले ?" असे विचारलेले आहे. तो प्रश्न या दंगलीशी संबंधित आहे हे रत्नाकर गणवीर यांच्या लक्षात न आल्याने त्यांनी सपशेल चुकीची टीप दिली आहे ती खालीलप्रमाणे. "नाशिकच्या लोकांनी काळाराम मंदिरप्रवेश सत्याग्रह ३ एप्रिल १९३० साली (रोजी) आरंभिला होता. रामनवमीच्या दिवशी रामाचा रथ ओढण्यावरून दंगल झाली (दि. ६ एप्रिल १९३०) त्या संदर्भातील हा निर्देश आहे." नाशिक रोडची दंगल ९ एप्रिल १९३० ला झाली नसून २८ सप्टेंबर १९३० ला झाली होती. ती रथ ओढण्यावरून झाली नसून मदाऱ्याचा खेळ मराठ्यांच्या पुढे बसून केशव माधव सोनवणे हा महार मुलगा पाहात होता आणि त्याने जागा सोडण्यास नकार दिला यामुळे झाली होती, ही वस्तुस्थिती रत्नाकर गणवीर यांना माहीत नसल्याने त्यांनी अशी चुकीची टीप दिलेली दिसते.

३९. **पतितपावन**, ४ ऑक्टोबर १९३०.

४०. **कित्ता**, ८ नोव्हेंबर १९३०

४१. रत्नाकर गणवीर (संपादक), **विलायतेहून डॉ. बाबासाहेबांची पत्रे**, द्वितीयावृत्ती, १९८४, पृ. १६

४२. गॉर्डनचे मॅकायना पत्र, १० फेब्रुवारी १९६१
४३. रत्नाकर गणवीर (संपादक) : उपरोक्त, पृ. १८
४४. टाइम्स ऑफ इंडिया, १७ फेब्रुवारी १९३१
४५. गव्हर्नरचे टिपण, १३ मार्च १९३१
४६. डी. एफ. मुल्ला यांचे टिपण, २९ जून १९३०
४७. मॅकाय यांचे गॉर्डनना पत्र, १४ मार्च १९३१
४८. गॉर्डनचे मॅकायना पत्र, १६ मार्च १९३१
४९. (अ) गॉर्डनची गृहखात्यास तार, १६ मार्च १९३१. (ब) गृहखात्याची गॉर्डनना तार, १७ मार्च १९३१
५०. गृहसचिवांचे गॉर्डनना पत्र, १९ मार्च १९३१
५१. गृहमंत्र्यांचे टिपण
५२. (अ) गॉर्डनचे गृहसचिवांना पत्र, २१ मार्च १९३१. (ब) गृहसचिवांचे एच. बी. क्लेटन (मध्यविभागाचे आयुक्त) यांना पत्र, ८ एप्रिल १९३१
५३. गॉर्डनचे थॉमसना पत्र, ४ ऑगस्ट १९३१
५४. चां. भ. खैरमोडे, उपरोक्त खंड ४, पृ. १४२–१४३
५५. वालजी गोविंदजी देसाई (अनुवादक व संपादक) द डायरी ऑफ महादेवभाई देसाई, खंड १, येरवडा पॅक्ट इव्ह १९३२; १९५३; पृ. ५२
५६. कित्ता, पृ. ५३
५७. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब, आंबेडकर १९५४, पृ. १६०
५८. चां. भ. खैरमोडे, उपरोक्त खंड ४, पृ. १४५–१४६
५९. (अ) गॉर्डनचे मध्यविभागाच्या आयुक्तांना पत्र, २९ जुलै १९३१ (ब) आयुक्तांचे उत्तर, ४ ऑगस्ट १९३१
६०. टाइम्स ऑफ इंडिया, २४ सप्टेंबर १९३१
६१. रत्नाकर गणवीर, उपरोक्त, पृ. ४९
६२. विलायतेहून डॉ. बाबासाहेबाची पत्रे या रत्नाकर गणवीरांनी संपादित केलेल्या पुस्तकातील पृ. ५० वरील तळटीपेत मुखेड दंगलीची तारीख २० सप्टेंबर अशी गणवीरांनी दिली आहे ती चुकीची आहे पाहा. टाइम्स ऑफ इंडिया २६ सप्टेंबर आणि ८ ऑक्टोबर १९३१
६३. भाऊराव गायकवाडांचे एल. एन. ब्राऊनना पत्र, २७ सप्टेंबर १९३१
६४. एल. एन. ब्राऊन यांचे गृहसचिवांना पत्र, १४ ऑक्टोबर १९३१
६५. ब्राऊन यांचे मध्यविभागाच्या आयुक्तांना पत्र, ४ ऑक्टोबर १९३१
६६. ब्राऊनचे गृहसचिव कॉलिन्सना पत्र, ८ ऑक्टोबर १९३१
६७. टाइम्स ऑफ इंडिया, १३ ऑक्टोबर १९३१

६८. (अ) जिल्हा पोलिस अधीक्षकाची रोजनिशी, १७ ऑक्टोबर १९३१
(ब) ब्राऊनचे मध्यविभागाच्या आयुक्तांना पत्र, १९ ऑक्टोबर १९३१
६९. टाइम्स ऑफ इंडिया, ४ नोव्हेंबर १९३१
७०. ब्राऊनचे क्लेटनना पत्र, ८ नोव्हेंबर १९३१
७१. टाइम्स ऑफ इंडिया, १२ नोव्हेंबर १९३१
७२. रॉबिन्सचे ब्राऊनना पत्र, ९ नोव्हेंबर १९३१
७३. ब्राऊनचे क्लेटनना पत्र, १० नोव्हेंबर १९३१
७४. रॉबिन्सचे ब्राऊनना पत्र, १३ नोव्हेंबर १९३१
७५. रॉबिन्सचे ब्राऊनना पत्र, १७ नोव्हेंबर १९३१
७६. बॉंबे क्रॉनिकल, १२ नोव्हेंबर १९३१
७७. ब्राऊनचे क्लेटनना पत्र, २२ नोव्हेंबर १९३१
७८. रॉबिन्सचे क्लेटनना पत्र, २३ नोव्हेंबर १९३१
७९. रॉबिन्सचे ब्राऊनना पत्र, १ डिसेंबर १९३१
८०. कित्ता
८१. भाला, ७ डिसेंबर १९३१
८२. गॉर्डनचे मध्यविभागाच्या आयुक्तांना पत्र
८३. कित्ता, ५ जानेवारी १९३२
८४. जिल्हा पोलिस अधीक्षकांचे पत्र, फेब्रुवारी १९३२
८५. गॉर्डनचे गृहसचिवांना पत्र, ९ फेब्रुवारी १९३२
८६. ब्राऊनचे क्लेटनना पत्र, ९ फेब्रुवारी १९३२
८७. जी. ए. थॉमस यांचे टिपण, १८ फेब्रुवारी १९३२
८८. (अ) मॅक्सवेलचे डॉ. पी. सोळंकींना पत्र, ८ मार्च १९३२
(ब) मॅक्सवेलचे टिपण, १३ मार्च १९३२
८९. मॅक्सवेलचे नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र, २३ मार्च १९३२
९०. जिल्हाधिकाऱ्यांच्यावतीने व्ही. एम. कुलकर्णी यांनी सादर केलेला आठवड्याचा वृत्तान्त, ७ एप्रिल १९३२
९१. गृहखात्याच्या विशेष शाखेतर्फे नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना तार.
९२. एल. एन. ब्राऊन यांचे गृहसचिवांना पत्र, १५ एप्रिल १९३२
९३. टाइम्स ऑफ इंडिया, २२ एप्रिल १९३२
९४. (अ) रॉबिन्सनचे जिल्हाधिकाऱ्यास पत्र, १६ एप्रिल १९३२
(ब) २७ एप्रिल १९३१ रोजी माहिती खात्याच्या संचालकांनी काढलेले पत्रक
९५. गृहसचिवांचे टिपण, १६ एप्रिल १९३२
९६. (अ) रोहम याचे नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र, २२ एप्रिल १९३२

(ब) ब्राऊनचे गृहसचिवांना पत्र, २४ एप्रिल १९३२
९७. मॅक्सवेलचे डॉ. आंबेडकरांना पत्र, १३ मे १९३२
९८. ब्राऊनची मॅक्सवेलना तीन पत्रे, दि. १९, २३ व २४ मे १९३२
९९. नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांचा साप्ताहिक वृत्तान्तातील उतारा, १५ जून १९३२ आणि ब्राऊनचे बी. बी. क्ली यांना पत्र १७ जून १९३२
१००. डी. जी. तेंडुलकर, महात्मा खंड ३, १९५२, पृ. २०४
१०१. बाबूलाल मौर्य (संपादक) महात्मा गांधीज लेटर्स टू पी. एन. राजभोज १९६७, पृ. २०३
१०२. उपरोक्त, पृ. ५–१०
१०३. टाइम्स ऑफ इंडिया, १९ ऑक्टोबर १९२७
१०४. बी. आर. आंबेडकर, वॅाट काँग्रेस अँड गांधी हॅव डन टु द अनटचेबल्स १९४५, पृ. १३४–१४०
१०५. कित्ता, पृ. १४०
१०६. जी. डी. बिर्ला, इन द शॅडो ऑफ द महात्मा, दुसरी आवृत्ती, १९७२, पृ. ७४ व ७७
१०७. रत्नाकर गणवीर, उपरोक्त, पृ. ९७–९८
१०८. महाराष्ट्र शासन, सोर्स मटेरिअल ऑन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द मुवमेन्ट ऑफ अनटचेबल्स.
१०९. जी. डी. बिर्ला, उपरोक्त, पृ. ९२
११०. बी. आर आंबेडकर, उपरोक्त, पृ. १०८–११३
१११. शंकरराव रा. खरात (संपादक), कर्मवीर भाऊराव कृ. ऊर्फ दादासाहेब गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, १९६१, पृ. ४६–४७
११२. भाला, ७ डिसेंबर १९३३
११३. जिल्हाधिकाऱ्यांचे साप्ताहिक पत्र, ३० मार्च १९३३
११४. टाइम्स ऑफ इंडिया, १४ ऑक्टोबर १९३३
११५. हेन्री नाइट या नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्याचे साप्ताहिक वृत्तान्त, १९ फेब्रुवारी व ३ मार्च १९३४
११६. शंकरराव रा. खरात, उपरोक्त, पृ. १५०–५१
११७. जिल्हाधिकाऱ्यांचा साप्ताहिक वृत्तान्त, २१ मार्च १९३४
११८. भाला, २३ मार्च १९३१
११९. टाइम्स ऑफ इंडिया, २ एप्रिल १९३४
१२०. गृहसचिवांचे नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्र, ३ एप्रिल १९३४
१२१. (अ) बॉंबे क्रॉनिकल, २२ मार्च १९३५

(ब) टाइम्स ऑफ इंडिया, ४ एप्रिल १९३५

१२२. जिल्हाधिकाऱ्याचा साप्ताहिक वृत्तान्त, ३ एप्रिल १९३५

१२३. जिल्हाधिकारी फारुकींचा साप्ताहिक वृत्तान्त, १० एप्रिल १९३५

१२४. आर. डी. बेल यांचे टिपण, ११ एप्रिल १९३५

१२५. लॉर्ड ब्रेबर्न यांचे टिपण, १ जून १९३५

१२६. डॉ. आंबेडकरांची हेन्री नाईटना पत्रे, २६ जुलै व १ ऑगस्ट १९३५

१२७. गृहसचिव हेन्री नाईट यांचे गोपनीय टिपण, ३ ऑगस्ट १९३५

१२८. (अ) हेन्री नाईटचे डॉ. आंबेडकरांना पत्र, २ ऑक्टोबर १९३५

(ब) डॉ. आंबेडकरांचे नाईटना पत्र, ११ ऑक्टोबर १९३५

# विभाग दुसरा

१

# स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना

१५ ऑगस्ट १९३६ रोजी टाइम्स ऑफ इंडियाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष (इंडिपेंडंट लेबर पार्टी) हा नवा राजकीय पक्ष स्थापन केल्याचे जाहीर केले आणि त्या पक्षाची उद्दिष्टे व कार्यक्रम यांचा तपशीलही प्रसिद्ध केला. जवळजवळ सहा वर्षे हा पक्ष चालवल्यानंतर बाबासाहेबांनी तो गुंडाळला आणि त्याच्याऐवजी १९ जुलै १९४२ रोजी नागपूरला शेड्यूल्ड कास्टस फेडरेशनची (शे. का. फे. ची) स्थापना केली. चांगदेवराव खैरमोडे, धनंजय कीर, भालचंद्र फडके, बापूसाहेब कांबळे वगैरे आंबेडकर चरित्रकारांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्याबद्दल थोडेसे लिहिले असले तरी एक राजकीय पक्ष म्हणून स्वतंत्र मजूर पक्षाचा साधार सविस्तर इतिहास अद्याप प्रकाशित झालेला नाही. या पक्षाचा जाहीरनामा, या पक्षाच्या वतीने बाबासाहेबांनी मुंबई विधानसभेत आणि सभागृहाबाहेर केलेली भाषणे वगैरेंची दखल आंबेडकर-चरित्रकारांनी घेतलेली आहे. पण ज्या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांनी अचानक हा पक्ष स्थापन करण्याचा तसेच तो गुंडाळण्याचा निर्णय घेतला त्या पार्श्वभूमीसंबंधी कोणी फारसे लिहिलेले नाही. या पक्षाची रणनीती (Strategy) आणि त्याचे डावपेच (Tactics), मुंबई विधानसभेतील एक विरोधी पक्ष म्हणून त्याने केलेली कामगिरी, मध्यप्रांत वऱ्हाडातील या पक्षाचे कार्य, पक्षाचे प्रांतिक विधानमंडळांच्या निवडणुकीतील यशापयश, पक्षाने अन्य राजकीय पक्षांशी केलेली युती आणि केलेल्या चळवळी, पक्षबांधणी करताना आंबेडकरांना आलेल्या अडचणी, त्यांच्यासमोर उभे राहिलेले पेच, स्वतंत्र मजूर पक्षाची बलस्थाने आणि मर्मस्थाने व मर्यादा या सर्वांचे विश्लेषण पुराव्यानिशी करणे उपयुक्त व उद्बोधक ठरेल असे वाटते.

आधी अस्तित्वात असलेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेऐवजी स्वतंत्र मजूर पक्ष

स्थापन करण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अचानक निर्णय घेतला तो १९३५ च्या कायद्यान्वये होणाऱ्या प्रांतिक विधानमंडळाच्या निवडणुकीचे त्यांना वेध लागले तेव्हा. 'जनता' या त्यांच्या मुखपत्राने त्याबाबत खुलासा केला आहे. "प्रथमतः त्यांचा उद्देश फक्त अस्पृश्य वर्गासाठीच स्वतंत्र पक्ष स्थापन करावा असा होता व त्या पक्षापुरताच व्यवहार्य असा मर्यादित कार्यक्रम त्यांनी ठरविला होता. पण हा मूळचा बेत बदलून या पक्षाला आता बहुसामान्य स्वरूपाचे नाव दिले आहे व त्याचा कार्यक्रमही त्या पक्षाला अनुरूप असा सर्वसाधारण स्वरूपाचा ठेविला आहे. या पक्षाला असे सर्वसामान्य स्वरूप देण्याचे कारण डॉक्टरसाहेबांनी असे सांगितले की अस्पृश्येतर वर्गातील त्यांच्या बऱ्याच स्नेह्यांनी त्यांच्या कार्यक्रमाला पूर्ण अनुमती दिली असून त्याप्रमाणे त्यांच्या पक्षातर्फे निवडणुकीला उभे राहण्याचे कित्येकांनी ठरविले आहे. अस्पृश्य व अस्पृश्येतर यांच्यामध्ये राजकीय बाबीत तरी सहकार्य घडून येण्यास हा पक्ष उपकारक होईल हे उघड आहे. कारण ज्या मतदारसंघात अस्पृश्य वर्गाला राखीव जागा नाहीत अशा पुष्कळ मतदारसंघांत अस्पृश्य वर्गाचे मतदानबळ भरपूर आहे आणि या आपल्या माताधिकाराचा उपयोग या नवीन पक्षातर्फे उभे राहणाऱ्या कोणत्याही वर्गाच्या उमेदवाराला करून घेता येईल."[1] १९३५ च्या कायद्याने दिलेली प्रांतिक स्वायत्तता त्या कायद्यातील संघराज्यविषयक तरतुदींना प्रखर विरोध करणाऱ्यांनीही स्वीकारली होती. प्रांतिक सरकारांना दिली जाणारी सत्ता काबीज करण्यासाठी काँग्रेससकट सर्व राजकीय पक्ष निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्यास तयार झाले होते.

१९२६ पासून बाबासाहेब मुंबई विधानमंडळात सरकारनियुक्त सभासद म्हणून काम करीत होते. १९३५ च्या कायद्यानुसार मुंबई विधानमंडळ द्विसभागृही बनले होते. मुंबई विधानपरिषदेतील सभासदांची एकूण संख्या तीस असेल तर विधानसभेत १७५ सदस्य असतील अशी तरतूद करण्यात आली होती. विधानसभेतील १७५ जागांपैकी ११५ सर्वसाधारण जागा होत्या तर मुसलमान, अँग्लोइंडियन, युरोपियन, भारतीय खिश्चन, स्त्रिया, जमीनदार, व्यापारी–उद्योगपती, मजूर वगैरेंसाठी ६० जागा देण्यात आल्या होत्या. ११५ सर्वसाधारण जागांपैकी पंधरा राखीव जागा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांच्या वाट्याला आल्या होत्या. या पंधरा जागा जिंकल्याने भागण्यासारखे नव्हते. उरलेल्या सर्वसाधारण जागा लढवण्यासाठी योग्य सवर्ण हिंदू उमेदवार निवडून किंवा त्यांना पाठिंबा देऊन आपले विधानसभेतील बळ शक्य तितके वाढवण्याची गरज होती. ती ओळखून बाबासाहेबांनी केवळ अस्पृश्यांसाठीच पक्ष स्थापन करण्याचा आधीचा विचार बदलला आणि अस्पृश्य जातींच्या आधारावर नव्या पक्षाची निर्मिती करण्याऐवजी व्यापक पायावर पक्षबांधणी करण्याचे ठरवले आणि सर्व जातिधर्मांच्या लोकांना नव्या पक्षात प्रवेश दिला जाईल असे घोषित केले.

अस्पृश्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या सर्व पंधरा जागा तर आपण जिंकूच; शिवाय किमान तीस सर्वसाधारण जागांसाठी आपण उभे केलेले अगर पाठिंबा दिलेले सवर्ण हिंदू उमेदवार निवडून येतील अशी बाबासाहेबांना खात्री वाटत होती. तसे त्यांनी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड ब्रेबर्न यांना सांगितलेही होते असे ब्रेबर्नने व्हाइसरॉय लॉर्ड लिनलिथगोस लिहिलेल्या पत्रावरून दिसते.[२] बाबासाहेबांचा हा अंदाज भलताच चुकीचा होता हे फेब्रुवारी १९३७ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या निकालानंतर उघड झाले.

नव्या पक्षाचे नाव ' स्वतंत्र मजूर पक्ष ' का ठेवले हे सांगताना बाबासाहेबांनी दिलेले स्पष्टीकरणही लक्षात ठेवण्यासारखे आहे. अन्य राजकीय पक्षांशी शक्य तेथे सहकार्य करण्याची नव्या पक्षाची तयारी असली तरी तो अन्य राजकीय पक्षांहून वेगळा व म्हणून ' स्वतंत्र ' असेल असे बाबासाहेबांनी बजावून सांगितले होते. सर्वच अस्पृश्यांचा कष्टकरी मजुरांमध्ये समावेश होत असला तरी सर्व कष्टकरी मजूर काही अस्पृश्य समजले जात नव्हते. म्हणून केवळ अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या श्रमजीवी लोकांचेच नव्हे तर सर्वच मजुरांचे हित साधण्यासाठी व त्यांचे कल्याण करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला असल्याचे बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते.[३] ' जनता ' या त्यांच्या मुखपत्राने संपादकीयात ही भूमिका विशद करताना लिहिले, " अस्पृश्यतानिवारणाच्या लढ्याचे बाह्य स्वरूप जरी जातिनिष्ठ दिसत असले तरी तत्त्वतः तो लढा आर्थिक आहे हे आम्ही वेळोवेळी आमच्या लेखात सांगितलेले आहे. अस्पृश्यतानिवारणाच्या बाबतीत अस्पृश्य श्रमजीवी जनतेचे हितसंबंध स्पृश्य श्रमजीवी जनतेच्या हितसंबंधाहून वेगळे किंबहुना परस्परविरोधी असल्यामुळे अस्पृश्यवर्गाला आपला लढा स्वतंत्रपणे लढविणे प्राप्त होते. परंतु आर्थिक लढ्यात स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी कामकरी वर्गांचे हितसंबंध एकजीव आहेत. अस्पृश्य वर्गाला आपला आर्थिक लढा स्पृश्य शेतकरी कामकरी वर्गाच्या साहाय्यावाचून स्वतंत्रपणे लढता येणार नाही. सामाजिक, आर्थिक, राजकीय वगैरे सर्व बाजूंनी गांजलेला अस्पृश्य वर्ग हिंदी श्रमजीविकांच्या लढ्यात पुढारीपण घेण्याला लायक आहे असे आम्ही मागे एकदा म्हटले होते."[४] स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून डॉ. आंबेडकरांनी श्रमजीवी जनतेच्या लढ्याचे रणशिंग फुंकले होते.

१९३६ सालापूर्वी बाबासाहेबांनी आर्थिक प्रश्नावर करण्यात येणाऱ्या किसान-कामगारांच्या चळवळीत प्रत्यक्ष भाग घेतला नव्हता. मात्र शेतकऱ्यांवर अगर कामगार नेत्यांवर भरण्यात आलेल्या खटल्यांत त्यांचे वकीलपत्र बाबासाहेबांनी घेतले होते. १९३६ च्या अखेरीस मुंबई विधानसभेच्या मतदारांना उद्देशून त्यांनी जे आवाहन केले होते त्यात याबद्दलचा तपशील दिला होता. " उंदेरी येथील खटल्यात खोती-कुळांच्या वतीने त्याचप्रमाणे मालवण तालुक्यातील कुणकावळे गावी आणि सावंतवाडी संस्थानातील पडवे-माजगाव येथील खटल्यात आरोपी शेतकरी कुळांच्या वतीने कोर्टात

मी कामे चालविली. मुंबईतल्या कामगार पुढाऱ्यांवर ट्रेड युनियन ॲक्टखाली सुमारे दोन वर्षांपूर्वी झालेल्या खटल्यांत काम चालवून त्यात यश मिळवले. हल्ली अंबरनाथ येथील संपप्रकरणात परुळेकर यांच्यातर्फे मी काम चालविले."[५] पुढे कम्युनिस्ट नेते म्हणून गाजलेले श्यामराव परुळेकर त्या काळात सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सदस्य होते आणि नारायण मल्हार जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार चळवळीत भाग घेत होते. अंबरनाथच्या मजुरांची संघटना बांधणाऱ्या परुळेकरांविरुद्ध मालकांनी भरलेल्या खटल्यात बाबासाहेब आंबेडकरांनी बचाव पक्षाचे वकील म्हणून काम चालविले होते.

शेतकरी–कामगारांच्या चळवळीशी १९३६ पर्यंत बाबासाहेबांचा अप्रत्यक्ष संबंध असला तरी अनंतराव चित्रे आणि गंगाधर नीलकंठ सहस्रबुद्धे या त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांचा कामगार चळवळीशी अनेक वर्षांपासून प्रत्यक्ष संबंध होता. हे दोघेही ना. म. जोश्यांच्या नेतृत्वाखालच्या सोशल सर्विस लीगचे काम करीत असत. १९२४ सालच्या जानेवारीत बोनसच्या प्रश्नावर मुंबईतील स्टँडर्ड मिलच्या कामगारांनी संप केला तेव्हा चित्रे व सहस्रबुद्धे या दोघांनीही कामगारांना कामावर जाण्याचा सल्ला दिला. पुढे संपाचे लोण इतर गिरण्यांतही पसरल्यामुळे ३१ जानेवारी १९२४ रोजी मुंबईत ७३ गिरण्यांतील कामगारांनी संप पुकारला. हा संप मिटवण्यासाठी गव्हर्नरने लवाद म्हणून काम करावे अशी जाहीर विनंती, सभा घेऊन करणाऱ्यांत ना. म. जोश्यांबरोबर गं. नी. सहस्रबुद्धेही होते.[६] कामगार चळवळीत १९२९ साली फूट पडल्यानंतर ना. म. जोशी, रघुनाथराव बखले या नेमस्त कामगारनेत्यांनी नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन ही स्वतंत्र संघटना स्थापन केली, कारण ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (ए आय टी यू सी) ही मूळची संघटना कम्युनिस्टांच्या ताब्यात गेली होती. चित्रे, सहस्रबुद्धे तसेच डॉ. आंबेडकर यांची जवळीक ना. म. जोश्यांच्या संघटनेबरोबर होती. कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालच्या ए. आय. टी. यू. सीशी त्यांचे कसलेच लागेबांधे नव्हते.

अनंतराव चित्रे आणि एन. एन. (ना. ना.) पाटील यांनी कुलाबा जिल्ह्यात शेतकऱ्यांची संघटना बांधण्याचे प्रयत्न १९२९–३० पासून सुरू केले होते. १९३२ साली त्यांचा 'शेतकरी संघ' सरकारने बेकायदा ठरवला होता. १९३४ साली सरकारने शेतकरी संघावरची बंदी उठवल्यानंतर ना. ना. पाटलांनी १६ डिसेंबर १९३४ रोजी अलिबाग तालुक्यातील चारी येथे डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली कुलाबा जिल्हा शेतकरी परिषद भरवली. 'शेतकरी' ही संज्ञा फारच संदिग्ध आहे, कारण बड्या जमीनदारांपासून ते शेतमजुरांपर्यंत सर्वांचाच त्यात समावेश होत असल्याने आणि जमीनदार व शेतमजूर यांचे वर्गीय हितसंबंध परस्परविरोधी असल्याने शेतकरी म्हणजे नेमके कोण याची निश्चित व्याख्या करणे जरूर आहे असा बाबा-

साहेबांनी इशारा दिला. ज्या चारी गावी ही शेतकरी परिषद भरली होती तेथील कुळांनी जमीनदार सावकारांविरुद्ध दोन वर्षांपासून लढा चालवला होता. त्याचा निर्देश करून बाबासाहेबांनी खोतांकडून होणाऱ्या जुलमांना आळा घालण्यासाठी कायदा करण्याची गरज असल्याचे सांगितले.[७] शेतकऱ्यांना तसेच कामगारांना संप करण्याचा हक्क असला तरी संप हा निर्वाणीचा उपाय असतो; त्याचा नित्य अवलंब करता येत नाही. म्हणून किसान–कामगारांचे जमीनदार मालकांबरोबर होणारे तंटे लवादामार्फत सोडवावेत आणि लवादमंडळाचा निर्णय उभय पक्षांवर बंधनकारक असावा असा तोडगा बाबासाहेबांनी सुचवला. शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे खरेखुरे प्रतिनिधी कायदेमंडळात निवडून आल्यानंतरच या वर्गांना अनुकूल असे कायदे मंजूर करणे शक्य होईल असेही मत त्यांनी व्यक्त केले. किसानांचे आणि कामगारांचे प्रश्न कायद्यामार्फत आणि लवादामार्फत सोडवू पाहण्याची ही भूमिका ना. म. जोशी, बखले वगैरे नेमस्त विचारसरणीच्या कामगारनेत्यांच्या भूमिकेशी मिळतीजुळती होती.

काँग्रेस पक्ष हा खऱ्या अर्थाने राजकीय पक्ष नसून ब्रिटिश राजवटीस विरोध करण्यासाठी एकत्र आलेल्या विविध हितसंबंधी गटांची ती एक आघाडी आहे असे बाबासाहेबांचे मत होते. या आघाडीत समाजवादी तसेच कम्युनिस्ट विचारसरणीचे अनेक तरुण असले तरी प्रत्यक्षतः पक्षावर नियंत्रण होते ते देशी भांडवलदारांचे अगर त्यांचे हितसंबंध जपणाऱ्या ब्राह्मणग्रस्त नेत्यांचे असे ते म्हणत असत. १९३६ च्या मार्चमध्ये लखनौस जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्या भाषणात जवाहरलालांनी केलेल्या समाजवादाच्या भाषेवर २ मे १९३६ च्या अंकात अभिप्राय देताना 'जनता' कर्त्यांनी लिहिले होते, "काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून समाजसत्तावादाचा पुरस्कार करणारे पंडित जवाहरलाल हे पहिलेच अध्यक्ष होते. श्रमजीविकांची मानसिक गुलामगिरी हे जमीनदार–भांडवलदार वर्गाच्या हातातले एक अमोघ शस्त्र आहे. समाजसत्तावादी आपल्या कार्यक्रमात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाला महत्त्वाचे स्थान देऊ इच्छीत नाहीत. उलट त्या प्रश्नाचे महत्त्व कमी करून शेतकरी–कामकरी वर्गात प्रचलित असलेल्या धार्मिक व सामाजिक विषमतेवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न समाजसत्तावादी करीत असतात, असा अनुभव आहे. हिंदी समाजसत्तावादी नुसत्या पुस्तकी ज्ञानाने बहकून गेले आहेत असा जो त्यांच्यावर आरोप केला जातो त्यात बराच तथ्यांश आहे."[८]

पाया व इमारत ( Base and superstructure ) असा भेद करून समाजाच्या आर्थिक पायामध्ये परिवर्तन झाले की वरचा इमला पाडण्यास वेळ लागत नाही असे मार्क्सवादी नेहमी म्हणत असत. त्यामुळे आर्थिक पाया बदलण्यावर लक्ष एकवटण्याच्या रणनीतीचा मार्क्सवादी जोरदार पुरस्कार करीत असत. अशा मार्क्सवाद्यांना उद्देशून जनताकर्त्यांनी म्हटले आहे, "संपत्त्युत्पादनाचे संबंध ( Relations

of Production ) हाच मानवी समाजरचनेचा पाया आहे हे खरे, परंतु नुसता पाया म्हणजे काही इमारत नव्हे. पाया जितका सत्य तितक्याच ह्या इमारतीही ( धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे ) सत्य असतात. पाया बदलावयाचा झाला तर प्रथम त्यावरील इमारती पाडाव्या लागतात, त्याचप्रमाणे समाजाच्या आर्थिक संबंधात फेरबदल करावयाचा असेल तर प्रथम प्रचलित सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे संस्थांचा विध्वंस करावा लागतो. वरच्या इमारती कायम ठेवून पाया बदलता येणार नाही. तद्वतच समाजातील प्रचलित संबंध कायम ठेवून आर्थिक संबंधांची पुनर्रचना करता येणार नाही. वर्ग जाणीव झाल्यावर सर्व भेद नष्ट होतील असे उडवाउडवीचे उत्तर देऊन भागणार नाही. सामाजिक आणि धार्मिक विषमता नष्ट झाल्यावाचून वर्गजाणीव झाली तरीदेखील शेतकरी कामकरी वर्गाची टिकाऊ संघटना शक्य नाही... स्पृश्यास्पृश्य शेतकरी-कामकरी एक झाले तर श्रमजीवी वर्गाची एकमुखी संघटना होऊ शकेल आणि समाजसत्तावाद्यांना इच्छित क्रांती घडवून आणून राजसत्तेचे शस्त्र हस्तगत करता येईल. अस्पृश्यतेचे निर्मूलन झाल्यावाचून शेतकरी कामकरी वर्गाच्या आर्थिक लढ्याला संघटित तोंड लागणार नाही. हिंदी श्रमजीवी वर्गात धार्मिक, सामाजिक, आर्थिक वगैरे सर्व प्रकारच्या शृंखलांवाचून ज्यांच्याजवळ गमावण्यासारखे दुसरे काहीच नाही असा जर कोणता गट असेल तर तो अस्पृश्य समाजच होय. हिंदू धर्माने शूद्र गणलेल्या स्पृश्य शेतकरी कामकरी वर्गाला आपण धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या पांढरपेशा वर्गापेक्षा हीन असलो तरी अस्पृश्यांपेक्षा आपला दर्जा उच्च आहे या भ्रामक भावनेचे समाधान तरी लाभत असते. ह्या भावनेचा त्याग करण्याला स्पृश्य शेतकरी कामकरी नाखूष असतो. नव्हे त्या भावनेसाठी तो आर्थिकदृष्ट्या समान पातळीवर असलेल्या आपल्या अस्पृश्य शे. का. बांधवांचा वैरी बनतो."[१]

अस्पृश्यांनी स्पृश्य हिंदूंबरोबर चालविलेला समतेचा लढा बाह्यतः जरी जातीय स्वरूपाचा असला तरी त्याचे मूळ अस्पृश्यांच्या आर्थिक गुलामगिरीत आहे याची बाबासाहेबांना कल्पना होती. अस्पृश्यतेचे उच्चाटन होणे हे भांडवलशाहीच्या हिताचे आहे हे जसे त्यांना माहीत होते तसेच ती हिंदी श्रमजीविकांच्या लढ्याची पहिली पायरी आहे असाही त्यांना विश्वास वाटत होता. जवाहरलाल नेहरूंच्या लखनौ काँग्रेसमधील अध्यक्षीय भाषणावर टीका करताना जनताकर्त्यांनी अग्रलेखात समाजसत्तावाद्यांच्या भ्रमावर कोरडे ओढले आहेत. अस्पृश्यता निवारणाच्या आर्थिक परिणामाबद्दल जनताकर्त्यांनी मात्र कसलेही भ्रम बाळगलेले दिसत नाहीत. दुर्दैवाने जनताकर्त्यांच्या या अत्यंत महत्त्वाच्या अग्रलेखाकडे आजवर आंबेडकरांच्या चरित्रकारांनी तसेच आंबेडकरी चळवळीच्या देशी-विदेशी अभ्यासकांनी दुर्लक्ष केले असल्याने वृत्तपत्रांच्या रद्दीत पडलेल्या रत्नासारखी त्याची अवस्था झाली आहे. जनताकर्त्यांनी म्हटले आहे, " व्यक्तिस्वातंत्र्य हा भांडवलशाहीचा महामंत्र आहे.

भांडवलशाहीने प्रत्यक्ष स्वरूपात दिसणारी श्रमजीविकांची वैयक्तिक (देहाची) गुलामगिरी जगाच्या पाठीवरून नष्ट केली. अस्पृश्यतेच्या प्रच्छन्न रूपाने ही गुलामगिरी अजून ह्या देशात वावरत आहे. अस्पृश्यतेच्या रूढीमुळे भांडवलशाहीच्या उघड्या बाजारात त्यांना आपल्या श्रमशक्तीची विक्री करण्याला मज्जाव करण्यात येत आहे. कित्येक धनोत्पादक धंद्यांची दारे त्यांना बंद आहेत. अस्पृश्य शेतकरी कामकरी वर्गाला आपली श्रमशक्ती उघड्या बाजारात विकण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. अस्पृश्य मजुरांना आधुनिक भांडवलशाही उद्योगात प्रवेश करण्याला इतर स्पृश्य मजुरांच्या बरोबरीने समतेचा हक्क मिळवावयाचा आहे... शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाच्या तत्त्वांचे पूर्ण ज्ञान असल्याची शेखी मिरविणाऱ्या हिंदी समाजसत्तावाद्यांनी अस्पृश्यांच्या चळवळीला 'मध्यमवर्गाची जातीय चळवळ' असे नाव देऊन विरोध करावा याचे नवल वाटते. अस्पृश्यता विध्वंसनाला भांडवलशाहीचा विरोध नाही. अस्पृश्यता नष्ट होऊन अस्पृश्य मजुरांना स्पृश्य मजुरांबरोबर उघड्या बाजारात श्रमशक्ती विकता यावी अशीच भांडवलशाहीची इच्छा असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मजुरांच्या खड्या फौजेची संख्या वाढेल. स्पर्धा तीव्रतर होऊन मजुरीचे दर कमी होतील. भांडवलशाही शासनसंस्थेच्या साहाय्याने अस्पृश्यता घालविणे शक्य असल्यामुळे अस्पृश्य वर्गाने सनदशीर मार्गाने राजकीय सत्ता अंशतः तरी हस्तगत करून घेण्याचा प्रयत्न केल्यास कोणाही न्यायप्रिय व्यक्तीला त्यांच्याबद्दल हेवादावा वाटण्याचे कारण नाही. आज अस्पृश्य वर्गाला राजकीय क्रांतीचे ध्येय आपल्यापुढे ठेवता येणार नाही. नवीन राजकीय घटना फेटाळून लावण्याचा प्रश्न अस्पृश्यांच्या बाबतीत उद्‌भवूच शकत नाही. नव्या सुधारणा कायद्यान्वये हाती आलेल्या राजकीय हक्कांचा उपयोग करून घेऊन सनदशीर मार्गाने आपली सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नती होईल तितकी करून घेणे हेच त्यांचे कर्तव्य आहे."[१०] समाजसत्तावादाच्या तत्त्वांवर समाजाची पुनर्घटना झाल्यास ती अस्पृश्य वर्गाला इष्टच ठरेल याबद्दल त्यांना शंका नसली तरी भारतातील समाजसत्तावाद्यांनी त्यासाठी स्वीकारलेली रणनीती आणि वापरलेले डावपेच यांच्याशी बाबासाहेब सहमत नव्हते.

१९३५ च्या कायद्यामुळे पूर्ण जबाबदारीचे स्वराज्य मिळणार नाही याबाबत अन्य राजकीय पक्षांच्या नेत्यांप्रमाणेच त्यांचीही खात्री झाली होती. मात्र तरीही नवीन सुधारणा राबविण्याची त्यांची तयारी होती. १९३५ च्या कायद्याने प्रांताच्या गव्हर्नरला जे खास व अनियंत्रित अधिकार दिले होते त्यांचा उपयोग प्रत्यक्षतः त्याने करू नये यासाठी आपला पक्ष दक्ष राहील असे अभिवचन स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात देण्यात आले होते. "लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रसंगी देशातील उद्योगधंद्यांची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी" असे आपले मत असल्याचे पक्षाच्या जाहीरनाम्यात म्हटले होते.[११] सहकारी पतपेढ्या, खरेदी-विक्री करणाऱ्या मंडळ्या तसेच नवे उद्योगधंदे सुरू करणे, धंदेशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेणे, खोती

तालुकदारी पद्धत नष्ट करणे, कुळांना संरक्षण देणे, किमान वेतन ठरविणे, शेतकऱ्यांना सावकारी पाशातून सोडविणे, घरभाडे नियंत्रण, कामाचे तास, पेन्शन, बोनस वगैरेसंबंधी कायदे करणे अशा विविध बाबींचा आर्थिक कार्यक्रमात पक्षाने समावेश केला होता. याखेरीज जातिबहिष्कृत करण्याच्या प्रथेला मनाई करण्यासाठी तसेच धार्मिक द्रव्य-निधीचा दुरुपयोग टाळण्यासाठी कायदे करण्याबद्दलही जाहीरनाम्यात आश्वासन देण्यात आले होते. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे, प्रौढांना शिक्षण द्यावे, औद्योगिक शिक्षणावर भर द्यावा आणि मागास वर्गीयांना उच्चशिक्षण घेण्यासाठी सरकारी मदत मिळावी या दृष्टीने पक्ष प्रयत्न करील अशी हमी देण्यात आली होती.

पक्षाची उद्दिष्टे व कार्यक्रम मान्य असणाऱ्या व्यक्तीमधून निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारांची निवड करताना बाबासाहेब आंबेडकरांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. १३ ऑक्टोबर १९३५ रोजी येवल्यास भरलेल्या परिषदेत बाबासाहेब आंबेड-करांनी धर्मांतर करण्याबाबतचा ठराव मांडला आणि तो मंजूर झाला. ३१ मे १९३६ रोजी बाबासाहेबांनी मुंबइत भरलेल्या महार परिषदेत 'मुक्ति कोन पथे?' या मथळ्याचे ऐतिहासिक महत्त्वाचे भाषण केले. महार परिषदेने धर्मांतराच्या ठरावावर शिक्कामोर्तब केले तरी चांभार, मातंग, ढोर, भंगी वगैरे जातींतील बहुसंख्य लोकांचा धर्मांतराला विरोध होता. अस्पृश्यांसाठी राखीव असलेल्या पंधरा जागांसाठी उमेदवार निवडताना धर्मांतरास पाठिंबा देणाऱ्यांमधूनच निवड करणे भाग होते. चांभार जातीच्या एकाही उमेदवारास १९३७ च्या निवडणुकीत बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे तिकीट दिले नाही त्याचे कारण हेच होते. "पंधरा जागांपैकी काही जागा आपल्याला मिळाव्या यासाठी चांभार जातीच्या काही लोकांनी डॉ. आंबेडकरांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला; परंतु जोपर्यंत चांभार लोक अस्पृश्य वर्गाच्या धर्मांतराला जाहीरपणे पाठिंबा देत नाहीत तोपर्यंत अस्पृश्य वर्गाला मिळालेल्या राजकीय हक्कांचा अंशदेखील आपण त्यांच्या पदरात टाकण्याला तयार नाही असे सांगून डॉ. आंबेडकरांनी त्यांना स्पष्ट नकार दिला." असे जनताकर्त्यांनी ३ ऑक्टोबर १९३६ च्या अंकातील अग्रलेखात म्हटले आहे, हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. १९३६ च्या मे महिन्याच्या सुरुवातीस नायगावला धर्मांतरास पाठिंबा असणाऱ्या मातंगांची परिषद झाली. या परिषदेत बोलताना पंधरा राखीव जागांपैकी काही जागांसाठी आपण मातंग उमेदवार निवडू असे बाबासाहेबांनी जाहीर आश्वासन दिले. मातंग समाजापैकी इंग्रजी भाषा जाणणाऱ्या, पंचवीस वर्षे वयाच्या आणि कोणत्याही पक्षास संलग्न नसलेल्या कोणीही तिकिटासाठी अर्ज करावा असे जाहीर आवाहन करण्यात आले होते.[१२] ही पात्रता असलेल्या तसेच धर्मांतरास पाठिंबा असलेल्या कृष्णाजी महादेव काळोखे या मातंग उमेदवाराने बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षा-तर्फे मुंबई कायदेमंडळाची निवडणूकही लढवली होती. मात्र काळोख्यांना निवडणुकीत

पराभव पत्करावा लागला.

प्रांतिक विधानमंडळाचे कामकाज तसेच सर्व राज्यकारभार इंग्रजीतून चालत असल्याने शक्यतो इंग्रजी बोलू शकणाऱ्या व्यक्तीला तिकीट देणे जरूर होते. इंग्रजीत बोलण्याचा सराव किंवा आत्मविश्वास नसलेल्या व्यक्तीस कायदेमंडळांत मराठीत बोलण्याची मुभा देण्यात आली तरी अन्य वक्त्यांची भाषणे समजण्यासाठी इंग्रजीचे किमान ज्ञान आवश्यक होते. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचे पुढारी गेल्या शतकापासून जिल्हा लोकलबोर्ड आणि नगरपरिषदांमध्ये सरकारनियुक्त किंवा लोक-नियुक्त सभासद म्हणून काम करू लागले. त्यांच्यापैकी बहुतेकांना इंग्रजी येत नसे. काहीजण तर अशिक्षितच होते. लिहितावाचता येणाऱ्यांनाही थोडीफार भाषणे लिहून द्यावी लागत. अशा स्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांतील कामाचा अनेक वर्षे अनुभव असलेल्यांनाही इंग्रजी येत नसल्यास तिकीट नाकारणे बाबासाहेबांना भाग पडले. त्यामुळे महार समाजातील ठिकठिकाणच्या अनुभवी व वयस्क पुढाऱ्यांचा बाबा-साहेबांना रोष पत्करावा लागला. पक्षाचे तिकीट नाकारले गेल्याने नाराज झालेल्या काही सहकाऱ्यांनी बाबासाहेबांची संगत सोडली आणि ते सरळ काँग्रेसमध्ये दाखल झाले आणि ' राष्ट्रीय हरिजनांचे ' मेळावे भरवू लागले.

आपण केलेले तिकीटवाटप आपल्या काही सहकाऱ्यांना आवडलेले नाही, हे माहीत असल्यामुळे ७ सप्टेंबर १९३६ रोजी पुण्यात भाषण करताना बाबासाहेब म्हणाले, " मी ज्या माणसाची निवड केली त्यात कोणी माझे नातेवाईक, चुलते, मुलगे, जावई किंवा व्याही वगैरे कोणी नाहीत. तीन कसोट्या लावून निवड केली. ( १ ) इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान कारण तेथे सर्व कामकाज इंग्रजीतूनच चालणार. प्रश्न इंग्रजीतून विचारता आले पाहिजेत .( २ ) उमेदवार वयाने तरुण असला पाहिजे. म्हाताऱ्या मंडळींना काही तेथे पालखीतून बसवून न्यावयाचे नाही. ( ३ ) आपल्या पक्षाचा उमेदवार पक्षाच्या शिस्तीखाली राहिला पाहिजे. तो निःस्वार्थ बुद्धीने काम करणारा असावा. मला भाऊबंदकीकडे किंवा जिल्ह्याच्या दुरभिमानाकडे अथवा वतनदारीकडे लक्ष द्यावयाचे नाही. सध्या माझी प्रकृती पाहिजे तितकी ठीक नाही. ब्लडप्रेशर झाले असल्यामुळे थोडे अंतर देखील चालून जाता येत नाही. माझ्यापेक्षा सुभेदार घाटग्यांनी पन्नास वर्षे जास्त काम केले आहे. शिवराम जानबा कांबळ्यांनी साठ वर्षे जास्त काम केले आहे. प्रत्येकाला लायकी पाहिजे."[१३] बाबासाहेबांनी इंग्रजी जाणणाऱ्या तरुणांना तिकिटे दिल्यामुळे पक्षात ताज्या दमाच्या सळसळत्या रक्ताच्या कार्यकर्त्यांची भरती झाली. मात्र त्याबरोबरच काही जुने सहकारी दुरावले.

पूर्व खानदेशातून दौलतराव गुलाजी जाधव या पदवीधरास तिकीट मिळाल्याने मेढे आणि बिऱ्हाडे हे जुने कार्यकर्ते नाराज झाले. दोघांनीही जाधवांविरुद्ध निवडणूक लढवली. दौलतराव जाधवांना मते द्या असे सांगण्यासाठी जळगावला झालेल्या सभेत

बाबासाहेबांनी भेडे आणि विन्हाडे या दोघा बंडखोर उमेदवारांवर कडक टीका केली आणि म्हटले, " मेढे, बिन्हाडे हे जाधवांविरुद्धचे उमेदवार म्युनिसिपालिटी, लोकलबोर्ड स्कूल बोर्ड यांच्या कामालाच योग्य आहेत. उमेदवाराला उत्तम इंग्रजीचे ज्ञान हवे. जाधव बी. ए. झाला आहे."[१४] सोलापूरला जिवाप्पा सुभान ऐदाळयांना बाबासाहेबांनी तिकीट दिल्याने उद्धव शिवशरण मास्तर हे जुने कार्यकर्ते रागावले. त्यांनी ऐदाळयां-विरुद्ध स्वतः जरी निवडणूक लढविली नाही तरी जी. पी. मागाडे यांना उमेदवारीचा अर्ज भरावयास फूस दिली. ऐदाळयांच्या वतीने प्रचार करताना सोलापूरच्या जाहीर सभेत बाबासाहेबांनी उद्धव शिवशरण मास्तरांच्या कारवायांवर प्रकाश टाकला. " इंग्रजी न जाणणाऱ्या शिवशरण मास्तरने आपली निवड करावी म्हणून मला पत्र लिहिले. मी मुग्ध राहिलो. तब्बल दोन महिने विचार केला. नंतर जिवाप्पा ऐदाळेंचे नाव जाहीर केले. इतके होईपर्यंत मागाडे यांचे नाव मला कळविले नाही. मागाहून कळविले. याच्या बुडाशी काँग्रेसचा हात आहे."[१५] मागाड्यांचा पराभव करून ऐदाळयांनी निवडणूक जिंकली.

एका मतदारसंघात बाबासाहेबांनी निवडलेल्या उमेदवारापेक्षा अस्पृश्य जातींतील प्रतिस्पर्धी उमेदवार अधिक शिकलेला होता. अहमदनगर जिल्ह्याच्या दक्षिण भागातील मतदारसंघात प्रभाकर रोहम स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणूक लढवीत होते. ते फक्त मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले होते तर त्यांचे प्रतिस्पर्धी डी. एस. सोनवणे हे बी. ए. एल.एल. बी. होते, पण सोनावण्यांचा धर्मांतराला विरोध असल्याने बाबासाहेबांनी सोनवण्यांहून कमी शिकलेल्या रोहमना तिकीट दिले होते. पुणे जिल्ह्यातील मतदार-संघातून राजाभाऊ भोळयांना स्वतंत्र मजूर पक्षाचे तिकीट मिळाले होते. दलित मुक्ती आंदोलनातील वयोवृद्ध नेते शिवराम जानबा कांबळे यांचे चिरंजीव अंबाजीराव हे वडलांच्या आग्रहामुळे निवडणूक लढवण्यास उद्युक्त झाले होते. अंबाजीराव तरुण होते तसेच ते शिकलेले होते. तेव्हा ते पदवीपरीक्षेचा अभ्यास करीत होते. त्यांना नकार देण्याची नाजुक कामगिरी बाबासाहेबांनी मोठ्या कौशल्याने पार पाडली. अंबाजीराव बी. ए.च्या वर्गात असल्यामुळे त्यांनी निवडणुकीच्या भानगडीत न पडता अगदी अखेरीस आलेला आपला अभ्यासक्रम पूर्ण करावा असा बाबासाहेबांनी त्यांना सल्ला दिला. " मी पुणे जिल्ह्यात अगर कोणत्याही जिल्ह्यात उभा राहात नाही असे अंबाजीरावांनी बाबासाहेबांना सांगितले आणि राजाराम भोळे यांच्या प्रचाराचे काम केले."[१६] अंबाजीरावांचे मन वळविण्यात बाबासाहेबांना यश आल्यामुळे राजाभाऊ भोळयांना निवडणूक जिंकणे सोपे झाले.

१९३७च्या निवडणुकीतील तिकीट-वाटपावरून झालेल्या वादामुळे नाशिक जिल्ह्यातील अमृतराव धोंडीबा रणखांबे आणि भाऊराव कृ. गायकवाड यांच्यामध्ये वितुष्ट निर्माण झाले आणि काळाराम मंदिर सत्याग्रहात बाबासाहेबांना निष्ठापूर्वक साथ

देणारे आणि त्यासाठी गायकवाडांच्या बरोबरीने तुरुंगवास भोगलेले रणखांबे १९३८च्या एप्रिलनंतर आंबेडकरी चळवळीतून कायमचे बाहेर पडले. संतापलेल्या रणखांब्यांनी आणि त्यांच्या गटातील अन्य असंतुष्टांनी बाबासाहेबांविरुद्ध भलभलते आरोप करणारी पत्रके काढली, पुस्तिका प्रकाशित केल्या आणि चिखलफेक करणारा प्रचार केला. रणखांब्यांच्या गटाने कॉंग्रेसचा आश्रय घेतला आणि नाशिक जिल्ह्यातील सामर्थ्यशाली चळवळ अंतर्गत यादवीमुळे दुभंगली.

१५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची उद्दिष्टे व कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वी जवळजवळ दोन महिने आधी नाशिक जिल्ह्यात भाऊराव गायकवाड आणि अमृतराव रणखांबे या दोघा मित्रांपैकी कोणी राखीव जागा लढवावी व कोणी जनरल किंवा सर्वसाधारण जागा लढवावी याबद्दलची पत्रापत्री सुरू झाली होती.[१८] रणखांबे श्रीमंत असल्याने त्यांनी सर्वसाधारण जागा लढवल्यास त्यासाठी आवश्यक तो खर्च ते सहज करू शकतील असे बाबासाहेबांना वाटत होते. याउलट आर्थिक दृष्ट्या गरीब भाऊरावांना राखीव जागेवर निवडणूक लढविणे खर्चाच्या दृष्टीने सोयीचे होते. नाशिक जिल्ह्यातील पश्चिम भागात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मतदारांची संख्या मोठी असल्याने आणि त्यांच्यामध्ये काळाराम मंदिर सत्याग्रहामुळे चांगली जागृती झाली असल्याने राखीव जागा जिंकणे सोपे होते. याउलट सर्वसाधारण जागा जिंकण्यासाठी आवश्यक इतका सवर्ण मतदारांचा पाठिंबा अस्पृश्य उमेदवारास मिळेलच अशी शाश्वती नव्हती. त्यामुळे सर्वसाधारण जागा लढविण्यास रणखांबे राजी नव्हते. गायकवाड व रणखांबे या दोघा मित्रांनी आपसांत तडजोड करून याबाबत निर्णय घ्यावा असे बाबासाहेबांना वाटत होते.

२६ ऑगस्ट १९३६ पर्यंत रणखांब्यांचा निर्णय न कळल्याने बाबासाहेबांनी कोणत्या जिल्ह्यातून कोणी उभे राहावयाचे याबद्दलचा निर्णय घेतला आणि त्यांच्या सहीने स्वतंत्र पक्षातर्फे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी २९ ऑगस्ट १९३६ च्या 'जनता' पत्राच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली. त्या आधी २८ ऑगस्ट १९३६ रोजी रणखांब्यांचे पत्र भाऊराव गायकवाडांनी बाबासाहेबांना मुंबईत भेटून त्यांच्या हवाली केले. त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण बाबासाहेबांच्या सहीनिशी उमेदवारांची यादी 'जनता' पत्राने तोपर्यंत छापून टाकली होती. या यादीनुसार नाशिक जिल्ह्याच्या पश्चिम भागातून राखीव जागेसाठी भाऊराव गायकवाडांना तिकीट दिले असल्याचे जाहीर करण्यात आले होते. २९ ऑगस्ट १९३६ रोजी नाशिकला परतल्यावर गायकवाडांनी रणखांब्यांना लिहिले, "आपले ठरल्याप्रमाणे मी ता. २८ ऑगस्ट १९३६ रोजी सकाळी ८ वाजता डॉ. बाबासाहेबांना जाऊन भेटलो व आपले पत्र दिले व आपल्याविषयी सांगू लागलो तो त्यानी सांगितले की 'याबाबत मी सर्व काही जाहीर केले असल्याने आता त्यात फरक करता येणार नाही'... आपल्या

जातीच्या इसमांना जनरल इलेक्शनमध्ये उभे राहता येत असल्याने आपण जनरल सीटसाठीच उभे राहावे अशी त्यांनी इच्छा प्रदर्शित केली असून त्याप्रमाणे ते आपणास लिहिणारही आहेत. आपण उदार अंतःकरणाने दिलेल्या पत्राचा काही उपयोग होऊ शकला नाही. कारण सर्वकाही त्याअगोदरच शिजून प्रसिद्धही झाले होते."[१८] गायकवाडांमार्फत बाबासाहेबांना पाठवलेल्या पत्रात रणखांब्यांनी राखीव जागेसाठी भाऊरावांना उभे करण्यास आपली हरकत नसल्याचे कळवले असले तरी आपण सर्वसाधारण जागा लढवू की नाही याबद्दल काहीच लिहिले नव्हते. रणखांब्यांनी सर्वसाधारण जागा लढवावी असा बाबासाहेबांचा आग्रह होता.

डॉ. सोळंकी यांना मुंबई शहरासाठी असलेल्या दोन राखीव जागांपैकी एका जागेसाठी निवडणूक लढवावयाची होती, पण बाबासाहेबांना सोळंकींचा हा बेत पसंत पडला नाही; कारण दोन राखीव जागांपैकी एक जागा आपण लढवावयाची आणि दुसऱ्या जागेसाठी मातंग उमेदवार उभा करावयाचा असे बाबासाहेबांनी ठरविले होते. मुंबईत तिकीट मिळाले नाही म्हणून नाराज झालेल्या सोळंकींनी सुरत जिल्ह्यातून निवडणूक लढवली. १९३९ च्या फेब्रुवारीत मुंबई महापालिकेची निवडणुक लढवताना सोळंकींनी मतदारांना उद्देशून काढलेल्या पत्रकात म्हटले होते, "असेंब्ली इलेक्शनच्या वेळी मुंबईत दोन जागा असताना मला मुंबईत डॉ. आंबेडकरांनी मुद्दाम उभे राहू दिले नाही; म्हणून मला नाइलाजास्तव स्वतंत्रपणे सुरतेला उभे राहावे लागले. डॉ. आंबेडकरांनी जनता पत्रात खोटेच छापले होते की मी स्वतंत्र मजूर पक्षाच्या तिकिटावर उभा आहे."[१९] २८ नोव्हेंबर १९३६ च्या जनतेच्या अंकात राखीव जागेकरता स्वतंत्र मजूर पक्षातर्फे उभ्या राहिलेल्या तेरा उमेदवारांच्या यादीत डॉ. सोळंकी यांचे नाव आढळते खरे. मुंबईत तिकीट न दिले गेल्याने चिडलेले सोळंकी स्वतंत्र मजूर पक्षाबरोबरचे आपले संबंध तोडतील असे बाबासाहेबांना वाटले नसावे.

सोळंकी सुरतेत उभे राहणार हे कळताच अमृतराव रणखांबे मुंबईतील दुसऱ्या राखीव जागेसाठी आपल्याला तिकीट मिळावे या दृष्टीने प्रयत्न करू लागले. त्यांच्यावतीने भाऊराव गायकवाडांनी तसेच नाशिक जिल्ह्यातील प्रमुख मंडळींच्या एका शिष्टमंडळाने रणखांब्यांना मुंबईत किंवा अन्यत्र राखीव जागेसाठी उमेदवारी द्यावी अशी बाबासाहेबांची विनवणी केली; पण ती निष्फळ ठरली. खुद्द रणखांब्यांनीही तशा आशयाचे पत्र व तार पाठवली. उत्तरादाखल बाबासाहेबांनी लिहिले, "मुंबईची जागा रिकामी होईलच असे खात्रीने सांगता येत नाही; कारण डॉ. सोळंकींचे मत अजून डळमळीत आहे. शिवाय जर ती जागा रिकामी झालीच तर ती मांगाला देणे आवश्यक आहे. मांगही महाराच्या विरुद्ध झाले तर महारांना फारच जड जाणार आहे. हे होणे व होऊ देणे अत्यंत अनुचित आहे. अशा अडचणीतून जनरल सीटला उभे राहण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. तरी तसे करण्यास अनमान करू नये. मला

त्यात काही अडचण वाटत नाही."[20] बाबासाहेबांसकट अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचे सर्व उमेदवार स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने राखीव जागेसाठी निवडणूक लढवीत असताना एकट्या अमृतराव रणखांब्यांनीच सर्वसाधारण जागेसाठी लढावे असा बाबासाहेब का आग्रह धरीत होते हे सांगणे कठीण आहे. मात्र बाबासाहेबांनी असा आग्रह धरल्याने आपल्यावर अन्याय केला जात आहे अशी रणखांब्यांची भावना होणे साहजिक होते. पुढे रणखांब्यांनी स्वतः सर्वसाधारण किंवा राखीव कोणत्याच जागेसाठी निवडणूक न लढवता भाऊराव गायकवाडांविरुद्ध उभ्या असलेल्या रामचंद्र संभाजी रोकड्यांना पाठिंबा देऊन बंडखोरी केली तेव्हा गायकवाडांच्या वतीने प्रचार करताना अमृतराव रणखांबे अशिक्षित असल्याचा खूप प्रचार केला गेला. खुद्द बाबासाहेबांनीही प्रचारसभेत गौप्यस्फोट केला. "आतापर्यंत अमृतराव रणखांबे यांनी अध्यक्ष व स्वागताध्यक्ष म्हणून अनेक सभांत जी भाषणे केली ती अमृतरावांची नसून भाऊराव गायकवाडांनी लिहून दिली आहेत हे मी जाणतो."[21] मात्र रणखांब्यांना तिकीट न देण्याचे कारण ते अशिक्षित होते हे निश्चितच नव्हते. तसे असते तर त्यांच्यासारख्या अशिक्षित उमेदवाराने सर्वसाधारण जागा लढवावी असा बाबासाहेबांनी आग्रह धरला नसता. रणखांबे तरुण नव्हते. त्यांना इंग्रजी येत नसे तरीही अन्य उमेदवारांच्या निवडीबाबत लावलेल्या कसोट्या त्यांच्या बाबतीत न लावता त्यांना सर्वसाधारण जागा लढवण्यास सांगण्याने रणखांबे दुखावले गेले ते कायमचे.

संयुक्त मतदारसंघातील राखीव जागेसाठी निवडणूक घेण्याची एक खास पद्धत १९३५ च्या कायद्यानुसार अंमलात आली होती. बंगाल प्रांत वगळता अन्य प्रांतांतील प्रत्येक संयुक्त मतदारसंघात जेथे अस्पृश्यांसाठी जागा राखीव असे तेथे फक्त एकच जागा राखीव असे. मुंबई प्रांतातील एकूण पंधरा राखीव जागांपैकी मुंबई शहरातील भायखळा-परळ मतदारसंघात एक आणि उपनगरात एक अशा दोन जागा राखीव होत्या. उरलेल्या तेरा जागा खेडा, सुरत, ठाणे, अहमदनगर, पूर्व खानदेश, नाशिक, कुलाबा, रत्नागिरी, पुणे, सातारा, सोलापूर, विजापूर आणि बेळगाव या जिल्ह्यांच्या ग्रामीण भागातील सर्वसाधारण संयुक्त मतदारसंघात होत्या. राखीव जागेसाठी फक्त एकच अस्पृश्य उमेदवार उभा राहिला तर तो बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर केले जात असे. एका राखीव जागेसाठी चाराहून अधिक अस्पृश्य उमेदवारांनी नामांकनपत्रे दाखल केल्यास आणि ती वैध ठरल्यास प्राथमिक निवडणूक घेण्यात येत असे. या प्राथमिक निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार फक्त अस्पृश्य मतदारांनाच असे. जेथे प्राथमिक निवडणूक घ्यावी लागत असे तेथे अस्पृश्य मतदारांना जास्तीत जास्त चार उमेदवार निवडता येत असत. मग या चार उमेदवारांमधून एकाची निवड करण्यासाठी जी निवडणूक घ्यावी लागत असे तीत मत देण्याचा हक्क अस्पृश्य मतदाराबरोबर सवर्ण हिंदू, पार्शी व ज्यू मतदारांनाही होता. मुसलमान, युरोपियन, अँग्लो-

इंडियन्स आणि भारतीय ख्रिश्चन यांना स्वतंत्र मतदारसंघ दिलेले असल्याने आणि पार्शी व ज्यू मतदारांची संख्या मुंबई शहराचा अपवाद वगळता अन्यत्र नगण्य असल्याने प्रत्यक्षतः निवडणुकीच्या या दुसऱ्या फेरीत बहुसंख्य सवर्ण हिंदू मतदारांचा पाठिंबा ज्या अस्पृश्य उमेदवाराला मिळत असे त्याचे पारडे जड होण्याची शक्यता जास्त असे. अशा स्थितीत एखाद्या बहुसदस्य मतदारसंघात समजा, चार जागा असल्या तर अस्पृश्य मतदारांनी आपली सर्व म्हणजे चारीच्या चारी मते अस्पृश्य उमेदवाराला दिली तरच तो निवडून येण्याची शक्यता जास्त असे.

राखीव जागांकरता घ्यावयाच्या निवडणुकीचा कार्यक्रम सरकारने जाहीर केला होता. त्यानुसार ५ ऑक्टोबर १९३६ रोजी मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या. नामांकन-पत्रांची तपासणी १९ ऑक्टोबरला होऊन जेथे चारापेक्षा अधिक अस्पृश्य उमेदवारांची नामांकनपत्रे वैध ठरली तेथे १० नोव्हेंबर १९३६ रोजी प्राथमिक निवडणूक घेण्यात येऊन १६ नोव्हेंबरला मते मोजण्यात आली. मुंबई इलाख्यातील पंधरा राखीव जागां-पैकी फक्त सातारा आणि विजापूर या दोन जिल्ह्यांत चारापेक्षा अधिक अस्पृश्य उमेदवारांची नामांकनपत्रे वैध ठरल्याने तेथे प्राथमिक निवडणूक घ्यावी लागली. ठाणे जिल्ह्यात स्वतंत्र मजूर पक्षाने रामकृष्ण ऊर्फ बाबूराव गंगाराम भातनकर यांना तिकीट दिले असताना त्यांचे प्रतिस्पर्धी शिवराम गोपाळ जाधव हे काही दिवस आपणही डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार उभे आहोत असे सांगून मतदारांची दिशाभूल करीत होते, पण त्यांनी प्राथमिक निवडणुकीला उभे राहण्याचा बेत रद्द केल्याने ठाणे जिल्ह्यात प्राथमिक निवडणूक घ्यावी लागली नाही.

अमृतराव रणखांब्यांनी राखीव जागेसाठी होणाऱ्या प्राथमिक निवडणुकीसाठी अर्ज भरला नाही तरी त्यांनी व त्यांच्या पाठीराख्यांनी, बाबासाहेबांनी जिल्हानिहाय समित्या व मध्यवर्ती निवडणूक समिती स्थापन करण्यापूर्वीच उमेदवारांची यादी निश्चित केली आणि ३० मे १९३६ रोजी मुंबईतील राजकीय परिषदेत जाहीररीत्या दिलेले वचन पाळले नाही असा आरोप करण्यास सुरुवात केली. जिल्हानिहाय समितीची संमती न घेता बाबासाहेबांनी उमेदवारांची यादी जाहीर केल्याबद्दलचा असंतोष व्यक्त करण्या-साठी २४ सप्टेंबर १९३६ रोजी इगतपुरीस तुळशीराम संभाजी काळ्यांच्या अध्यक्षते-खाली जाहीर सभा घेण्यात आली. या सभेच्या हस्तपत्रिकेवर ज्यांच्या सह्या होत्या त्यांच्यामध्ये सावळेराम बापूजी दाणी यांची सही पाहून बाबासाहेबांना नवल वाटले. बाबासाहेबांनी अमृतराव रणखांब्यांना पत्र लिहून विचारले, "इतर सही करणारे तुमचे वा भाऊरावाचे पक्के विरोधी! नव्हे शत्रू! यांचे व दाणी यांचे सख्य हा काय प्रकार आहे समजत नाही. हे कोणाकरिता प्रयत्न करीत आहेत? तुमच्याकरिता प्रयत्न करीत आहेत असे म्हणावे तर तेही शक्य नाही! कारण तुम्ही होऊनच गायकवाड यांनी उभे राहावे अशी कबुली दिली आहे. हे काय गौडबंगाल आहे मला काही

समजत नाही."[२२] प्रथमदर्शनी बाबासाहेबांनी बुचकळ्यात पडावे असाच हा प्रकार होता. सावळेराम बापूजी दाणींची पत्नी ही अमृतराव रणखांब्यांची बहीण होती तसेच दाणी हे रणखांब्यांचे व्याहीही होते. दाणी हे भाऊराव गायकवाडांचे चुलत सासरे होते. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील आपल्या विरोधकांना सावळेराम दाणी सामील झालेले पाहून बाबासाहेबांना आश्चर्य वाटणे साहजिक होते.

यामागे रणखांबे आहेत असे लवकरच उघडकीला आले. त्यांच्या गटाने निफाडला सभा घेऊन रणखांब्यांना पाठिंबा देणारा ठराव केला. एवढेच नव्हे तर त्यांनी धर्मांतराचा निषेध करणारा ठरावही मंजूर केल्याचे प्रभाकर रोहमनी बाबासाहेबांच्या कानावर घातले.[२३] रणखांबे आपल्याला विरोध करणाऱ्यांचा गट संघटित करीत आहेत असेही बाबासाहेबांच्या कानावर येऊ लागले. तरीही रणखांब्यांनी सर्वसाधारण जागा लढवावी असे त्यांना वाटत असल्याने राखीव जागेसाठी रणखांब्यांनी १९ ऑक्टोबरला अर्ज दाखल केल्यास त्यांना सर्वसाधारण जागेसाठी उभे राहता येणार नाही हे त्यांना भाऊराव गायकवाडांमार्फत कळविण्याची बाबासाहेबांनी व्यवस्था केली. भाऊराव गायकवाडांनीही रणखांब्यांना ते सर्वसाधारण जागेसाठी उभे राहिल्यास मदत करण्याचे लेखी आश्वासन दिले आणि म्हटले, "आपल्या पुष्कळ ठिकाणच्या सहवासात जी उदारता मला दाखवून मला पुढे पुढे केले आहे व मला पुढे आणण्यात ज्याप्रमाणे अनेकदा मदत केली आहे त्याचप्रमाणे याही वेळेस उदारता दाखवून मला राखीव जागेसाटीच उभे राहण्याची संधी कृपेने देऊन जनरल सीटसाठी आपण उभे राहण्याची कृपा कराल अशी सविनय प्रार्थना आहे."[२४] गायकवाडांच्या विनंतीला मान देऊन रणखांब्यांनी आपण प्राथमिक निवडणुकीला उभे राहणार नसल्याचे जाहीर केले तेव्हा 'श्रीमंत अमृतराव रणखांबे' या मथळ्यानिशी रणखांब्यांचे छायाचित्र छापून जनताकर्त्यांनी २४ ऑक्टोबर १९३६ च्या अंकात त्यांना धन्यवाद दिले होते.

मात्र यामुळे रणखांबे प्रकरण मिटले नाही. उलट त्यानंतर ते जास्तच चिघळले. भाऊराव गायकवाडांविरुद्ध रामचंद्र संभाजी रोकडे हे निवडणूक लढवीत होते. रोकडेही श्रीमंत होते. त्यांचे वडील संभाजी येसूजी रोकडे यांनी शाहू छत्रपती बोर्डिंग स्थापन केले होते. काळाराम मंदिर सत्याग्रहात त्यांनीही सढळ हाताने गुप्तदान केले होते. मात्र रणखांबे व रोकडे या दोन सधन कुटुंबांत बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे "सलोखा अगर प्रेमभाव मुळीच नव्हता." असे असताना रणखांबे रोकड्यांशी असलेले वैमनस्य विसरून त्यांना गायकवाडांविरुद्ध पाठिंबा देऊ लागलेले पाहून रणखांब्यांचे "हे करणे न्यायाचे नाही, अयोग्य आहे." असे बाबासाहेबांना वाटू लागले.[२५] मुंबईतील वडाळ्याच्या अँटॉप हिल भागातील बी. पी. टी. ट्रॅफिक सोमवंशीय सेवासंघाने नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्य मतदारांनी भाऊराव गायकवाडांना मते देण्याबद्दल आवाहन केले. या हस्तपत्रिकेत रणखांब्यांच्या कारवायांबद्दल टीका

करण्यात आली होती.

या टीकेला उत्तर देताना रणखांब्यांनी आपल्या भूमिकेबाबत जाहीर खुलासा केला. "रा. रोकडे हे जातिवंत महार आहेत व महारालाच मी मदत करीत आहे. रोकड्यांच्यासारख्या सद्गृहस्थाला मदत करणे म्हणजे डॉक्टरांविरुद्ध वागणे कसे होऊ शकते? रोकडे व आंबेडकर यांचा काही कधी वैर झालेला नाही. कायस्थ, ब्राह्मणास मदत करीत नाही. अस्पृश्य तितुका मेळवावा हे माझे ध्येय आहे. समाजात दुहीचे कार्य जर कोणी करीत असेल तर ते कायस्थ ब्राह्मणी बोर्डाचे नावाने उभे राहिलेले उमेदवारच होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मते मिळवून देण्यासाठी तुम्ही सर्वांनी तनमनधने करून झटावे अशी माझी सर्वांना प्रेमाची विनंती आहे. रा. भाऊराव गायकवाड यांनी मला विनंती केली की नॉमिनेशन अर्ज भरू नका व मला उभे राहण्याची परवानगी व संधी द्या. त्यांच्या विनंतीस मान देऊन मी नॉमिनेशन अर्ज भरण्याचे टाळले. मी नाशिक जिल्ह्याचे पूर्व भागाला उभा राहणार म्हणून माझे विरुद्ध रा. गायकवाड यांनी रा. बापूजी रावजी भालेराव यांना सजवून आणवून अर्ज देवविला व मी अर्ज दिला नाही म्हणून त्यांचा अर्ज दुसरे दिवशी काढून घेतला. परंतु ता. २–१–३७ चे जनतेत भालेराव पूर्व भागात उभे आहेत हे प्रसिद्ध होत आहे."[२६] रणखांब्यांनी केलेल्या या खुलाशावरून नाशिक जिल्ह्यातील पूर्व भागातून सर्वसाधारण जागा लढवण्याचा त्यांचा विचार होता; पण तेथेही भाऊराव गायकवाडांनी त्यांच्याविरुद्ध बापूजी रावजी भालेराव यांना अर्ज भरण्यास उद्युक्त केले होते असे दिसते. रणखांब्यांनी सर्वसाधारण जागा लढवावी अशी बाबासाहेबांनी सूचना केल्याने आणि ती रणखांब्यांनी प्रथम अमान्य केल्याने रणखांबे-गायकवाड या दोघांची जोडी फुटली. रणखांब्यांनी सर्वसाधारण जागा लढवावयाचे ठरवल्यास त्यांना मदत करण्याचे बाबासाहेबांनी तसेच गायकवाडांनी त्यांना लेखी आश्वासन दिले होते. असे असताना नाशिक जिल्ह्याच्या पूर्व भागातून रणखांबे सर्वसारण जागा लढवणार असा रंग दिसू लागताच त्यांच्याविरुद्ध बापूजी भालेरावांना अर्ज भरण्यास प्रवृत्त करण्याच्या डावपेचाने काय साधले कोण जाणे! रणखांब्यांनी प्रत्यक्षतः सर्वसाधारण जागेसाठीही उमेदवारी अर्ज भरला नाही. त्यामुळे आपसांतील यादवीत रणखांब्यांवर मात केल्याचा आनंद गायकवाडांनी काही काळ अनुभवला तरी रणखांब्यांसारखा मोहरा दलित मुक्ती आंदोलनाने कायमचा गमावला. १९३८ पासून रणखांब्यांनी बाबासाहेबांविरुद्धच्या कडवट आणि भडक प्रचार मोहिमेसाठी पैसा पुरवला. 'अस्पृश्यांची दिशाभूल', 'महार व चांभार' 'अस्पृश्यांचे धर्मांतर', 'स्वतंत्र मजूर पक्षांची गुंडगिरी' आणि 'घणाचे घाव' या पाच पुस्तकांच्या दलित लेखकांनी बाबासाहेबांविरुद्ध त्यांच्या सवर्ण हिंदू टीकाकारांनी जेवढे चारित्र्यहनन करणारे लेखन केले नव्हते तेवढे केले.

रणखांब्यांनी केलेल्या जाहीर खुलाशात त्यांनी 'अस्पृश्य तितुका मेळवावा' हे

आपले ध्येय असल्याचे म्हटले आहे. याउलट स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करून अस्पृश्यांसकट सर्वच कष्टकरी लोकांचे प्रश्न धसाला लावण्यास बाबासाहेब सिद्ध झाले होते. बाबासाहेब आर्थिक प्रश्नांवर लढा करण्याची भाषा बोलू लागताच रणखांबे, रोकडे यांच्यासारखे महार जातीतील मूठभर धनिक अस्वस्थ होणे अटळ होते. आपल्या खुलाशात रणखांब्यांनी 'कायस्थ ब्राह्मणी बोर्डाचे उमेदवार' म्हणून गायकवाडांची संभावना केली आहे. याच 'कायस्थ ब्राह्मणी बोर्डाने' आपल्याला तिकीट द्यावे म्हणून रणखांबे प्रयत्न करीत होते आणि ते प्रयत्न विफल झाल्यावर त्यांनी कायस्थ ब्राह्मणी बोर्डाविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला होता. तेरा राखीव जागांखेरीज स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने पाच सर्वसाधारण जागा लढवण्यात येणार होत्या. त्यासाठी निवडलेले अनंतराव चित्रे, विनायकराव गडकरी, सुरेंद्रनाथ गोविंद टिपणीस, भालचंद्र विठ्ठल प्रधान, आणि चिंतामण त्रिंबक रणदिवे हे पाचही उमेदवार कायस्थ होते. त्यांच्याखेरीज रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागातून निवडणूक लढवणारे शामराव परुळेकर आणि सोलापूर शहरातील मजूर मतदारसंघातून निवडणूक लढवणारे रघुनाथराव बखले हे दोन ब्राह्मण कामगार नेते स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असले तरी त्यांनी स्वतंत्र पक्षाचा कार्यक्रम सर्वतोपरी मान्य केला होता.[२७] त्यामुळे ते पक्षाचे सभासद झालेले नसले तरी पक्षातर्फे निवडणुकीत त्यांनाच साहाय्य केले जात होते. या सर्वांची रणखांबे 'कायस्थ ब्राह्मणी बोर्डाच्या' उमेदवारांत गणना करीत होते.

स्वतंत्र मजूर पक्षाचे सदस्य असलेल्या किंवा त्यांचा कार्यक्रम मान्य केलेल्या अशा या वीस उमेदवारांखेरीज पक्षाने ठिकठिकाणच्या मतदारसंघांतील ब्राह्मणांसकट विविध जातींच्या उमेदवारांना आपला पाठिंबा जाहीर केला होता. पुणे शहरातील स्त्रियांसाठी असलेल्या मतदारसंघातून निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या डॉ. कुमारी मधुमालती गुणे या ब्राह्मण बाई स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणूक लढवणार असल्याचे 'जनता' पत्राने १२ डिसेंबर १९३६ च्या अंकात वृत्त प्रसिद्ध केले होते. पुणे शहरातून काँग्रेसतर्फे बापूसाहेब गुप्ते, लोकशाही स्वराज्य पक्षातर्फे लक्ष्मण बळवंत ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर आणि त्यांच्याविरुद्ध त्यांचे बंधू भास्कर बळवंत भोपटकर हे निवडणूक लढवीत होते. भोपटकर बंधूंपैकी भालाकार हे वर्णाश्रमधर्माचे कडवे पुरस्कर्ते होते तर अण्णासाहेबांना हिंदू समाज एकसंध व बलशाली होण्यासाठी अस्पृश्यतेचे उच्चाटन व्हावे असे वाटत असे. तिसरे उमेदवार बापूसाहेब गुप्ते हे कायस्थ असले तरी ते काँग्रेस पक्षाचे उमेदवार असल्याने त्यांना बाबासाहेब पाठिंबा देणे शक्यच नव्हते. भालाकारांना पाठिंबा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. मात्र अण्णासाहेब भोपटकरांनी ४ फेब्रुवारी १९३७ रोजी बाबासाहेबांना पत्र लिहून त्यांचा पाठिंबा मागितला तेव्हा उत्तरादाखल बाबासाहेबांनी लिहिले, "पुण्यातील माझ्या अनुयायांना आपल्या

निवडणुकीत आपल्याला पाठिंबा देण्याचा सल्ला देणे अहितकारक नाही असेच मला आढळून आले आहे."[२८] अण्णासाहेब भोपटकरांना पाठिंबा देण्याची दोन कारणे होती. एकतर अस्पृश्यतानिवारणासाठी आपण सतत झटू असे लेखी आश्वासन अण्णासाहेबांनी बाबासाहेबांना दिले होते. शिवाय १९३५ च्या कायद्यानुसार अमलात येणाऱ्या नव्या घटनेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याच्या बाबतीत लोकशाही स्वराज्य पक्ष आणि स्वतंत्र मजूर पक्ष यांचे एकमत होते. सोलापूर जिल्ह्याच्या नैर्ऋत्य भागातील मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या रावबहादूर जी. बी. परिचारक या ब्राह्मण उमेदवारासही स्वतंत्र मजूर पक्षाने पाठिंबा दिला होता.

ज्या मतदारसंघात आपला उमेदवार नसेल तेथे काँग्रेसला विरोध करणाऱ्या उमेदवारास पाठिंबा देणे ही स्वतंत्र मजूर पक्षाची रणनीती होती. म्हणूनच मवाळ किंवा नेमस्त विचारसरणीच्या ब्राह्मण उमेदवारांप्रमाणेच ठिकठिकाणच्या ब्राह्मणेतर उमेदवारांनाही स्वतंत्र मजूर पक्षाने आपला पाठिंबा जाहीर केला होता. अशा 'पुरस्कृत' उमेदवारांत खालील उमेदवारांचा समावेश होता. (१) मुंबई शहर— फोर्ट—मांडवी—भुलेश्वर. गिरगाव विभाग— सर जहांगीर बोमन बेहराम (२) सातारा पश्चिम— ज्ञानदेव सुभाना पवार (३) नाशिक (पूर्व)— रावसाहेब भाऊसाहेब थोरात (४) बेळगाव (दक्षिण)— मार्तंड मल्हार लाड (५) पश्चिम खानदेश (पूर्व विभाग) नामदेव बुधाजी मराठे (६) पूर्व खानदेश (पश्चिम भाग) केशव तुळशीराम पाटील (७) प. खानदेश (पश्चिम विभाग)— शंकरराव विंधूजी बेडसे (८) ठाणे (उत्तर विभाग)— दत्तात्रय वामन राऊत[२९] या पुरस्कृत उमेदवारांपैकी फक्त रावसाहेब भाऊसाहेब थोरात, नामदेव बुधाजी मराठे, दत्तात्रय वामन राऊत हे तिघे निवडणुकीत विजयी झाले.

१९३६ च्या सप्टेंबरमध्ये मध्यप्रांत-वऱ्हाडातही डॉ. आंबेडकरांच्या अनुमतीने स्वतंत्र मजूर पक्षाची शाखा स्थापन केली जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले. १४ जानेवारी १९३७ रोजी बाबासाहेबांनी वऱ्हाड मध्यप्रांतातील अस्पृश्य मतदारांना निर्वाणीचा संदेश पाठविला. त्यात म्हटले होते, " खालील उमेदवार आमच्या संमतीने व पसंतीने उभे राहिले आहेत. (१) शंभूजी अंसूजी खंडारे (अकोला-बाळापूर) (२) पवारचिखलीकर (चिखली-मेहेकर) (३) संपतराव गणपतराव सरनाईक (एलिचपूर-दर्यापूर मेळघाट) (४) डी. के. भगत (यवतमाळ-दारव्हा) (५) देवाजी भिकाजी खोब्रागडे (चांदा-ब्रह्मपुरी) (६) केशव नारायण देव ऊर्फ पतितपावन दास (हिंगणघाट-वर्धा) (७) दौलत भीमसेन वारसे (छिंदवाडा-सौंसर) (८) राघव गंभीर घोडीचोर (भंडारा-साकोली) (९) एल. एन. हरदास (नागपूर शहर) (१०) रा. बा. फुले वकील नागपूर (मजूर मतदारसंघ) (११) डॉ. पंजाबराव देशमुख (अमरावती तहसिल) (१२) विठ्ठल बंडूजी चौबळ (वऱ्हाड पूर्व) (१३)

सौ. विमलाबाई देशमुख ( अकोला अमरावती स्त्री-मतदार संघ ( १४ ) जयनारायणजी ( रामटेक तहसिल ) याखेरीज नागपूर-उमरेड मतदारसंघासाठी उमेदवार निवडण्याचे अधिकार एल. एन. हरदास यांना देण्यात आले होते.[३०] मध्यप्रांत वऱ्हाडात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या लोकांची संख्या मुंबई इलाख्यातील अस्पृश्यांच्या संख्येपेक्षा जास्त असल्याने त्या प्रांतात अस्पृश्यांसाठी वीस जागा राखीव होत्या. त्यांपैकी अठरा जागांसाठी प्राथमिक निवडणूक घ्यावी लागली नाही.

खुद्द बाबासाहेब आंबेडकर मुंबई शहरातील भायखळा-परळ या मुख्यतः गिरणी कामगारांची वस्ती असलेल्या संयुक्त मतदारसंघातील राखीव जागा लढवत होते. या मतदारसंघात तीन जागा होत्या. बाबासाहेबांविरुद्ध बी. बी. पालवणकर ऊर्फ पी. बाळू हे विख्यात क्रिकेटपटू, पां. ना. ऊर्फ बापूसाहेब राजभोज आणि बाळकृष्ण जानूजी देवरूखकर हे तिघेजण राखीव जागा जिंकण्यासाठी प्रयत्न करीत होते. बाबासाहेबांचे तिघेही प्रतिस्पर्धी चांभार जातीचे होते. तिघांचाही धर्मांतर करण्याच्या घोषणेला पाठिंबा नव्हता. या तिघांपैकी देवरूखकर आणि राजभोज यांनी काही काळ बाबासाहेबांबरोबर सहकार्य केले होते. देवरूखकरांचा स्वभाव चंचल व वृत्ती धरसोडीची असल्याने त्यांच्या राजकीय निष्ठा सारख्या बदलत असत. कधी बाबासाहेबांबरोबर सहकार्य करीत तर अनेकदा बाबासाहेबांना विरोध करीत देवरूखकरांची राजकीय वाटचाल चालू होती. देवरूखकर मॅट्रिकपर्यंत शिकलेले होते. नऊ वर्षे लष्कराच्या पलटणीत कारकुनी केल्यानंतर तीन वर्षे त्यांनी बी. बी. सी. आय. रेल्वेच्या मुख्यालयात नोकरी केली होती. त्यानंतर ते लालबावटा युनियनमध्ये सामील झाले आणि त्यांनी १९२८ च्या गिरणी कामगारांच्या संपातही भाग घेतला. १९३० साली गांधीजींनी मिठाचा कायदा मोडून सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू केली तेव्हा देवरूखकर काँग्रेसमध्ये गेले आणि गोलमेज परिषदेचे प्रतिनिधी म्हणून विलायतेस निघालेल्या डॉ. आंबेडकरांचा व रावबहादूर श्रीनिवासन् यांचा निषेध करण्यासाठी त्यांनी जाहीर सभा घेतल्या. खरे म्हणजे त्या आधी ९ नोव्हेंबर १९२९ रोजी भरलेल्या मातंग हितकारक मंडळाच्या सभेत देवरूखकरांनीच बाबासाहेब आंबेडकरांना गोलमेज परिषदेतील अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून नेमावे अशी सरकारला सूचना केली होती.[३१] मात्र सरकारने डॉ. आंबेडकरांची खरोखर नियुक्ती करताच देवरूखकरांनी एकदम पलटी खाल्ली आणि ते निषेधसभा भरवू लागले.

बाबासाहेबांच्या मतदारसंघातूनच कॉ. के. एन. जोगळेकर ए. आय. टी. यू. सी. या अखिल भारतीय कामगार संघटनेच्या वतीने निवडणूक लढवीत होते. या मतदारसंघात राखीव जागेखेरीज दोन सर्वसाधारण जागा होत्या. या दोन्ही जागा काँग्रेसने लढविण्याचे ठरवले तेव्हा त्यांपैकी एका जागेसाठी रघुनाथ शिवराम निंबकर या कम्युनिस्ट पुढाऱ्याला काँग्रेसने तिकीट द्यावे अशी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसने

३३०५ २६९२८ निबंध-२२।५।८०

काँग्रेसच्या केंद्रीय संसदीय मंडळाला विनंती केली होती; पण वल्लभभाई पटेलांमुळे केंद्रीय संसदीय मंडळाने निंबकरांना तिकीट देण्यास नकार दिला..तेव्हा आयटकच्या मुंबई शाखेने कॉ. के. एन. जोगळेकरांना आपला उमेदवार म्हणून उभे राहण्याचा आदेश दिला.[३२] त्या आदेशानुसार जोगळेकर हे डॉ. गिल्डर आणि जे. पी. जोशी या अधिकृत काँग्रेस उमेदवारांविरुद्ध निवडणुकीच्या आखाड्यात उतरले. जोगळेकरांचे मित्र कॉ. श्रीपाद अमृत डांगे हे अ. भा. काँ. समितीचे सभासद असतानाही बंडखोर उमेदवाराच्या वतीने प्रचार करीत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरू यांनी तुमच्यावर शिस्तभंगाचा इलाज का करू नये याची कारणे दाखवा अशी नोटीस डांग्यांना धाडली. उत्तरादाखल लिहिताना जोगळेकरांसाठी एखाद्या काँग्रेस उमेदवाराने माघार घ्यावी या दृष्टीने नेहरूंनी प्रयत्न करावेत अशी डांग्यांनी जवाहरलालांना विनंती केली.[३३] एकेकाळी अखिल भारतीय समितीचे सभासद असलेल्या जोगळेकरांनी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध अर्ज भरून बंड केले तरी बाबासाहेबांनी मुंबई काँग्रेसमधल्या बेबनावाचा फायदा घेऊन जोगळेकरांना पाठिंबा दिला नाही; कारण त्यांना काँग्रेसविषयी जसे प्रेम नव्हते तसेच काँग्रेसच्या छावणीत दाखल झालेल्या कम्युनिस्टांविषयीही प्रेम नव्हते.

१९३७ च्या मुंबई विधानमंडळाच्या निवडणुकीत मुंबई शहर व उपनगरांसाठी असलेल्या एकूण नऊ जागांपैकी काँग्रेसने आठ जागा जिंकल्या. फक्त एका जागी काँग्रेसला हार पत्करावी लागली. काँग्रेसचा पाठिंबा असलेल्या पी. बाळूंचा बाबासाहेबांनी १२९७ मतांनी पराभव करून भायखळा-परळ मतदारसंघातील राखीव जागा जिंकली. बाबासाहेबांना १३२४५ मते पडली तर पी. बाळूंना ११२२५ मते मिळाली. बिचारे देवरूखकर आणि बापूसाहेब राजभोज! त्यांना अनुक्रमे अवघी ४३७ व २०५ मते मिळाली. उपनगरासाठी असलेल्या मतदारसंघात मात्र स्वतंत्र मजूर पक्षातर्फे उभे राहिलेल्या मातंग जातीच्या काळोख्यांचा जवळजवळ दहा हजार मतांनी पराभव करून चांभार जातीचे एस. जी. सोनगावकर काँग्रेसच्या तिकिटावर निवडून आले. कुलाबा जिल्ह्यात सुभेदार विश्राम सवादकरांचा एक हजाराहून जास्त मतांनी पराभव करून काँग्रेसचे तळकर निवडून आले. डॉ. आंबेडकरांखेरीज निवडणुकीत यशस्वी झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या उमेदवारांमध्ये राजाभाऊ भोळे, खंडेराव सखाराम सावंत, विनायकराव गडकरी, रामकृष्ण गंगाराम भातनकर, अनंतराव चित्रे, गंगाराम घाटमे, शामराव विष्णू परुळेकर, प्रभाकर रोहम, जिवाप्पा ऐदाळे, दौलतराव गुलाजी जाधव, भाऊराव गायकवाड, विजापूरचे आर. एस. होलर, बळवंत हनुमंत वराळे आणि दत्तात्रय वामन राऊत असे चौदा उमेदवार होते. मध्यप्रांत वऱ्हाडात स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने व पसंतीने उभ्या असलेल्या पंधरा उमेदवारांपैकी एल. एन. हरदास, देवाजी खोब्रागडे, राघव घोडीचोर, डी. के.

भगत, नागपूर-उमरेड भागातून उभे राहिलेले सीताराम महार हे अवघे पाच उमेदवार विजयी झाले. याखेरीज वर्धा-हिंगणघाट मतदारसंघातून स्वतंत्र म्हणून निवडून आलेले दशरथ लक्ष्मण पाटील यांनी बाबासाहेबांच्या ध्येयानुसार कार्य करण्याची इच्छा व्यक्त केल्याने त्यांचाही स्वतंत्र मजूर पक्षाच्या विजयी उमेदवारांमध्ये समावेश करण्यात आला.[३४] स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला तेव्हा आपल्या पक्षाला जितक्या जागा मिळतील असे बाबासाहेबांना वाटले होते त्यापेक्षा कितीतरी कमी जागा जिंकता येतील असे त्यांना १९३६ च्या ऑक्टोबरमध्ये वाटू लागले. जनता कर्त्यांनी १७ ऑक्टोबर १९३६ च्या अंकात कबुली दिली, "मुंबई इलाख्याच्या चाळीस विभागांतील सामान्य मतदारसंघांत आणखी तीस प्रतिनिधी निवडून आणता आले तर ४५ प्रतिनिधी पाठवता येतील असे डॉ. आंबेडकर यांनी सांगितले होते. आंबेडकरांची अटकळ पूर्णांशाने खरी ठरणे अशक्य आहे अशी चिन्हे दिसू लागली."[३५] पंधरा राखीव जागांपैकी अकरा स्वतंत्र मजूरपक्षाने जिंकल्या तर चार काँग्रेसने जिंकल्या. त्यावरून बहुसंख्य अस्पृश्य मतदार बाबासाहेबांच्या बाजूने असल्याचे निर्विवादपणे सिद्ध झाले. मध्यप्रांत वऱ्हाडात मात्र तसे यश मिळाले नव्हते. सर्वसाधारण जागा जिंकण्यात मात्र मोठे अपयश पदरी आले.

निवडणूक निकालाचे विश्लेषण करताना बाबासाहेबांनी म्हटले, "सबंध हिंदुस्थानात काँग्रेसबरोबर लढावयास काय तो मी एकटाच उभा होतो, व त्यात मी यशस्वीही झालो. सबंध हिंदुस्थानात काँग्रेसला तीनच जागा महत्त्वाच्या वाटत होत्या. त्या म्हणजे डॉ. वाडांची मुंबई युनिव्हर्सिटीची जागा, लो. स्व. पक्षाचे ल. ब. भोपटकर यांची पुण्यातील जागा व तिसरी माझी मुंबईची जागा. यांपैकी पहिल्या दोन काँग्रेसला मिळवता आल्या. शनिवारवाड्यापुढे वल्लभभाई म्हणाले, आंबेडकरांच्या पक्षाचे म्हणणे काँग्रेसला कबूल करावे लागेल." जनताकर्त्यांनी १४ ऑगस्ट १९३७ च्या अंकात प्रसिद्ध केलेला वृत्तान्त अचूक असेल तर 'सबंध हिंदुस्थानात काँग्रेसला तीनच जागा महत्त्वाच्या वाटत होत्या' हे बाबासाहेबांचे विधान अतिशयोक्तीचे वाटते. त्यांनी 'सबंध हिंदुस्थान' ऐवजी 'मुंबई इलाख्यात' म्हटले असावे. तसे म्हटले असेल तर ते यथार्थ ठरते. 'सबंध हिंदुस्थानात काँग्रेसबरोबर लढावयास काय तो मी एकटाच उभा होतो व त्यात मी यशस्वीही झालो' असे म्हणताना त्यांना देशभरच्या अस्पृश्यांसाठी असलेल्या राखीव जागांसाठी झालेली लढत अभिप्रेत होती. देशात अन्यत्र बहुसंख्य अस्पृश्य मतदारांनी काँग्रेसच्या उमेदवारांच्या बाजूने मते टाकली. फक्त मुंबई इलाख्यात तसे घडले नाही. मुंबई इलाख्यातील बहुसंख्य अस्पृश्य मतदार काँग्रेसमागे नसून आपल्यामागे आहेत असे बाबासाहेब बजावीत असत. ते त्यांचे म्हणणे 'काँग्रेसला कबूल करावे लागेल." असा वल्लभभाईंच्या उद्‌गारांचा अर्थ होता.

निवडणुकीतील काँग्रेसचा विजय म्हणजे खरा ब्राह्मण्याचा विजय होता असे बाबा-

साहेबांचे मत होते. पाच सहा प्रांतांतील मुख्य दिवाणांच्या म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या जागा ब्राह्मणांकडेच गेल्या असल्याचे सांगून त्यांनी मुंबई प्रांताच्या मंत्रिमंडळातील अकरा जागांपैकी पाच जागा ब्राह्मणांनी पटकावल्या असल्याचे सांगितले. १९१९ पासून १९३५ पर्यंत कौन्सिलमध्ये ब्राह्मण सभासदांची संख्या अत्यंत थोडी म्हणजे दहाबारा होती व ती पुढे कमी कमी होत गेली, परंतु १९३७ साली मुंबई प्रांतात २५ ब्राह्मण निवडून आले. [ काँग्रेस १८, लोकशाही स्वराज्य पक्ष ४, स्वतंत्र २, स्वतंत्र मजूर पक्ष १ = एकूण २५ ] काँग्रेसने चार राखीव जागा जिंकल्या तरी त्या जागा जिंकणाऱ्या अस्पृश्य उमेदवारांपैकी एकाचाही मंत्रिमंडळात समावेश केला नाही. या संदर्भात बाबासाहेबांनी म्हटले, " मागच्या राऊंड टेबल कॉन्फरन्सच्या वेळी माझ्या हातून एक चूक झाली. अल्पसंख्याक पक्षाचा एकतरी प्रतिनिधी गव्हर्नरने मंत्रिमंडळात नेमला पाहिजे असा कायदाच बनवून घ्यायला हवा होता; परंतु मी विचार केला. 'काही वाढतीनेही लाजावे व काही खातीनेही लाजावे.' मी जास्त ताणून धरले नाही."[३४] निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर पक्षबांधणीच्या कामावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते. स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने निवडून आलेले बहुतेक सर्व आमदार तरुण व उत्साही असले तरी अननुभवी होते. त्यांचा कायदेमंडळात प्रभाव पडावयाचा असेल तर त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक होते. छापखाना आणि वृत्तपत्र ही कोणत्याही चळवळीची हत्यारे असतात असे बाबासाहेब नेहमी म्हणत असत. त्यासाठी तसेच पक्षाच्या अन्य कार्यासाठी पुरेसा पैसा उभा करण्याची गरज होती. त्याबाबत बोलताना बाबासाहेबांनी मोकळेपणाने आपली अडचण सांगितली. " इलेक्शनचा खर्च जबरदस्त होतो. तो करणे आपल्यातील उमेदवारांना शक्य नसते. मागच्या इलेक्शनच्या वेळेस उभ्या राहिलेल्या बऱ्याच उमेदवारांस मला पैशाची मदत करावी लागली तेव्हा ते निवडून आले. परंतु प्रत्येक वेळेस अशी मदत करणे मला शक्य नाही व उमेदवारांनाही त्यांचा त्यांनाही खर्च भागविणे शक्य नाही. म्हणून त्यांचा खर्च तुम्ही दिला पाहिजे. स्वतंत्र मजूर पक्षाची वर्गणी आठ आणे ठेविली आहे ती फार कमी आहे. जनता पत्र चांगल्या तऱ्हेने चालले पाहिजे."[३५] स्वतंत्र मजूर पक्षाला पैशाची चणचण नेहमीच भेडसावत असे. निवडणुकीतील विजयाचा आनंद ओसरल्यावर हा प्रश्न आ वासून उभा राहिला. एकच समाधान देणारी घटना निवडणूक निकालानंतर घडली. ती म्हणजे १७ मार्च १९३७ रोजी न्यायमूर्ती ब्रुमफिल्ड यांनी महाडच्या चवदार तळ्याच्या प्रकरणातील दाव्याचा निकाल दिला. या निकालानुसार अस्पृश्यांना कायदेशीररीत्या चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा व वापरण्याचा हक्क प्राप्त झाला.

'डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म' या कॉ. प्रभाकर वैद्यांच्या पुस्तकात 'स्वतंत्र मजूर पक्ष' या शीर्षकाचे एक प्रकरण आहे. त्यात त्यांनी १९३७ सालच्या निवडणुकी-

बाबत काही विधाने केली आहेत. त्यांना वस्तुस्थितीचा आधार नाही. या निवडणुकीतील बाबासाहेबांच्या मोहिमेबद्दल लिहिताना वैद्यांनी म्हटले आहे, "नेमस्त पक्षापासून, ब्राह्मणेतर पक्षापासून ते थेट कम्युनिस्ट समजल्या जाणाऱ्या कार्यकर्त्यांपर्यंतच्या वेगवेगळ्या पक्षांच्या परिसरातील कार्यकर्ते या निवडणुकीच्या मोहिमेत ओढले गेलेले दिसतात. नाहीत फक्त काँग्रेसवाले आणि सनातनी हिंदुत्वनिष्ठ ( काँग्रेसवाल्यांमध्ये तेव्हा सर्व छटांचे व गटांचे समाजवादीही सामील होते ). काँग्रेसवाले आगामी सत्ताधारी म्हणून त्याचप्रमाणे छुपे सनातनी म्हणूनही विरोधी होते आणि हिंदुत्वनिष्ठ तर उघड सनातनी म्हणून. हे दोन पक्ष वगळता बाकी कोणालाही आंबेडकरांनी मज्जाव केला नाही– कम्युनिस्टांनासुद्धा नाही हे आज मुद्दाम सांगितले पाहिजे. किंबहुना आज जर मागे वळून पाहिले तर कितीतरी कम्युनिस्ट कार्यकर्ते किंवा कम्युनिस्टांचे हितचिंतक–सहप्रवासी स्वतंत्र मजूर पक्षाच्या आणि आंबेडकरांच्या इतर आंदोलनाच्या आसपास तेव्हा असलेले आढळतात. अस्पृश्यांसाठी ज्या एकूण पंधरा जागा होत्या त्यांपैकी तेरा जागा 'स्वतंत्र मजूर पक्षाने' जिंकल्या. स्वतंत्र मजूर पक्षाच्या विजयी उमेदवारामध्ये जमातीबाहेरील दोन उमेदवारसुद्धा आढळतात. त्यांपैकी एक तेव्हासुद्धा कम्युनिस्ट हितचिंतक म्हणून जाणत्यांना माहीत असलेले ( पण ना. गोखल्यांच्या भारत सेवक समाजाचे आजीव सभासद असलेले ) कॉ. शामराव परुळेकर होते."[३८]
कॉ. प्रभाकर वैद्यांनी जनता पत्राचे अंक मुळात जाऊन वाचले असते आणि १९३७ च्या निवडणुकीचे निकाल नजरेखाली घातले असते तर वरील निराधार विधाने त्यांनी केली नसती. स्वतंत्र मजूर पक्षाने पंधरा राखीव जागांपैकी तेरा जिंकल्या नसून अकरा जागा जिंकल्या होत्या. स्वतंत्र मजूर पक्षाच्या विजयी उमेदवारांमध्ये अस्पृश्य नसलेले विनायकराव गडकरी, अनंतराव चित्रे, द. वा. राऊत आणि शामराव परुळेकर असे चार उमेदवार होते. यांपैकी शामराव परुळेकर कम्युनिस्ट पक्षात गेले ते १९४० साली. १९३७ साली नव्हे. शामराव तेव्हा कम्युनिस्टांचे हितचिंतक सहप्रवासी होते असे गृहीत धरले तरी बाबासाहेबांनी शामरावांना पाठिंबा दिला होता आणि नंतर स्वतंत्र मजूर पक्षात सामील करून होते ते त्यांचे सर्वंट्स ऑफ इंडिया सोसायटीशी असलेले संबंध लक्षात घेऊन. खेरीज शामराव काँग्रेसशी संबंध असलेले कामगारनेते नव्हते तसेच त्यांचा कम्युनिस्टांचा वरचष्मा असलेल्या ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसशीही तेव्हा कसलाच संबंध नव्हता. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसशी तसेच काँग्रेस पक्षाशी संबंध असलेल्या कॉ. के एन. जोगळेकर, रामभाऊ खेडगीकर या कामगार-नेत्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाठिंबा दिला नव्हता हे प्रभाकर वैद्यांनी लक्षात ठेवावयास हवे होते.

## संदर्भ


१. जनता, २२ ऑगस्ट १९३६.
२. पी. एन. चोप्रा ( संपादक ) टोवर्डस फ्रीडम खंड १ : १९३७–४७; १९८५ ब्रेबोर्नचे लिनलिथगोस पत्र; १३ फेब्रुवारी १९३७.
३. इंडिपेंडंट लेबर पार्टी : इटस् फॉर्मेशन अँड इटस् एम्स, १९३७, पृ. ३
४. जनता, २२ ऑगस्ट १९३६.
५. कित्ता, २६ डिसेंबर १९३६.
६. हिंदुस्थान सरकार; गृह/राजकीय खाते फाईल क्र. ३६३, १९२५ : मुंबईचे प्रभारी पोलिस आयुक्त डी हिली यांचे गृहसचिवास पत्र, १२ एप्रिल १९२४.
७. गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, सोर्स मटेरिअल ऑन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द मुवमेंट ऑफ अनटचेबल्स, खंड १, १९८२, पृ. १२५–१२६.
८. जनता, २५ जून १९३८.
९. कित्ता
१०. कित्ता
११. स्वतंत्र कामगार पक्षाचा जाहीरनामा, १९३६, पृ. २.
१२. जनता, २९ ऑगस्ट १९३६.
१३. कित्ता, १२ सप्टेंबर १९३६.
१४. कित्ता, १७ ऑक्टोबर, १९३६.
१५. कित्ता, ६ फेब्रुवारी १९३७.
१६. कित्ता, ७ नोव्हेंबर १९३६.
१७. विजय सुरवाडे ( संपादक ), पत्रव्यवहारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खंड २ ( १९३१–१९३६ ); १९८९; पृ. ३९६–३९८.
१८. कित्ता, पृ. १९९.
१९. भाई अमरसिंग, अस्पृश्यांच्या चळवळीतील सावळा गोंधळ, १९४०, पृ. ७७-७८.
२०. विजय सुरवाडे उपरोक्त, पृ. २०१.
२१. जनता, ३० जानेवारी.
२२. विजय सुरवाडे, उपरोक्त, पृ. २०१.
२३. चां. भ. खैरमोडे : डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र ग्रंथ, खंड ६ व ७ १९८५ खंड ७, पृ. २४–२५.
२४. कित्ता, पृ. २७.
२५. कित्ता, पृ. २८.
२६. खैरमोडे संग्रह, अमृतराव धोंडिबा रणखांबे यांचेकडून जाहीर खुलासा.

२७. जनता, २१ नोव्हेंबर १९३६.
२८. कित्ता, १३ फेब्रुवारी १९३७.
२९. कित्ता, ६ व १३ फेब्रुवारी १९३७.
३०. कित्ता, २३ जानेवारी १९३७.
३१. मुंबई सरकार गृहखाते ( विशेष शाखा ) फाईल क्र. ७७६.
३२. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस ( आयटक ), फाईल क्र. १ मुंबई प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसच्या सरचिटणिसांचे आयटकच्या सरचिटणिसांना पत्र, २६ नोव्हेंबर १९३६.
३३. पी. एन. चोप्रा, उपरोक्त, एस.ए. डांगे यांचे नेहरूंना पत्र, १९ जाने. १९३७
३४. जनता, २७ फेब्रुवारी १९३७.
३५. कित्ता, १७ ऑक्टोबर १९३६.
३६. कित्ता, १४ ऑगस्ट १९३७.
३७. कित्ता.
३८. प्रभाकर वैद्य, डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म, १९८१, पृ. ६०–६१

# २

## स्वतंत्र मजूर पक्षाचा कामगार चळवळीतील सहभाग

कामगार चळवळीतील स्वतंत्र मजूर पक्षाच्या सहभागाचे विश्लेषण करण्यापूर्वी या सहभागाची पार्श्वभूमी आणि डॉ. आंबेडकरांची कामगार चळवळीसंबंधीची भूमिका प्रथम नीट समजावून घेतली पाहिजे. १९३५ साली मुंबईतील कापड गिरण्यांत काम करणाऱ्या एक लाख तेहेतीस हजारांहून अधिक कामगारांमध्ये अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींच्या कामगारांची संख्या पंधरा ते अठरा हजार होती. १९२३ सालापासून कापड उद्योगात मंदी असल्याने आणि त्यात भर म्हणून १९२९ च्या जागतिक मंदीचाही जबरदस्त तडाखा बसल्याने १९३५ सालापर्यंत गिरणी मालकांनी नोकरकपातीचे, बोनस न देण्याचे, महागाईभत्त्यात तसेच वेतनात कपात करण्याचे धोरण स्वीकारले होते. त्याचा निषेध म्हणून १९२४, १९२५, १९२८, १९२९ आणि १९३४ या वर्षांत मुंबईच्या कापड गिरणीकामगारांनी संपाचे हत्यार उपसले होते. काही संप त्यांनी महिनोन्‌महिने चालवले होते. १९२४ सालचा संप गिरणीमालकांनी बोनस देण्यास नकार दिल्यामुळे सुरू झाला. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश नॉर्मन मॅक्लीऑड यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने समिती नेमली. कामगारांना बोनस द्यावा इतका नफा गिरणीमालकांना १९२३ साली झालेला नसल्याने बोनस देण्यास मालकांनी दिलेल्या नकाराचे समितीने समर्थन केले आणि जवळजवळ तीन महिने चाललेला संप अयशस्वी ठरला. महागाईभत्त्यात मालकांनी जुलै १९२५ मध्ये अचानक वीस टक्के कपात केल्यामुळे १५ सप्टेंबर १९२५ पासून ते डिसेंबर १९२५ पर्यंत कामगार संपावर होते. अखेर मालकांनी ही कपात करण्याची सूचना मागे घेतल्यावर संप मिटला. १९२८ साली उत्पादनखर्च कमी करण्याच्या उद्देशाने गिरणीमालकांनी काही सुधारणा करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यामुळे काही कामगारां-

वर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार या भीतीने २६ एप्रिल १९२८ पासून संपाला सुरुवात झाली. पाच महिन्यांहून अधिक काळ चाललेला हा संप ६ ऑक्टोबरला मागे घेतला गेला तो न्यायमूर्ती फॉसेट यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक चौकशी समिती नेमण्याचे आश्वासन दिल्यानंतर.[1] कामगारांतर्फे करण्यात आलेल्या सतरा मागण्यांपैकी बऱ्याच न्याय्य व वाजवी असल्याचे समितीच्या मार्च १९२९ मध्ये सादर केलेल्या अहवालात मान्य करण्यात आले. तरीही कामगारांची वेतनवाढीची मागणी समितीने फेटाळली. १९२८ च्या संपाची सूत्रे कम्युनिस्टांच्या हाती होती. २० मार्च १९२९ रोजी डांगे, जोगळेकर, निंबकर, आळवे, झाबवाला वगैरे नेत्यांची सरकारने धरपकड केली आणि त्यांना मीरत कट खटल्यात गोवले. त्यामुळे गिरणी कामगार युनियनचे नेतृत्व बी. टी. रणदिवे, शं. वा. देशपांडे या कम्युनिस्टांच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांकडे गेले. या परिस्थितीचा फायदा घेऊन मुंबईतील गिरणीमालकांनी १९२८ सालच्या संपात पुढाकार घेणाऱ्या कामगारांना या ना त्या कारणाने कामावरून काढून टाकण्याचे तंत्र अवलंबिले. त्याचा निषेध म्हणून ४३ गिरण्यांतील पाऊण लाख कामगार २६ एप्रिल १९२९ रोजी संपावर गेले. हा संप जवळजवळ पाच महिने चालला होता.

१९२९ सालच्या या संपाला आरंभापासूनच डॉ. आंबेडकरांनी विरोध केला होता. बहिष्कृत वर्गातील कामगार तसेच मुसलमान कामगार या संपात सहभागी झाले नव्हते. 'बहिष्कृत भारतात' याबद्दलची आपली भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेबांनी म्हटले, "युनियनपासून कामगारांना दोन पैसे अधिक मिळाले पाहिजेत, त्यांची स्थिती सुधारली पाहिजे; परंतु कम्युनिस्टांच्या लाल बावटेवाला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युनियनच्या पाचवीलाच संप पुजलेला असल्यामुळे गिरणी कामगारांना दोन पैसे अधिक मिळण्याऐवजी त्यांची सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस खालावत आहे. संप केव्हा व कशाकरिता करावयाचा याविषयी काही ताळतंत्रच उरलेला नाही. हे इतर वर्गातल्या कामगारांना तूर्त कळत नाही. म्हणून बहिष्कृत वर्गातल्या कामगारांनी त्यांच्याबरोबर नाचून कसे चालेल ?"[2] हा संप पोटापाण्यासाठी चाललेला असता तर "बहिष्कृत वर्गातले व मुसलमान कामगार पूर्वीच्या सर्व संपांत जसे सामील झाले होते तसे याही संपात सामील झाले असते" असे टीकाकारांना बजावून बाबासाहेबांनी लिहिले, "कम्युनिझम व कामगारवर्गाची चळवळ ही एक नव्हत. आम्हाला कामगार संघाची चळवळ अवश्य पाहिजे आहे. भांडवलशाहीशी कामगारांच्यावतीने झगडण्याची आवश्यकताही आम्हाला पूर्णपणे मान्य आहे. इतकेच नव्हे तर संप हे सुद्धा कामगारांचे एक कायदेशीर शस्त्र आहे असेच आम्ही समजतो. परंतु या शस्त्राचा जपून व योग्य वेळीच उपयोग करावयाचा असतो."[3]

हिंदुस्थानच्या तत्कालीन परिस्थितीत झटपट क्रांती शक्य नाही व इष्टही नाही असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. कम्युनिस्टांचे ध्येय आत्यंतिक असले तरी ते अयोग्य आहे

असे त्यांना वाटत नव्हते. मात्र ते साकार करण्यासाठी रशियातील बोल्शेविक आणि त्यांचे हिंदुस्थानातील चेले ज्या मार्गाचा आणि धोरणाचा पुरस्कार करीत होते ते त्यांना बिलकुल मान्य नव्हते. "कम्युनिझमचे ध्येय जसे राजकीय स्वरूपाचे आहे तसेच ते आर्थिक व सामाजिक स्वरूपाचे आहे आणि सामाजिक बाबतीत लोकमतामध्ये जी क्रांती व्हावयास पाहिजे ती झालेली नाही. त्याचप्रमाणे कम्युनिझमचे आर्थिक व राजकीय ध्येय समजण्याची पात्रता बहुजनसमाजाच्या अंगी अद्यापि आलेली नाही. सोशियालिझम व कम्युनिझम यांच्या ध्येयामध्ये म्हणण्यासारखा काहीच फरक नाही कम्युनिझम ( रशियातील बोल्शेविक चळवळ ) याला सध्या विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला आहे आणि सोशियालिझमचे अंतिम साध्य ज्यांना मान्य आहे असे लोकही कम्युनिस्टांच्या चळवळीविरुद्ध आहेत." या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधून बाबासाहेबांनी आपले कम्युनिस्टांबरोबरचे मतभेद निःसंदिग्धपणे स्पष्ट केले. "रशियन कम्युनिस्टांचे मार्ग व धोरण ही झटपट क्रांतीच्या उद्देशाने योजिलेली असून उत्क्रांतीच्या मार्गाच्या आड येणारी आहेत. क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न करताना सत्यासत्य, न्यायान्याय काही पाहावयाचा नाही, अत्याचार निषिद्ध समजावयाचे नाहीत आणि वेळ पडल्यास रक्तपात करून सोव्हिएट पद्धतीवर नवीन राज्य स्थापावयाचे हा जो क्रांतिवादी कम्युनिस्टांचा मार्ग तो आम्हाला पसंत नाही. तो देशाच्या प्रगतीच्या आड येणारा आहे. इतकेच नव्हे तर त्यामुळे पिछेहाट होण्याचाही दृढ संभव आहे."[४] १९२९ सालच्या संपाच्या संदर्भात बाबासाहेबांनी जे लेखन केले त्यात कम्युनिस्टांची राज्यक्रांतीची चळवळ आणि तिच्या सिद्धीसाठी एक साधन म्हणून संप करण्याचे त्यांचे धोरण या दोहोंचाही त्यांनी धिक्कार केलेला दिसतो.

मुंबईच्या कापडगिरण्यांतील कामगारांचा असंतोष १९३३ साली त्यांनी लढवलेल्या सतरा संपांच्या रूपाने व्यक्त झाला. मुंबई गिरणी कामगार युनियन या कम्युनिस्ट नियंत्रित संघटनेने पुढाकार घेऊन १९३४ च्या जानेवारीत मुंबईत कानपूरचे मजूर नेते हरिहरनाथ शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय कापड गिरणीकामगार परिषद भरवली आणि वेतनकपात करण्याच्या मालकांच्या धोरणाचा निषेध म्हणून २३ एप्रिल १९३४ रोजी सबंध देशात सार्वत्रिक संप घडवून आणण्याचे आवाहन केले. प्रत्यक्षतः हा संप केवळ मुंबई, नागपूर आणि सोलापूर या शहरांतच झाला. १९३४ च्या जानेवारीत मुंबईतील ८४ गिरण्यांपैकी ३४ गिरण्या बंद होत्या. त्यामुळे ६५ हजार कामगार बेकार झाले होते. चालू असलेल्या पन्नास गिरण्यांपैकी काही गिरण्यांत मालकांनी नवी यंत्रे बसविल्याने पाच हजार कामगार बेकार झाले होते. अशा तऱ्हेने बेकार झालेल्या सत्तर हजार कामगारांपैकी सुमारे पंधरा हजार कामगारांना रात्रपाळीने चालणाऱ्या सतरा गिरण्यांत काम मिळाले असले तरी पंचावन्न हजार बेकार कामगार काम शोधीत वणवण करीत होते. कामावर असलेल्यांच्या पगारातही

मालकांनी किमान ७ टक्के तर कमाल पंचेचाळीस टक्के कपात केली होती. गिरणी कामगारांच्या दैन्यावस्थेचे वर्णन केल्यानंतर डॉ. आंबेडकरांच्या जनता पत्राने इशारा दिला, "आम्हास जरी आज सार्वत्रिक संपाचा मार्ग काही अंशी पसंत नसला तरी कामगारांनी सार्वत्रिक संप पुकारल्यास त्यांना कोणी दोषी ठरवू शकेल असे आम्हास वाटत नाही. यदाकदाचित सार्वत्रिक संप झालाच तर तो कितपत फलदायी व यशस्वी होईल ह्याबद्दल आम्हास जबरदस्त शंका आहे."[५] कामगार पुढाऱ्यांत अनेक मतांचा सावळागोंधळ होता. कामगारांची एकी अभेद्य नव्हती. तसेच त्यांची संघटनाही जोरदार व दणकट नव्हती. त्यामुळे तसेच जागतिक मंदीमुळे बेकारीही वाढत असल्याने सार्वत्रिक संप यशस्वी करण्यास वातावरण अनुकूल नाही असे जनताकर्त्यांचे मत होते. जनताकर्त्यांनी रेखाटलेले मुंबईतील कामगार चळवळीचे हे चित्र या काळात मुंबईतच कार्य केलेल्या वामनराव कुलकर्णींनी अलीकडेच आपल्या आठवणी सांगताना रंगवलेल्या चित्राशी मिळतेजुळते असल्याचे दिसते. "आम्ही जिला कामगार चळवळ म्हणत होतो ती प्रामुख्याने राजकीय चळवळ होती. आपापल्या उद्दिष्टांसाठी वेगवेगळे गट कामगारांत काम करीत होते. ग्राम्य शब्दात सांगावयाचे तर रानात बोंबलल्या-सारखा हा प्रकार होता...मंदी, बेकारी याला दुसरीही एक बाजू असते. त्यांचा जीवघेणा व्यक्तिगत, कौटुंबिक संदर्भ आमच्या लेखी गौण असायचा... जागतिक मंदीच्या काळात, कामगारावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली असताना त्याविरुद्ध लढण्यासाठी आम्ही संपाचे हत्यार उपसले. हा नुसता वेडेपणा होता असे नाही तर अतिजहाल धोरणाचा परिणाम होता."[६]

२३ एप्रिल १९३४ रोजी मुंबईच्या कापडगिरण्यांतील कामगारांनी सार्वत्रिक संप सुरू केला. त्याआधी दोन दिवस जनताकर्त्यांनी सार्वत्रिक संप पुकारण्याची अजून वेळ आली नाही असे मत व्यक्त केले आणि संप सुरू झाल्यानंतर संपाच्या नेत्यांवर झोड उठवली. "पुढाऱ्यांनी स्वतःच्या फायद्यासाठीच हा संप घडवून आणला असे आम्ही म्हणत आहोत. आपण कामगारांच्या राज्यात समर्थ असे लोक आहोत ही यांना जगाला दाखवावयाची झालेली मनीषा या सार्वत्रिक संपाच्या मुळाशी जीव धरून आहे हे आम्हास स्पष्टपणे दिसत आहे."[७] जनताकर्त्यांचा हा आरोप खरा होता. हा संप घडवून आणण्यासाठी आणि तो चालू ठेवण्यासाठी कोणते तंत्र आपण अवलंबिले याबद्दल संपाचे एक नेते वामनराव कुलकर्णी यांनी दिलेली कबुली या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे. "संप यशस्वी करण्यासाठी आम्ही काहीही करावयास तयार असायचो. मी स्वतः इतर कम्युनिस्ट पुढाऱ्यांबरोबर दगडफेक करून गिरण्या बंद पाडण्यास भाग पाडलेले आहे."[८] प्रभादेवीच्या एका गिरणीतील सहा हजार कामगार संपात सामील होत नाहीत हे पाहून गिरणी सुटल्यानंतर काम संपवून बाहेर पडणाऱ्या कामगारांवर पद्धतशीर हल्ला चढवण्याची योजना आपण कशी अंमलात आणली

याचे वर्णन वामनराव कुलकर्ण्यांनी आत्मचरित्रात प्रांजळपणे केले आहे.

असले सर्व प्रकारचे मार्ग वापरून १९३४ सालच्या संपाच्या नेत्यांनी जवळजवळ दोन महिने संप चालू ठेवला; पण संप चालवण्यासाठी नेमलेल्या समितीच्या सदस्यांमध्ये तीव्र मतभेद झाल्यामुळे कसलीही तडजोड होण्याआधीच संप मागे घ्यावा लागला, कारण नेत्यांनी निर्णय घेण्यापूर्वी कामगारच कामावर जाऊ लागले दोन महिने चाललेल्या या संपात दगडफेक, लाठीहल्ले, गोळीबार, पुढाऱ्यांची धरपकड हे सारे प्रकार घडले. आळवे, कासले, कांदळकर या कामगार पुढाऱ्यांनी समेट घडवून आणण्यासाठी नारायण मल्हार जोशी आणि रघुनाथराव बखले या नेमस्त नेत्यांना समितीमध्ये घ्यावे अशी सूचना केली; पण जनताकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे संपसमितीतील "पांढरपेशा जहाल म्हणविणाऱ्या पुढाऱ्यांनी" ती फेटाळून लावली. जनताकर्त्यांचा पाठिंबा ना. म. जोशी व बखले या पुढाऱ्यांना होता असे स्पष्ट दिसते.

मुंबईतील कापड गिरणीकामगारांची काही गाऱ्हाणी वाजवी असल्याचे मुंबई सरकारचेही मत असल्याने आणि संपाला बंदी घालण्याची कायद्यात तरतूद नसल्याने २३ एप्रिल १९३४ ला संप सुरू झाला तरी सरकारने आणीबाणीच्या परिस्थितीसंबंधीच्या कायद्याने देऊ केलेले अधिकार वापरले नाहीत. मात्र संपाचे नेतृत्व करणाऱ्या कम्युनिस्टांना धडा शिकवण्यासाठी ३० एप्रिलला १४ कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची आणि २५ मे रोजी आणखी १४ कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली. हिंदुस्थान सरकारने फौजदारी कायद्यात दुरुस्ती करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे व्यापक अधिकार हाती घेतले होते; पण या कायद्यांची मुदत १९३५ साली संपणार होती. मुंबई शहरातल्या कम्युनिस्टांच्या वाढत्या प्रभावाला आळा घालण्यासाठी एक खास विधेयक मंजूर करावे असा मुंबई सरकारने हिंदुस्थान सरकारमागे लकडा लावला होता; पण १९३४ साली केंद्रीय विधानसभेच्या निवडणुकी होणार असल्याने असले विधेयक मांडण्याचा प्रयत्न केला तर कॉंग्रेस पक्ष त्याचा सरकारवर झोड उठवण्यासाठी उपयोग करील अशी भारतमंत्री सॅम्युएल होअरना धास्ती वाटत होती. म्हणून त्यांनी त्यास परवानगी नाकारली.[९] कम्युनिस्टांना जरब बसावी म्हणून कायदा करण्याचा विचार मुंबई सरकारने सोडून दिला तरी १९३४ चा संप बारगळल्यानंतर मुंबई सरकारने औद्योगिक कलहात समेट घडवून आणण्यासंबंधीचा कायदा मंजूर केला. या कायद्यान्वये नेमण्यात आलेल्या कामगारांसाठीच्या सरकारी अधिकाऱ्यामार्फत कामगारांची गाऱ्हाणी मालकांपुढे मांडली जाऊ लागली. गिरणीमालक संघानेही आपला एक कामगारांसाठीचा अधिकारी नेमला. त्याने आणि सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्याने जॉबर लोकांनी चालविलेल्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला; पण तो निष्फळ ठरला. १९३७ च्या मार्चमध्ये सरकारने वेतन देण्यासंबंधीचा कायदा केला.[१०] कामगार चळवळीत हस्तक्षेप करण्याचे कम्युनिस्टांचे प्रयत्न म्हणून पाडणे हे कायद्याचे

उद्दिष्ट असल्याचे औद्योगिक कलहात समेट घडवून आणण्यासंबंधीचा कायदा मांडताना मुंबई विधानसभेत सरकारतर्फे स्पष्ट सांगण्यात आले होते.

तुरुंगात डांबून ठेवलेल्या कम्युनिस्ट कामगारनेत्यांच्या सुटकेचा प्रश्न प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुका झाल्यानंतर काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्यास उपस्थित करणार हे गोऱ्या राज्यकर्त्यांना दिसत होते. मुंबई इलाख्यात बाळासाहेब खेरांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यानंतर या प्रश्नाला जवाहरलाल नेहरूंनी चालना दिली. राजबंद्यांच्या मुक्ततेबाबत आणि नागरी स्वातंत्र्याच्या रक्षणाबाबत काँग्रेस वचनबद्ध असल्याने कारावासात असलेल्या कम्युनिस्टांना बंधमुक्त करावे आणि कम्युनिस्टांच्या नियंत्रणाखाली असलेल्या संघटनांवरचे निर्बंध रद्द करावेत असा काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने जवाहरलाल नेहरूंनी तगादा लावला. बाळासाहेब खेर आणि गृहमंत्री कन्हय्यालाल मुन्शी दोघेही कम्युनिस्टांचे कडवे विरोधक असल्याने ते या दिशेने हालचाल करण्यास मुळीच उत्सुक नव्हते. आपल्यावर नेहरूंचे सारखे दडपण येत असले तरी आपण ते जुमानीत नाही असे खेर मुन्शी या दुकलीने गव्हर्नर ब्रेबर्नलाही सांगितले.[११] गव्हर्नरही व्हाइसरॉय लिनलिथगोंच्या सल्ल्यानुसार कालहरणाचा डाव खेळीत होता. १४ ते १७ ऑगस्ट १९३७ रोजी वर्ध्याला भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत जवाहरलाल नेहरूंनी खेरांना पुन्हा एकदा कम्युनिस्टांना बंधमुक्त करण्याबाबत आठवण करून दिली.

सरकारने कामगारांसाठी नेमलेले अधिकारी ए. डब्ल्यू. प्राइड यांना मुंबईतील कामगार चळवळीबाबत एक गोपनीय अहवाल सादर करण्यास गृहमंत्री मुन्शींनी सांगितले. बदललेल्या राजकीय वातावरणाचा कम्युनिस्ट फायदा उठवतील, त्यांच्यापैकी काहींना कुशाग्र बुद्धिमत्तेचे देणे लाभले आहे, ते संघटनाकुशल असून जनतेचे मानसशास्त्र चांगले जाणतात, प्रचार करण्याच्या कलेत ते निष्णात असून विरोधकांना नेस्तनाबूत करण्याइतका निष्ठुरपणाही त्यांच्याकडे आहे असे या अहवालात नमूद करण्यात आले होते. कोणत्याही कम्युनिस्टावरचे अथवा त्यांच्या संघटनेवरचे निर्बंध उठवू नयेत, तसेच कम्युनिस्टांना वठणीवर आणण्यासाठी आणीबाणीत वापरावयाच्या खास अधिकारांचाही उपयोग करावा असे प्राइडने सुचवले होते[१२] आणीबाणीच्या परिस्थितीतील खास अधिकारांचा वापर करण्यास मुन्शी तयार होते; पण अशा अधिकारांच्या वापराविरुद्ध काँग्रेसने नेहमीच टीका केलेली असल्याने हा उपाय निषिद्ध मानावा असे गांधीजींचे मत होते. हिंसक दंगली उसळल्याच तर त्या काबूत आणण्यासाठी आत्मदहनाचा अहिंसात्मक उपाय गांधीजींनी सुचवला तेव्हा त्याचा अवलंब करण्यास आपल्याप्रमाणेच मंत्रिमंडळातील आपले सहकारी तयार नाहीत असे मुन्शींनी गांधीजींना स्पष्ट सांगितले.[१३] मुंबईतील कामगारांची संघटना काँग्रेसच्या ध्येयधोरणानुसार बांधावी आणि ते काम गुलझारीलाल नंदांवर सोपवावे असे गांधीजींच्या सल्ल्या-

नुसार ठरले. अखेर कम्युनिस्टांवरचे उरलेसुरले निर्बंध उठवावेत आणि गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास आवश्यक तर आणीबाणीतील खास अधिकार वापरावेत अशी मुंबई मंत्रिमंडळाने एकमताने गव्हर्नरला शिफारस केल्यामुळे १९ ऑक्टोबर १९३७ रोजी कम्युनिस्टांवरचे सर्व निर्बंध रद्द करण्यात आले.

खेर मंत्रिमंडळाने जयरामदास दौलतराम यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई इलाख्यातील कापडउद्योगाची चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ आणि सय्यद अब्दुल्ला ब्रेलवी हे तिघे या समितीचे सदस्य होते. समितीने प्रथम एक अंतरिम अहवाल सादर केला आणि १९३८ च्या फेब्रुवारीत कामगारांच्या वेतनात ११.९ टक्के वाढ करण्याची शिफारस केली. पति-पत्नी आणि दोन मुले अशा चार व्यक्तींच्या कुटुंबाला जगण्यासाठी दरमहा किमान पन्नास ते पंचावन्न रुपये खर्च करावे लागतात असे समितीच्या अंतिम अहवालात नमूद करण्यात आले होते. मुंबईतील कापडगिरण्यांतील कामगारांच्या पगारात थोडी वाढ करण्यास मान्यता देऊन आणि समिती नेमून असंतुष्ट कामगारांना गप्प करण्याचा कॉंग्रेस मंत्रिमंडळाने प्रयत्न केला; पण त्यामुळे कम्युनिस्टांचा मुंबईतील कामगार चळवळीवरचा प्रभाव कमी झाला असे नाही. मालक-मजूर संघर्ष वाढतच होता, अशा परिस्थितीत कॉंग्रेसप्रमाणेच स्वतंत्र मजूर पक्षानेही कामगार चळवळीच्या क्षेत्रात आपली वेगळी राहुटी टाकण्याचा मनोदय व्यक्त करताच डॉ. आंबेडकर कामगार चळवळीत फूट पाडीत असल्याचा आरोप करण्यात येऊ लागला. आर्थिक लढ्यात स्पृश्य आणि अस्पृश्य शेतकरी कामगार वर्गाचे हितसंबंध एकच असल्याने सर्वांनी मिळून लाल बावट्याखाली संघर्ष करावा असे कम्युनिस्टांचे म्हणणे होते. त्यामुळे १९३८ च्या फेब्रुवारीत मनमाडला जी. आय. पी. रेल्वेत काम करणाऱ्या अस्पृश्य कामगारांची परिषद भरणार असे जाहीर होताच बाबासाहेबांची 'फूटपाडे' म्हणून संभावना होऊ लागली.

१९३४ सालापासून बाबासाहेब आंबेडकर म्युनिसिपल कामकरी संघाचे अध्यक्ष या नात्याने मुंबई महापालिकेच्या कामगारांच्या प्रश्नात स्वतः लक्ष घालू लागले. कामकरी संघाचे सरचिटणीस गं. नी. ऊर्फ बापूसाहेब सहस्रबुद्धे आणि सहचिटणीस गणपतबुवा जाधव यांच्यासह कामगार वस्तीतील चाळीचाळीत फिरून ते कामगारांची गाऱ्हाणी ऐकून घेत असत. कामगार चळवळीचे कम्युनिस्ट नेते दलित कामगारांच्या सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असल्याने ते सोडवण्यासाठी अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींतील कामगारांनी स्वतंत्र संघटना स्थापन करावी असे त्यांचे मत होते. कामगार म्हणून त्यांना काही हक्क मिळण्यापूर्वी माणूस म्हणून काही हक्क मिळणे आवश्यक आहे अशी त्यांची धारणा होती. आणि अस्पृश्यांना साधे माणुसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी कामगार चळवळीचे कम्युनिस्ट नेते लढा तर पुकारीत नव्हतेच. उलट

सवर्ण कामगारांचा पाठिंबा गमावू या भीतीने ते अशा प्रश्नांविषयी मौन पाळीत होते. कामगारचळवळीत डॉ. आंबेडकर फूट पाडीत आहेत असा अरोप करणाऱ्यांना आणि जगातले सारे कामगार एक आहेत या तत्त्वज्ञानाचा जयघोष करणाऱ्यांना जनताकारांनी चार सवाल विचारले : (१) रेल्वे अस्पृश्य कामगारांना चहा किंवा फराळ करण्याचा मज्जाव का करण्यात येतो ? (२) रेल्वे मालकीच्या विहिरी, बावड्या अस्पृश्य कामगारांना पाणी भरण्यासाठी का देण्यात येत नाहीत ? (३) मोठमोठ्या स्टेशनवर अस्पृश्य पोर्टरना नोकरीवर ठेवण्याच्या बाबतीत बरेच ब्राह्मण स्टेशनमास्तर का विरोध करतात ? (४) अस्पृश्य कामगारातील लायक कामगारांना वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळविण्याच्या बाबतीत स्पृश्यवर्गीय लोक जाणूनबुजून अडथळा का करतात ?[१४] मनमाडला भरलेल्या अस्पृश्य रेल्वे कामगारांच्या परिषदेत केलेल्या इंग्रजी भाषणाचा श्रोत्यांना मराठीत सारांश सांगताना अस्पृश्य कामगारांना कशी संधी नाकारली जाते याचे यथार्थ वर्णन डॉ. आंबेडकरांनी केलेले आढळते. "गिरणीत वीव्हिंग खात्यात काम करणाऱ्यांना सर्वांत जास्त पगार मिळतो; परंतु वाकबगार अस्पृश्य कामगाराला तेथे प्रवेश मिळत नाही. मराठे कामगार महारांच्या बरोबर काम करायला तयार नाहीत. अस्पृश्य कामगारांना त्रासन खात्याशिवाय इतर खात्यात नोकरी करणे कठीण असते. मी विद्यार्थी असताना दुपारच्या सुटीत माझ्या नातेवाइकाचे जेवण घेऊन गिरणीत जात असे. तेव्हा जी परिस्थिती पाहिली, ऐकली तीच आजतागायत चालू आहे. गिरण्यांतून काम करणाऱ्या अस्पृश्य कामगाराला मोठ्यातली मोठी नोकरी म्हणजे तेलवाल्याची. जॉबर, मास्तरच्या नोकऱ्या त्यांना मिळणे अशक्य. रेल्वेमध्ये गँगमनच्या हुद्द्यापलीकडे त्यांच्या दर्जात क्वचितच वाढ होते. त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या नोकरीत अवघे १०–१५ लोक सापडतील. काहीजण पोर्टर. त्यांना स्टेशनमास्तरच्या घरातील कामे करावयाची असतात. सरकारच्या दडपशाहीला एखादेवेळेस संपाशिवाय अन्य इलाज नसेल तेव्हा मीच आमच्या अस्पृश्य कामगारांना अखिल कामगारवर्गाच्या लढ्यासाठी सार्वत्रिक संपात सामील व्हा असे सांगेन; परंतु केवळ स्पृश्य कामगारांच्या हितासाठी, त्यांच्या हक्कांपेक्षा तुम्ही प्रथम आपल्या माणुसकीच्या हक्कांचे संरक्षण करा."[१५] कामगारांना संप करण्याचा अधिकार असला तरी "वेळीअवेळी संपाचे शस्त्र हाती घेऊन भागणार नाही." असे बाबासाहेबांचे मत होते. मनमाडच्या परिषदेनंतर अस्पृश्य रेल्वे कामगारांनी वेगळी संघटना स्थापन न करता जी. आय. पी. रेल्वे स्टाफ युनियनमध्ये सामील होण्याचे ठरवले. या कामगार संघटनेचे चिटणीस एस. सी. जोशी हे नेमस्त कामगार नेते स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद होते.

मनमाडची परिषद भरली तेव्हा खेर मंत्रिमंडळाने तयार केलेल्या औद्योगिक कलहासंबंधीच्या विधेयकाचा मसुदा लोकमत अजमावण्यासाठी प्रसृत करण्यात आला होता. १७ ऑगस्ट १९३७ रोजी खेर मंत्रिमंडळाने घोषित केलेल्या कामगारविषयक

धोरणानुसार हा मसुदा तयार करण्यात आला असल्याचे काँग्रेस पक्षाचे म्हणणे होते. शक्यतो संप आणि टाळेबंदी यांना प्रतिबंध करता यावा या उद्देशाने हे विधेयक तयार करण्यात आले होते. कामगारांनी संप पुकारण्यापूर्वी किंवा मालकांनी टाळेबंदी जाहीर करण्यापूर्वी समेटाचे प्रयत्न करणे उभय पक्षांना बंधनकारक करण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली होती. सरकार त्यासाठी रजिस्ट्रारांची आणि साहाय्यक रजिस्ट्रारांची नियुक्ती करणार होते. रजिस्ट्रारच्या निर्णयाविरुद्ध औद्योगिक न्यायालयाकडे अपील करण्याचा अधिकार देण्यात आला होता. समेट मंडळाचे तसेच औद्योगिक लवाद न्यायालयाचे प्रमुख म्हणून उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची नेमणूक करण्याची तरतूदही करण्यात आली होती. २ सप्टेंबर १९३८ रोजी बाळासाहेब खेरांनी हे विधेयक मुंबई विधानसभेत सादर केल्यानतर कामगारनेते रामभाऊ खेडगीकर, एस. एच. झाबवाला, जमनादास मेहता, शामराव परुळेकर वगैरेंनी विधेयकावर कडाडून टीका केली. काँग्रेसपक्षातर्फे स. का. पाटील, कन्हय्यालाल मुन्शी, हरिभाऊ पाटसकर वगैरेंनी त्याची तरफदारी केली.

१५ सप्टेंबर १९३८ रोजी विधानसभेत विधेयकावर बाबासाहेब आंबेडकरांनी घणाघाती हल्ला चढवला. ह्या विधेयकामुळे "संप करणे हा गुन्हा ठरवून काँग्रेस सरकारने कामगारांवर गुलामगिरीच लादली आहे" अशा शब्दात विधेयकाचा धिक्कार करून त्यांनी त्यास 'कामगारांचे नागरिक स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा' म्हटले. कायदा अंमलात आल्यानंतर एक वर्षापर्यंत कामगारांना संप करण्याची बंदी केली जाणार होती. त्यानंतरही समेटाचे प्रयत्न केल्याखेरीज संप पुकारण्यास बंदी करण्यात आली असल्याने किमान सहा महिन्यांचा काळ गेल्यानंतरच कामगारांना संप करणे शक्य होणार होते. या तरतुदी कामगारांना जाचक ठरतील अशी बाबासाहेबांना खात्री वाटत होती. हा मुद्दा स्पष्ट करताना बाबासाहेब विधानसभेत म्हणाले, "कामगार चळवळीत विशेष असा मी भाग घेतलेला नसल्यामुळे संपाकरता कामगारांचे संघटन करण्यास कामगार पुढाऱ्यास प्रत्यक्ष कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते याची मला तितकीशी कल्पना नाही; परंतु मुंबई शहरातील कामगार चळवळीच्या माझ्या अभ्यासावरून मी असे खास सांगू शकतो की, चार महिन्यांच्यावर कामगारांना डांबून ठेवल्यानंतर संपाच्या तयारीसाठी परत संघटना करण्यास दोन महिन्यांचा अवधी अगदीच अपुरा आहे."[१६] १९२९ सालच्या औद्योगिक कलह विधेयकाचा काँग्रेस नेत्यांनी काळा कायदा म्हणून धिक्कार केला होता. त्या कायद्यातील संपबंदीसंबंधीचे कलम फक्त लोकोपयोगी ( Public Utilities ) उद्योगधंद्यांनाच लागू करण्यात आले होते. याउलट खेर मंत्रिमंडळाने सादर केलेल्या औद्योगिक कलह विधेयकान्वये सर्वच उद्योगधंद्यांतील संप बेकायदेशीर ठरणार होते. त्यामुळे इंग्रज नोकरशहांनी केलेल्या कायद्यापेक्षाही काँग्रेस मंत्रिमंडळाने तयार केलेला कायदा अधिक

प्रतिगामी आहे असे बाबासाहेबांचे म्हणणे होते.

१९ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर १९३८ या काळात विधेयकावर कलमवार चर्चा करण्यात आली. विधानमंडळातील बहुमताच्या जोरावर काँग्रेसला विधेयक उभय सभागृहांत मंजूर करून घेण्यात अडचण येणार नाही हे ओळखून कामगारांचा एक दिवसाचा सार्वत्रिक संप घडवून आणण्याची कल्पना पुढे मांडण्यात आली. एप्रिल १९३८ मध्ये कामगार चळवळीतील फूट सांधण्यात येऊन ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस आणि ना. म. जोशींच्या नेतृत्वाखालची नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन या दोन संघटनांचे एकीकरण झाले होते. कोमिंटर्न या कम्युनिस्टांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या सातव्या काँग्रेसमध्ये ठरल्याप्रमाणे हिंदुस्थानातील कम्युनिस्ट संयुक्त आघाडी स्थापन करण्याचे राजकारण खेळत होते. डांग्यांच्या संपादकत्वाखाली 'क्रांती' साप्ताहिक ४ सप्टेंबर १९३७ पासून पुन्हा सुरू करण्यात आले होते. त्याच्या जोडीला सावळाराम मिरजकरांच्या संपादकत्वाखाली 'नॅशनल फ्रंट' नावाचे वृत्तपत्र १८ जानेवारी १९३८ पासून सुरू करण्यात आले. पुनर्रचित ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या मुंबई प्रांतिक शाखेचे अध्यक्ष जमनादास मेहता होते तर मिरजकर सर-चिटणीस आणि केशवराव जोगळेकर संयुक्त चिटणीस होते. ८ सप्टेंबर १९३८ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद असलेले आमदार शामराव परुळेकर आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेत भाग घेऊन युरोपातून परतले तेव्हा डांग्यांच्या 'क्रांती' पत्राला दिलेल्या मुलाखतीत शामरावांनी औद्योगिक कलह विधेयकाला विरोध म्हणून एक दिवसाचा सार्वत्रिक संप करावा अशी सूचना केली. कामगारांच्या संपाच्या हक्कावर गदा आणणारे काळे विधेयक हाणून पाडण्यासाठी १७ ऑक्टोबर १९३८ रोजी एक दिवसाचा सार्वत्रिक संप करावा असे बाबासाहेब आंबेडकरांनीही जाहीर आवाहन केले.

या संपाची पूर्वतयारी करण्यासाठी म्हणून दोन ऑक्टोबरला आयोजित करण्यात येणार असलेली कामगारांची परिषद प्रचंड पर्जन्यवृष्टीमुळे १६ ऑक्टोबरपर्यंत लांबणीवर टाकावी लागली. मात्र १६ ऑक्टोबरला पन्नास हजार कामगारांच्या उपस्थितीत पार पडलेल्या परिषदेने ७ नोव्हेंबर १९३८ ही सार्वत्रिक संपाची तारीख मुक्रर केली आणि डांगे पति-पत्नी, बी. टी. रणदिवे, मिरजकर, जोगळेकर, निंबकर, खेडगीकर, जमनादास मेहता, शामराव परुळेकर, द. वि. प्रधान, मडकेबुवा आणि बाबासाहेब आंबेडकर यांनी गिरणगावात सभांचा धूमधडाका सुरू केला. घोडपदेव हा भाग स. का. पाटलांचे चेले बोरकरदादा यांचा बालेकिल्ला होता. संपाचा प्रचार करणाऱ्या कामगार कार्यकर्त्यांवर तेथे दगडफेक करण्यात आली. तेव्हा जखमी झालेल्या कामगारांचे रक्ताने माखलेले कपडे जमनादास मेहतांनी सभेत हजारो श्रोत्यांना दाखवले. ६ नोव्हेंबर १९३८ रोजी भरलेल्या प्रचंड जाहीर सभेत एक लाख काम-गारांसमोर डांगे, मिरजकर, परुळेकर, जमनादास मेहता आणि बाबासाहेब आंबेडकर

यांनी भाषणे केली.

स्वतंत्र मजूर पक्ष आणि कम्युनिस्ट यांच्या युतीमुळे सार्वत्रिक संप होणार असा रंग दिसू लागताच मुंबई प्रांतिक काँग्रेसने कामगार चळवळीत काम करणाऱ्या आणि काँग्रेसचे सभासद असलेल्या रॉयवाद्यांनी तसेच काँग्रेस समाजवादी गटाच्या मंडळींनी संपात भाग घेतल्यास त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाबद्दल कृती केली जाण्याची धमकी दिली. त्यामुळे सार्वत्रिक संप घडवून आणण्यासाठी नेमलेल्या कृतिसमितीचे एक सदस्य आणि मानवेंद्रनाथ रॉय यांचे निकटचे सहकारी वसंतराव कर्णिक यांनी कृतिसमितीच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. ३ नोव्हेंबर १९३८ रोजी मुंबई प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसच्या सरचिटणिसांना कर्णिकांनी पत्र लिहिले, "कृतिसमितीच्या सदस्यत्वाचा मी राजीनामा देत आहे. संपात भाग घेणाऱ्या काँग्रेसजनांविरुद्ध मुंबई प्रांतिक काँग्रेस शिस्तभंगाची कृती करणार आहे. संपात भाग घेण्यासंबंधी काँग्रेसजनांवर घातलेली बंदी ही मला अनावश्यक वाटते तरीही काँग्रेसचा सभासद म्हणून मला ती मोडता येणार नाही. औद्योगिक कलह विधेयक हे माझ्या मते अत्यंत घृणास्पद आहे. तरीही काँग्रेसमध्ये राहूनच मला कामगारांची अधिक परिणामकारकरीत्या सेवा करता येईल असे वाटते."[१७]

'काँग्रेस सोशॅलिस्ट' या साप्ताहिकाच्या १६ ऑक्टोबर १९३८ च्या अंकात मिनू मसानींनी सार्वत्रिक संपाच्या संयोजकांच्या हेतूविषयी संशय व्यक्त केला. मसानी अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेसच्या सर्वसाधारण परिषदेचे सदस्य होते. त्यांनी संपाविरुद्ध मत व्यक्त केलेले पाहून कृतिसमितीने त्यांचा निषेध करणारा ठराव तावडतोब मंजूर केला. मसानी कामगारांचा विश्वासघात करीत आहेत आणि चळवळीशी बेइमान होत आहेत असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला. त्याला धाडलेल्या उत्तरात मसानींनी कामगारांचे निदर्शन तसेच सभांतील प्रचार काँग्रेसविरोधी होत आहे आणि त्यावर डॉ. आंबेडकरांसारख्या कडव्या काँग्रेस विरोधकाचे वर्चस्व आहे असे म्हटलेले दिसते.[१८] औद्योगिक कलह विधेयक मांडले गेले तेव्हा धुळ्याच्या गिरणीमालकाने टाळेबंदी जाहीर केली असल्याने तीन हजार कामगार बेकार झाले होते. धुळे आणि अंमळनेर येथील संपाचे नेतृत्व करणारे साने गुरुजी, नथुभाऊ पारोळेकर या काँग्रेसजनांनी औद्योगिक कलह विधेयकामुळे कामगारांचा संपाचा हक्क हिसकावून घेतला जात आहे आणि मालकांचे काँग्रेस सरकारवर दडपण आहे अशी जाहीर सभा घेऊन उघडउघड टीका चालवली होती. त्यांनाही महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने शिस्तभंगाबद्दल कारवाई करण्याचा इशारा दिला होता.

अशा वातावरणात ७ नोव्हेंबरला मुंबईत सार्वत्रिक संप करण्यात आला. त्या दिवशी सकाळीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बॅ. जमनादास मेहता या दोघांनी गिरणगावात ठिकठिकाणी जाऊन स्वयंसेवकांना सूचना दिल्या. स्वयंसेवकांमध्ये सुभेदार

संवादकरांनी प्रशिक्षण दिलेल्या समता दलाच्या दोन हजार स्वयंसेवकांचा मुख्यतः भरणा होता. कम्युनिस्टांचे तेव्हा असे सुसंघटित स्वयंसेवक दल नव्हते. डॉ. आंबेडकरांना त्या दिवशी न्यायालयात एका अशिलाच्या बाजूने युक्तिवाद करावयाचा असल्याने कामगारविभागाची फेरी आटोपून बाबासाहेब सकाळी साडेनऊच्या सुमारास घरी गेले आणि तेथून न्यायालयात गेले. त्यानंतर डिलाईल रस्त्यावर दगडफेक झाली आणि खवळलेल्या जमावाला पांगवण्यासाठी एल्फिन्स्टन गिरणीसमोर पोलिसांनी पहिला गोळीबार केला. गृहमंत्री मुन्शींच्या मोटारीच्या काचा फोडण्यात आल्या. स्प्रिंग गिरणी आणि डेव्हिड ससून गिरणीच्या चाळीजवळ झालेल्या गोळीबारात भैरू रावजी चव्हाण मृत्युमुखी पडले तर भागोजी वाघमारे यांना जखमी अवस्थेत औषधोपचारासाठी इस्पितळात दाखल केल्यानंतर मरण आले. लाठीहल्ल्यात आणि गोळीबारात जखमी झालेल्यांची संख्या ६३३ होती.

सरकारच्या आणि गिरणीमालकांच्या म्हणण्यानुसार एक दिवसाचा हा सार्वत्रिक संप अंशतः यशस्वी झाला होता. रेल्वे, ट्राम तसेच कंपन्यांचे कामगार संपात सामील झाले नव्हते. बस आणि टॅक्सी वाहतूक नेहमीप्रमाणे सुरू होती. 'सँढर्स्ट रोडवरचे काही घाटी सोडले" तर अन्य व्यवसायातील बाकीचे कामगार संपात सामील झाले नव्हते असे गृहमंत्री मुन्शी यांनी विधानपरिषदेत सांगितले.[१९] संपावर गेलेल्या सफाई कामगारांची संख्या काही शेकड्यांनी मोजावी लागली तरी मुख्यतः संप कापड गिरण्यांपुरता मर्यादित होता आणि तेथेही एकूण १,१६,८०४ कामगारांपैकी ६५,११४ कामगार कामावर आले होते असे मुन्शींचे म्हणणे होते. मुन्शींनी कामावर असलेल्या बहुसंख्य रेल्वेकामगारांची आकडेवारी देण्याची खरे म्हणजे आवश्यकता नव्हती. कारण एस. सी. जोशी यांनी विधानपरिषदेत म्हटल्याप्रमाणे मुंबई सरकारचे औद्योगिक कलह विधेयक त्यांना लागू होत नसल्याने त्यांना संपात सामील होण्याचे आवाहन संपनेत्यांनीच केले नव्हते. मुंबई प्रांतात धुळे व अंमळनेर या शहरातील गिरण्यांतील संप यशस्वी झाला होता तर जळगाव, गोकाक, सोलापूर आणि अहमदाबाद येथील कापडगिरण्यातील बहुसंख्य कामगार संपात सामील झाले नव्हते असे सरकारचे म्हणणे होते. सरदार वल्लभभाई पटेलांनी संपानंतर खास पत्रक काढून फक्त पंचवीस टक्के कामगार संपात सामील झाले असल्याने संपाला फारसे यश मिळाले नाही असे म्हटले तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी "वल्लभभाईंचे हे म्हणणे धडधडीत असत्य असल्याचे एक पत्रक काढून जाहीर केले. गृहमंत्री मुन्शींनी मुंबई विधानपरिषदेत दिलेली आकडेवारी खरी धरली तरी संपात सामील झालेल्या कामगारांची एकूण संख्या ५१,६९० होत होती. म्हणजेच एकूण १,१६,८०४ कामगारांपैकी जवळजवळ अठ्ठेचाळीस टक्के कामगारांनी संपात भाग घेतला होता. याचा अर्थ सरदार पटेलांनी पत्रकात नमूद केलेली टक्केवारी सरकारी माहितीच्या आधारेच असत्य ठरत होती. संपाच्या दिवशी

७ नोव्हेंबर १९३८ रोजी संध्याकाळी कामगारांची एक जंगी जाहीर सभा झाली. त्यातही बाबासाहेबांनी भाषण करून संपाला प्रतिसाद देणाऱ्या हजारो कामगारांचे अभिनंदन केले. संपाच्या दिवशी झालेल्या गोळीबाराची चौकशी करा अशी बाबासाहेबांनी मागणी केली. खेर मंत्रिमंडळाने ती मान्य केली आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एच. जे. कनिया यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमली. सेवानिवृत्त न्यायमूर्ती विकाजी तारापोरवाला आणि बॅ. एम. सी. छगला हे या समितीचे सदस्य होते आणि एच. के. चैनानी हे आय. सी. एस. अधिकारी समितीचे चिटणीस होते. स्वातंत्र्योत्तर काळात कनिया हे सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सरन्यायाधीश बनले आणि छगला तसेच चैनानी यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीशपद भूषविले. समितीच्या सदस्यांच्या कायदेपांडित्याबद्दल त्यांच्या विरोधकांनाही शंका नव्हती. तरी अन्य कारणांमुळे त्यांच्या नेमणुकीस हरकत घेण्यात आली. न्यायमूर्ती कनिया हे मुंबईतील एका बड्या गिरणीमालकाचे जावई असल्याने त्यांनी या समितीचे अध्यक्षपद स्वीकारावयास नको होते असे विरोधकांचे म्हणणे होते.[२०] तारापोरवाला हे फार वृद्ध झाले होते तर छगला हे काँग्रेसच्या गोटातले समजले जात असत. समितीची कार्यकक्षा ठरवून देताना सरकारी ठरावात करण्यात आलेली विधाने विरोधकांना आक्षेपार्ह वाटली. २५ नोव्हेंबर १९३८ रोजी जमनादास मेहतांनी तशा आशयाचे पत्र समितीला धाडले आणि त्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या मुंबई प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसच्या सभेत समितीशी सहकार्य करू नये असा निर्णय घेण्यात आला. स्वतंत्र मजूर पक्ष, लाल बावटा फडकविणारी गिरणी कामगारांची युनियन तसेच तत्सम अन्य कामगार संघटनांनीही समितीशी असहकार करण्याचे धोरण स्वीकारले. समितीने पाठविलेल्या प्रश्नमालिकेला यापैकी कोणीच उत्तर पाठविले नाही त्याचप्रमाणे ३ जानेवारी ते ११ जानेवारी १९३९ पर्यंत समितीने जाहीररीत्या नोंदवलेल्या साक्षीपुराव्यात त्यांच्या प्रतिनिधींनी साक्षीही दिल्या नाहीत.

कनिया समितीच्या अहवालात डॉ. आंबेडकर आणि त्यांचे अनुयायी यांच्यावर टीका करण्यात आली होती. फेब्रुवारी १९३९ मध्ये होणाऱ्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर डोळा ठेवून संपाचे निमित्त करून बाबासाहेबांनी काँग्रेस उमेदवारांना मते देऊ नका असे कामगारांना ७ नोव्हेंबर रोजी सांगितले असे समितीने म्हटले आणि डॉ. आंबेडकरांनी संपाचा निवडणूक मोहिमेचा एक भाग म्हणून उपयोग केला अशी टीका केली.[२१] जबरदस्ती केल्याशिवाय संप यशस्वी होणार नाही हे ओळखून संपनेत्यांनी हिंसक कृत्ये करण्याची आपल्या अनुयायांना चिथावणी दिली असा निष्कर्षही समितीने काढला. संपाच्या आदल्या दिवशी म्हणजे ६ नोव्हेंबर १९३८ रोजी दोन लॉऱ्यांमधून काँग्रेसच्या देशसेविका परळच्या रस्त्याने जात असताना एका सायकलवाल्याने आडवे येऊन लॉऱ्या रोखल्या आणि काँग्रेसच्या काही स्त्री-

कार्यकर्त्यांना शिवीगाळ केली. तेव्हा जमलेल्या जमावातील काहींनी या देशसेविकांचे पदर ओढले असे समितीने अहवालात नमूद केले. संपाच्या दिवशी वरळीला खादी टोपी जाळण्यात आली आणि काँग्रेसचा झेंडा पायाखाली तुडवण्यात आला असे चौकशी समितीला आढळले. सकाळी कामगार विभागात फेरी मारून आल्यानंतर डॉ. आंबेडकर घरी गेले आणि तेथून उच्च न्यायालयात गेले. त्यांनी दिवसभर संप करणाऱ्या कामगारांबरोबर राहून त्यांना मार्गदर्शन करावयास हवे होते असे काँग्रेसवाल्यांचे म्हणणे होते. डॉ. आंबेडकर न्यायालयात खटला चालवण्यासाठी गेल्यानंतर दंगलीला सुरुवात झाली. त्यांच्या समता दलातील स्वयंसेवकांनी दुकानांची लुटालूट तसेच अन्य हुल्लडबाजीचे प्रकार थांबवण्यासाठी काहीही केले नाही असे समितीने अहवालात नोंदविलेले आहे. संपाला जे काही यश मिळाले ते आंबेडकरांच्या सुसंघटित स्वयंसेवक दलामुळे हे समितीला मान्य होते.[२२] ते संपात सामील झाले नसते तर संप पाच टक्केही यशस्वी झाला नसता असा एका साक्षीदाराचा हवाला देऊन समितीने म्हटले आहे. कापडगिरण्यांतील सर्वच्या सर्व अस्पृश्य कामगार म्हणजे समितीच्या म्हणण्यानुसार पंधरा हजार अस्पृश्य कामगार संपात सहभागी झाले होते. तसेच महापालिकेच्या अस्पृश्य कामगारांपैकी पन्नास टक्के अस्पृश्य कामगारांनीही संपात उडी घेतली होती असे समितीने कबूल केलेले आहे.

गिरणगावात ठिकठिकाणी झालेल्या दगडफेकीत कम्युनिस्टांप्रमाणेच स्वतंत्र मजूर पक्षाच्या स्वयंसेवकांनीही भाग घेतला. एवढेच नव्हे तर शापूरजी गिरणीत कामावर जात असलेल्या साठ विणकरांवर त्यांनी लाठ्याकाठ्यांनी हल्ला चढवला असे समितीने अहवालात नोंदविलेले आहे. काळाचौकीच्या पंचवीस-तीस अस्पृश्य कामगारांनी कामावर जाणाऱ्या स्त्रियांना घेरले आणि म्हटले, " जर मराठे तुम्हाला खायला घालू शकत नसतील, तर आमचे आंबेडकर ते करतील. बायांना महारांच्या ताब्यात द्या." गणेशवाडीलगतच्या गल्लीत समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनी चाळीस-पन्नास स्त्रियांना अडवून सांगितले, " आता बाबासाहेबांचे राज्य आहे. तुम्हाला पैसे हवे असतील तर ते तुम्हाला देतील, पण तुम्ही कामावर जाऊ नका." कामावर जाणाऱ्या स्त्रियांना स्वयंसेवकांनी धक्काबुक्की केली एवढेच नव्हे तर गोल्ड मोहर गिरणीजवळ एका स्त्रीचे जमावाने वस्त्रहरण केले आणि त्या नग्न स्त्रीची हेटाळणी केली. अशीच वागणूक काळाचौकीजवळ दुसऱ्या एका स्त्रीला देण्यात आली असे समितीने अहवालात नमूद केलेले आढळते.[२३] हे आरोप अत्यंत गंभीर स्वरूपाचे होते. स्वातंत्र्योत्तर काळात संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या वेळी मुंबईत उसळलेल्या दंगलीच्या वेळीही गुजराती स्त्रियांचे वस्त्रहरण करून त्यांना नग्न करण्याबाबतचे बेछूट आरोप काँग्रेसनेत्यांकडून करण्यात आले होते हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. कनिया समितीने वस्तुस्थिती म्हणून नोंदविलेल्या या घटनांबाबत वादळ उठणे स्वाभाविक होते. १६ आणि १७

मार्च १९३९ रोजी कनिया समितीच्या अहवालावर मुंबई विधानसभेत चर्चा झाली, तेव्हा मुन्शींनी या घटनांबाबतचे अहवालातील परिच्छेद वाचून दाखवताच स्त्रीचे वस्त्रहरण करून त्या नग्न स्त्रीची हेटाळणी करणाऱ्यांना अटक करून तुम्ही त्यांच्यावर खटले का भरले नाहीत असा बाबासाहेब आंबेडकरांनी गृहमंत्री मुन्शींना सरळ सवाल केला.[२४] तेव्हा मुन्शींनी त्या प्रश्नाला सरळ उत्तर दिले नाही. त्यांनी फक्त अशा घृणास्पद घटना घडल्याबद्दल आपल्याला शरम वाटते एवढेच म्हटले. दंगलीत जखमी झालेल्या दोन लहान पारशी मुलांची आणि त्यांच्या विधवा आईची आपण इस्पितळात जाऊन कशी विचारपूस केली हे तपशीलवार सांगणाऱ्या गृहमंत्री मुन्शींनी जमावाने वस्त्रहरण केलेल्या स्त्रियांना भेटून त्यांचे सांत्वन केल्याचा निर्देश कोठेही आढळत नाही. असल्या आरोपांचा विधानसभेत पुनरुच्चार करण्यापूर्वी आपण ते खरे असल्याची खात्री करून घेतल्याचेही त्यांनी म्हटलेले आढळत नाही. तसेच या घृणास्पद घटनांना जबाबदार असलेल्या कोणासही पकडून त्याच्यावर खटला भरल्याचा पुरावाही सापडत नाही.

गोळीबार करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना त्यांच्या कामगिरीबद्दल बक्षीस म्हणून स्प्रिंग गिरणीच्या व्यवस्थापकाने दोनशे रुपये वाटले असल्याचा बाबासाहेब आंबेडकरांनी विधानसभेतील भाषणात आरोप केला. त्याबद्दल मुन्शींनी आपल्या भाषणात एक शब्दही उच्चारला नाही. मुन्शींच्या या मौनाबद्दल पी. डब्ल्यू. वाघ या सदस्याने त्यांना खुलासा विचारला तेव्हाही आपण या आरोपाबाबत चौकशी करू असे उत्तर देऊन मुन्शींनी वेळ मारून नेली.[२५] ७ नोव्हेंबरला पोलिसांनी केलेले गोळीबार समर्थनीय होते आणि गोळीबारास कारण झालेली परिस्थिती निर्माण करण्याबद्दल अखेर संपाचे मार्गदर्शन करणाऱ्या कृतिसमितीला जबाबदार धरले पाहिजे असा कनिया समितीने निष्कर्ष काढला होता. समितीच्या या निष्कर्षाचे खंडन करताना बाबासाहेबांनी विधानसभेत मुन्शींना आव्हान दिले, "हिंसेला चिथावणी दिल्याबद्दल कृतिसमितीच्या सभासदांवर खटले भरण्यास गृहमंत्री तयार आहेत काय? माझा कृतिसमितीशी संबंध असल्याने मी माझ्यावर खटला भरल्यास त्याला तोंड द्यायला तयार आहे अहवालातील पुराव्यावर ज्याचा विश्वास असेल आणि ज्याच्याजवळ माझ्यावर खटला भरण्याचे धैर्य असेल अशा कोणाही इसमाने पुढे यावे आणि माझ्यावर खटला भरावा. कायद्याने मी दोषी ठरलो तर त्याबद्दल होणारी शिक्षा भोगण्यास मी तयार आहे."[२६] या आव्हानाला उत्तर देताना मुन्शी म्हणाले, "माझी त्यांच्यावर खटला भरण्याची तयारी आहे का असे त्यांनी मला विचारले. त्यांनी आक्षेपार्ह भाषणे केली तर मी निश्चितच त्यांच्यावर खटला भरेन. पण सभापती महोदय ते इतके निष्णात वकील आहेत की ते आक्षेपार्ह भाषण करणार नाहीत. त्यांनी वाट पाहावी. माणसांचे हुतात्मे बनविण्यासाठी योग्य ती वेळ व पद्धत सरकार निवडल्याशिवाय राहणार

नाही.''[२७] तत्कालीन कायद्याची बंधने पाळून बाबासाहेब भाषणे करीत असल्याने त्यांना कायद्याच्या कचाट्यात पकडणे कठीण असल्याची स्वतः अग्रगण्य कायदेपंडित असलेल्या मुन्शींना पुरेपूर कल्पना होती.

मात्र बाबासाहेबांना धडा शिकवण्याची संधी मिळाली नाही तरी त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद असलेल्या आमदार शामराव परुळेकरांवर खटला भरून त्यांना तुरुंगात पाठवण्याचा सरदार पटेल, खेर, मुन्शी वगैरे काँग्रेसनेत्यांचा इरादा होता असे दिसते. शामराव परुळेकर तेव्हा सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद या नात्याने ना. म. जोशींचे सहकारी म्हणून अंबरनाथच्या आगपेट्या बनविण्याच्या कारखान्यातील कामगारांच्या संघटनेचे नेतृत्व करीत असत. कारखान्याच्या मालकांनी त्यांच्यावर अनेकदा खटले भरले होते, पण त्यातून शामराव सहीसलामत सुटले होते. त्यांना त्यांपैकी एकाही खटल्यात तुरुंगवासाची सजा फर्मावण्यात आली नव्हती. ७ नोव्हेंबर १९३८ या संपाच्या दिवशी शामराव परुळेकर त्यांची प्रकृती बरी नसतानाही अंबरनाथला गेले आणि अंबरनाथला कोणताही गैरप्रकार घडणार नाही याची त्यांनी दक्षता घेतली. शामरावांनी त्या दिवशी केलेल्या भाषणात हिंसेला उत्तेजन देणारे उद्‌गार काढले अशी सभेला हजर असलेल्या अंबरनाथ काँग्रेस समितीच्या चिटणिसांनी आणि ठाणे जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. परांजपे यांनी तक्रार केली. त्या आधारे सरकार परुळेकरांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा विचार करीत असल्याचे बाळासाहेब खेरांनी ना. म. जोश्यांना पत्र लिहून कळवले.[२८] ना. म. जोश्यांनी खेरांना उत्तर धाडले नाही. मात्र परुळेकर त्या भाषणात नक्की काय म्हणाले अशी खुद्द महात्मा गांधींनी विचारणा करताच नारायणराव जोश्यांनी परुळेकरांना ते भाषण लिहून देण्यास सांगितले. त्यांच्यामार्फत परुळेकरांनी लिहून पाठवलेल्या मजकुराची भाषा सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या सदस्याच्या तोंडी शोभणारी नाही असे जरी गांधीजींना वाटले तरी कायद्याच्या दृष्टीने महात्माजींना ती आक्षेपार्ह वाटली नाही. त्यामुळे परुळेकरांवर खटला भरण्याचा विचार मुंबई काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने सोडून द्यावा असा गांधीजींनी सल्ला दिला. सरदार वल्लभभाईंना तो तितकासा रुचला नाही तरी त्यांनी गृहमंत्री मुन्शींना कळवले, " परुळेकरांवर खटला भरू नये असे बापूंना वाटते. त्यामुळे मुंबई सरकारने परुळेकरांवर खटला भरण्याचा विचार सोडून द्यावा. तुम्ही त्याप्रमाणे योग्य ती पावले उचलावीत.''[२९] शामरावांविरुद्ध तक्रार करणारे ठाणे जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. परांजपे अंबरनाथच्या एका कारखान्याचे व्यवस्थापक होते आणि जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत आपल्याला परुळेकरांनी केलेल्या प्रचारामुळे हार पत्करावी लागली अशी परांजप्यांची समजूत झाली होती. खेरीज परुळेकर काही वावगे बोलले नाहीत अशी त्या सभेस हजर असणारे सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे दुसरे सभासद ना. वि. फडके यांनीही साक्ष दिल्याने महात्मा गांधींनी परुळेकरांना संशयाचा फायदा

देण्याचे ठरवले. गांधीजींच्या आदेशानुसार परुळेकरांवर खेर मंत्रिमंडळाने खटला भरला नाही. मात्र परुळेकरांच्या वतीने ना. वि. फडक्यांनी दिलेल्या साक्षीचा बाळासाहेब खेरांवर मुळीच प्रभाव पडला नाही. फडक्यांनी केलेल्या भाषणाचा वृत्तान्तही एकदा नजरेखालून घालावा असे खेरांनी वल्लभभाई पटेलांना सुचविलेले आढळते[३०]

७ नोव्हेंबर १९३८ रोजी झालेल्या गोळीबाराच्या चौकशीसाठी कनिया समिती नेमल्यानंतर तिच्याशी संपूर्ण असहकार करण्याचा बाबासाहेबांनी घेतलेला निर्णय मात्र चुकीचा असल्याचे त्यांचे त्यांनाच लक्षात आले. ११ जानेवारी १९३९ पर्यंत कनिया समितीपुढे काँग्रेसवाल्यांनी सादर केलेला पुरावा हा स्वतंत्र मजूर पक्षाची आणि समता सैनिक दलाची प्रतिमा कलंकित करणारा होता. दगडफेक, लुटालूट आणि स्त्रियांची विटंबना या प्रकाराबद्दल आपल्या अनुयायांना जबाबदार धरले जात आहे हे पाहून ८ जानेवारी १९३९ रोजी बाबासाहेबांनी कनिया समितीसमोर साक्ष देणाऱ्यांच्या आणि त्यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या विश्वसनीयतेबद्दल जाहीररीत्या शंका घेतली. आपण चौकशी समितीच्या कामकाजावर बहिष्कार न घालता त्यात भाग घेतला असता तर साक्षीदारांची उलट तपासणी करून त्यांचे पितळ उघडे पाडण्याची संधी आपल्याला मिळाली असती हे बाबासाहेबांच्या लक्षात आले. आपली चूक उमगल्यानंतर ती दुरुस्त करण्याचा त्यांनी अखेरच्या क्षणी प्रयत्न केला; पण तो निष्फळ ठरला. १२ जानेवारी १९३८ रोजी चौकशी समितीने आपल्या अहवालाचा मसुदा तयार करण्यास सुरुवात केली तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांचे आणि त्यांचे सहकारी स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार डी. जी. जाधव यांचे अशी दोन पत्रे समितीच्या हाती पडली. आपण ज्यांची नावे देऊ त्या साक्षीदारांना पुन्हा साक्षीसाठी बोलावण्यास समिती तयार असेल तर आपणास त्यांची उलटतपासणी घेऊ द्यावी अशी बाबासाहेबांनी समितीला विनंती केली होती.[३१] आमदार जाधव हे तर ७ नोव्हेंबरच्या दंगलीत स्वतः जायबंदी झाले होते. आपले म्हणणे ऐकून घ्यावे अशी त्यांनीही समितीला विनंती केली होती; पण समितीने दोघांनाही नकार दिला. आधी आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली असताना आणि त्यासाठी पुरेसा अवधी दिला असतानाही चौकशी समितीने पाठविलेल्या प्रश्नमालिकेला उत्तर द्यावे असे डॉ. आंबेडकरांना आणि त्यांच्या पक्षाला वाटले नाही. त्यामुळे चौकशीचे कामकाज पुरे झाल्यानंतर काही साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याबाबत डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेल्या इच्छेमागचे हेतू शुद्ध नाहीत असा अभिप्राय चौकशी समितीने अहवालात नोंदवला आणि २५ जानेवारी १९३९ रोजी अहवालावर सभासदांनी स्वाक्षऱ्या करून अध्यक्षामार्फत तो सरकारला सादरही केला. त्यामुळे विधान सभेत कपात सूचना आणून त्यावरील चर्चेत दहा मिनिटांत आपली बाजू मांडण्याखेरीज बाबासाहेबांना दुसरा पर्याय राहिला नाही.

७ नोव्हेंबरचा एक दिवसाचा सार्वत्रिक संप लढवण्यापूर्वी बाबासाहेबांनी मुंबई

महापालिकेच्या जलनिःसारण खात्यातील कामगारांचे काही प्रश्न धसास लावले होते. रविवारी काम करण्यास नकार दिल्याबद्दल दोन कामगारांना निलंबित करण्यात आले होते. ७ एप्रिल १९३८ रोजी त्याविरुद्ध कामगारांनी संप केल्यानंतर त्यांना कामावर घेतो असे महापालिकेचे अभियंते कॅमेरॉन यांनी बाबासाहेबांना उच्च न्यायालयात भेटून सांगितले. कामगारांच्या मासिक वेतनात थोडीशी वाढ मिळवून दिली होती. महापालिकेचे गोरे आयुक्त सिमिंग्टन कामगारांनी रीतसर अर्ज करून सादर केलेल्या मागण्याबाबत बोलावयास तयार नाहीत हे पाहून २ जुलै १९३८ पासून कामगार संपावर जातील अशी घोषणा करण्यात आली; पण संप सुरू होण्याच्या आदल्या दिवशी सिमिंग्टनने डॉ. आंबेडकर, मो. वा. दोंदे, प्रधान, मडकेबुवा, एस. सी. जोशी वगैरेंशी वाटाघाटी करून तडजोड घडवून आणली.[३२] दरमहा पंचवीस ऐवजी तीस रुपये पगार द्यावा अशी कामगारांची मागणी होती. सिमिंग्टनने कामगारांना दरमहा अठ्ठावीस रुपये पगार देण्याची तयारी दाखविल्याने संप टळला.

स्वतंत्र मजूर पक्षाने मध्यप्रांत-वऱ्हाडातील विडीकामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. मध्यप्रांत-वऱ्हाडच्या विधानसभेतील स्वतंत्र मजूर पक्षाचे आमदार एल. एन. हरदास यांनी १ जानेवारी १९३१ रोजी नागपुरला मध्यप्रांत वऱ्हाड विडी कामगार संघ स्थापन केला होता. तेव्हापासून विडी कामगारांचे "हक्क, हित, दर्जा व मान" वाढवण्यासाठी आणि कायदेशीर उपायांनी त्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठी हरदास, कालीचरण नंदा गवळी, रामचद्रराव फुले, सीतलप्रसाद गजभिये यांनी सतत प्रयत्न चालविले होते. मध्यप्रांत वऱ्हाडातील विडी कारखान्यात काम करणाऱ्या तीस हजार कामगारांपैकी बहुसंख्य महार जातीचे होते. विडी कारखान्यांचे नियंत्रण करणारा कायदा केलेला नसल्याने अल्प भांडवलावर गब्बर झालेले विडी कारखानदार कमी दराने मजुरी देऊन कामगारांची, विशेषतः स्त्री-कामगारांची, बिनदिक्कत पिळवणूक करीत असत. हिंदुस्थानातील कामगारांच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी नेमलेल्या बादशाही मजूर आयोगाने विडी कामगारांच्या दुर्दशेचे वर्णन केले तरी त्या आयोगाच्या शिफारशी सरकारने अंमलात आणल्या नाहीत. १९३२ साली विडी कारखान्यासंबंधीचे विधेयक रामचंद्रराव फुल्यांनी मध्यप्रांत–वऱ्हाडच्या विधानसभेत मांडलेही होते; पण ते फेटाळण्यात आले होते. विडी-कामगारांनी एक हजार विड्या वळल्यास त्यांना किमान आठ आणे मजुरी द्यावी. स्त्री-कामगारांना रात्री काम करण्यास मनाई करावी, पत्ताछाट, मोजणीछाट, झाल छाट, बंडल काट अशा मजुरीत काटछाट करण्याच्या विविध पद्धतींना बंदी घालावी वगैरे मागण्या कारखानदारांप्रमाणेच सरकारनेही धुडकावून लावण्याचे धोरण स्वीकारले होते. अस्पृश्यांमधील काही कर्तृत्ववान व्यक्तींनी मध्यप्रांत-वऱ्हाडात काही ठिकाणी विडीकारखाने काढले. या कारखान्यांचे मालकही आपल्याच जातीतील मजुरांना जी वागणूक देत ती काही निराळी नव्हती.

अस्पृश्य कारखानदारांच्या कारखान्यात तयार झालेल्या लाल झेंडा छापाच्या विड्या "आपले लोक खरेदी करीत नाहीत." अशी या अस्पृश्य जातीतील कारखानदारांची तक्रार होती. अस्पृश्य जातीतील विडीकारखानदारांनी तयार केलेल्या लाल झेंडा छापाच्या विड्या विकत घेऊन अस्पृश्य बांधवांनी मदत करावी अशी "सर्व कारखानदारांची सविनय विनंती" असल्याचे जनताकर्त्यांनी प्रसिद्ध केले होते.[३३] मध्यप्रांत–वऱ्हाडातील विडी उद्योगातील शोषित कामगारांचे प्रश्न स्वतंत्र मजूर पक्षाने सोडवण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवले तेव्हा बहुसंख्य कामगारांचे आर्थिक हितसंबंध आणि स्वजातीच्या काही विडी कारखानदारांचे आर्थिक हितसंबंध यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होणे स्वाभाविक होते. आमदार एल. एन. हरदास यांचे १९३९ च्या जानेवारीत आकस्मिक निधन झाले तरी विडीकामगारांना न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न त्यांच्या सहकाऱ्यांनी सोडून दिले नाहीत. भंडारा-साकोली या मतदारसंघातून निवडून आलेले आमदार राघव गंभीर घोडीचोर यांनी विडीकामगारांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी मध्यप्रांत-वऱ्हाडच्या विधानसभेत १९३९ च्या एप्रिलमध्ये एक विधेयक मांडले; पण त्याचेही कायद्यात रूपांतर होऊ शकले नाही.

कापड किंवा विडी यासारख्या उद्योगात तसेच नगरपालिकांच्या जलनिःसारण खात्यासारख्या विभागात जेथे अस्पृश्य कामगारांची संख्या बऱ्यापैकी होती तेथे प्रसंगी संपासारख्या निर्वाणीच्या अस्त्राचा वापर करून किंवा संप करण्याची धमकी देऊन सरकारवर आणि प्रशासकावर दडपण आणण्याचे बाबासाहेबांनी प्रयत्न केले. संप हा मूलतः नोकरीबाबतच्या मालक आणि मजूर यांच्यामधील कराराचा भंग असून संप करणे हा गुन्हा होऊ शकत नाही असे बाबासाहेबांचे मत होते. संप करण्याचा अधिकार नसतोच अशी भूमिका घेणाऱ्यांना ते बजावीत, "स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचेच संप हे दुसरे नाव आहे."[३४] मात्र ऊठसूट संप करण्याच्या ते विरुद्ध होते. संपाबद्दलचा बाबासाहेबांचा दृष्टिकोण कम्युनिस्टांच्या दृष्टिकोणापेक्षा वेगळा होता. भांडवलशाहीविरुद्ध लढण्यासाठी कामगार संघटनांनी संपाचे हत्यार वापरावे म्हणणारे कम्युनिस्ट सोविएत युनियनसारख्या देशात कामगारांना संप करण्याचा अधिकार नाही, असे म्हणत असत. त्यांच्या दृष्टीने संप करण्याचा अधिकार हा माणसाच्या स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचा अविभाज्य भाग नव्हता. समाजवादी क्रांती झाल्यानंतर कामगारांचे राज्य अस्तित्वात येत असल्याने कामगारांचा संप करण्याचा हक्क आपोआपच नाहीसा झाला असे सैद्धान्तिक दृष्ट्या समर्थन करणाऱ्या कम्युनिस्टांशी आपण या बाबतीत सहमत आहोत असे बाबासाहेबांनी कोठेही म्हटल्याचे आढळत नाही.

स्वतंत्र मजूर पक्ष आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्या एक दिवसाच्या सार्वत्रिक संपाच्या निमित्ताने झालेल्या युतीचे फलित काय हे सांगताना कम्युनिस्ट नेते कॉ. मिरजकर यांनी संपानंतर फ्री प्रेस जर्नलच्या संपादकांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे, "सुमारे

पंधरा हजार अस्पृश्य कामगार अनेक वर्षे कामगारांच्या लढ्यापासून आणि साम्राज्यवाद विरोधी संघर्षापासून दूर राहिले होते. ते प्रथमच कॉंग्रेसबरोबरच्या तसेच साम्राज्यवादाविरुद्धच्या संयुक्त राष्ट्रीय लढ्यातील स्फूर्तिदायक संदेश ऐकताना आढळले."[३५] स्वतंत्र मजूर पक्षामुळे मुंबईच्या कापडगिरणीतील सर्व अस्पृश्य कामगार कॉंग्रेसला विरोध करण्यासाठी आणि कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एकजुटीने प्रथमच लढ्यात उतरले हे खरे असले तरी या लढ्याची गणना साम्राज्यविरोधी लढ्यात करता येणार नाही.

## संदर्भ


१. वसंत गुप्ते, **लेबर मुवमेंट इन बॉंबे**, १९८१, पृ. ५२.
२. गणवीर रत्नाकर ( संपादक ) **बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फुट लेख**, १९८१, पृ. १९५
३. **कित्ता**, पृ. २००.
४. **कित्ता**, पृ. २३१–२३२
५. **जनता**, १७ फेब्रुवारी १९३४
६. वामनराव कुलकर्णी, **वेड्या मना तळमळशी**, १९८९, पृ. ६८–६९
७. **जनता**, २८ एप्रिल १९३४
८. वामनराव कुलकर्णी, **उपरोक्त**, पृ. ७०
९. हिंदुस्थान सरकार होम/पोलिटिकल : फाईल क्र. ७।२।१९३४ ( अ ) लॉर्ड ब्रेबर्न यांचे भारतमंत्री सॅम्युएल होअर यांना पत्र–२८ जून १९३४ ( ब ) सॅम्युएल होअर यांचे ब्रेबर्नना पत्र, २० जुलै १९३४
१०. एम. डी. मॉरिस, **द इमर्जन्स ऑफ अॅन इंडस्ट्रियल लेबर फोर्स इन इंडिया : अ स्टडी ऑफ द बॉंबे कॉटन मिल्स १८५४–१९४७**, १९६५, पृ. १५२.
११. पी. एन. चोप्रा, **टोवर्ड्स फ्रीडम १९३७–१९४७**, पृ. ८६५
१२. खेर पत्रव्यवहार, फाईल क्र. २ ए. डब्ल्यू. प्राइड यांचे मुंबई सरकारच्या मुख्य सचिवास पत्र, ५ ऑक्टोबर १९३७
१३. पी. एन. चोप्रा, **उपरोक्त**, पृ. १०२०
१४. **जनता**, १२ फेब्रुवारी १९३८
१५. **कित्ता**, १९ फेब्रुवारी १९३८
१६. मा. फ. गांजरे ( संपादक ) **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ४**, १९७५, पृ. २३
१७. ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस फाईल क्र. ६१, व्ही. बी. कर्णिक यांचे पत्र, ३ नोव्हेंबर १९३८.

१८. कित्ता, मिनू मसानींचे पत्र, १६ नोव्हेंबर १९३८

१९. बॉंबे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली खंड ५ : ११ ते १५ नोव्हेंबर १९३८, पृ. ७८-९२

२०. बॉंबे लेजिस्लेटिव्ह कौन्सिल डिबेट्स : खंड ५ भाग २६, १६ मार्च १९३९, पृ. १६८८

२१. गव्हर्मेंट ऑफ इंडिया : होम पोलिटिकल फाईल क्र. ५।२।३९, रिपोर्ट ऑफ द बॉंबे डिस्टर्बन्सेस एन्क्वायरी कमिटी, पृ. १६.

२२. कित्ता, पृ. २७

२३. कित्ता, पृ. २१

२४. बॉंबे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली डिबेट्स खंड ५ : भाग २७, पृ. १७३५

२५. कित्ता, पृ. १७३९

२६. कित्ता, पृ. १७२४

२७. कित्ता, पृ. १७३२

२८. खेर पत्रव्यवहार फाईल क्र. ६ (अ) ना. म. जोशींचे गांधीजींना पत्र. ५ डिसेंबर १९३८. (ब) गांधीजींचे ना. म. जोशींना पत्र, २१ डिसेंबर १९३८

२९. कित्ता, वल्लभभाई पटेलांचे मुन्शींना पत्र, २४ डिसेंबर १९३८

३०. कित्ता, बाळासाहेब खेरांचे वल्लभभाई पटेलांना पत्र, १४ डिसेंबर १९३८.

३१. होम/पोलिटिकल : फाईल क्र. ५।२।३९, पृ. ४४

३२. जनता, ९ जुलै १९३८

३३. जनता, १६ डिसेंबर १९३३

३४. महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : रायटिंग्ज अँड स्पीचेस, खंड २, १९८२, पृ. २०८.

३५. ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस, फाईल क्र. ६१, मिरजकरांचे फ्री प्रेस जर्नलच्या संपादकांना पत्र, तारीख नाही.

# ३

## स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेतकऱ्यांचे प्रश्न

ग्रामीण भागातील अस्पृश्यांसकट सर्व शेतमजुरांची आणि कर्जबाजारी कुळांची स्थिती सुधारण्यासाठी तत्कालीन कायद्यात दुरुस्त्या सुचविणारी विधेयके डॉ. आंबेडकरांनी मुंबईच्या विधानसभेत मांडली. त्यांच्या पक्षाचे कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील बळ फारच कमी असल्याने त्यांनी मांडलेली बिनसरकारी विधेयके मंजूर होण्याची सुतराम शक्यता नव्हती. तरीही विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने आणि विधेयकांच्या बाजूने लोकमत अनुकूल करून घेण्यासाठी काढलेल्या प्रचार मोहिमेमार्फत त्यांनी मुंबई इलाख्यातील शेतमजुरांच्या, वेठबिगारांच्या आणि कर्जबाजारी कुळांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडली. खेर मंत्रिमंडळाचे धोरण कसे कारखानदारधार्जिणे आहे आणि काँग्रेस, सावकारांनी आणि जमीनदारांनी चालविलेल्या शोषणास कशी आळा घालू इच्छीत नाही ते उघडकीस आणण्याचाही बाबासाहेबांनी सतत प्रयत्न केला. काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यानंतर गव्हर्नरची ९३ कलमी राजवट सुरू झाली. त्या राजवटीनेही गरीब शेतकऱ्यांवर कराचे ओझे लादून त्यांची आणखी दुर्दशा करण्याचे धोरण अनुसरले तेव्हा इंग्रज राज्यकर्त्यांच्या धोरणाचे वाभाडे काढतानाही बाबासाहेब कचरले नाहीत.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांनी मुंबई विधानसभेत दोन विधेयके मांडली. त्यांपैकी पहिले होते वंशपरंपरागत हुद्दयांसंबंधीच्या कायद्यात दुरुस्त्या सुचविणारे तर दुसरे होते खोती पद्धती नष्ट करण्यासंबंधीचे. पहिल्या विधेयकाच्या शीर्षकावरून ते सर्वसाधारण स्वरूपाचे वाटले तरी खुद्द बाबासाहेबांनी त्याबाबत खुलासा केला आहे. “ सदरहू बिल जरी सर्वसाधारण स्वरूपाचे असले तरी त्याला महार वतनात दुरुस्ती करणारे बिल असेच म्हटले आहे. कारण सदरहू बिलातील कलमे ही सर्वांशी जरी

नसली तरी बहुतांशी महारकी वतनालाच लागू पडणारी आहेत. अशाच प्रकारचे एक बिल मी सन १९२८ साली जुन्या कायदेकौन्सिलमध्ये मांडले होते. या बिलात व पूर्वीच्या बिलात एका कलमाखेरीज दुसरा काहीच फरक नाही व त्या बिलाचे पहिले वाचनही पास झाले होते, परंतु बिलाच्या काही कलमात सिलेक्ट कमिटीमध्ये महार लोकांना अनहितकारक होणाऱ्या दुरुस्त्या केल्या गेल्याने ते बिल त्या वेळी मला परत घेणे आवश्यक झाले."[1] महारवतनाबाबत साधकबाधक चर्चा करणारे पाच लेख बाबासाहेबांनी २ सप्टेंबर १९२७ ते ७ डिसेंबर १९२८ या सव्वा वर्षाच्या काळात 'बहिष्कृत भारतात' प्रसिद्ध केले होते. त्यात भर घालण्यासारखे काही राहिले नसल्याने बाबासाहेबांनी या जुन्या अग्रलेखांचेच पुनर्मुद्रण करून ते पुस्तकरूपाने १९३७ साली जनतेला सादर केले. १० डिसेंबर १९३७ रोजी 'महार आणि त्यांचे वतन अथवा विसाव्या शतकातील गुलामगिरी' या नावाने ही पुस्तिका प्रकाशित झाली आणि दोन हजार प्रतींची पहिली आवृत्ती अवघ्या पाच दिवसांनी म्हणजे १५ डिसेंबर १९३७ रोजी संपली. या दोन हजार प्रती रोख किंमत देऊन वाचकांनी विकत घेतल्या असे के. व्ही. चित्रे आणि एस. ए. उपशाम यांनी केलेल्या निवेदनात आढळते.[२] बाबासाहेबांनी १९२७–२८ साली महार वतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले आणि त्याचे समर्थन करण्यासाठी पाच लेख लिहिले त्या आधी दोन वर्षे महारवतनाचा प्रश्न मुंबई कायदेमंडळात आमदार रामचंद्र सटवाजी निकाळजे यांनी ४ मार्च १९२५ रोजी प्रथम गव्हर्नर लेस्ली विल्सनसमोर आणि नंतर मुंबई कायदेमंडळात ठराव मांडून उपस्थित केला होता.

११ ऑगस्ट १९२५ रोजी मांडलेल्या ठरावात निकाळज्यांनी मागणी केली होती, "जी इनाम जमीन महार कुटुंबातील मुख्य इसमाचे नावे असेल ती जमीन सरकारी नोकरी केल्याबद्दल त्या कुटुंबातील वारसाला शेतसारा माफ करून मोफत बक्षीस दिली जावी व सरकारी कामाकरिता प्रत्येक गावी दोन महार दरमहा वीस रुपये पगारावर नेमण्यात यावेत." बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा, सीताराम केशव बोले, सर रफीउद्दीन अहमद वगैरे सभासदांनी निकाळज्यांच्या ठरावाला पाठिंबा दिला तरी इंग्रज राज्यकर्त्यांनी ठराव फेटाळले.[३] कॅनरा नावाने ओळखल्या जाणाऱ्या मुंबई इलाख्याच्या दक्षिण भागात ६७०० खेडी होती. त्यातील प्रत्येक खेड्यात दरमहा वीस रुपये पगार देऊन दोन महार नेमावयाचे म्हटले तर किमान सव्वीस लाख रुपये सरकारला खर्च करावे लागतील असे राज्यकर्त्यांचे म्हणणे होते. याखेरीज गावकामगारांना द्यावा लागणारा पगार जमेस धरला तर निकाळज्यांच्या सूचनेच्या अंमलबजावणीसाठी मुंबई इलाख्याच्या केवळ दक्षिण भागात सरकारला पन्नास लाख रुपये खर्च करावे लागतील असे सरकारतर्फे सांगण्यात आले.

निकाळज्यांना महारवतन संपूर्णतया नष्ट व्हावे असे वाटत नव्हते. त्यात सुधारणा

करून वतनदार महारांवर होणारा अन्याय दूर करण्यावर त्यांचा भर होता. याउलट १९३७ साली बाबासाहेबांनी मांडलेल्या विधेयकात कोणावरही महारवतन सोडून देण्याच्या बाबतीत सक्ती करण्याची तरतूद केलेली नसली तरी महारवतन नष्ट करावे असेच बाबासाहेबांचे आरंभापासून मत होते आणि ते त्यांनी वतनदार महारांपासून कधी लपवूनही ठेवले नव्हते. "महारवतनात सुधारणा करण्यापेक्षा ते खालसा केलेले बरे असे आमचे स्पष्ट मत आहे. 'जन्मा आला हेला आणि पाणी वाहता वाहता मेला' हीच महाराची गत. अशा परिस्थितीत सुधारणा करून ती कायम करणे केव्हाही हितावह होणार नाही."[४] वतनामुळे महार स्वाभिमानशून्य झाले आहेत. त्यांच्यामधील महत्त्वाकांक्षा साफ गेली आहे, असे बाबासाहेबांना वाटत होते. दारातल्या शेवग्याच्या झाडावर जोपर्यंत उपजीविका होऊ शकते तोपर्यंत उदरनिर्वाहाचा दुसरा मार्ग शोधणे जरूर वाटत नाही. वतन म्हणजे महारांच्या दारातील शेवगा आहे. वेसकरकीच्या व्यसनात सापडल्यामुळे कोणीही महार दुसरा पेशा घेण्याची इच्छा करीत नाही." असे त्यांचे ठाम मत झाले होते.[५] वतन गेल्याशिवाय महारांची सुधारणा होणे शक्य नाही अशी त्यांची खात्री झाली होती.

वतनपद्धतीमुळे महारांचे जिणे सर्वस्वी पराधीन झाले आहे. त्यांच्यामधील स्वाभिमान नष्ट झाला आहे म्हणून महारवतन खालसा करून त्यांना देण्यात आलेल्या जमिनी रयताव्यात दाखल कराव्यात ही कल्पना बाबासाहेबांसमोर प्रथम राजर्षी शाहू छत्रपतींनी मांडली होती.[६] बाबासाहेबांना ती पटली होती. कोल्हापूर संस्थानापुरती ही कल्पना प्रत्यक्षात उतरवणे शाहू छत्रपतींना शक्य होते आणि त्यांनी तसे तत्परतेने केलेही. महारवतन खालसा केल्याबद्दल शाहू छत्रपतींचा गौरव करताना बाबासाहेबांनी लिहिले आहे, "कै. शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल आम्हास शंकाच आहे. त्यांना पक्केपणी कळून चुकले होते की, वतनामुळेच महारांची अधोगती झाली आणि म्हणूनच त्यांनी आपल्या अधिकाराच्या जोरावर कोल्हापूर संस्थानातील महारांची वतने जबरदस्तीने खालसा केली. वतन नष्ट होणे ही आपल्या हिताची गोष्ट आहे असे कोल्हापूर संस्थानातील महारांनी अखेर ओळखले व आमची वतने खालसा करावीत असे स्वखुशीने करवीर सरकारकडे त्यांनी अर्ज केले. वतन गेल्यामुळे कोल्हापूर संस्थानातील महारांची स्थिती सुधारली."[७] "महारकी वतन खालसा करण्याकरता जरूर पडल्यास जबरदस्ती करण्यात यावी" असे जरी बाबासाहेबांचे मत असले तरी १९३७ साली त्यांनी सादर केलेल्या विधेयकात महारवतन सोडावयाचे की नाही हे त्या त्या वतनदाराने स्वेच्छेने ठरवावे अशी सूचना करण्यात आली होती.

व्यक्तिशः ते या बाबतीत सक्ती करण्याच्या बाजूचे असले तरी त्यांनी अखेरचा निर्णय वतनदाराच्या इच्छेवर अवलंबून ठेवला होता याचे कारण महारवतन हे एक

इनाम आहे असा बहुतेक सर्व महारांचा गैरसमज होता. त्यामुळे बहुतेक महारांना साध्या रयतावाऱ्याच्या हक्कापेक्षा इनामहक्क महत्त्वाचा वाटत होता. वतनाबद्दलची महारांची जबरदस्त ओढ लक्षात घेऊन त्यांनी विधेयक तयार केले होते. त्यामुळे वतन खालसा करण्यासाठी जबरदस्ती करण्याबाबतचे आपले मत बाजूला ठेवून त्यांनी विधेयक महारांच्या गळी उतरवण्याचा आणि महार वतन नष्ट होण्यात त्यांचे कसे हित आहे हे त्यांना पटवून देण्याचा परोपरीने प्रयत्न चालवला होता. इनाम म्हणजे वंशपरंपरागत जमिनीच्या मालकीवरचा हक्क असा बहुतेक सर्व महारांनी गृहीत धरलेला अर्थ चुकीचा आहे असे बाबासाहेब बजावीत होते. महारकी वतन हे वंशपरंपरागत नाही व त्यापासून महारांना मालकी हक्काची प्राप्ती होत नाही याची ते महारांना आठवण करून देत होते. हे तथाकथित इनाम म्हणजे नोकरीबद्दल पगार देण्याचा एक प्रकार असल्याने जोपर्यंत महार काम करीत आहेत तोपर्यंत त्यांना जमिनीचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे अशी कायद्याच्या दृष्टीने त्यांची अवस्था होती. पाटील आणि कुलकर्णी या राहुकेतूंच्या युतीमुळे महाराला केव्हा निलंबित केले जाईल याचा नेम नसे. वतनदार महारांची कामे कोणती हे ठरविण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला असला तरी महारांची कामे कधीच कोणी निश्चित केलेली नसल्याने त्यांना सांगकामे आणि हरकामे नोकर म्हणून वागवण्यात येत असे. वसूल गोळा करण्याच्या बाबतीत तसेच जमिनीच्या मोजणीच्या कामात महसूल खात्याचा शिपाई म्हणून जंगलासंबंधीची कामे त्याच्यावर सोपवली जात तर मोकाट गुरे कोंडवाड्यात घालण्याचे काम तो पोलिस खात्याच्या वतीने करीत असे. तालुक्याच्या गावी जाऊन टपालाची ने-आण करणे, तेथील कार्यालयात वसूल जमा करणे वगैरे जबाबदाऱ्याही त्याला पार पाडाव्या लागत. याखेरीज सरकारी अंमलदार फिरतीवर असताना त्यांची सरबराईही त्यालाच करावी लागत असे. त्यांचा तंबू किंवा राहुटी ठोकून देणे, त्यांना हव्या असलेल्या वस्तू बाजारातून आणून देणे, त्यांचे घोडे-बैल सोडून त्यांना चंदी किंवा चारा घालणे, घोड्यांचा खरारा करणे, अंमलदाराच्या टांग्याबरोबर एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामापर्यंत धावत जाणे वगैरे कामांचीही सरकारी कामामध्ये गणना केली जात असे.

वतनदार महाराने महारकीचे काम चोवीस तास करावे अशी अपेक्षा असे. इनाम जमीन, बलुते आणि नक्त पगार अशी त्याला तीन प्रकारची उत्पन्ने असली तरी सगळे मिळून त्याला दरमहा पाचसहा रुपये मिळत असत. बलुते मिळावे म्हणून वतनदार महार शेतकऱ्याला खळी तयार करण्यात मदत करीत असे. गावात कोठे कोणी मयत झाले की त्याची वर्दी मृताच्या नातेवाइकांना देणे, अंत्यसंस्कारासाठी लागणारी लाकडे फोडून नेणे ही कामे त्याला करावीच लागत. मेलेली जनावरे ओढण्याचे काम तर त्यानेच करावयाचे अशी इतरांची समजूत होती. एवढे सगळे करूनही बलुते मिळेलच

अशी खात्री नसे. दुष्काळ पडलेला असला तर सरकार शेतकऱ्याने महाराला द्यावयाच्या बलुत्यात सूट देत असे. याउलट कालव्यासारख्या सोयीमुळे महारांच्या जमिनीपासून त्यांना मिळणारे उत्पन्न वाढले की सरकार, 'महारांना जमीन जास्त झाली' या सबबीवर त्यांच्या जमिनीचा काही भाग बेलाशक खालसा करीत असे. अनेक महारांच्या वतनी जमिनी परक्यांच्या ताब्यात गेलेल्या होत्या.

अशा स्थितीत 'काही दुष्ट सुधारणा' अंमलात आल्यास "महारांच्या मनावर योग्य परिणाम होऊन ते वतन सोडून देण्यास तयार होतील." असे बाबासाहेबांना वाटत होते. १८३९ साली बलुते उकळण्याचा पाटील आणि कुलकर्णी यांचा हक्क रद्द करण्यात येऊन त्यांना सरकारी तिजोरीतून पगार देण्यास ईस्ट इंडिया कंपनीने सुरुवात केली. तोच कित्ता इंग्रज राज्यकर्त्यांनी महारांच्या बाबतीत गिरवावा आणि महारांना सरकारी काम केल्याबद्दलचा पगार सरकारी खजिन्यातून द्यावा असे बाबासाहेबांनी सुचवले होते. महारवतनाबद्दलचे देणे बलुत्याऐवजी रोकड रकमेच्या रूपाने जमीन-महसुलाबरोबरच सरकारने शेतकऱ्यांकडून वसूल करावे असेही त्यांचे म्हणणे होते. महारांना रयतेच्या खासगी कामातून मुक्त करावे, त्यांना सरकारी नोकर म्हणून करावी लागणारी कामे नेमकी कोणती ते ठरवावे. परक्यांनी घशात घातलेल्या त्यांच्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून महारांना परत मिळवून द्याव्यात अशा तरतुदी बाबासाहेबांनी विधेयकात समाविष्ट केलेल्या होत्या. महारवतन नष्ट करण्याची मागणी स्वतंत्र मजूर पक्ष करीत असला तरी सर्व महारांनी या मागणीला एकमुखी पाठिंबा दिलेला नाही असे कारण सांगून महारवतन नष्ट करण्यास एवढेच नव्हे तर बाबासाहेबांनी मांडलेले बिनसरकारी विधेयक स्वीकारण्यास कॉंग्रेसपक्ष तयार झाला नाही. अखेर महारवतन नष्ट झाले ते बाबासाहेबांच्या मृत्यूनंतरच्या काळात आणि तेही यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखालच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळाच्या कारकीर्दीत, पण त्यासाठी वीस वर्षांहून अधिक काळ वाट पाहावी लागली.

महारांची नेमकी कामे कोणती याची निश्चित यादी तयार करण्याबाबतचा बाबासाहेबांचा आग्रह मात्र कॉंग्रेसपक्षाने मानला आणि महारांनी करावयाच्या १९ कामांची यादी महसूलमंत्री मोरारजी देसाई यांच्या संमतीने प्रसिद्ध करण्यात आली. भाऊराव गायकवाडांनी एक पत्रक काढून सरकारने नमूद केलेली १९ कामेच गावकामगार महारांनी करावीत त्याहून अधिक करू नयेत असे महारांना आवाहन केले. तेव्हा ही १९ कामेही "या समाजास जड अशी आहेत; ती कमी करण्याचा प्रयत्न व्हावा" असा ठराव करण्यासाठी अमृतराव रणखांबे आणि त्यांच्या अनुयायांनी २६ मार्च १९३९ रोजी नाशिक जिल्ह्यातल्या निफाड तालुक्यातल्या अंतरवेली या खेडेगावी सभा भरवली. या सभेत भाऊराव गायकवाडांनीही भाषण करून आपण काढलेल्या पत्रकाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला; पण तो निष्फळ ठरला; त्यांच्यानंतर भाषण करताना

अमृतराव रणखांब्यांनी भाऊराव गायकवाडांवरच ठपका ठेवला. "गावकामगारांनी १९ कामे करावीत असे यापूर्वी कधीच कोणी पत्रक काढलेले नव्हते. त्यामुळे अधिकारी लोक महार करतील तेवढी कामे करून घेत. जी त्यांनी नाकारली ती परभारे करीत असत. पण श्री. गायकवाड यांनी पत्रक प्रसिद्ध करून खेड्यातील पाटील, तलाठी वगैरे छोटेमोठे अधिकाऱ्यांना महारांचे कामासंबंधी झोपेतून जागे करून महारांना १९ कामांचे रगाड्याखाली चिरडले आहे. हे त्यांचे धोरण चुकले आहे."[१] खरे म्हणजे बाबासाहेब आंबेडकर, भाऊराव गायकवाड यांच्या प्रयत्नांमुळे खेर मंत्रिमंडळाने सरकारी गावकामगार महाराने करावयाची १९ कामे निश्चित केली होती. त्याआधी महारांना कोणतेही काम करावे लागत असे. पण आंबेडकर आणि गायकवाड यांना विरोध करण्यासाठी सज्ज झालेल्या रणखांब्यांना त्यामुळे एक पाऊल पुढे पडले असेही वाटत नव्हते. १९ कामांच्या यादीतून काही कामे कमी करावीत यासाठी आपल्या स्वतंत्र हरिजन पक्षाचे प्रयत्न चालू असल्याचे सांगून ते वतनदार महारांचा बुद्धिभेद करीत होते.

खेर मंत्रिमंडळाने राजीनामा दिल्यानंतर गव्हर्नरच्या राजवटीत वतनदार महार, मांग, वेठिया यांच्या जमिनीवर जादा जुडी ( सारा ) आकारून ती त्यांच्याकडून वसूल करण्यास सुरुवात झाली. या धोरणाचा निषेध करण्यासाठी बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली १६ डिसेंबर १९३९ रोजी हरेगावला अस्पृश्य वतनदारांची परिषद भरवण्यात आली. बाबासाहेबांनी मागण्यांचा एक खलिता तयार करून गव्हर्नरकडे धाडला; पण त्याच्यावर विचार चालू आहे असे ठरीव ठशाचे उत्तर देऊन सरकार स्वस्थ बसले. जादा जुडी न देणाऱ्या वतनदारांविरुद्ध सरकारने दिवाणी दावे लावले एवढेच नव्हे तर वसुलीसाठी काही ठिकाणी त्यांची मालमत्ता जप्त करण्याचा प्रयत्न केला. १६ ऑगस्ट १९४१ रोजी सिन्नरला भरलेल्या सभेत बाबासाहेबांनी इंग्रज राज्यकर्त्यांवर कडक टीका केली. "आजपर्यंत हिंदुधर्म आणि हिंदुसमाज यांच्यावर मी हल्ले चढवीत होतो. परंतु सरकारला मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, जितक्या निकराने मी हिंदुसमाजावर हल्ले चढविले त्याच्या शतपटीने तीव्र हल्ले सरकारविरुद्ध चढवीन. मी केव्हाही सरकारविरुद्ध बोलत नसे म्हणून माझ्यावर अनेकजण सरकारनिष्ठ, देशद्रोही, जातिनिष्ठ असे आरोप करतात. परंतु आपणा सर्वांना ही गोष्ट कबूल करावी लागेल की कोणी कितीही प्रबळ असला तरी चोहोबाजूस शत्रूवर हल्ला करू शकणार नाही. केव्हाही मी एकेका शत्रूवर हल्ला चढवून त्यांना आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करीत होतो. याच धोरणाने मी आजपर्यंतचा लढा लढवीत आलो आहे; परंतु ज्या सरकारशी आम्ही पूर्ण इमानाने वागलो ते सरकारच आता आमच्यावर उलटले आहे. वास्तविक या देशामध्ये इंग्रजांचे राज्य आम्ही आणले हे ऐतिहासिक सत्य आहे. इंग्रजांच्या बाजूने रक्त सांडून पेशवाईचा अंत आम्ही केला. ज्यांना आम्ही राज्य मिळवून दिले तेच

आता आम्हावर लाथा झाडण्यास सिद्ध झाले आहेत."[10] आपण आजपर्यंत सरकार-विरुद्ध कधी वागलो नाही, काँग्रेसच्या लढ्यात किंवा कोणत्याही दंग्यात सामील झालो नाही याची आठवण करून देऊन जादाजुडीच्या प्रश्नावर सरकारला प्रतिकार करण्याची, तुरुंगात जाण्याची बाबासाहेबांनी भाषा केली तरी इंग्रज राज्यकर्त्यांविरुद्ध त्यांना कधीच लढा करता आला नाही. युक्तिवादाने त्यांचे मन वळवून, अर्जविनंत्या करून आणि त्यांच्याशी वाटाघाटी करून त्यांनी दलितांचे प्रश्न सोडविण्याचा सदैव प्रयत्न केला.

बाबासाहेबांनी एक सावकारीनियंत्रण विधेयकही तयार करून सभागृहात मांडण्याची अनुमती मगितली होती. स्वतंत्र मजूर पक्षाने हे विधेयक बाबासाहेबांच्या नावाने एका पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध केले होते. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या बाबासाहेबांच्या लेखांच्या आणि भाषणांच्या दुसऱ्या खंडामध्ये त्यांनी मुंबई कायदेमंडळात मांडण्या-साठी पाठवलेली अन्य विधेयके समाविष्ट करण्यात आली असली तरी का कोण जाणे या विधेयकाचा त्यात समावेश करण्यात आलेला नाही. त्या खंडाच्या सापेक्षी संपाद-कांच्या नजरेतून बाबासाहेबांच्या नावे १९३८ साली प्रकाशित झालेली या विधेयका-बाबतची पुस्तिका निसटलेली दिसते. बाबासाहेबांनी तयार केलेल्या सावकारीनियंत्रण विधेयकाची काही खास वैशिष्ट्ये होती. १९३७ सालापर्यंत मध्यप्रांत-वऱ्हाड वगळता हिंदुस्थानातल्या कोणत्याही प्रांतात सावकारांच्या नावाची रीतसर नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक ठरवले नव्हते. त्याचप्रमाणे हा व्यवसाय करणाऱ्यांनी सरकार-कडून त्याबाबतचा परवाना घेतला असणे आवश्यक आहे अशी तरतूद तर हिंदुस्थाना-तल्या कोणत्याच प्रांतातील कायद्याने केलेली नव्हती.[11] बाबासाहेबांनी तयार केलेल्या सावकारी नियंत्रण विधेयकामध्ये सावकारांनी आपला व्यवसाय करण्यासाठी परवाने घ्यावेत, या परवान्याची मुदत एक वर्षापुरती असावी दर वर्षाने परवान्याचे नूतनी-करण केले जावे, सावकाराने गैरव्यवहार केल्याचे सिद्ध झाल्यास हा परवाना रद्द केला जावा, कर्ज देण्याबाबत लेखी व्यवहार करावा आणि धनकोने ऋणकोस या व्यवहारांची नोंद असलेले खाते पुस्तक द्यावे अशा अनेक अभिनव तरतुदी होत्या. बाबासाहेबांच्या या विधेयकाच्या धर्तीवर खेर मंत्रिमंडळाच्या वतीने २५ जानेवारी १९३८ रोजी गृहमंत्री कन्हय्यालाल मुन्शींनी एक विधेयक मांडले; पण ते अनेक महिने प्रवरसमितीकडे पडून राहिले होते. अखेर १९३९ च्या नोव्हेंबरमध्ये काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले त्याअगोदर काही दिवस सावकारांविषयीचे मुंबई सरकारने मांडलेले विधेयक कायदे-मंडळाने मंजूर केले.

सावकारी नियंत्रण विधेयक मंजूर करावे असे बाबासाहेबांना वाटले, कारण ते मुंबई शहरातील अस्पृश्य कामगारांच्या कर्जबाजारीपणामुळे फार व्यथित झाले होते. 'शितावरून भाताची परीक्षा' या न्यायाने त्यांना शहरी तसेच ग्रामीण भागातील सर्वच जातींच्या व धर्मांच्या गरिबांची कर्जबाजारीपणामुळे कशी परवड होते ते दिसत होते.

गोपीनाथ रा. प्रधान यांनी मुंबई शहरातील मराठी तसेच गुजराती भाषिक अस्पृश्य कामगारांची पद्धतशीर पाहणी करून त्यांच्या कर्जबाजारीपणाचे विदारक चित्र रेखाटले होते. प्रधानांनी केलेल्या पाहणीचा अहवाल 'अनटचेबल वर्कर्स ऑफ बॉंबे सिटी' या शीर्षकानिशी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला तेव्हा बाबासाहेबांनी त्यासाठी खास पुरस्कार-पर मजकूर लिहिलेला होता. प्रधानांनी आपल्या पाहणीचे निष्कर्ष जनता पत्रातही प्रसिद्ध केले होते. महापालिकेत हलालखोर म्हणून सफाईचे काम करणाऱ्या, गिरणीत त्रासन खात्यात डॉफर बॉय तारवाले किंवा हमाल म्हणून काम करणाऱ्या, रेल्वेत फाईलवाले, गॅंगमन किंवा हमाल म्हणून काम करणाऱ्या अस्पृश्य कामगारांचा पगार अत्यंत थोडा असल्याने त्यांना सारखे कर्ज काढावे लागत असे. तुटपुंज्या पगारा-मधून कर्ज फेडण्याची किंवा फिटण्याची अजिबात आशा नसे. उलट कर्ज सारखे वाढतच असे. व्यसनामुळे, उधळेपणामुळे किंवा सट्टेबाजीमुळे त्यांना कर्ज होते हे म्हणणे वस्तुस्थितिनिदर्शक नसल्याचे गोपीनाथ प्रधानांचे म्हणणे होते. अस्पृश्य कामगार पठाण, मारवाडी आणि वाणी सावकारांकडून कर्ज घेत असत. पठाण दरमहा रुपयाला चार आणे किंवा शंभर रुपयांमागे सालिना तीनशे रुपये व्याज घेत असे, मारवाडी सावकार शंभर रुपये कर्जाऊ घेतल्यास सालिना दीडशे रुपये व्याज आकारीत असे, तर वाणी ७५ रुपये व्याज घेतो असे प्रधानांना आढळले होते.[१२] सावकारांना परवाने देण्याची कल्पना मुंबईच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळाने मंजूर करून घेतलेल्या सावकारी नियंत्रण कायद्यात समाविष्ट केली होती हे खरे असले तरी मुंबई सरकारने केलेल्या कायद्यात एक महत्त्वाची उणीव राहिली होती. सावकारीचा व्यवसाय करण्यासाठी परवाना काढण्याच्या फंदात न पडणाऱ्यांना रान मोकळे ठेवण्यात आले होते. कारण हा व्यवसाय करण्यासाठी परवाना न घेणे हा कायद्याच्या दृष्टीने गुन्हा ठरविण्यात आला नव्हता.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांनी जसे महारवतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले तसेच त्याच दिवशी खोती पद्धती नष्ट करण्यासंबंधीचे विधेयकही मांडले. स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात मतदारांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्यासाठी टाकलेले ते आणखी एक पाऊल होते. जाहीरनाम्यात म्हटले होते, "सर्वसाधारणपणे जमीनदारांकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक अगर त्याजकडून जमिनीचे भागेलपण काढून घेण्याची जमीनदारांची प्रवृत्ती— विशेषतः (१) खोती व (२) तालुकदारी या पद्धतीत असणारी ही प्रवृत्ती– शेतकऱ्यांच्या हिताला विरोधी असल्यामुळे त्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे अशा स्वरूपाचे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील." मुख्यतः रत्नागिरी जिल्ह्यात तसेच कुलाबा आणि ठाणे या जिल्ह्यांच्या काही भागात आढळणारी खोती पद्धत ही मूलतः जमीन-धारा पद्धत होती. रत्नागिरी जिल्ह्यातील खोती पद्धतीचे नियमन करण्यासाठी १८८०

साली मुंबई इलाख्यात एक कायदा करण्यात आला होता तो रद्द करावा असे बाबासाहेबांनी सुचवले होते.

'वतनदार खोतांचा इतिहास' हे पुस्तक लिहिणारे एकोणिसाव्या शतकातील विख्यात कायदेपंडित रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या मते "खोत हे निझामशहाच्या इतके जुने आहेत. विजापूरकरांचे राज्य असल्यावेळेचे आहेत. शिवाजीमहारांच्या आधीचे आहेत. पेशव्यांनी त्यांच्या हक्कास मान दिला आहे."[१३] खोतीवतन हे मिराशी हक्कांप्रमाणेच वंशपरंपरा भोगले जात असे. रावसाहेब मंडलिकांनी खोतांच्या हक्कांचा सारांश सांगताना म्हटले होते, "खोत हा गावचा मालक आहे; त्यास तो गाव गहाण टाकता येतो; विकता येतो; खोती कुळांची धारेकरी कुळे बनविता येतात; आपल्या मार्फत सारा सरकारास कुळांनी द्यावा असा ठराव करून धारेकऱ्यापासून ठरलेल्या साऱ्याहून अधिक सारा घेता येत नाही व खोती कुळांपासून ठरावाप्रमाणे व जेथे ठराव नसेल तेथे झालेल्या उत्पन्नातून अर्धेल, तिर्धेल घेण्याची मामूल वहिवाट आहे. एवढ्यापर्यंत हवे तेवढे उत्पन्न घेता येते; अधिक घेता येत नाही. सरकारला खोताने कबुलायत दिली म्हणजे सरकारला ती नाकबूल करता येत नाही."[१४] भातजमिनीतून होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वरकस जमिनीतील पिकाचा एक तृतीयांश भाग खोताने कुळांकडून वसूल करावा अशी वहिवाट होती. तिलाच अर्धेल तिर्धेल घेण्याची मामूल वहिवाट म्हणत असत. याखेरीज कुळाला एका वेळचे जेवण देऊन वेठीस धरण्याचा खोताला हक्क असे. ओसाड तसेच जंगलांनी वेढलेल्या पडित व बुडीत जमिनी अपार श्रम करून आणि भांडवल खर्ची घालून लागवडीस आणल्या आणि गावेच्या गावे वसविली असे खोत आणि त्यांचे पाठीराखे म्हणत असत. खोत हे इतर मधमाश्यांनी कणशः जमविलेला मध खाणाऱ्या आळशी राणी माशीसारखे नाहीत असे म्हटले जात असे. खोतीचा हक्क फक्त ब्राह्मणांनाच बहाल केला होता हा समज चुकीचा आहे. काही गावांत मुसलमान, मराठा, कायस्थ एवढेच नव्हे तर महार जातीचेही खोत होते. महार खोतांची संख्या फारच थोडी होती. खोतांमध्ये ब्राह्मणांचा मोठा भरणा होता.

१८१८ साली मुंबई इलाख्यात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट सुरू झाल्यापासून चॅपलिन, विंगेट, एल्फिन्स्टन, ग्रँट डफ, रॉबर्टसन वगैरे इंग्रज प्रशासकांनी खोती पद्धतीचा अभ्यास चालवला होता. १८५७ च्या अयशस्वी उठावानंतर कंपनीची राजवट संपुष्टात येऊन व्हिक्टोरिया राणीचे राज्य प्रस्थापित झाले. त्यानंतर मेजर फ्रॅन्सिस, मेजर वॅडिंग्टन या अधिकाऱ्यांनी खोती पद्धतीचा अभ्यास करून सरकारला काही शिफारशी केल्या. खोत हा नुसता मध्यस्थ आहे. सारा वसूल करून तो सरकारी तिजोरीत जमा करणारा आहे असे त्यांचे मत होते. दर तीस वर्षांनी जमिनीची मोजणी करून सरकारदस्त ठरवला जात असे. १८६४ साली मंजूर करण्यात

आलेल्या रेव्हेन्यू सर्व्हे बिलाच्या म्हणजेच पैमाषीच्या कायद्यानुसार खोताने कुळाकडून किती वसूल मागावा ते ठरविण्याचा अधिकार महसूलखात्याच्या अधिकाऱ्यांना देण्यात आला होता. खोताकडून वार्षिक कबुलायत न घेता तीस वर्षे त्यांच्याकडे गाव राहू देण्याची परवानगी देण्याचे सर्व अधिकारही महसूल खात्याच्या जमाबंदी अधिकाऱ्यास ( सेटलमेंट ऑफिसर ) मिळाले होते. १८६४ च्या कायद्यान्वये सरकार खोतांचे पुरातन काळापासून मान्य झालेले हक्क हिरावून घेत आहे अशी ओरड खोतांनी तेव्हाही केली होती, आणि आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी बंगालमधील जमीनदार, संयुक्त प्रांतातील तालुकदार यांच्या पावलावर पाऊल टाकून १८६६ साली खोत हितेच्छू सभा स्थापन केली होती. खोत विरुद्ध सरकार असे कज्जे खटले अनेक वर्षे न्यायालयात लढवले गेले. खुद्द रावसाहेब मंडलिकांचा जन्म खोताच्या पोटी झालेला असल्याने त्यांनी खोतांचे वकीलपत्र घेणे साहजिक होते. सरकार आणि खोत यांच्यामध्ये मंडलिकांनी तडजोड घडवून आणल्यानंतर १८८० साली खोती वतनाचा क़ायदा करण्यात आला होता. सरकारला वेळोवेळी सारा वाढविण्याचा अधिकार आहे आणि खोतीगावासाठी सरकारने ठरवून दिलेला सारा खोताने भरलाच पाहिजे अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली होती.

त्यानंतरच्या काळातही मुंबई सरकारने या कायद्यात दुरुस्ती करून खोतांचे हक्क मर्यादित करण्याचे अधूनमधून प्रयत्न केले. त्यासाठी तयार केलेल्या विधेयकाला १८९९ साली भारतमंत्र्यांनी संमती दिली नाही. १९०३ साली पुन्हा मुंबई सरकारने खोती वतनाच्या कायद्यात दुरुस्ती करणारे विधेयक मांडले तेव्हा त्यावर खोतांची कड घेऊन झोड उठविणाऱ्यांमध्ये लोकमान्य टिळक आघाडीवर होते. १८९९ साली सरकार खोतीच्या हक्कावर घाला घालणार असे वाटताच टिळकांनी केसरीत सहा लेख लिहून खोतांची बाजू उचलून धरली होती. परके सरकार शेतकऱ्यांकडून जबर सारा वसूल करून त्याला नागवीत होते या टिळकांच्या टीकेत तथ्य होते. मात्र त्यामुळे स्वकीय खोत करीत असलेली कुळांची पिळवणूक समर्थनीय ठरणार नव्हती तशीच ती सुसह्य वाटणार नव्हती हे खोतीचे हक्क उपभोगलेल्या कुटुंबात जन्म घेतलेल्या टिळकांना जाणवलेले दिसत नाही.[१५] सारा म्हणून पिकाचा काही भाग कुळाने खोतास देण्याऐवजी रोकड रकमेच्या रूपाने त्याला सारा देण्याची कुळांना मुभा देण्यात आली होती.

१८६४ पासून खोतांच्या हक्कांना आळा घालण्याचे प्रयत्न सरकारने चालवले असले तरी कायद्यातील तरतुदी धाब्यावर बसवून खोत बिनदिक्कत कुळांचे शोषण करीत होते. १८८० च्या कायद्यान्वये कुळांचे धारेकरी, कायमची कुळे आणि उपरी कुळे असे गट पाडण्यात आले होते. धारेकऱ्यांकडून खोतास अर्धेलतिर्धेल घेता येत नसे. तसेच त्याची जमीनही काढून घेता येत नसे. कायमच्या कुळांकडून खोतास

अर्धेलतिर्धेल घेता येत असे. कायमच्या कुळांचा जमिनीवरचा हक्क वंशपरंपरागत असला तरी त्यांना जमीन विकण्याचा अधिकार नव्हता. याउलट उपरी कुळांकडून आपसात ठरलेल्या कराराप्रमाणे लागेल तितके उत्पन्न घेण्याचा खोताला अधिकार होता. त्यांची जमीनही खोत पाहिजे तेव्हा काढून घेऊ शकत असे. सर्व कुळांमध्ये सर्वांत जास्त शोषण खोत या उपरी कुळांचे करीत असे. मुंबई इलाख्याच्या दक्षिण विभागाच्या माऊंटफर्ड नावाच्या आयुक्ताने खोती पद्धतीबाबत सादर केलेल्या अहवालानुसार सत्तर वर्षांचा काळ लोटला तरी एकेकाळची उपरी कुळे ही उपरी कुळेच राहिली होती. रत्नागिरी तालुक्यातील दीडशे खेडेगावांची पाहणी करून माऊंटफर्डने आपला अहवाल सादर केला होता. त्यात त्याने म्हटले होते, "काही अपवाद सोडले तर खोतांनी कुळांची स्थिती सुधारण्यासाठी काहीही केलेले नाही. जमीनदाराची काही कर्तव्ये असतात याची त्यांना मुळीच कल्पना नाही. पिढ्यान्‌पिढ्या त्यांनी कुळांकडून सेवा करून घेतली आहे. कुळाचा ते हमाल म्हणून, लाकूडतोड्या म्हणून, नांगरट करणारा, मळणी, कापणी करणारा नोकर म्हणून उपयोग करतात. खोताच्या स्वतःच्या मालकीच्या शेतावरचे सर्व काम तो कुळांकडून करवून घेतो. पूर्वीच्या काळी कुळांना खोताला पालखीतून घेऊन जावे लागे. आठवड्यातला एक दिवस त्यांना खोताचे काम करण्यासाठी घालवावा लागतो. त्यासाठी खोत त्यांना फक्त एका वेळचे जेवण देतो. उपरी कुळाने पिकवलेल्या पिकांपैकी बऱ्याचदा निम्म्याहून अधिक भाग खोत घेतो. एका एकरात उपरी कुळाने भाताचे पीक घेतले तर किमान दहा मण तांदूळ त्याला खोताला द्यावा लागतो."[१६] खोतांनी राजरोस चालवलेली लूट असह्य झाली की काही वेळा खोत आणि कुळे यांच्यामध्ये प्रकरण हातघाईवर येत असे आणि खून केले जात.

अशा फौजदारी खटल्यात तसेच खोतांनी लावलेल्या दिवाणी दाव्यातही आरोपी कुळांच्या वतीने बाबासाहेब काम चालवीत असत. १९३४ साली उंदेरी खटला या नावाने गाजलेल्या खटल्यात प्रकृती बरी नसतानाही बाबासाहेबांनी मुंबई उच्च न्यायालयात आरोपींनी केलेल्या अपिलाचे काम चालवले होते आणि सत्र न्यायालयाने आरोपींना दिलेल्या दीर्घमुदतीच्या शिक्षा कमी करून त्यांची मुदत फक्त एक वर्षापुरती करण्यात यश मिळवले होते.[१७] कुलाबा जिल्ह्यातल्या महाड गावाजवळच्या उंदेरी गावातील खोत मुसलमान होते. या खोतांमध्ये आणि त्यांच्या कुळांमध्ये १९३३ साली धुमश्चक्री होऊन महमदखान देशमुख नावाचा खोत मारला गेला होता. त्याच्या खुनास तसेच दंगलीस जबाबदार असल्याच्या आरोपावरून २१ इसमांवर खटला भरण्यात आला. या २१ आरोपींमध्ये ३ चांभार होते तर बाकीचे सर्व महार होते. सत्र न्यायालयाने २५ डिसेंबर १९३३ रोजी दोन आरोपींना दहा वर्षे, सात आरोपींना पाच वर्षे आणि चार आरोपींना दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली होती. या आरोपींच्या बचावासाठी बाबासाहेबांचे एक ज्येष्ठ व निकटचे सहकारी

सुभेदार सवादकर यांनी एक निधी जमवला होता. त्यामुळे हे गरीब आरोपी उच्च न्यायालयात अपील करू शकले.

खोत कुळांवर कसा जुलूम करीत आहेत त्याची कहाणी सांगणारी अनेक पत्रे 'जनता' साप्ताहिकात छापलेली आढळतात. रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेड तालुक्यातल्या आंजणी गावच्या आठ शेतकऱ्यांनी आपल्या गावातील ब्राह्मण खोतांविरुद्ध गाऱ्हाणे नोंदवले होते. "प्रत्येक शेतकऱ्याला वर्षातून २४ वेठी खोताला घालाव्या लागतात. असे पाच खोत गावात असल्यामुळे वर्षातून १२० दिवस खोतांच्या वेठीसाठी खर्च होतात. दिवसभरच्या वेठीसाठी फक्त चार पैसे मजुरी देतात. कोणी विचारले तर आम्ही आठ आणे मजुरी देतो म्हणतात. चुकून आमचे ढोर खोतांच्या जमिनीत गेले की खोत त्याला कोंडवाड्यात घालतात. ढोरामागे आमच्याकडून दीड रुपया घेण्यात येतो. आमच्या गावात भोई लोकांची मोठी वस्ती आहे. त्यांच्या मालकीची जमीन असूनही खोत त्यांच्याकडून भुईभाडे वसूल करतात. आम्ही कुळांनी लावलेली झाडे फळास आली की खोत फळांवर आपली मालकी सांगतात"[१८] संगमेश्वर तालुक्यातल्या नायरी गावच्या शेतकऱ्यांनी विचारले होते, "आम्ही जगावे कसे?"[१९] खोताने सांगितलेली कामे केली नाहीत की पोलिसपाटील शेतकऱ्यालाच बेदम मारहाण करीत असे. खेड तालुक्यातल्या अंजनी गावचा पोलिसपाटील दादा अण्णा कान्हेरे हा स्वतः खोत असून सावकारीही करीत असे. गावातल्या वीस महार कुळांनी खोताची कामे करण्यास नकार दिला तेव्हा त्याने त्यांना बोलावून जाब विचारला. या वीस कुळांचा म्होरक्या लख्या गोविंद तांबे हा महार आहे असे समजून पोलिसपाटलाने हातातल्या जाड काठीने त्याला इतके झोडपले की रक्त वाहावयास लागले.[२०] मारहाणीमुळे जखमी झालेले हे गृहस्थ मुंबईस येऊन २८ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांना भेटले तेव्हा त्यांच्या अंगावरचे काठीचे वळ तसेच कायम होते.

ब्राह्मण खोतच कुळांना अशी अमानुष मारहाण करीत असत असे समजण्याचे कारण नाही. मुसलमान तसेच मराठा खोतही आपल्या कुळांशी असेच वागत. ताडील गावचे खोत मुसलमान होते. ते मोहरममध्ये दिवट्या धरण्याचे काम करण्याची कुळांना सक्ती करीत असत. कुळांना छळणाऱ्या अशा ताडील गावच्या दहा मुसलमानांची नावानिशी यादी देऊन महार कुळांनी बाबासाहेबांकडे पाठवलेली कैफियतही 'जनता' पत्राने १६ ऑक्टोबर १९३७ च्या अंकात प्रसिद्ध केली होती. खोतांनी चालवलेल्या जुलमाविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांवर हल्ले चढवून त्यांना जायबंदी केले जात असे एवढेच नव्हे तर त्यांचे दिवसाढवळ्या सरळसरळ खून केले जात असत. खेड तालुक्यातल्या साखर गावी १४ नोव्हेंबर १९३७ रोजी खोतांनी महार कुळांवर हल्ला चढवला तेव्हा झालेल्या जखमांमुळे तिघे अत्यवस्थ होते तर दहाजण गंभीररीत्या घायाळ झाले होते. बाळा बेंडके या शेतकऱ्याने खोतांना प्रतिकार केला तेव्हा त्याला

काठ्यांनी इतकी बेदम मारहाण करण्यात आली की तो त्यामुळे मरण पावला. खोतांनी त्याचे घरदार, गुरेढोरे विकली. त्याचा मुलगा सीताराम तापाने फणफणला असतानाही तसाच सायकलवरून महाडला गेला आणि अनंतराव चित्र्यांना भेटला. मुंबईला जाऊन तक्रार गुदरण्याचा त्याचा विचार प्रत्यक्षात उतरलाच नाही, कारण त्याआधीच तोही मृत्युमुखी पडला.[२१] खोतांच्या जुलमामुळे मृत्युमुखी पडलेल्या बेंडके पितापुत्रांची हृदयद्रावक कहाणी खोती नष्ट करण्याबाबतच्या प्रचारमोहिमेत नेहमी सांगितली जात असे.

खोतीपद्धतीची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसनेही एक समिती नेमली होती. या समितीने वीस वर्षांत खोती पद्धती नष्ट करावी अशी शिफारस केल्यामुळे खोत चिडले आणि त्यांनी १९३७ च्या मुंबई विधानसभेच्या निवडणुकीत काही उमेदवारांना पाठिंबा दिला. रत्नागिरीच्या उत्तर विभागातून खोतांच्या पाठिंब्या-वर निवडून आलेले शिवराम लक्ष्मण करंदीकर, कुलाबा जिल्ह्यातील यशस्वी उमेद-वारांमध्ये सर्वांत जास्त मते मिळवून निवडून आलेले जी. के. फडके हे खोती पद्धतीची तरफदारी करणारे आमदार होते. कुलाबा जिल्ह्यातून दुसऱ्या क्रमांकाने निवडून आलेले काँग्रेसचे आमदार द. का. ऊर्फ नानासाहेब कुंटे यांनी खोतांच्या विरोधाबाबतचा स्वानुभव सांगितला आहे. "खोती सभेच्या बैठकीस मी गेलो. काँग्रेसला मदत करा म्हणून विनंती केली. त्यावर त्यांनी विचारले 'खोती नष्ट करणार आहात त्याचे काय?' मी उत्तर दिले, 'त्याचा मोबदला मिळेल'. प्रतिप्रश्न 'ते ठरावात नाही.' मी उत्तरलो. 'गरज नाही. कारण कोणाची मिळकत ताब्यात घेणे असेल तर त्याचा मोबदला द्यावा असे काँग्रेस वर्किंग कमिटीने आपल्या बनारस येथील ठरावाने स्पष्ट केले आहे.'"[२२] निवडणुकीच्या वेळी खोतांनी केलेला प्रखर विरोध लक्षात घेऊन आपण खोती नष्ट करणार नाही असे लेखी आश्वासन काँग्रेसपक्षाच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेलांनी दिले आणि १९३७ च्या डिसेंबरमध्ये महसूलमंत्री मोरारजी देसाईंनी कुलाबा जिल्ह्याचा दौरा केला तेव्हा 'आपण खोती नष्ट करणार नाही' असे स्पष्टपणे सांगितले. सत्ताधारी काँग्रेसपक्षाच्या या धोरणाला लोकशाही स्वराज्य पक्षासारख्या विरोधी पक्षाच्या आमदारांचाही पाठिंबा असल्याने खोती नष्ट करण्यासंबंधी आपण मांडलेले विधेयक मंजूर होणे शक्य नाही हे बाबासाहेब आंबेडकर ओळखून होते. तरीही त्यांनी हे विधेयक मांडले, कारण त्यांना काँग्रेसपक्षाचे तसेच लोकशाही स्वराज्य पक्षाचे जमीनदार-सावकारधार्जिणे रूप उघडकीस आणावयाचे होते.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी सादर केलेल्या खोती वतन नष्ट करण्यासंबंधीच्या विधेयकात खोतांना वाजवी नुकसानभरपाई द्यावी अशी बाबासाहेबांनी तरतूद केली होती. एखादे विधेयक जेव्हा प्रथम मांडले जात असे तेव्हा ते मांडण्यास कोणी विरोध करू नये असा संकेत मुंबई कायदेमंडळात पाळला जात असे. तरीही जाणून

बुजून तो मोडून शिवरामपंत करंदीकरांनी बाबासाहेबांच्या विधेयकाच्या पहिल्या वाचनाच्या वेळीच आपला विरोध आवर्जून नोंदविला. जमीन महसुलाविषयीच्या संहितेमध्ये दुरुस्त्या सुचविणारे एक व्यापक विधेयक आपण फेब्रुवारी १९३८ मध्ये मांडू असे महसूलमंत्र्यांनी सभागृहात आधीच आश्वासन दिलेले असल्याने रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यापुरती मर्यादित व्याप्ती असलेले खोतीवतन नष्ट करण्यासंबंधीचे विधेयक मांडले जाऊ नये असे करंदीकरांचे म्हणणे होते; पण खोती वतन ही वेगळी बाब असून ती जमीन महसूलविषयक संहितेच्या कक्षेत येत नाही असे बाबासाहेबांचे मत होते. काँग्रेसपक्षाने या विधेयकाची चर्चा लांबणीवर टाकण्याचे धोरण अवलंबिले तेव्हा या प्रश्नावर कुळांना संघटित करून सरकारवर दडपण आणण्याचे तंत्र बाबासाहेबांनी वापरले.

१ जानेवारी १९३८ रोजी दापोली येथे खोती वतन नष्ट करा ही मागणी करण्यासाठी रघुनाथ धोंडिबा खांब्यांच्या अध्यक्षतेखाली तिल्लोरी कुणब्यांची परिषद भरली. या परिषदेस बाबासाहेबांना हजर राहता आले नाही तरी अनंतराव चित्रे, सुरेंद्रनाथ (सुरबानाना) टिपणीस, भास्कर राजाराम कवळे या बाबासाहेबांच्या सहकाऱ्यांनी आपल्या भाषणांनी श्रोत्यांना चांगलेच प्रभावित केले. खोतांच्या जुलमाला बळी पडलेल्या बेंडके पितापुत्रांची कहाणी चित्र्यांच्या तोंडून ऐकताना श्रोत्यांची अंतःकरणे हेलावली तर स्वतः खोत असूनही सुरेंद्रनाथ टिपणिसांनी जळजळीत शब्दात खोतांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या सरकारवर आवेशाने हल्ला चढविला. शेतकऱ्यांनी आपल्या गाऱ्हाण्यांचे निवारण झाले नाही तर विधानसभेवर धाड घालावी, रस्त्यावर आडवे पडून सर्व रस्ते रोखावेत, गोळीबाराला तोंड द्यावे, हातातल्या काठीचा स्वसंरक्षणासाठी वापर करावा, बाजार आणि बँका लुटाव्या असा सुरबानानांनी त्यांना सल्ला दिला. चित्रे आणि टिपणीस उघडउघड हिंसेला चिथावणी देणारी भाषणे करीत फिरत असून त्यामुळे खोतांची कुळे असलेले महार दगडफेक करीत आहेत, झाडे व गवत खुशाल कापून नेत आहेत, दमदाटी करीत आहेत, असे रत्नागिरीचे जिल्हाधिकारी आर. एस. हिरेमठ यांनी मुंबई सरकारच्या गृहसचिवाला कळवलेले आढळते.[२३] चित्रे आणि टिपणीस यांच्या हालचालींना आळा घालण्यासाठी त्यांना रत्नागिरी जिल्ह्यात प्रवेश करण्यास बंदी करावी, तसेच प्रक्षोभक भाषणे केल्याबद्दल त्यांच्यावर खटले भरावेत असे जिल्ह्याधिकाऱ्याने सुचवले होते; पण दक्षिण विभागाच्या आयुक्ताने ही सूचना स्वीकारली नाही. मात्र पुढे एक वर्षानंतर १ फेब्रुवारी १९३९ रोजी कालवण येथे भरलेल्या शेतकऱ्यांच्या सभेमध्ये सुरबानानांनी केलेले भाषण आक्षेपार्ह ठरवून १५३ अ कलमाखाली त्यांच्यावर खटला भरण्यात आला. अलिबागच्या दंडाधिकाऱ्याने सुरबानानांना दोषी ठरवून तीन महिने सक्तमजुरी आणि तीनशे रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. शिक्षेविरुद्ध सुरबानानांनी अतिरिक्त सत्रन्यायाधीशांकडे अपील केले

तेव्हा त्यांच्या बाजूने न्यायालयात बाबासाहेबांनी युक्तिवाद केला तरी तो निष्फळ ठरला.[२४] सत्र न्यायालयाने अपील फेटाळल्यावर सुरबानानांना ठाण्याच्या तुरुंगात जावे लागले तेव्हा त्यांना तुरुंगात पोचवण्यासाठी बाबासाहेब गेले होते.

१ जानेवारी १९३८ रोजी दापोलीस भरलेल्या परिषदेचे अध्यक्ष रघुनाथराव खांबे हे तिल्लोरी कुणबी समाजाचे नेते तेव्हा ऐन पंचविशीत होते. त्याच्या अवघ्या दुसऱ्या वर्षी आईबापांचे छत्र हरपल्याने पोरके झालेले रघुनाथराव मॅट्रिक झाल्यानंतर इंग्लंडमध्ये आणि युरोपात आठ-नऊ वर्षे राहून मायदेशी परत आले होते. भास्कर राजराम कवळे हे चिपळूणचे व्यापारी कॉंग्रेसमधून स्वतंत्र मजूर पक्षात आले होते. भास्करराव कवळयांनी कॉंग्रेसमध्ये असताना सविनय कायदेभंग करून कारावासही भोगला होता. खोती पद्धतीविरुद्ध रत्नागिरी जिल्ह्यात रान उठवण्यात खांबे आणि कवळे यांचाही वाटा मोठा होता. त्यांच्याविरुद्ध सरकारने कारवाई करावी असे जिल्हाधिकारी तसेच दक्षिण विभागाचे आयुक्त यांचे म्हणणे होते; पण बाबासाहेबांच्या सल्ल्यामुळे असेल बहुधा' दोघांनीही आपल्या भाषणांचा आधीचा चढा सूर बदलला आणि ते सौम्य शब्दात टीका करू लागले.[२५] त्यामुळे खांबे आणि कवळे यांच्यावर सरकारने खटले भरले नाहीत.

१० जानेवारी १९३८ रोजी मुंबईत स्वतंत्र मजूर पक्षाने वीस हजार शेतकऱ्यांचा मोर्चा आझाद मैदानावरून कौन्सिल हॉलकडे नेला. या मोर्चामध्ये शांताराम मिरजकर आणि लालजी पेंडसे हे कम्युनिस्ट नेतेही सामील झाले होते. मोर्चाच्या वतीने बाबा-साहेब आंबेडकरांनी कॉंग्रेस मंत्रिमंडळाला शेतकऱ्यांच्या चार मूलभूत मागण्या आणि तेरा तातडीच्या मागण्या सादर केल्या.[२६] जमीन कसणाऱ्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे. खोत इनामदारांसारखे मध्यस्थ नकोत. शेतकऱ्यांवर कर अगर पट्टी बसवण्यापूर्वी त्याला चरितार्थापुरती योग्य सोय करून दिली पाहिजे. शेतमजुरांना किमान मजुरी देण्याची सोय कायद्याने करून दिली पाहिजे, या चार मूलभूत मागण्या होत्या. शेतसारा बाक्यांप्रमाणे थकलेल्या खंडाच्या बाक्याही माफ कराव्यात. जमिनीचे किमान उत्पन्न ठरवून त्यापेक्षा कमी उत्पन्नावर सारा अजिबात माफ करावा. जास्त उत्पन्न असलेल्या जमिनीवर वाढत्या मानाने साऱ्याची आकारणी करण्यासाठी जमीन महसूल कायद्यात दुरुस्ती करावी. तोपर्यंत सालीना ७५ रुपये अगर त्यापेक्षा कमी शेतसारा देणाऱ्यांचा सारा ताबडतोब पन्नास टक्क्यांनी कमी करावा. खोती व इनाम-दारी पद्धती भरपाईसह नष्ट करण्यासाठी ताबडतोब कायदा करावा. तीन वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायम कूळ समजले जावे. जमीनविषयक प्रश्नांची पाहणी करण्या-साठी आयोग नेमावा. साऱ्याच्या मानाने फक्त तिसरा हिस्सा अधिक खंड घ्यावा. लहान शेतकऱ्यांची पाणीपट्टी पन्नास टक्क्यांनी कमी करावी. सर्व खेड्यात मोफत चराई राने असावीत. कर्जनिवारण कायदा लागू होईपर्यंत कर्जतहकुबी जाहीर करावी.

सावकारी व्यवसायाचे नियंत्रण करावे. शेतकऱ्याला उदरनिर्वाहासाठी लागणारी जमीन तसेच चरितार्थाला आवश्यक वस्तूंवर सावकारी जप्ती आणण्यास बंदी घालवी. वेठबिगार हा फौजदारी गुन्हा ठरवावा. सर्व पडित जमीन उपरी शेतमजुरांना मोफत वाटून द्यावी अशा विविध बाबींचा तेरा तातडीच्या मागण्यांमध्ये अंतर्भाव करण्यात आला होता. तेव्हा मताधिकार फारच मर्यादित करण्यात आलेला असल्याने लोकमताचे खरे प्रतिबिंब कायदेमंडळात उमटत नव्हते. म्हणून वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मताधिकार द्यावा अशी मागणीही शेतकऱ्यांच्या मोर्चाने केली होती.

खोती वतन नष्ट करण्याची मागणी खेरमंत्रिमंडळाने मान्य केली नाही. तरी खोतांच्या कुळांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने काही तरतुदी मोरारजी देसाईंनी मांडलेल्या कुळकायद्यात केलेल्या होत्या. कुळकायद्यातील तरतुदी खोती गावांच्या बाबतीत लागू करू नयेत अशी दुरुस्ती सुचवून शिवरामपंत करंदीकरांनी खोती पद्धतीचे समर्थन करण्याचा पुन्हा एकदा अयशस्वी प्रयत्न केला तेव्हा त्यांच्यावर टीका करणाऱ्यांमध्ये मोरारजीभाईप्रमाणेच स्वतंत्र मजूर पक्षाचे शामराव परुळेकर आणि भाऊराव गायकवाडही होते.[२७] काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा देण्यापूर्वी २५ ऑक्टोबर १९३९ रोजी घाईघाईने मंजूर करून घेतलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जनिवारण विधेयकावरील चर्चेत तसेच कुळकायद्यावरील चर्चेत का कोण जाणे बाबासाहेबांनी भाग घेतलेला दिसत नाही. त्या आधी मुंबई विधानसभेने संमत केलेल्या जमीनमहसूल संहितेत दुरुस्ती करणाऱ्या विधेयकावरील चर्चेतही बाबासाहेब सहभागी झालेले दिसत नाहीत. काँग्रेस मंत्रिमंडळाने मांडलेली ही सर्व विधेयके त्यांना असमाधानकारक वाटत होती; पण स्वतंत्र मजूर पक्षातर्फे विधानसभेत हे असमाधान व्यक्त करण्यात पुढाकार घेतलेला आढळतो तो शामराव परुळेकर, अनंतराव चित्रे आणि भाऊराव गायकवाड या त्यांच्या सहकाऱ्यांनी.

## संदर्भ टीपा


१. डॉ. भी. रा. आंबेडकर, महार आणि त्यांचे वतन अथवा विसाव्या शतकातील गुलामगिरी, दुसरी आवृत्ती, १९३८, पृ. २

२. जनता, १८ डिसेंबर १९३७

३. बहिष्कृत भारत, समाज संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सरकारला जाहीर विनंती, १९५८, पृ. ३

४. डॉ. भी. रा. आंबेडकर, उपरोक्त, पृष्ठ २८

५. कित्ता, पृ. २१

६. य. दि. फडके, शाहू छत्रपती आणि लोकमान्य, १९८६, पृ. २७२

७. डॉ. भी. रा. आंबेडकर, उपरोक्त, पृ. ३८–३९
८. कित्ता, पृ. २९
९. शंकरदास बर्वे, वतनदार महार समाजास इशारा : स्वतंत्र मजूर पक्षाची गुंडगिरी, १९३९, पृ. ५
१०. मा. फ. गांजरे ( संपादक ), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे : खंड ५, १९७६, पृ. ५०
११. द सर्वंट ऑफ इंडिया, २८ जुलै १९३८, "द बॉम्बे मनीलेंडर्स बिल' हा धनंजयराव गाडगिळांचा लेख, पृ. ३५९
१२. जनता, ८ ऑगस्ट १९३६
१३. ग. रा. हवालदार, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांचे चरित्र : भाग १, १९२७, पृ. ५४५
१४. कित्ता, पृ. ५४७
१५. य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, १९८९, पृ. १२८
१६. बॉंबे लेजिस्लेटिव असेंब्ली डीबेट्स, खंड ७, भाग १, २५ सप्टेंबर १९३९, पृ. ६४–६५
१७. जनता, ४ ऑगस्ट १९३४
१८. कित्ता, २९ मे १९३७
१९. कित्ता, १२ जून १९३७
२०. कित्ता, ९ ऑक्टोबर १९३७
२१. मुंबई सरकार, गृहखाते ( विशेष शाखा ): फाईल क्र. ९२८–ए बेळगाव येथील दक्षिण विभागाच्या आयुक्तांचे गृहसचिवास पत्र, १ मार्च १९३८
२२. नाना कुंटे, वाटचाल, १९८२, पृ. ४२
२३. मुंबई सरकार, गृहखाते (विशेष शाखा), फाईल क्र. ९२७ ए–रत्नागिरीचे जिल्हाधिकारी आर. एस. हिरेमठ यांचे गृहसचिवास पत्र, १२ जानेवारी १९३८
२४. जनता, २० मे, २२ जुलै आणि ११ नोव्हेंबर १९३९
२५. मुंबई सरकार, गृहखाते ( विशेष शाखा ), फाईल क्र. ९२७ ए–गृहखात्याचे टिपण
२६. जनता, १५ जानेवारी १९३८
२७. बॉंबे लेजिस्लेटिव असेंब्ली डीबेट्स, खंड ७, भाग १, २५ सप्टेंबर १९३९, पृ. ६३–६४ आणि ६७–६८

# ४

## पक्षबांधणीतील समस्या

१५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना झाल्याचे जाहीर झाले आणि त्या पक्षाच्या वतीने मुंबई तसेच मध्यप्रांत-वऱ्हाड या प्रांतातील विधानमंडळाच्या निवडणुका फेब्रुवारी १९३७ मध्ये लढवण्यात आल्या तरी पक्षाच्या सभासदांची नोंदणी करण्याचे काम सुरू झाले ते १९३७ च्या जुलै महिन्यात ! पक्ष स्थापन झाल्या-नंतर जवळजवळ एक वर्षानंतर म्हणजे सात ऑगस्ट १९३७ रोजी नागपाडा नेबर-हूड हाऊसमध्ये सुभेदार विश्वास गंगाराम सवादकरांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र मजूर पक्षाची पहिली सर्वसाधारण सभा भरवण्यात आली आणि पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. डॉ. आंबेडकर पक्षाचे अध्यक्ष आणि खजिनदार होते. बॅ. एम. बी. समर्थ पक्षाचे सरचिटणीस होते तर कमलाकांत चित्रे आणि शांताराम अनाजी उपशाम पक्षाचे चिटणीस होते. कार्यकारी मंडळात पन्नास सभासद असून त्यांपैकी ३२ जणांची निवड सर्वानुमते करण्यात आली तर १८ सभासद कार्यकारी मंडळाने निवडावेत असे ठरले.[1] स्वतंत्र मजूर पक्षाची वार्षिक वर्गणी प्रथम फक्त आठ आणे होती, पण तीही नियमितपणे देणाऱ्यांची संख्या फारच थोडी होती. 'जनता' पत्र हे पक्षाचे मुखपत्र असले तरी त्यालाही वर्गणीदारांचा फारसा आश्रय लाभलेला नसल्याने त्याचा संसारही सदैव ओढगस्तीचाच होता. पदरमोड करून बाबासाहेबांना हे वृत्तपत्र तसेच स्वतंत्र मजूर पक्ष चालवावा लागत होता. त्यांचा वकिलीचा व्यवसाय चांगला चालत असला तरी बॅ. जिना, कन्हय्यालाल मुन्शी, भुलाभाई देसाई या त्या काळातील खोऱ्याने पैसा ओढणाऱ्या अग्रगण्य वकिलांमध्ये बाबासाहेबांची गणना होत नव्हती. गरीब कुळे, कामगार चळवळीतील कार्यकर्ते यांचाच त्यांच्या अशिलांमध्ये मुख्यतः भरणा असल्याने एका विशिष्ट मर्यादेपलीकडे त्यांचे उत्पन्न जाणे शक्य नव्हते. तरीही

वकिलीत मिळणाऱ्या पैशापैकी बराच भाग ते 'जनता' साप्ताहिक चालवण्यासाठी आणि स्वतंत्र मजूर पक्षासाठी खर्च करीत होते असे दिसते.

पक्षाच्या पहिल्या सर्वसाधारण सभेसमोर भाषण करताना बाबासाहेबांनी आवाहन केले, "इलेक्शनचा खर्च जबरदस्त होतो. तो करणे आमच्या उमेदवारांना शक्य नसते. मागच्या इलेक्शनच्या वेळेस उभ्या राहिलेल्या बऱ्याच उमेदवारांस मला पैशाची मदत करावी लागली, तेव्हा ते निवडून आले. परंतु प्रत्येक वेळेस अशी मदत करणे मला शक्य नाही व उमेदवारांनाही त्यांचा त्यांनाही खर्च भागविणे शक्य नाही. म्हणून त्यांचा खर्च तुम्ही दिला पाहिजे."[२] "काबाडकष्ट करणाऱ्या वर्गाचे हित प्रथम साधावयाचे हे या पक्षाचे धोरण आहे," असा निर्वाळा देऊन बाबासाहेबांनी कष्टकरी माणसांनी पक्षाचे सभासद व्हावे अशी जाहीर विनंती केली तरी तिला फारच थोडा प्रतिसाद मिळाला. १९ सप्टेंबर १९३७ रोजी पक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा भरून मोरेश्वर वासुदेव दोंदे यांची कायमचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. देणगी आणि वर्गणी मिळून पक्षाकडे २४२ रुपये १२ आणे जमा झाल्याचे आणि त्यापैकी ६३ रुपये ८ आणे खर्च झाल्याचे तेव्हा सांगण्यात आले. २ ऑक्टोबर १९३७ रोजी पक्षाच्या सभासदांची संख्या एक हजारावर गेली.[३] पक्षाचे दरवाजे जरी सर्व कष्टकरी जनतेसाठी खुले असले तरी अस्पृश्येतर जातींचे फारच थोडे लोक पक्षाचे सदस्य बनले होते. मुंबईसारख्या शहरात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीच्या लोकांची संख्या एक लाखावर गेली असली तरी १९३८ च्या मार्चअखेर स्वतंत्र मजूर पक्षाचे चार हजारच सभासद झाले आहेत ही गोष्ट 'लाजिरवाणी' असल्याचे बाबासाहेबांनी २७ मार्च १९३८ रोजी नायगावात भरलेल्या पक्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना म्हटले.

अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींपैकी चांभारांचा धर्मांतरास विरोध असल्याने आणि त्यामुळे त्यांच्यापैकी एकालाही बाबासाहेबांनी तिकीट न दिल्याने ते स्वतंत्र मजूर पक्षात येणे शक्यच नव्हते. महार जातीच्या लोकांपैकी अनेकांना महार वतन नष्ट करण्याची कल्पना पसंत नव्हती. महार जातीतील अमृतराव रणखांब्यांसारख्या श्रीमंत गृहस्थाला विधानसभेतील राखीव जागेसाठी तिकीट मिळाले नसल्याने ते नाराज होते. त्यांच्याप्रमाणेच लोकल बोर्डात अनेक वर्षे ठिय्या देऊन बसलेल्या प्रतिष्ठित पण अशिक्षित महार पुढाऱ्यांनाही बाबासाहेबांनी तिकिटे नाकारून तरुण रक्ताला वाव देण्याचे धोरण अनुसरल्याने ही असंतुष्ट मंडळी पक्षात तर सामील झाली नाहीतच, उलट काँग्रेसच्या वळचणीला जाऊन 'राष्ट्रीय हरिजन' नावाने बाबासाहेबांविरुद्ध त्यांनी विरोधी प्रचाराची आघाडी उघडली. अशा प्रतिकूल परिस्थितीत स्वतंत्र मजूर पक्षाची उभारणी करण्याचे काम अतिशय बिकट बनणे साहजिक होते. नायगावचा भारतभूषण छापखाना म्हणजे पक्षाचे मुख्य कार्यालय होते. तेथे स्वयंसेवक म्हणून काम करणारे अवघे नऊदहा पूर्ण-

वेळचे कार्यकर्ते होते. बाबासाहेब म्हणत त्याप्रमाणे स्वतंत्र मजूर पक्ष हा खरोखरच गरिबांचा पक्ष होता. त्याचा वार्षिक खर्च हजारबाराशे रुपये होता तर त्याच्या खात्यावर हजारबाराशे रुपयेच शिल्लक होते. "काँग्रेसच्या मीठमिरचीलाही ही आपली रक्कम पुरणार नाही" असे सांगून त्यांनी २७ मार्च १९३८ रोजी नायगावच्या सभेस हजर असलेल्या स्त्रियांना म्हटले, "येथे बसलेल्यांमध्ये सभासद न झालेल्या स्त्रियांचा गट सभासद झालेल्या स्त्रियांपेक्षा मोठा आहे. पानसुपारीसाठी दरमहा दोन रुपये खर्च करणाऱ्या स्त्रियांना स्वतंत्र मजूर पक्षाला वर्षाकाठी आठ आणे देण्यास जड का वाटावे? माझी सर्व मदार स्त्रियांवरच आहे. त्या पुढे येऊन स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभासद होतील तर पुरुषांनाही त्यांचा कित्ता गिरवणे भाग पडेल."[४] नायगावला भरलेल्या या सभेत पक्षाचे सभासद नसलेल्या स्त्रियाही हजर असण्याचे एक कारण होते. कुर्ल्याच्या आगपेट्यांच्या कारखान्यात काम करणाऱ्या पाचशे स्त्रियांनी महिनाभर संप केला तेव्हा स्वतंत्र मजूर पक्षाने मालकांशी वाटाघाटी करून तडजोड घडवून आणल्याने संप मिटला होता. संपावर गेलेल्या त्या स्त्रियांपैकी बऱ्याचजणी नायगावच्या सभेला हजर होत्या.

१५ ऑगस्ट १९३६ ला पक्ष स्थापन झाल्यानंतर एक वर्षभराने का होईना मुंबई प्रांतात पक्षाचे कार्य रीतसर सुरू झाले. मध्यप्रांत-वऱ्हाडात पक्षाची रीतसर स्थापना करण्यात आली ती त्यानंतर सुमारे वर्षाने म्हणजे १९३८ सालच्या जुलै अखेरीस. तोपर्यंत स्वतंत्र मजूर पक्षाच्या तिकिटावर यवतमाळ जिल्ह्यातून निवडून आलेले डी. के. भगत यांच्यासारखे आमदारही बेलाशक शिस्तभंग करीत असत. निवडून आल्यानंतर भगत काँग्रेसमध्ये सामील झाले तेव्हा बाबासाहेबांनी शिस्तभंगाची कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्या बडग्याला घाबरून भगत घाईघाईने स्वतंत्र मजूर पक्षात परत आले. ते यवतमाळ जिल्ह्यातून निवडून आलेले असले तरी राहात मात्र अकोला जिल्ह्यात. मार्च १९३८ पर्यंत त्यांनी कायदेमंडळात एकदाही तोंड उघडले नव्हते. त्यांना स्वतःचा गाजावाजा करण्याची हौस होती. मध्यप्रांत-वऱ्हाडातील चळवळीत विस्कळीतपणा आणण्यासही ते कारणीभूत होते.[५] शिस्त राखा, नाहीतर शिस्तभंगाच्या नियमाखाली काम चालविण्यात येईल अशी बाबासाहेबांच्या सल्ल्यावरून मध्यप्रांत-वऱ्हाडचे नेते एल. एन. हरिदास यांनी त्यांना जाहीररीत्या ताकीद दिली होती.

१ जुलै १९३८ रोजी बाबासाहेब आंबेडकरांच्या सहीनिशी एक पत्रक प्रसिद्ध झाले आणि नागपूरला स्वतंत्र मजूर पक्षाची रीतसर स्थापना होत असल्याचे जाहीर करण्यात आले. भाई जयवंत, दशरथ पाटील आणि चंद्रभान चव्हाण यांना मध्यप्रांत-वऱ्हाडातील पक्षाच्या शाखेचे संघटक म्हणून नेमण्यात आले. मध्यप्रांत-वऱ्हाडातील परिस्थिती लक्षात घेऊन पक्षाच्या कार्यक्रमामध्ये मालगुजारी नष्ट करण्याच्या उद्दिष्टास अग्रक्रम देण्यात आला. जुने कर्ज रद्द करविणे, शेतकऱ्यांवरील शेतसारा कमी करणे,

कास्तकारांना जाचक असलेले इतर कायदे रद्द करून त्यांना पोषक असे नवे कायदे करविण्याची चळवळ करणे, शेतमजुरांची (ठलव्यांची) किमान मजुरी ठरविणे, नोकरीचा व अपघाताचा मालकांकडून विमा, नुकसानभरपाई, आजारीपणात तसेच बेकारीत भत्ता मिळवण्यासाठी लढा उभारणे वगैरे बाबींचा मध्यप्रांत-वऱ्हाडातील स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यक्रमात समावेश करण्यात आला होता.[६] मध्यप्रांत वऱ्हाडातील पक्षाच्या कामाबाबत बाबासाहेबांची आमदार एल. एन. हरिदास यांच्यावर भिस्त असे. १९३९ च्या जानेवारीत हरिदास यांचे निधन झाले आणि त्यांच्या पाठोपाठ मुंबई इलाख्यातील बाबासाहेबांचे वडिलधारे पाठीराखे सुभेदार सवादकरही मरण पावले. सवादकरांप्रमाणेच हरिदास यांच्या निधनानेही बाबासाहेबांना धक्का बसला, कारण हे दोन्हेही पक्ष उभारणीच्या बिकट कार्यात त्यांना निष्ठेने साथ देत होते. हरिदास यांच्या निधनानंतर २५ मार्च १९३९ रोजी विधानसभेतील त्यांच्या मोकळ्या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली तेव्हा बाबासाहेबांनी गोविंदराव मेश्राम यांना अस्पृश्य मतदारांनी पाठिंबा द्यावा असे जाहीर आवाहन केले होते.

पक्षाच्या वतीने मुंबई आणि मध्यप्रांत-वऱ्हाड प्रांतातील कायदेमंडळाच्या निवडणुकी लढवल्यानंतर नगरपालिका, कँटोन्मेंट बोर्डे, डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड, ग्रामपंचायती यांच्या निवडणुकीही लढवण्याचा निर्णय स्वतंत्र मजूर पक्षाने घेणे साहजिक होते. नाशिक जिल्हा लोकल बोर्डात ४८ जागा होत्या. त्यांपैकी सहा राखीव जागा, दोन सर्वसाधारण जागा आणि स्त्रियांसाठी राखीव असलेली एक जागा अशा नऊ जागा लढवण्याचे स्वतंत्र मजूर पक्षाने ठरवले. विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी राखीव जागेसाठी तिकीट न मिळाल्याने नाराज झालेल्या अमृतराव रणखांब्यांच्या गटामध्ये आणि भाऊराव गायकवाडांच्या गटामध्ये समेट घडवून आणण्याचे प्रयत्न ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी रावसाहेब थोरात आणि देवराव सयाजी ऊर्फ काकासाहेब वाघ या दोघांनी केले. थोरात व वाघ या मध्यस्थांमार्फत रणखांब्यांनी आंबेडकरांना समक्ष भेटून त्यांच्याशी बोलणी करण्याची इच्छा दर्शविली. १ एप्रिल १९३८ रोजी त्यासाठी भाऊराव गायकवाडांना बरोबर घेऊन रावसाहेब थोरातांनी बाबासाहेबांची भेट घेतली आणि त्यांना रणखांब्यांचा निरोप कळवला. तेव्हा बाबासाहेबांनी २ एप्रिलला रणखांब्यांना लिहिले, "तुमचा निरोप कळला. भेटण्याची इच्छा असल्यास मला भेटावे." देवराव सयाजी वाघांनाही अशाच आशयाचे पत्र बाबासाहेबांनी पाठवले. तेव्हा देवराव वाघांनी रणखांब्यांना लिहिले, "डॉक्टरसाहेब यांजकडून पत्र आले आहे आणि आपणास मुंबईस उदईक सकाळी बोलावले आहे. तरी आपण पत्र मिळताच नाशिक येथे यावे किंवा नाशिक येथे येणे शक्य नसल्यास परभारे मुंबई येथे रा. देवराव नाईक यांचे प्रेसमध्ये दादर येथे जावे. तेथे सकाळीच रा. थोरात व गायकवाड आपणास भेटतील."[७] ३ एप्रिल १९३८ रोजी रणखांबे, भादुजी निकाळे व सावळाराम दाणी

मुंबईत बाबासाहेबांना भेटले. चांदवड आणि येवला येथील राखीव जागांसाठी कोणाला उमेदवारी द्यावी याबाबत रणखांबे गट व गायकवाड गट यांच्यामध्ये मतभेद असल्याचे या भेटीच्या वेळी स्पष्ट झाले.

हे मतभेद लक्षात घेऊन बाबासाहेबांनी आपला निर्णय भाऊराव गायकवाडांना कळवला. त्यानंतर ६ एप्रिल १९३८ रोजी भाऊराव गायकवाडांनी अमृतराव रणखांब्यांना लिहिले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या निवडणुकीबाबत दिलेला निकाल मी कालच श्री. दाणीमार्फत आपणास कळविला आहे. तो आपणास मिळाला असेलच. आपणास तो मान्य आहे काय? मान्य असल्यास आपल्या मंडळीने स्वतंत्र मजूर पक्षाकडे अर्ज करावयास हवे आहेत. ते अजून केले नाहीत. तरी ते अर्ज ताबडतोब पाठविण्याची तजवीज करावी."[८] गायकवाडांना धाडलेल्या उत्तरात रणखांब्यांनी म्हटले, "जनता पत्रात देण्यासाठी आपणा उभयतांच्या सहीने त्या दिवशी रिपोर्ट तयार केला आहे. त्यास माझी मान्यता आहेच."[९] रणखांबे आणि गायकवाड यांच्यामध्ये समेट झाल्यासारखा वाटला तरी परस्परांविषयीचा संशय व अविश्वास दूर झालेला नव्हता. १४ एप्रिल १९३८ रोजी बाबासाहेबांच्या कार्यालयात दोन्ही गटांमध्ये बोलणी होऊन तोडगा काढण्यात आला. रणखांबे आणि त्यांचे सहकारी हे स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद झालेले नव्हते. त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाचे सभासद होऊन पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्ज भरणे आवश्यक होते. म्हणून भाऊराव गायकवाडांनी त्यांना लिहिले, "मुंबई स्वतंत्र मजूर पक्षाच्या घटनेचा विचार करिता खालील गोष्टी होणे अत्यंत अपरिहार्य असल्याने त्या पुऱ्या करण्याची कृपा करावी. (१) १९।४।३८ पर्यंत मुंबईला माझ्या पत्त्यावर अर्ज भरून त्यावर उमेदवार मजकूर यांनी आपली माहिती भरून आपल्या सहीसह अर्ज मुदतीत पोचतील अशा बेताने पाठविण्याची तसदी कृपेने घ्यावी. वरील मुदतीत आपल्या उमेदवारांकडून अर्ज न आल्यास आपणास स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणुकीस उभे राहावयाचे नाही असे मोठ्या कष्टाने म्हणावे लागेल. (२) अर्ज करण्यापूर्वी उमेदवार स्वतंत्र मजूर पक्षाचा वार्षिक फी भरून सभासद असावा असा नियम आहे. (३) स्वतंत्र मजूर पक्षाचा सभासद हा दुसऱ्या कोणत्याही पक्षाचा सभासद नाही हे उमेदवार मजकूर यांनीच स्वदस्तुराने कळविण्याची कृपा केल्यास ती अडचण दूर होईल."[१०] रणखांबे आणि त्यांचे सहकारी स्वतंत्र मजूर पक्षाशी निवडणुकीपुरता समझौता करावयास तयार असले तरी त्या पक्षाचा टिळा लावून घेण्यास मुळीच उत्सुक नव्हते. उमेदवारी अर्जांची रदबदली झाल्यावर मजूर पक्षाचे फॉर्म भरून देऊ असा ते वायदा सांगत होते. भाऊराव गायकवाडांच्या या पत्राला पाठविलेल्या उत्तरात रणखांब्यांनी सवाल टाकले, "तारीख १५।४।३८ रात्रौ ९ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ऑफिसात व समोर उभे राहणाऱ्या उमेदवारांपैकी कोणास उभे करावयाचे व कोणास अर्ज काढून

घ्यावयाचे सांगावयाचे असे निश्चित ठरले असून स्वतंत्र मजूर पक्षाचे वतीने उभे राहणाऱ्या उमेदवारांचे अर्जही तेथेच भरून घेऊ असे ठरले होते. असे असता आजच आपले टपाल मिळून त्यात समजते की दाणी, निकाळे, साबळे व मी असे चार फॉर्म आगाऊ भरून पाठविल्याशिवाय पुढील विचार करता येणार नाही म्हणता हे कसे? यावरून आपण डॉ. बाबासाहेबांसमोर बोलता एक व मागाहून लिहिता एक हे कसे? तरी आपले समक्ष ठरल्याप्रमाणे व अर्ज रदबदली झाल्यावर मजूर पक्षाचे फॉर्म भरून देऊ. एकवार ठरल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेबांचे शब्दाबाहेर मी नाही. तरी विपर्यास करून न घेता ठरल्याप्रमाणे पुढील कार्यक्रम उरकण्याचे करावे म्हणजे बरे होईल."[११] रणखांब्यांच्या या पत्रानंतर बाबासाहेब आंबेडकर आणि भाऊराव गायकवाड यांच्या नावानिशी ३० एप्रिल १९३८ च्या 'जनता' पत्राच्या अंकात जाहीर खुलासा करण्यात आला. "रणखांबे व इतर उमेदवार मंडळी यांची स्वतंत्र मजूर पक्षाच्या अर्जावर सह्या करण्याची इच्छा दिसत नाही. रणखांब्यांना समेट बोर्डाच्या निवडणुकीसाठीच करावयाचा आहे. त्यामुळे स्वतंत्र मजूर पक्षास हा समेट मान्य नाही." असे या खुलाशात नमूद करण्यात आले होते.

रणखांबे आणि त्यांचे सहकारी स्वतंत्र हरिजन पक्षात सामील झाले. नाशिक जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षातर्फे बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांच्या नावामध्ये शंकरराव रावबा रोकडे यांच्या नावाचा समावेश करून भाऊराव गायकवाडांनी ती नावे 'जनता' पत्रात प्रसिद्ध केली तेव्हा रोकड्यांनी पत्रक काढून जाहीररीत्या खुलासा केला, "तारीख ३० एप्रिल १९३८ चे 'जनता' पत्रात पान नंबर ७ वर स्वतंत्र मजूर पक्षाचे वतीने इगतपुरी तालुक्यातून अस्पृश्यांचे राखीव जागेवर मी शंकरराव रावबा रोकडे बिनविरोधी निवडून आले आहेत असा मजकूर श्री. भाऊराव कृष्णराव गायकवाड यांचे सहीने प्रसिद्ध झालेला वाचून पाहिला. तो मजकूर खोटा आहे हे जनतेसमोर जाहीर करण्यासाठीच खुलासा करीत आहे. मी इगतपुरी तालुक्याचे हरिजनाचे राखीव जागेकरिता उमेदवार म्हणून जो अर्ज भरला आहे तो नवीन स्थापन झालेल्या 'स्वतंत्र हरिजन पक्षाचे' मार्फत भरला असून मी स्वतंत्र हरिजन पक्षाचे वतीनेच बिनविरोध निवडून आलो आहे व पुढेही मी 'स्वतंत्र हरीजन पक्षा'चे वतीनेच काम करावयाचे ठरविले आहे. मी स्वतंत्र मजूर पक्षाकडे उमेदवारीचा अर्ज केलेला नाही असे असताना देखील श्री. भा. कृ. गायकवाड यांनी 'जनता' पत्रात माझेसंबंधी जो खुलासा केला आहे तो साफ खोटा आहे."[१२] नाशिक जिल्ह्यातील दुफळीमुळे जिल्हा लोकल बोर्ड निवडणुकीत सर्व राखीव जागा पक्षाला जिंकता आल्या नाहीत. सहा राखीव जागांपैकी चार स्वतंत्र मजूर पक्षाला जिंकता आल्या. स्त्रियांसाठी असलेल्या राखीव जागेवर भाऊराव गायकवाडांच्या पत्नी गीताबाई निवडून आल्या.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३३८८
२६९२४
२८/५/९०

सोलापूर जिल्हा लोकल बोर्डात अस्पृश्यांसाठी आठ राखीव जागा होत्या. त्या सर्व जागा स्वतंत्र मजूर पक्षाने जिंकल्या. याखेरीज पक्षाच्या वतीने पंढरपूरचे रावबहाद्दूर परिचारक आणि माढ्याचे शेठ हिरालाल परदेशी यांनी दोन सर्वसाधारण जागा जिंकल्या. पुणे जिल्ह्यात ज्या सहा राखीव जागा पक्षाने पटकावल्या त्यामध्ये चार जागांसाठीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. याखेरीज चार सर्वसाधारण जागाही पक्षाने जिंकल्या होत्या. पुणे जिल्हा लोकल बोर्डातील स्वतंत्र मजूर पक्षाच्या दहा सभासदांच्या गटाचे नेते होते इंदापूरचे हणमंत श्रीनिवास देशपांडे वकील.[१३] पुणे, सोलापूर या जिल्ह्यांच्या तुलनेने सातारा, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश या जिल्ह्यांत स्वतंत्र मजूर पक्षाला चार-सहा जागांपलीकडे जास्त जागा जिंकता आल्या नाहीत.

याच काळात रणखांब्यांप्रमाणेच सी. ना. शिवतरकर आणि शंकरदास बर्वे ऊर्फ सरदार अमरसिंग हे दोन जुने सहकारीही बाबासाहेबांची साथ सोडून विरोधकांच्या छावणीत दाखल झाले होते. २५ व २६ डिसेंबर १९३७ रोजी रत्नागिरी जिल्हा चर्मकार परिषदेच्या खेडला भरलेल्या अधिवेशनात भाषण करताना शिवतरकरांनी डॉ. आंबेडकरांवर झोड उठविली. " मी गेली वीस वर्षे महार समाजाबरोबर समाजसेवेचे काम केले व त्या समाजाची संघटना केली. तिचीच फळे आज डॉ. आंबेडकरांस चाखावयास मिळत आहेत. एवढा मोठा विद्वान अखेर जातिनिष्ठच ठरला. त्यांचे अंगी विनयाचे ऐवजी दर्प मात्र भरपूर आहे. त्यांनी श्री. वानखेडकर, दे. भ. सोनगावकर व श्री. वनमाळी यांना असेंब्ली इलेक्शनच्या वेळी चांभारास मी एकही जागा देणार नाही असे उत्तर दिले. महाभारतातील दुर्योधनाने प्रतिज्ञा केली होती त्याचे पुढे काय झाले ? डॉ. आंबेडकरांचे पाठीमागे जरी कौरवांसारखा मोठा महार समाज असला व आपण पांडवांसारखे थोडे असलो तरी आपणच जिंकू."[१४] शिवतरकरांनी आणलेले हे वीरश्रीचे अवसान फार काळ टिकलेले दिसत नाही. त्यांच्याच आवडत्या महाभारतातील दाखला द्यावयाचा तर 'बालिश बहु बायकात बडबडला' अशी विराटपुत्र उत्तराप्रमाणे त्यांची अवस्था झाली आणि शिवतरकरांनी १९४० साली पुन्हा बाबासाहेबांचा आसरा घेतला. १३ एप्रिल १९४० रोजी 'जनता' साप्ताहिकाने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अंक' काढला त्यात 'डॉ. आंबेडकरांच्या सहवासातील काही संस्मरणीय प्रसंग' असा त्यांचा एक सुरेख लेख आढळतो.

शिवतरकरांनी १९३७ ते १९३९ या तीन वर्षांच्या काळात बाबासाहेबांची संगत सोडून दिली तर १९३१ पासून बाबासाहेबांची साथ सोडून काँग्रेसच्या मागे गेलेले बाळकृष्ण जानूजी देवरुखकर १९३९ सालच्या सुरुवातीला स्वतंत्र मजूर पक्षात सामील झाले. ७ फेब्रुवारी १९३९ रोजी झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाने आठ जागा लढवल्या. त्यांपैकी ५ जिंकल्या. विजयी उमेदवारां-

मध्ये देवरुखकरांखेरीज रेवजीबुवा डोळस, द. वि. प्रधान, एस. सी. जोशी आणि मो. वा. दोंदे हे चौघे होते. मडकेबुवा, सीताराम केणी आणि ॲ. माने हे तिघे मात्र पराभूत झाले. देवरुखकरांचा विजय सर्वांत महत्त्वाचा होता. कारण स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणूक लढवण्यापूर्वी त्यांनी कॉंग्रेस पक्षातर्फे बारा वेळा निवडणूक लढवून पराभव पत्करला होता. "मी कॉंग्रेसमध्ये गेलो ही मोठी चूक केली" अशी जाहीर कबुली देऊन देवरुखकर स्वतंत्र मजूर पक्षात दाखल झाले तेव्हा बाबासाहेबांनी "श्री. देवरुखकर आपले 'कच' आहेत" असे म्हणून संजीवनी विद्या मिळविण्यासाठी असुरांचा गुरू शुक्राचार्य यांचा शिष्य बनलेल्या कचाच्या कथेची श्रोत्यांना आठवण करून दिली.[१५] शिवतरकर, देवरुखकर, शंकरदास बर्वे या सहकाऱ्यांशी बाबासाहेबांचे मतभेद झाले तरी या तिघांच्या संघटनाकौशल्याची, धडाडीने व प्रचार करण्याच्या वृत्तीची बाबासाहेबांना पुरेपूर कल्पना होती. पक्षसंघटना बांधताना कोणत्याही राजकीय नेत्याला अशा कार्यकर्त्यांच्या दुसऱ्या फळीचा भरभक्कम पाठिंबा फार उपयोगी पडतो.

देवरुखकर १९३९ साली आणि शिवतरकर १९४० साली बाबासाहेबांना पुन्हा साथ देऊ लागले तरी शंकरदास बर्वे मात्र एकदा दुरावले ते कायमचे. बर्व्यांनी ठाणे जिल्हा लोकल बोर्डाच्या निवडणुकीत शहापूर गटात स्वतंत्र मजूर पक्षातर्फे निवडणूकही लढवली होती. त्यांना डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा मान्य होती. आपण डॉ. आंबेडकरांची साथ का सोडली याची कारणे 'अस्पृश्यांच्या चळवळीतील सावळागोंधळ' या पुस्तिकेत बर्व्यांनी सांगितली आहेत. "माझ्या नेतृत्वाखाली सोळा संतांना शीख धर्माचा अभ्यास करण्यासाठी अमृतसरला ता. १५-९-१९३७ रोजी पाठविण्यात आले त्यांतून तिघेजण प्रकृतिअस्वास्थ्यामुळे परतले. तेरा जणांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर आम्हाला ता. ३१ मार्च १९३७ ला अमृतसर येथील अकाल तख्त येथे शीख धर्माची दीक्षा देण्यात आली. त्यांचा (बाबासाहेब आंबेडकर) मुलगा यशवंत आणि पुतण्या मुकुंद यांना अमृतसरला बरेच दिवस ठेविले होते. आम्ही तेराजण शीख धर्माची दीक्षा घेऊन मुंबईस ४ एप्रिल १९३७ ला आलो. प्रचारकार्यासाठी आमच्या नेमणुका १७ एप्रिल १९३७ ला करण्यात आल्या. मिशनने दरमहा ४५ रु. पगार देण्याची तयारी दाखविली होती, परंतु डॉ. आंबेडकरांनी १५ रु. पगार या लोकांना बस्स होईल अशी शिफारस केल्यामुळे आम्हाला कमी पगार ठरविण्यात आला. १४ एप्रिल १९३७ ला विलेपार्ले येथे आमचा सत्कार करण्यात आला तेव्हा दोंदे, काणेकर, (पु. गो.) सहस्रबुद्धे, कमलाकांत चित्रे आणि शां. अ. उपशाम यांच्यासह डॉ. आंबेडकर हजर होते. शीख धर्मप्रचारासाठी आम्ही पगार घ्यावयाचा शीख मिशनकडून आणि प्रचारकार्य करावयाचे डॉ. आंबेडकरांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे असा हास्यास्पद प्रकार. पक्ष स्थापल्यानंतर धर्मांतराच्या कार्याकडे डॉ. आंबेडकरांनी मुळीच लक्ष दिले नाही. आम्हाला वेळेवर पगार मिळत नसत. या व

इतर कारणांमुळे शीखधर्म स्वीकारलेल्यांपैकी बऱ्याच जणांनी शीख धर्माची वस्त्रे दूर फेकून दिली. मी अद्याप शीख आहे."[१६]

शंकरदास बर्वे ऊर्फ सरदार अमरसिंग यांना धर्मप्रचारक म्हणून शीख मिशन-कडून बाबासाहेब आंबेडकरांमार्फत मासिक वेतन जसे दिले जात असे तसाच प्रवास-खर्चही दिला जात असे. १९३७ च्या उत्तरार्धात बाबासाहेब आणि शीख मिशनचे नेते यांच्यामधील संबंध बिघडू लागल्यावर शीख मिशनने आर्थिक साहाय्य हळूहळू कमी केले. शीख धर्माचा प्रचार करण्यासाठी नेमलेल्या सरदार अमरसिंगांसारख्या प्रचारकांचा स्वतंत्र मजूर पक्षाचा प्रचार करण्यासाठी उपयोग केला जात होता त्यामुळे शीख मिशनचे सूत्रधार नाराज झाले आणि त्यांनी १९३७ च्या नोव्हेंबरमध्ये प्रचारकांना दरमहा दिली जाणारी प्रवासखर्चाची रक्कम देणे थांबवले. त्यामुळे शंकरदास बर्वे ऊर्फ सरदार अमरसिंग भडकले. त्यांची समजूत घालण्याचा भाऊराव गायकवाडांनी प्रयत्न केला. "जसे तुम्हास पत्र आले आहे त्याचप्रमाणे इकडील प्रचारकांनाही पत्रे येऊन प्रवासखर्चाप्रीत्यर्थ मिळणारी रक्कम ३ रुपये १२ आणे ही ता. १–११–३७ पासून बंद केल्याचे समजते. आपण जर असल्या लहानसहान बाबीवरून रुसू लागलो तर आपले धर्मांतर हे धर्मांतर करून ज्या धर्मात जाऊ त्या धर्मातील लोकांच्या सर्वस्वी आश्रयावरच जगावयाचे नसून उद्या शिखांकडून मिळणारा सर्व पगार जरी बंद झाला तरी स्वतंत्रपणे जगण्याचे मार्ग आपण शोधून काढून जगले पाहिजे."[१७] शंकरदास बर्व्यांना स्वतंत्रपणाने जगण्याचे मार्ग शोधणे शक्य नव्हते. ते सरदार अमरसिंग म्हणून मुंबईच्या खालसा महाविद्यालयात नोकरी करीत राहिले ते त्यांचा १९५० साली मृत्यू होईपर्यंत. स्वतः शीख धर्माचा स्वीकार न करता आप-ल्याला मात्र शीख धर्म स्वीकारावयास लावून बाबासाहेबांनी आपल्याला वाऱ्यावर सोडले अशी शंकरदास बर्व्यांची भावना झाली आणि अमृतराव रणखांब्यांनी उत्तेजन दिल्याने त्यांनी 'अस्पृश्यांच्या चळवळीतील सावळागोंधळ' नावाची पुस्तिका प्रकाशित करून डॉ. आंबेडकरांनी गोळा केलेला प्रेसफंड तसेच १९३० साली लंडनमध्ये गोळा केलेले हजारो रुपये यांचे काय झाले असे प्रश्न उपस्थित केले आणि रणखांब्यांच्या पुढाकाराने लावण्यात आलेल्या आंबेडकर-विरोधी प्रचाराच्या आगीत तेल ओतले.

बाबासाहेबांचे चरित्रकार* चांगदेवराव खैरमोडे यांनी म्हटल्याप्रमाणे "शीख लोकांशी आपण संबंध का तोडले यासंबंधाने बाबासाहेबांनी कधीच स्पष्ट खुलासा केला नाही. शिखांनीही केला नाही."[१८] मात्र १९३६ साली बाबासाहेब आज ना उद्या शीख धर्माचा स्वीकार करणार असे शिखांना वाटत होते तसेच बाबासाहेबांच्या निकटच्या सहकाऱ्यांनाही वाटत होते. अमृतसरला सुवर्णमंदिरात भरलेल्या शीख धर्मप्रचारकांच्या सभेत बाबासाहेबांनी अस्पृश्यांनी शीख धर्माचा स्वीकार केल्यास त्यांच्याशी बेटीव्यवहार करण्यास अन्य शीख तयार आहेत का असा प्रश्न विचारला

होता. तेव्हा त्यांना ' होय ' असे उत्तर श्रोत्यांनी दिले होते. खरे म्हणजे हिंदूंप्रमाणे शीखही अस्पृश्यता पाळीत असत. मझबी ( भंगी ) नावाने ओळखल्या जाणाऱ्या शिखांबरोबर जाट शीख अन्नग्रहण करीत नसत. मझबी शीख मेलेली ढोरे ओढतात, त्यांची कातडी काढतात आणि मेलेल्या ढोरांचे मांस खातात. त्यामुळे त्यांचे पाणवठेही स्वतंत्र असत. मझबी शिखांचे पुढारी सरदार किशनसिंग यांना बाबासाहेबांचा शीख धर्म स्वीकारण्याचा विचार मुळीच आवडला नव्हता. त्यांनी बाबासाहेबांना उद्देशून वृत्तपत्रात एक अनावृत पत्र प्रसिद्ध केले आणि "आपण शीख धर्माचा बिलकुल स्वीकार करू नका," अशी विनंती केली.[१९] सरदार किशनसिंगांनी ४९५५७ अस्पृश्यांना शीख धर्माची दीक्षा दिली होती तरी एक जानेवारी १९३६ च्या खालसा सेवक वृत्तपत्राच्या अंकातही त्यांचा निर्देश ' बाबा किशनसिंग अस्पृश्य ' असाच केला जात होता, या वस्तुस्थितीकडे त्यांनी बाबासाहेबांचे लक्ष वेधले होते. या किंवा अशा अन्य कारणांमुळे शीख धर्माचा स्वीकार करण्याचा विचार मागे पडत गेला. मात्र त्यामुळे बाबासाहेबांच्या विरोधकांना धर्मांतराची घोषणा हा केवळ एक राजकीय डाव आहे असे म्हणण्याची संधी मिळाली.

' अस्पृश्यांच्या चळवळीतील सावळागोंधळ ' या पुस्तिकेप्रमाणे ' वतनदार महार समाजास इषारा ' ' स्वतंत्र मजूर पक्षाची गुंडगिरी ' ही पुस्तिकाही शंकरदास बर्वे ऊर्फ सरदार अमरसिंगांच्या नावेच प्रसिद्ध झालेली आहे. नाशिक जिल्ह्यातल्या निफाड तालुक्यातील अंतरवेली खेड्यात २६ मार्च १९३९ रोजी भरलेल्या सभेत भाऊराव गायकवाड आणि अमृतराव रणखांबे यांनी एकमेकांशी जाहीर वाद घातला. ' स्वतंत्र मजूर पक्ष आम्हास मान्य नाही ' असे गायकवाडांना सुनावून रणखांबे म्हणाले, "याचे कारण स्वतंत्र मजूर पक्ष हा अस्पृश्यांचा पक्ष नसून तो मिश्र जातींच्या लोकांचा पक्ष आहे म्हणून तो आम्हास मान्य नाही. आम्हास आजच्या परिस्थितीला अस्पृश्यांकरिताच काम करणारा पक्ष पाहिजे आहे आणि म्हणूनच आम्ही स्वतंत्र मजूर पक्षाचे विरुद्ध केवळ अस्पृश्यांचा म्हणून स्वतंत्र हरिजन पक्षाची स्थापना केली आहे. आईची सर दाईला येणार नाही तसे स्वतंत्र मजूर पक्ष दाई आहे. अस्पृश्य समाजाची आई होऊ शकत नाही. स्वतंत्र मजूर पक्षात सर्व स्पृश्यांचा भरणा आहे. रशियाच्या लाल बावट्याखाली आम्हास जावयाचे नसून आमचेच पायावर उभे राहून जगावयाचे आहे. मी आतापर्यंत स्वतःचे खिशाला चाट देऊन समाजकार्य करीत आलो आहे व पुढेही करीन. निवडणुकीसाठी डॉ. आंबेडकरांचे पाय धरले नाहीत... आमच्यात जो मतभेद आहे तो तत्त्वाचा आहे. डॉ. आंबेडकरांनी अजूनही स्वतंत्र मजूर पक्ष हा अस्पृश्यांसाठी आहे असे जाहीर केल्यास आमची अजूनही जमावाने काम करण्याची इच्छा आहे... स्वतंत्र मजूर पक्ष केवळ काँग्रेस द्वेषाचा आणि संधिसाधू राजकारणाचा एक प्रकार आहे. खरोखर संपूर्ण स्वातंत्र्य किंवा बहुजनसमाजाची

बंधमुक्तता हे स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय नसून साम्राज्यशाहीशी सहकार्य आणि जातिनिष्ठ राजकारण चालविणे हेच या पक्षाचे उद्दिष्ट आहे."[२०] रणखांब्यांची काही विधाने पूर्णतया निराधार होती. स्वतंत्र मजूर पक्षात " सर्व स्पृश्यांचा भरणा " असा प्रकार मुळीच नव्हता. मोजके स्पृश्य सभासद वगळले तर बहुसंख्य सभासद अस्पृश्य जातीतीलच होते. निवडणुकीसाठी आपण डॉ. आंबेडकरांचे पाय धरले नाहीत हे त्यांचे म्हणणे त्यांनी तिकिटाबाबत केलेला पत्रव्यवहार पाहिला तर धडधडीत खोटे ठरते. स्वतंत्र मजूर पक्षाचे ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य असल्याचे २१ मार्च १९३९ रोजी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले होते.

रणखांबे, शंकरदास बर्वे यांनी चालवलेल्या डॉ. आंबेडकरांच्या आणि स्वतंत्र मजूर पक्षाच्या निंदानालस्तीच्या मोहिमेस रणखांब्यांचे जावई चिंतामण स. साळवे यांनीही हातभार लावला. साळवे पदवीधर होते आणि तेव्हा सचिवालयात कारकून म्हणून काम करीत असत. ' चित्रमयजगत ' हे त्या काळचे गाजलेले मासिक काँग्रेस पक्षाचे पाठीराखे होते. या मासिकाच्या डिसेंबर १९३९ च्या अंकात साळव्यांनी लेख लिहून डॉ. आंबेडकरांवर आणि त्यांच्या पक्षावर हल्ला चढवला. आंबेडकरांच्या विभूतिपूजेचे देव्हारे पुजले जात असून त्यांची चळवळ तत्त्वहीन व पायाभ्रष्ट असल्याचे साळव्यांचे मत होते. बाबासाहेब आंबेडकर हे आरामखुर्चीत बसून राजकारण करणारे पुढारी असून कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण करण्याचा नेत्याला आवश्यक असणारा गुण डॉ. आंबेडकरांमध्ये नाही असे चिंतामणराव साळव्यांचे म्हणणे होते. स्वतंत्र मजूर पक्ष हा कधीही राष्ट्रीय क्रांतिकारक पक्ष होऊ शकत नाही. या पक्षाची प्राणप्रतिष्ठा कोणत्या तत्त्वप्रणालीत झाली हे डॉ. आंबेडकरांना सांगता येईल की नाही याची शंकाच आहे. आंबेडकरांची टीका विध्वंसक व छिद्रान्वेषी स्वरूपाची असते. त्यांचे राजकारण जातिनिष्ठ असते असे अनेक आक्षेप साळव्यांनी या लेखात घेतले होते.[२१] रणखांबे, शंकरदास बर्वे, साळवे वगैरेंनी चालवलेल्या असल्या टीकेची दखल घेऊन बाबासाहेबांनी त्यांना कधीही लेख लिहून उत्तर दिलेले आढळत नाही. असल्या टीकेला किती किंमत द्यावयाची हे ते ओळखून होते. साळव्यांच्या या ' जावई शोधांबद्दल ' ' जनता 'कारांनी त्यांची हजेरी घेतली आणि राजाराम हरी गायकवाड यांनी साळव्यांना दिलेले उत्तर ' जनता ' पत्रात प्रसिद्ध केले.

जुलै १९४० मध्ये झालेल्या नाशिक जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या पाठिंब्याच्या जोरावर उभे राहिलेल्या रणखांब्यांविरुद्ध स्वतंत्र मजूर पक्षाने ऑल इंडिया मराठा लीगचे वामन गोविंद पाटील यांना पाठिंबा दिला आणि रणखांबे निवडणुकीत पराभूत झाले. त्याआधी रणखांबे १९३८–३९ मध्ये वर्क्स कमिटीचे अध्यक्ष असताना भ्रष्टाचाराचे एक प्रकरण उघडकीस आले होते. रणखांब्यांनी सबओव्हरसिअर आणि कंत्राटदार यांच्याशी संगनमत करून खडी व मुरूम

कंत्राटदारांनी पुरवला नसतानाही त्यांची खोटी नोंद करून पैसे उपटले असा त्यांच्यावर आरोप करण्यात आला होता. या प्रकरणाची नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी पुरी केली होती. २३ मे १९३९ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या टिपणात रणखांब्यांवर ठपका ठेवण्यात आला होता. त्यात म्हटले होते, "चेअरमननी डोळे झाकून सह्या केल्या असे म्हणता येत नाही. सबओव्हरसिअरने मेझरमेंट बुकात खोटे उतारे केल्याबद्दलचे व मे. रणखांबे यांनी ते तपासल्याबद्दल सही केल्याचे दुसरे उदाहरणही आहे. चेअरमन व सबओव्हरसिअर यांनी जाणूनबुजून खोटी नावे नोंदली आणि बोर्डास फसविण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत आता फौजदारी कोर्टात खटला भरणे इष्ट होणार नाही. सबओव्हरसिअरला बडतर्फ करण्याची शिक्षा देणे बाजवी आहे असे कमिशनरसाहेबांचे मत आहे. रणखांबे यांनी सबओव्हरसिअरला मदत केली आहे. बोर्डाने त्याबद्दल पूर्ण नापसंती दाखवली पाहिजे."[२२] जिल्हाधिकाऱ्यांच्या या शिफारशी-नंतर रणखांब्यांकडून स्पष्टीकरण मागण्यात आले. ते देण्यास रणखांब्यांनी तब्बल एक वर्ष घेतले. रणखांब्यांनी भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्याला साथ दिल्याचे माहीत असतानाही काँग्रेस पक्षाने जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षीय निवडणुकीत रणखांब्यांना पाठिंबा दिला होता. रणखांबे बाबासाहेबांवर कडक टीका करीत होते ही त्यांची काँग्रेसच्या दृष्टीने जमेची बाजू होती. अध्यक्षीय निवडणुकीत रणखांब्यांना हार खावी लागल्यानंतर स्वतंत्र मजूर पक्षाच्या पाठिंब्यावर निवडून आलेल्या वामनराव पाटलांनी रणखांब्यांविरुद्ध कारवाई करण्याचे ठरवले. रणखांब्यांना अपात्र ठरवून त्यांचे बोर्डाचे सभासदत्व रद्द करण्याचा ठराव बहुमताच्या जोरावर पाटलांनी मंजूर करून घेतला. 'नाशिक जिल्हा लोकल बोर्डात रणखांबेकृत सावळागोंधळ' असा बोलका मथळा देऊन 'जनता' पत्राने ही बातमी प्रसिद्ध केली आणि शंकरदास बर्व्यांना 'अस्पृश्यांच्या चळवळीतील सावळागोंधळ' ही पुस्तिका छापण्यास आर्थिक साहाय्य करणाऱ्या रणखांब्यांवर अखेर मात केली.

रणखांबे आणि त्यांच्यासारखे बाबासाहेबांचे अन्य विरोधक यांनी काँग्रेसनेत्यांच्या आशीर्वादाने 'राष्ट्रीय' हरिजनांच्या परिषदा भरवल्या की स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने त्यांच्याविरुद्ध निदर्शने केली जात असत. १ जून १९४० रोजी पुण्यात गोखले हॉलमध्ये रणखांब्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई इलाखा हरिजन परिषद भरली तेव्हा ठक्करबाप्पा, केशवराव जेधे, बापूसाहेब गुप्ते, पोपटलाल शहा, सोलापूरचे रामकृष्ण जाजू वगैरे काँग्रेसजन परिषदेस हजर राहिले. ही परिषद भरवण्यात वयोवृद्ध दलित नेते शिवराम जानबा कांबळे आणि त्यांचे चिरंजीव अंबाजी यांनी पुढाकार घेतला होता. या परिषदेचा निषेध करण्यासाठी पुण्यातील बाबासाहेबांच्या सात-आठशे अनुयायांनी मिरवणूक काढली होती. मुंबईतही डॉ. सोळंकी, निकाळजे, शिवतरकर वगैरे आंबेडकर-विरोधकांनी बहिष्कृत तरुण जहाल पक्ष नावाचे एक पिल्लू सोडून पाहिले, पण या

जहाल पक्षाने भरवलेल्या सभेस हजर राहण्याची सोळंकी, निकाळजे, शिवतरकर वगैरे सूत्रधारांची हिंमत झाली नाही. बाबासाहेबांच्या अनुयायांनी सभास्थानी निदर्शन केल्यामुळे सभेत हजर असलेल्या तरुण जहालांना पळ काढावा लागला. बाबासाहेबांचे पाठीराखे आणि त्यांचे विरोधक यांच्यामधील मतभेदाचे पर्यवसान कधी कधी चक्क मारामारीमध्ये होत असे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळी डॉ. सोळंकी आणि त्यांच्याविरुद्ध निवडणूक लढवणारे स्वतंत्र मजूर पक्षाचे देवजीबुवा डोळस यांच्या अनुयायांमध्ये झालेल्या मारहाणीचे प्रकरण न्यायालयापर्यंत गेले होते. १६ डिसेंबर १९३९ रोजी हरेगावला भरलेल्या महारवतन परिषदेस बी. एम. साळुंखे हजर होते. त्यांनी 'व्रणाचे घाव' ही पुस्तिका प्रकाशित करून बाबासाहेबांवर झोड उठवली होती. शंकरदास बर्वे, भि. शि. जाधव वगैरेंनी केलेल्या बेताल टीकेची री ओढणाऱ्या साळुंख्यांवर त्यामुळे बाबासाहेबांचे कडवे अनुयायी चिडलेले होते. त्यांनी संधी साधून साळुंख्यांना एकटे गाठले आणि त्यांना बेदम मारहाण केली.

स्वतंत्र मजूर पक्षाचे मुखपत्र असलेले 'जनता' पत्र कसे चालवावे हा प्रश्न बाबासाहेबांची कायमची डोकेदुखी होऊन बसला होता. स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन झाला तेव्हा 'जनता' पत्राचे संपादक भास्कर रघुनाथ कद्रेकर हे भारतभूषण छापखान्याची व्यवस्थाही पाहात असत. १ जुलै १९३९ रोजी या दोन्ही कामांतून आपण निवृत्त होत असून आपल्यानंतर ही कामगिरी काशीनाथ विश्राम सवादकर पाहतील असे कद्रेकरांनी वाचकांना कळवले.[२३] ५ ऑगस्ट १९३९ पासून जनता पत्राचे संपादक म्हणून गंगाधर निळकंठ सहस्रबुद्धे यांचे नाव झळकू लागले. जनता पत्राची सांपत्तिक स्थिती सारखी खालावत चालली होती. मुळात या पत्राला वर्गणीदारांचा पुरेसा आश्रय कधीच लाभलेला नव्हता. त्यात वर्गणीदारांची संख्या घटू लागल्याने आणि एजंटाकडे बाकी थकल्याने अंक नियमितपणे काढणे अवघड होऊ लागले. २१ जून १९४० पासून आमदार अनंतराव चित्रे यांनी जनता कार्यालयाच्या कारभारात लक्ष घालण्यास सुरुवात केली. चित्रे यांनी जनता पत्राची खेदजनक कहाणी वाचकांना सांगताना म्हटले आहे, "गेल्या पंधरा दिवसांत मी दररोज पंधरा तासांप्रमाणे काम पाहात आहे. भारतभूषण छापखान्यात कमीत कमी पंचवीस हजार रुपयांचे भांडवल खर्ची पडले आहे. छापखान्याला पुरेसे काम नसल्यामुळे तासचे तास यंत्रे बंद असतात. त्यामुळे छापखाना सध्या तोट्यात चालला आहे. तीन वर्षांपूर्वीची वर्गणीदारांची संख्या जवळजवळ निम्मी अधिक घटली आहे. वर्गणीदारांकडून हजार बाराशे रुपये येणे निघेल. तीन तीन वर्षे अंक घेऊन शेवटी व्ही. पी. नाकारणारे समाजघातकी हरीचे लाल आजपर्यंत अनेक आढळले आहेत. कमीत कमी एक हजार रुपये बाकी एजंटांकडे थकली आहे. जाहिरातदारांकडून सुमारे पाचशे रुपये येणे आहे. कामगारांचे पगाराचे देणे सुमारे साडेतीनशे, कागदवाल्यांचे सहाशे, म्युनिसिपल टॅक्स व इलेक्ट्रिक कंपनी मिळून शंभर रुपये देणे

आहे. छापखाना व वर्तमानपत्र हा कोणत्याही चळवळीचा प्राण आहे. आपला छापखाना आणि 'जनता' पत्र यांचा मृत्यू म्हणजे आपल्या चळवळीचा मृत्यू."[२४] त्यामुळे "सर्व चळवळी सोडून आपण छापखाना आणि जनता पत्र यांना आपले सर्वस्व अर्पण करण्याचे ठरविले" असल्याचे चित्रे यांनी जाहीर केले.

बहिष्कृत भारतात जसे बाबासाहेबांनी नियमितपणे आणि विपुल लेखन केले तसे त्यांनी जनता पत्रात केले नाही. एकतर या काळात त्यांची प्रकृती बरी नसे. त्यांचे वजन मे आणि जून १९३८ या दोन महिन्यांत अडतीस पौंडांनी घटले होते. त्यांना सांधेदुखीचा व रक्तदाबाचा फार त्रास होत असे. अविश्रांत काम करण्याच्या त्यांच्या सवयीमुळे त्यांच्या प्रकृतीची नेहमी काही ना काही तक्रार असे. वयाची पन्नाशी उलटण्यापूर्वीच आपण आता म्हातारे होत चालल्याची भाषा बाबासाहेब जाहीर सभेतही करीत असत. नानाविध व्यापामुळे वृत्तपत्रासाठी लेखन करण्यास आवश्यक ती सवड त्यांना मिळत नव्हती. आपण जनता पत्रात नियमित लिहिले तर त्याचा खप वाढेल हे त्यांना माहीत होते. म्हणून अनंतराव चित्रे यांनी 'जनता' पत्राची संपादकीय सूत्रे हाती घेतल्यावर "यापुढे शक्य तर दर आठवड्याला–निदान अधूनमधून तरी– मी जनतेत लेख लिहू शकेन असे वाटते." असे बाबासाहेबांनी जाहीर आश्वासन दिले.[२५] पण इच्छा असूनही नियमितपणे 'जनता' पत्रासाठी लेखन करणे त्यांना शक्य झाले नाही.

अनंतराव चित्रे यांनी ६ जुलै १९४० च्या अंकात 'ही बेफिकिरी घात करील' या मथळ्याचा लेख लिहून वाचकांना सावध करण्याचा प्रयत्न केला तरी तो निष्फळ ठरला. १७ ऑगस्ट १९४० च्या अंकात चित्रे यांनी 'उपड्या घड्यावर पाणी' अशा मथळ्यानिशी प्रसिद्ध केलेल्या संपादकीयात त्यांची निराशा व्यक्त झालेली दिसते. "दोन महिन्यांच्या मुदतीत तीन हजार रुपये जमावयास हवे होते. दीड महिन्यात अवघे ११३ रुपये ७ आणे जमले. माझे सहकारी आमदार माझ्या एसओएसच्या (निर्वाणीच्या) हाकेला क्षणाचाही विलंब न लावता स्वयंस्फूर्तीने धावून येतील ही आशा पूर्णपणे फलद्रूप झाली नाही." आमदार खंडेराव सावंत आणि जिवाप्पा ऐदाळे हे दोघे वगळले तर पक्षातर्फे निवडून आलेल्या आमदारांनी पक्षाच्या मुखपत्रासाठी आर्थिक साहाय्य केले नाही. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर महागाई वाढली. कागदाची टंचाई जाणवू लागली. त्यामुळे चढ्या भावाने वृत्तपत्रासाठी कागद विकत घेणे अटळ झाले. ते झेपेना तेव्हा 'जनता' पत्र बंद करण्याचा विचारही बाबासाहेबांनी एकदा बोलून दाखवला, पण पक्षाचे मुखपत्र बंद केल्यामुळे स्वतंत्र मजूर पक्षाचीच अडचण झाली असती हे जाणून बाबासाहेबांनी वृत्तपत्र चालू ठेवण्याचा निर्धार केला. त्यांनी पुन्हा एकदा वाचकांना विनंती केली. "पत्र म्हणजे अस्पृश्यांच्या चळवळीला जिवंत ठेवण्यास एक संजीवनी आहे अशी माझी ठाम समजूत आहे. बंद करण्याची कल्पना हल्लीच्या विकट परिस्थितीमुळे मनात आणावी लागली, पण ती असह्यच होती. इतर

पत्रकर्त्यांनी तूट भरून काढण्याकरिता वर्तमानपत्राची किंमत वाढविली आहे. 'जनता'ची किंमत वाढविणे लोकांच्या दारिद्र्यामुळे शक्य नाही व शक्य असले तरी इष्ट नाही. माझ्या मते दोन गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. 'जनता'च्या वर्गणीदारांची संख्या वाढविता येईल व दुसरी 'जनता'ला जास्ती देणगी मिळविता येईल."[२६] प्रत्यक्षतः या विनंतीनंतरही वर्गणीदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली नाही. तसेच 'जनता'ला जास्ती देणगी देणारे दातेही भेटले नाहीत. त्यामुळे 'जनता' पत्राच्या प्रकाशनात अधून-मधून खंड पडत असे. स्वतंत्र मजूर पक्ष अस्तित्वात असताना त्याचे हे मुखपत्र रडतखडत कसेबसे चालले होते एवढेच.

जुलै १९४२ मध्ये व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगो यांच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नेमणूक होईपर्यंत बाबासाहेबांची आर्थिक परिस्थिती ओढगस्तीची असावी असे त्यांचे एक हितचिंतक मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लम्ले यांनी लिन्‌लिथगोस लिहिलेल्या पत्रावरून दिसते. "त्यांच्या (डॉ. आंबेडकरांची) आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना काही काळ काळजी वाटत आहे हे तुम्हाला माहीत आहेच. पूर्वी त्यांना ज्यांनी आर्थिक साहाय्य केले त्यांचे देणे त्यांना अद्याप द्यावयाचे आहे असे मला वाटते. त्यापैकी काहीही परत करणे त्यांना शक्य नाही. त्याबद्दल कोणी नुसता उल्लेख केला तरी ते त्याला काहीसे टाकून बोलतात. आपल्या भविष्यकाळाची तरतूद करण्याची संधी मिळावी म्हणून उच्च न्यायालयात किंवा अन्य ठिकाणी आपल्याला एखादे अधिकारपद मिळावे याबद्दल अलीकडे ते उत्सुक आहेत हेही तुम्हाला माहीत आहेच. आपल्या अनुयायांसाठी आपण जे कार्य करीत आहोत त्याबद्दल आता त्यांना खरीखुरी आस्था वाटत नाही आणि अन्य क्षेत्रात उडी घेण्यास ते अधीर झाले आहेत असा अलीकडे माझा त्यांच्याविषयी ग्रह झालेला आहे."[२७] गव्हर्नर लम्लेसाहेबांशी बोलताना बाबासाहेबांनी आपल्या मनातली निराशा लपवून ठेवली नसल्यामुळे त्यांचा असा समज झाला असावा. सर्व सोंगे आणता येतात पण पैसा असल्याचे सोंग आणता येत नाही म्हणतात. स्वतंत्र मजूर पक्ष हा खऱ्या अर्थाने गरिबांचा पक्ष असल्याने त्याला पैशाची चणचण सारखी भासत असे. काँग्रेसला गिरणीमालक, बडे व्यापारी देणग्या देत असल्यामुळे पैशाची अडचण तितकीशी जाणवत नसे. मुस्लिम लीगलाही धनाढ्य जमीनदार आणि मुंबईतील खोजा, बोहरी व कच्छी व्यापारी पैसा देत असल्याने तिचेही कार्य पैशासाठी अडत नसे. बाबासाहेबांना मात्र पदरमोड करून पक्ष आणि त्याचे मुखपत्र चालवावे लागत असे.

## संदर्भ


१. जनता, १४ ऑगस्ट १९३७
२. कित्ता

३. कित्ता, २ ऑक्टोबर १९३७
४. कित्ता, २ एप्रिल १९३८
५. कित्ता, २६ मार्च १९३८
६. कित्ता, ३० जुलै १९३८
७. देवराव नाईकांचे अमृतराव रणखांब्यांना पत्र, २ एप्रिल १९३८
८. भाऊराव गायकवाडांचे अमृतराव रणखांब्यांना पत्र, ६ एप्रिल १९३८
९. अमृतराव रणखांब्यांचे गायकवाडांना पत्र, ८ एप्रिल १९३८
१०. भाऊराव गायकवाडांचे रणखांब्यांना पत्र, १५ एप्रिल १९३८
११. रणखांब्यांचे गायकवाडांना पत्र, १७ एप्रिल १९३८
१२. शंकर रावबा रोकडे यांचे पत्रक
१३. जनता, ९ जुलै १९३८
१४. भि. शि. जाधव, अस्पृश्यांचे धर्मांतर, १९३८, पृ. १२
१५. वि. ल. केळशीकर, हुतात्मा देवरुखकर, १९४८, पृ. ९
१६. भाई अमरसिंग, अस्पृश्यांच्या चळवळीतील सावळागोंधळ, पृ. ४८–५६
१७. भा. कृ. गायकवाडांचे सरदार अमरसिंगांना पत्र, ५ नोव्हेंबर १९३७
१८. चां. भ. खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड ६ व ७, १९८५, पृ. २२१
१९. भि. शि. जाधव, उपरोक्त, पृ. २५
२०. शंकरदास बर्वे, वतनदार महार समाजास इषारा : स्वतंत्र मजूर पक्षाची गुंडगिरी, १९३९, पृ. ५–९
२१. जनता, २० जानेवारी १९४०
२२. कित्ता, २७ जुलै १९४०
२३. कित्ता, १ जुलै १९३९
२४. कित्ता, ६ जुलै १९४०
२५. कित्ता, १३ जुलै १९४०
२६. कित्ता, १७ मे १९४०
२७. निकोलस मॅनसर्ग ( मुख्य संपादक ), द ट्रान्सफर ऑफ पॉवर : १९४२–४७, व्हॉल्यूम १ : क्रिप्स मिशन, जानेवारी-एप्रिल १९४२, १९७०, पृ. ८४७

# ५

## स्वतंत्र मजूर पक्ष आणि भारतीय राजकारण

हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी गांधीजींच्या नेतृत्वाखाली आणि काँग्रेस पक्षाच्या तिरंगी झेंड्याखाली चाललेल्या देशव्यापी चळवळीपासून आपल्या राजवटीला खरा धोका आहे अशी इंग्रज राज्यकर्त्यांची खात्री झाली होती. त्यामुळे या ना त्या कारणाने काँग्रेसला विरोध करणाऱ्या मुस्लिम लीग, लिबरल फेडरेशन, ब्राह्मणेतर पक्ष, स्वतंत्र मजूर पक्ष वगैरे राजकीय पक्षांना उत्तेजन देण्याचे, त्यांना कधी चुचकारून तर कधी आंजारून गोंजारून जवळ करण्याचे इंग्रज राज्यकर्त्यांचे धोरण असे. ते 'फोडा आणि झोडा' या साम्राज्यवाद्यांच्या नीतीच्या सनातन सूत्राशी सुसंगत होते. बॅ. जिना तसेच डॉ. आंबेडकर यांच्या दृष्टीने काँग्रेस हा सवर्ण हिंदूंचे वर्चस्व असलेला पक्ष होता. इंग्रजी राजवटीने सत्तेचा हप्ता देऊ केला की त्याचा वाटा आपणासही मिळावा अशी मागणी अल्पसंख्याकांच्या वतीने जिना तसेच डॉ. आंबेडकर हे दोघेही करीत असत. इंग्रज राज्यकर्त्यांशी सहकार्य करून अल्पसंख्याकांचा फायदा करून घ्यावयाचा असे धोरण जिनांनी तसेच डॉ. आंबेडकरांनीही अनुसरले होते. आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपण इंग्रज राज्यकर्त्यांचा उपयोग करून घेतला पाहिजे अशी या दोघांचीही धारणा होती. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षामार्फत काँग्रेसविरुद्ध चालविलेली प्रचार मोहीम इंग्रजांच्या पथ्यावरच पडणारी असल्याने ते बॅ. जिनां-प्रमाणेच बाबासाहेबांचाही काँग्रेसविरुद्धच्या संघर्षात चलाखीने वापर करून घेत असत. याचा अर्थ इंग्रज राज्यकर्ते जे जे करतील त्याला बाबासाहेब मान्यता देत असत असा करणे चुकीचे ठरेल.

१९३५ च्या कायद्यात समाविष्ट केलेली संघराज्याची योजना काँग्रेसप्रमाणेच बॅ. जिनांनी आणि डॉ. आंबेडकरांनीही फेटाळली होती. संघराज्याच्या कल्पनेबाबत

सुरुवातीला उत्साह दाखवणारे हिंदी संस्थानिक १९३५ चा कायदा ब्रिटनच्या संसदेने मंजूर केल्यानंतर संघराज्याचे स्वागत करण्याच्या मनःस्थितीत नसल्याचें इंग्रज राज्यकर्त्यांना जाणवले होते. १९३६ साली व्हाइसरॉय म्हणून लॉर्ड लिन्लिथगोने अधिकारसूत्रे हाती घेतली आणि १ एप्रिल १९३८ रोजी आपणास भारतीय संघराज्य अस्तित्वात आणता येईल या आशेने त्याने कसोशीने प्रयत्न चालवले होते. १९३५ च्या कायद्यातील संघराज्याची योजना कॉंग्रेसने झिडकारली असली तरी कॉंग्रेस पक्षातील सत्यमूर्ती, भुलाभाई देसाई वगैरे नेत्यांना १९३५ च्या कायद्यात काही दुरुस्त्या करण्यास इंग्रज राज्यकर्ते तयार झाले तर संघराज्याची योजना स्वीकारावी असे वाटत होते. याउलट कॉंग्रेसमधील उजव्या गटाच्या या नेत्यांनी स्वीकारलेल्या धोरणाला १९३८ साली कॉंग्रेसचे अध्यक्ष झालेल्या सुभाषचंद्र बोसांनी प्रखर विरोध दर्शविला होता. संघराज्याबाबतच्या सुभाषबाबूंच्या भूमिकेला बाबासाहेब आंबेडकरांनी निःसंदिग्ध शब्दात आपला पाठिंबा जाहीर केला. १९३५ च्या कायद्यातील फेडरेशनबाबतचा म्हणजेच संघराज्याबाबतचा भाग "जालीम विष समजून तो फेकून दिला पाहिजे" असे मत व्यक्त करून बाबासाहेबांनी पत्रकात म्हटले होते, "कॉंग्रेसने जर बहुमताने फेडरेशनविरोध कायम राखला तर स्वतंत्र मजूर पक्ष सुभाषबाबूंच्या पक्षाशी सहकार्य करील"[१]. "येऊ घातलेली जुलमी राज्यघटना (फेडरेशन) हाणून पाडणे" हे उद्दिष्ट मध्यप्रांत-वऱ्हाड शाखेच्या वतीने श्रमजीवी वर्गास जाहीर विनंती करण्यासाठी बाबासाहेबांनी काढलेल्या पत्रकात स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते.

याचा अर्थ भारतात संघराज्य निर्माण होऊ नये असे त्यांना वाटत होते असा करणे चुकीचे ठरेल. "प्रगतीच्या मार्गावर असताना हिंदुस्थानला पुढे मागे फेडरेशनचा स्वीकार करावा लागेल; परंतु ते फेडरेशन १९३५ च्या कायद्याने प्रस्थापित केलेल्या फेडरेशनपेक्षा अगदी निराळ्या स्वरूपाचे असेल" असे त्यांचे म्हणणे होते.[२] १९३५ च्या कायद्यातील संघराज्याची योजना स्वीकारली तर भारतात खरेखुरे संघराज्य निर्माण होण्याऐवजी कॉन्फेडरेशन म्हणजेच राज्यसंघ अस्तित्वात येईल असा इशारा बाबासाहेब देत होते. केंद्र सरकारात द्विदल राज्यपद्धती सुरू करण्याची तरतूद, साडेसहाशे संस्थानांपैकी जवळजवळ पाचशे संस्थानांना संघराज्यात सामील होण्यास नाकारण्यात आलेली परवानगी, सबंध राष्ट्रातील सर्व नागरिकांना सर्वसामान्य नागरिकत्वाचे हक्क उपभोगता यावेत अशा व्यवस्थेचा अभाव, असे अनेक दोष १९३५ च्या कायद्यातील संघराज्याच्या योजनेत असल्यामुळे ही योजना बाबासाहेबांना राक्षसी स्वरूपाची वाटत होती. संस्थानिकांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करण्याचा अधिकार संघराज्याला असणार नाही ही तरतूदही बाबासाहेबांना घातक वाटत होती, कारण त्यामुळे खालसा मुलखात जबाबदार राज्यपद्धतीवर आधारलेली लोकशाही तर संस्थानामध्ये राजे-महाराजांचा बेबंद मनमानी एकतंत्री कारभार असे चित्र निर्माण होणार होते.

१९३७ साली खालसा मुलखात लोकनियुक्त मंत्रिमंडळे अधिकारावर आल्यानंतर संस्थानी प्रजेनेही आपल्या हक्कांचा प्रश्न उपस्थित करणे अपरिहार्य झाले. संस्थानातील प्रजेने हक्कांसाठी चळवळ केल्यास तिला नैतिक पाठिंबा देणे आणि काँग्रेससदस्यांना व्यक्तिशः अशा चळवळीत भाग घेण्यास मुभा देणे असे १९३८ अखेरपर्यंत काँग्रेसचे धोरण होते. त्यानंतर संस्थानी प्रजेच्या चळवळीस सक्रिय पाठिंबा देण्याचे आणि आवश्यक तेथे सत्याग्रह, उपोषण वगैरे मार्गांचा अवलंब करून हस्तक्षेप करण्याचे धोरण काँग्रेसने अधिकृत रीत्या स्वीकारले. १९३८ च्या अखेरीस स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने बाबासाहेबांनी संस्थानी प्रजेच्या हक्कांचा प्रश्न हाती घेतला. हैदराबाद संस्थानातील मीर उस्मान अलीखान या निजामाच्या राजवटीत प्रजेला अनेक मूलभूत हक्क नाकारण्यात आले होते. बहुसंख्य प्रजाजन हिंदू असले तरी संस्थानात अल्पसंख्य मुसलमानांचा वरचष्मा होता. अस्पृश्यांवर बळजबरी करून त्यांना मुसलमान होण्यास भाग पाडले जात असे. सवर्ण हिंदू ज्या अपमानास्पदरीतीने अस्पृश्यांना वागवीत त्याच पद्धतीने मुसलमानही अस्पृश्यांना वागवीत असत.[३] संस्थानच्या हद्दीत राजकीय स्वरूपाची सभा भरविण्यास मनाई असल्याने बाबासाहेबांच्या अनुयायांनी औरंगाबाद जिल्ह्याच्या हद्दीलगतच्या चाळीसगाव जिल्ह्यातील मकनपूर गावी औरंगाबाद जिल्हा दलित परिषदेचे पहिले अधिवेशन ३० डिसेंबर १९३८ रोजी भरवले होते. अध्यक्षीय भाषणात बाबासाहेबांनी निजामी राजवटीतील मानवी हक्कांच्या मुस्कटदाबीबद्दल दुःख व्यक्त केले. "तुम्हाला तोंड खोलण्याची सक्त मनाई आहे. तुम्हाला मिरवणुकी काढता येत नाहीत. तुमच्या जिभा कापल्या गेल्या आहेत. येथील राज्य करण्याची पद्धत सदोष आहे म्हणून तुम्ही आतून काही करू शकत नाही; पण मी बाहेरून जरूर करीन असे आश्वासन मी तुम्हाला देतो."[४] परिषदेत मंजूर करण्यात आलेले ठराव निजामाचे मुख्य प्रधान सर अकबर हैदरी यांच्याकडे पाठवून देणे यासारख्या सनदशीर उपायांचा अवलंब करण्यात आला, पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. हैदराबाद संस्थानातील प्रजेच्या हक्कांसाठी प्रथम आर्यसमाजाने आणि नंतर हिंदुमहासभेने सत्याग्रह केला आणि या संघटनांच्या सदस्यांनी तुरुंगवासही पत्करला. नंतर स्वामी रामानंद तीर्थांच्या नेतृत्वाखाली हैदराबाद स्टेट काँग्रेसनेही आंदोलन केले. निजामाविरुद्ध असा लढाऊ पवित्रा घेण्यास बाबासाहेब तयार नव्हते. "आपली गाऱ्हाणी योग्य त्या सनदशीर मार्गाने सरकारच्या नजरेस आणण्याचा प्रयत्न करावा" असा सल्ला त्यांनी तडवळे (ढोकी) येथे २३ फेब्रुवारी १९४१ रोजी भरलेल्या वतनदार महार-मांग परिषदेत बोलताना दिला हे लक्षात घेण्यासारखे आहे. १९३९ च्या मार्चमध्ये जत संस्थानात आणि एप्रिलमध्ये फलटणला प्रजा परिषद भरवण्यात आली. या दोन्ही संस्थानांच्या राजेसाहेबांनी बाबासाहेबांना सन्मानाने वागवले आणि त्यांचा गौरव केला. कारण संस्थानिकांकडून समोपचाराने, वाटाघाटींद्वारा प्रजेला हक्क मिळवून

देण्यावर बाबासाहेबांचा भर होता.

बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडांसारख्या प्रजाहितदक्ष राजाबद्दल बाबासाहेबांना अतीव आदर असला तरी सयाजीरावांसारखा संस्थानिक एखाददुसराच आढळतो याची बाबासाहेबांना पुरेपूर कल्पना होती. संस्थानांचे स्वतंत्र अस्तित्व टिकवावे यासाठी धडपडणाऱ्यांपैकी ते नव्हते. फलटणचे राजे सुज्ञ असल्याने त्यांना पेन्शन देऊन संस्थान खालसा करण्यास ते हरकत घेणार नाहीत असे उद्‌गार फलटणच्या अस्पृश्य प्रजा परिषदेच्या अधिवेशनात काढताना बाबासाहेब बिलकुल कचरले नाहीत. संस्थानिकांनी काळाची बदलती पावले ओळखून प्रजेला जबाबदार राज्यपद्धती द्यावी असा त्यांना बाबासाहेब सल्ला देत असत. १९३९ सालच्या अखेरीस कोल्हापुरात भरलेल्या दलित प्रजा परिषदेच्या अधिवेशनात बोलताना त्यांनी छत्रपती महाराजांना सांगितले, "एकतर त्यांनी स्वतःच्या हातात राज्यसूत्रे घेऊन कारभार पाहावा, नाहीतर प्रजेला अधिकार देऊन लोकशाही तरी स्थापन करावी. प्रजेला नोकरशाहीच्या ताब्यात मात्र मुळीच ठेवू नये."[५] फलटण, कोल्हापूर वगैरे संस्थानांतील कायदेमंडळांत अस्पृश्यांना वाजवी प्रतिनिधित्व द्यावे. अस्पृश्य मुलामुलींच्या वसतिगृहासाठी सढळ हाताने पैसा द्यावा अशा मागण्या त्यांनी या संस्थानांच्या अधिपतींकडे केल्या. मात्र काँग्रेसच्या प्रभावाखालच्या प्रजापरिषदेशी त्यांनी कधीही सहकार्य केले नाही.

१९३९ च्या मार्चच्या सुरुवातीस राजकोटसारख्या चिमुकल्या संस्थानात गांधीजींनी केलेल्या उपोषणामुळे पेचप्रसंग निर्माण झाला तेव्हा बाबासाहेबांना त्यात लक्ष घालावे लागले. जेमतेम पाऊण लाख लोकवस्ती आणि २८२ चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या राजकोट संस्थानात अवघे एक शहर आणि साठ खेडेगावे होती. महात्मा गांधींच्या वडलांनी काही काळ राजकोटचे दिवाण म्हणून काम केले होते. राजकोटचे ठाकोरसाहेब धर्मेंद्रसिंह यांनी राजकोट प्रजा प्रतिनिधीसभा या नावाने ओळखले जाणारे कायदेमंडळ बरखास्त करून टाकले. ठाकोरसाहेब ख्यालीखुशालीत रमणारे आणि चैन करणारे गृहस्थ होते.[६] दरबार वीरावाला हे त्यांचे दिवाण प्रत्यक्षतः राज्यकारभार करीत असत. राजकोटमधील प्रजेच्या चळवळीमुळे २६ डिसेंबर १९३८ रोजी ठाकोरसाहेबांना सरदार पटेलांबरोबर वाटाघाटी करून संस्थानातील सुधारणाबाबतच्या करारावर सही करावी लागली तरी या कराराचे पालन करण्याचा त्यांचा बिलकुल इरादा नव्हता. ठाकोरसाहेब आणि सरदार पटेल यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार एक महिन्याच्या आत घटनात्मक सुधारणा सुचवण्यासाठी दहा सदस्यांची एक समिती नेमण्याचे ठाकोरसाहेबांनी मान्य केले होते. समितीच्या दहा सदस्यांपैकी सात बिनसरकारी सदस्य असावेत आणि त्यांच्या नावांची शिफारस सरदार पटेलांनी केल्यानंतर त्यांची नेमणूक करण्याचेही ठाकोरसाहेबांनी कबूल केले होते. आधी ठरल्याप्रमाणे वल्लभभाईंनी सात नावांची यादी सादर करताच इंग्रज रेसिडेंटच्या चिथावणीमुळे त्यांपैकी फक्त चौघांची

नेमणूक करण्यास ठाकोरसाहेब तयार झाले.[८] उरलेल्या तिघा बिनसरकारी सदस्यांची निवड मुसलमान तसेच भायात आणि गिरासिया या अल्पसंख्याकांमधून आपण करू असे ठाकोरसाहेब म्हणू लागले. पटेलांनी ज्यांची शिफारस केली त्यांची नेमणूक करण्यास आपण बांधील नाही असेही ठाकोरसाहेब म्हणू लागले. तेव्हा हा सरळसरळ वचनभंग आहे असे म्हणून सरदार पटेलांनी राजकोट प्रजापरिषद पुन्हा सत्याग्रहास सुरुवात करील असा ठाकोरसाहेबांना इशारा दिला.

२६ जानेवारी १९३९ पासून राजकोटच्या प्रजाजनांपैकी काहींनी शांततापूर्ण आंदोलन सुरू करताच त्यांना बेदम मारहाण करून वठणीवर आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. तेव्हा सत्याग्रह्यांना धीर देण्यासाठी प्रथम कस्तुरबा गांधी राजकोटला गेल्या. गांधीजींनी पाठिंबा दिलेल्या पट्टाभीसीतारामय्यांचा पराभव करून कॉंग्रेसच्या त्रिपुरी अधिवेशनाचे अध्यक्ष बनलेले सुभाषचंद्र बोस आणि गांधीजी व कॉंग्रेस कार्यकारिणीतील बहुतेक सर्व सदस्य यांच्यामधील मतभेदांनी याच दिवसांत उग्र रूप धारण केले होते. अशा स्थितीत राजकोटमध्ये राजबंद्यांनी सुरू केलेल्या अन्नसत्याग्रहाबाबतच्या तारेने येणाऱ्या बातम्या वाचून गांधीजी व्यथित झाले. गांधीजींच्या विनंतीवरून राजबंद्यांनी अन्नसत्याग्रह थांबवला आणि सत्याग्रह आंदोलनही स्थगित करण्यात आले. २८ फेब्रुवारी १९३९ रोजी गांधीजी राजकोटला आले आणि २ मार्च १९३९ रोजी त्यांनी ठाकोरसाहेबांना पत्र लिहून यू. एन. ढेबर आणि त्यांचे चार सहकारी यांची घटनात्मक सुधारणा सुचवणाऱ्या समितीचे सदस्य म्हणून ठाकोरसाहेबांनी नेमणूक करावी असे सुचवले. समितीत प्रजा परिषदेच्या प्रतिनिधींचे बहुमत असावे असाही गांधीजींनी आग्रह धरला. ठाकोरसाहेब, त्यांचे दिवाण दरबार वीरावाला आणि रेसिडेंट गिब्सन दाद देईनात तेव्हा गांधीजींनी ३ मार्चला प्राणांतिक उपोषण सुरू केले. ज्या प्रांतांमध्ये कॉंग्रेस मंत्रिमंडळे होती तेथील मुख्यमंत्र्यांनी व्हाइसरॉय लिन्‌लिथगोस हस्तक्षेप करण्याची विनंती केली आणि व्हाइसरॉयने राजकोटमधला पेचप्रसंग सोडविण्यासाठी पुढाकार घेतला नाही तर कॉंग्रेस मंत्रिमंडळे राजीनामे देतील असा इशारा दिला. फेडरल कोर्टाचे सर न्यायाधीश सर मॉरिस ग्वायर यांची लवाद म्हणून नेमणूक करावी आणि त्यांनी दिलेला निवाडा मान्य करावा हा लिन्‌लिथगोने सुचवलेला तोडगा स्वीकारण्याची ठाकोरसाहेब आणि गांधीजी यांनी तयारी दर्शविली आणि गांधीजींनी ७ मार्चला उपोषण सोडले.

उपोषणानंतर आलेल्या अशक्ततेमुळे आपणास त्रिपुरी अधिवेशनास हजर राहणे शक्य नाही असे गांधीजींनी जाहीर केले. गांधीजींच्या गैरहजेरीत त्यांच्या गटाने त्रिपुरी अधिवेशनात अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांना अडचणीत आणणारे ठराव मंजूर केले. कॉंग्रेसवर अजूनही आपलेच नियंत्रण असल्याचे सिद्ध केल्यानंतर गांधीजींनी १५ मार्च रोजी दिल्लीत व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगोशी बोलणी केली आणि ९ एप्रिलला

गांधीजी पुन्हा राजकोटला परतले. घटनात्मक सुधारणा सुचवण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या समितीतील सदस्यांची संख्या दहापेक्षा जास्त असू नये आणि त्यांपैकी सात सभासदांच्या नावाची शिफारस सरदार पटेलांनी करावी असा निवाडा सरन्यायाधीश ग्वायरनी दिला होता. सरदार पटेलांनी ज्या व्यक्तींची शिफारस केली असेल त्या व्यक्ती प्रजाजनांपैकी असल्यास त्यांची नेमणूक करणे ठाकोरसाहेबांवर बंधनकारक राहील असेही सरन्यायाधीशांनी म्हटले होते. राजकोट नगरपालिकेचे लोकनियुक्त अध्यक्ष मंडन हे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीतील असल्याने त्यांच्या नावाचा समावेश सरदार पटेलांनी सुचवावयाच्या सात जणांच्या यादीमध्ये केला जावा असे ठाकोरसाहेबांचे म्हणणे होते तर मोहन मंडन हे अस्पृश्य नाहीत असे गांधीजींचे म्हणणे होते. त्यामुळे मोहन मंडन यांच्या नावाचा समावेश यादीत करण्यात आला नाही.[८] सरदार पटेलांनी सुचवलेल्या गांधीजींनी मान्य केलेल्या सात सभासदांच्या यादीमध्ये अस्पृश्यांचा एकही प्रतिनिधी नाही हे पाहून गिरासिया चिडले. मुसलमान आणि भायातही नाराज होते, कारण त्यांना अधिक प्रतिनिधित्व पाहिजे होते. मुसलमानांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले नाही याबद्दल गांधीजींवर टीका करणारे पत्रक बॅ. जिनांनी १८ एप्रिलला काढले आणि राजकोट संस्थान घटनात्मक सुधारणा समितीवर मुसलमानांनी बहिष्कार घालावा असा जिनांनी सल्ला दिला. १८ एप्रिलला गिरासियांच्या निमंत्रणावरून बाबासाहेब राजकोटला गेले, आणि त्यांनी १९ एप्रिलला गांधीजींची भेट घेतली. सुधारणा समितीत अस्पृश्यांचा निदान एक तरी प्रतिनिधी घ्यावा असा बाबासाहेबांनी आग्रह धरला. समितीच्या सभासदांच्या नियुक्तीबाबत गांधीजी आणि दिवाण दरबार वीरावाला यांच्यामध्ये चाललेली बोलणी फिसकटली आणि वैतागून गांधीजी एप्रिलअखेर कलकत्त्यास भरणाऱ्या अ. भा. काँग्रेस समितीच्या अधिवेशनात भाग घेण्यासाठी गेले. राजकोट प्रकरणाचा गांधीजींनी घातलेला घोळ मे अखेरपर्यंत चालूच राहिला आणि त्यातून प्रजा परिषदेच्या पदरी अखेर काहीच पडले नाही.

१९३९ च्या एप्रिल महिन्यात इंग्रज राज्यकर्त्यांना दुसऱ्या महायुद्धाची चाहूल लागलेली असल्यामुळे त्यांनी ब्रिटनच्या संसदेत एक दुरुस्ती विधेयक मांडून १९३५ च्या कायद्यात १२६ अ हा नवा विभाग समाविष्ट केला. त्यामुळे हिंदुस्थान सरकारला युद्ध किंवा अंतर्गत अशांततेमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत प्रांतिक सरकारांच्या अखत्यारात असलेल्या बाबींसंबंधीही कायदे करण्याचे अधिकार मिळाले.[९] या दुरुस्ती विधेयकामुळे प्रांतिक स्वायत्ततेच्या मुळावरच घाव घातला गेला आहे अशा शब्दात काँग्रेसने त्याचा निषेध केला. जुलै-ऑगस्टमध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या सावल्या गडद होऊ लागताच हिंदी सैनिकांच्या तुकड्या एडन, सिंगापूर, कैरो वगैरे ठिकाणी धाडल्या जाऊ लागल्या. तेव्हा भारतीय जनतेला विश्वासात न घेता तसेच प्रांतिक कायदेमंडळे आणि मंत्रिमंडळे यांच्याशी आधी सल्लामसलत न करता आणि त्यांची संमती न

मिळवता ब्रिटिश सरकार हिंदुस्थानलाही युद्धात ओढणार हे स्पष्ट दिसू लागले. ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनीविरुद्ध युद्ध सुरू झाल्याचे जाहीर केले. मुस्लिम लीग आणि कॉंग्रेस या दोन पक्षांनी इंग्रज सरकारला सशर्त सहकार्य देऊ केले तर हिंदुमहासभा, लिबरल फेडरेशन या पक्षांप्रमाणे आणि संस्थानिकांप्रमाणे स्वतंत्र मजूर पक्षानेही सरकारशी बिनशर्त सहकार्य करण्याबाबत घोषणा केली. आता हिटलरला विरोध करावयास सरसावलेल्या राष्ट्रांनी यापूर्वीच त्याला विरोध करावयास हवा होता असे मत व्यक्त करून युद्ध निव्वळ पोलंडच्या रक्षणासाठी पुकारलेले नाही असा अभिप्राय स्वतंत्र मजूर पक्षाच्या युद्धविषयक जाहीरनाम्यात देण्यात आला होता. "स्वातंत्र्यासाठी हिंदुस्थानच्या परक्या मित्रास पाचारण करणे हे आत्मघातकी ठरले नाही तरी हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्यासारखे मूर्खपणाचे खास ठरणार" असा स्वतंत्र मजूर पक्षाने इशारा दिला आणि हिंदुस्थानातील खड्या सैन्यात युद्धास लायक व नालायक असा भेदभाव न करता सर्व जातींच्या लोकांना प्रवेश आणि अधिकाराच्या जागा द्याव्यात असे इंग्रज राज्यकर्त्यांना सुचवले. "या आणीबाणीच्या वेळी मदत करण्यापूर्वी शर्ती घालणे योग्य होणार नाही," असे स्वतंत्र मजूर पक्षाचे मत असल्याचे जाहीर करण्यात आले.[१०]

ऑक्टोबर १९३९ च्या पहिल्या पंधरवड्यात लिन्लिथगोने पन्नासाहून अधिक भारतीय नेत्यांशी बोलणी करून त्यांचे मत अजमावले. ९ ऑक्टोबर १९३९ रोजी बाबासाहेबांनी व्हाइसरॉयची भेट घेतली. ब्रिटन करीत असलेल्या युद्धाची उद्दिष्टे लिन्लिथगोने १७ ऑक्टोबर १९३९ रोजी स्पष्ट केली. वसाहतीचे स्वराज्य हे हिंदुस्थानबाबतच्या ब्रिटनच्या धोरणाचे उद्दिष्ट असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला आणि युद्धानंतर १९३५ च्या कायद्याचा फेरविचार करण्याचे अभिवचन देण्यात आले. व्हाइसरॉय लिन्लिथगो आणि भारतमंत्री लॉर्ड झेटलंड यांच्या घोषणा गांधीजींना आणि कॉंग्रेस पक्षाला निराशाजनक वाटल्या आणि ३१ ऑक्टोबरपूर्वी कॉंग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे द्यावेत असा २३ ऑक्टोबर १९३९ रोजी कॉंग्रेस कार्यकारिणीने ठराव मंजूर करून त्यांना आदेश दिला. कॉंग्रेस कार्यकारिणीच्या ठरावानुसार मुंबईचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी विधानसभेत २५ ऑक्टोबर १९३९ रोजी हिंदुस्थानच्या युद्धातील सहभागाबाबत ठराव मांडला. हिंदी जनतेच्या संमतीशिवाय हिंदुस्थानला महायुद्धात सहभागी केल्याबद्दल आणि लोकमताकडे दुर्लक्ष करून प्रांतिक सरकारांचे अधिकार मर्यादित केल्याबद्दल विधानसभेला खेद होत आहे असे या ठरावात आरंभीच म्हटले होते. हिंदुस्थानला आपल्यासाठी घटना तयार करण्याचा अधिकार आहे असेही त्यात नमूद करण्यात आले होते. बाबासाहेब आंबेडकरांनी या ठरावाला दुरुस्ती सुचवली. प्रांतिक सरकारांचे अधिकार मर्यादित केल्याबद्दलचा ठरावातील निर्देश गाळावा असे बाबासाहेबांनी सुचवले होते. नवी घटना, अल्पसंख्याकांचे जीवित आणि

स्वातंत्र्य ज्यामुळे सुरक्षित राहील अशा तरतुदी असलेली तसेच अल्पसंख्य जाति-जमातींनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींना समाधानकारक वाटणारी अशी असली तरच ब्रिटिश सरकारने ती अंमलात आणावी असेही बाबासाहेबांनी सुचवले होते.[११] ठरावावरील चर्चेच्या वेळी प्रत्येक विरोधी पक्षाच्या नेत्यास जास्तीत जास्त पाऊण तास बोलण्यास आपण परवानगी देऊ असे सभापती मावळणकरांनी प्रथम जाहीर केले असले तरी बाबासाहेबांनी आपण ही कालमर्यादा पाळणार नसल्याचे भाषणाच्या प्रारंभीच स्पष्ट केले आणि ते तब्बल दीड तास बोलले.

बाळासाहेब खेरांनी मांडलेला ठराव अनुचित आणि अयोग्य वेळी मांडलेला असून व्हाइसरॉय लिन्‌लिथगोने १७ ऑक्टोबर १९३९ रोजी केलेली घोषणा समाधानकारक आहे किंवा नाही याबद्दल खेरांनी मौन राखल्याबद्दल बाबासाहेबांनी त्यांना दोष दिला. हिंदी जनतेची संमती न घेता महायुद्धात हिंदुस्थानाला सहभागी होणे भाग पाडल्याबद्दलच्या ठरावातील भागाशी आपण सहमत आहोत असे बाबासाहेबांनी जाहीर केले. खेरांच्या ठरावात असलेल्या लोकशाहीच्या उल्लेखाचा आधार घेऊन बाबासाहेबांनी अस्पृश्य मानलेल्या अल्पसंख्याकांना बहुसंख्य लोक कशी अपमानास्पद वागणूक देतात याची अनेक उदाहरणे दिली. भाषणाच्या अखेरीस आपली भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेब म्हणाले, "जेव्हा जेव्हा माझे व्यक्तिगत हितसंबंध आणि सबंध देशाचे हितसंबंध यांच्यामध्ये संघर्ष होण्याचा प्रसंग आला तेव्हा तेव्हा माझ्या वैयक्तिक हितापेक्षा मी नेहमीच देशहिताला प्राधान्य दिले आहे. माझी आणखीही एक निष्ठा आहे आणि ती मी कदापि सोडू शकत नाही. ही निष्ठा म्हणजे ज्या अस्पृश्य समाजात मी जन्मलो आणि ज्याला कधीही मी वाऱ्यावर सोडणार नाही त्या समाजावरची निष्ठा. जेव्हा जेव्हा देश आणि अस्पृश्य यांच्या हितसंबंधांमध्ये द्वैत निर्माण होईल तेव्हा तेव्हा मी देशापेक्षा अस्पृश्यांचे हितसंबंध जपण्याला अग्रक्रम देईन."[१२] अस्पृश्यांना दिलेल्या अमानुष वागणुकीची उदाहरणे विधानसभेत देताना बाबासाहेबांचा कंठ दाटून आला होता आणि डोळ्यात भरून आलेली आसवे त्यांनी मोठ्या संयमाने आवरली होती. त्यांच्या या भाषणाने बाळासाहेब खेरांचे अंतःकरण हेलावल्याशिवाय राहिले नाही. अल्पसंख्याकांच्या हक्कांचे व स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याबाबतच्या तरतुदी नव्या घटनेत असाव्यात ही बाबासाहेबांची सूचना काँग्रेस पक्षाने मांडलेल्या मूळ ठरावात समाविष्ट करण्यात आली आणि ठराव दुरुस्त स्वरूपात मताला टाकला गेला तेव्हा ९२ विरुद्ध ५६ मतांनी तो मंजूर झाला.

३१ ऑक्टोबर १९३९ रोजी दुपारी खेर मंत्रिमंडळाने राजीनामा दिला तेव्हा गव्हर्नर सर रॉजर लम्लेने विधानसभेतील मुस्लिम लीगचे पक्षनेते अली महम्मद खान देहेलवी यांना मंत्रिमंडळ बनविण्यासाठी पाचारण केले. अधिकारावर येण्यास मुस्लिम लीगचे सदस्य अधीर झाले असले तरी अन्य विरोधी पक्षांच्या सहकार्याशिवाय

मंत्रिमंडळ बनविणे देहेलवींना शक्य नव्हते. विधानसभेतील बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा असलेले संमिश्र मंत्रिमंडळ आपल्याला बनवणे शक्य नाही हे लक्षात येताच देहेलवींनी तो नाद सोडला आणि मंत्रिमंडळ बनवण्यास आपण असमर्थ आहोत असे लम्लेला कळवले. देहेलवी जरी निराश झाले तरी बाबासाहेबांना संमिश्र मंत्रिमंडळ बनवता येण्याची आशा वाटत होती असे दिसते. गव्हर्नरने अल्पसंख्याकांच्या मंत्रिमंडळास अधिकारावर येऊ द्यावे आणि त्याला सहा महिन्यांची मुदत द्यावी असे बाबासाहेबांनी गव्हर्नरला सुचवले. काँग्रेसमधील काही असंतुष्ट सभासदांना आपल्याकडे ओढून घेण्यास आणि विधानसभेत बहुमत मिळविण्यास एवढा अवधी पुरेसा ठरेल असे बाबासाहेबांचे मत होते,[१३] नवे मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यास मार्च महिना संपण्यापूर्वी विधानसभेत अर्थसंकल्प मंजूर करून घेणे अवश्य होते. तसेच कायद्याप्रमाणे विधानसभेचे अधिवेशन सहा महिन्यांच्या आत बोलावणे जरूर होते. तसे ते बोलावले गेल्यास आणि काँग्रेसने विधानसभेतील बहुमताच्या जोरावर नव्या मंत्रिमंडळाने सादर केलेला अर्थसंकल्प फेटाळल्यास गव्हर्नरने आपल्या खास अधिकारांचा वापर करून अर्थसंकल्प मंजूर करावा असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. सुमारे वीस काँग्रेस आमदारांचे मन वळवून त्यांना आपल्या बाजूस ओढता येईल असे जमनादास मेहतांनाही वाटत होते. पण गव्हर्नर लम्लेला याबाबतचा जमनादास मेहतांचा तसेच डॉ. आंबेडकरांचा आशावाद म्हणजे शेखमहंमदी दिवास्वप्न वाटत होते. अखेर १९३५ च्या कायद्यातील कुविख्यात ९३ कलमान्वये मुंबई प्रांताचा राज्यकारभार सरळ आपल्या हाती घेणे लम्लेसाहेबाने पसंत केले आणि डॉ. आंबेडकरांनी पुरेशा काँग्रेस आमदारांना आपल्या बाजूला ओढल्यास केव्हाही नवे मंत्रिमंडळ नेमता येईल असे सांगून बाबासाहेबांची सूचना निकालात काढली.

मुंबईप्रमाणेच अन्य प्रांतांतील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिल्यानंतर मुस्लिम लीगने आनंदोत्सव साजरा करण्याचे ठरवले. काँग्रेस मंत्रिमंडळाच्या सत्तावीस महिन्यांच्या कारकीर्दीत मुसलमानांना क्रूर वागणूक देण्यात येऊन त्यांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे अशी जिनांनी आधीपासूनच ओरड चालवली होती. काँग्रेसची राजवट म्हणजे फॅसिस्ट हिंदू राज्य असल्याचा त्यांनी घोशा लावला होता. २२ डिसेंबर १९३९ हा दिवस हिंदुस्थानातील मुसलमानांनी मुक्तिदिन म्हणून साजरा करावा असे बॅ. जिनांनी आवाहन केले आणि हा मुक्तिदिन साजरा करण्यात जिनांना साथ देण्याचा बाबासाहेब आंबेडकरांनीही निर्धार केला. खरे म्हणजे काँग्रेस मंत्रिमंडळे असलेल्या प्रांतात मुसलमानांना धाकदपटशा दाखवला जात आहे तसेच त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती केली जात आहे या मुस्लिम लीगच्या म्हणण्यावर आपला विश्वास नसल्याचे बाबासाहेबांनी १० ऑक्टोबर १९३९ रोजी दिल्लीत टाइम्स ऑफ इंडियाच्या वार्ताहराला सांगितले होते.[१४] त्याच महिन्याच्या अखेरीस काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे

दिल्यामुळे आपले मत त्यामुळे बाबासाहेबांनी बदलावे असे दरम्यान काही अभूतपूर्व घडलेही नव्हते. तरीही मुक्तिदिन साजरा करण्याची कल्पना जिनांनी मांडताच तत्परतेने बाबासाहेबांनी ती उचलून धरण्यामागे केवळ काँग्रेसविरोधी पक्षांची युती बळकट करण्यापलीकडे त्यांचा दुसरा काही विचार नसावा.

मुक्तिदिनाच्या निमित्ताने बॅ. जिनांनी भेंडीबाजारात बोलावलेल्या सभेत सर इब्राहिम करीमभॉय यांनी काँग्रेस मंत्रिमंडळांच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी बादशाही आयोग नेमला जावा अशी मागणी करणारा ठराव मांडला तेव्हा बाबासाहेबांनी या मागणीला आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला. मात्र काँग्रेस मंत्रिमंडळांनी मुसलमानांवर केलेल्या अत्याचाराचीही बादशाही आयोगाने चौकशी करावी असे सुचवले. "सर्व अल्पसंख्याक एकाच बोटीतून प्रवास करीत असले तरी त्यातील काही उतारू पहिल्या वर्गाचे, काही दुसऱ्या वर्गाचे व काही तिसऱ्या वर्गाचे आहेत." असे सांगून "आम्ही अस्पृश्य बोटीच्या सामान ठेवण्याच्या तळमजल्यातूनच प्रवास करणारे उतारू आहोत." असे ते म्हणाले. अल्पसंख्याकांना मान्य होईल असा तोडगा काढण्याऐवजी गांधीजी ब्रिटिश सरकारविरुद्ध सत्याग्रह सुरू करण्याची भाषा करीत असलेले पाहून बाबासाहेब म्हणाले, "मला या वेळी लो. टिळकांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. तुम्हाला माहीत आहे, की मुसलमानांचे व टिळकांचे विशेष सख्य नव्हते. किंबहुना हिंदु-मुसलमानांची तेढ वाढविली असाही आरोप त्यांचेवर केला जात असे; पण ज्या वेळेस मॉटेग्यू हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेची चर्चा करण्याकरता हिंदुस्थानात यावयास निघाले त्या वेळेस हिंदु-मुसलमानांची एकमुखी मागणी मॉटेग्यूसमोर मांडता यावी म्हणून टिळकांनी मनातील वैरभाव बाजूस ठेवून लखनौ पॅक्ट घडवून आणला. हल्ली याच्या उलट परिस्थिती आहे."[११] या दिवसांत मजूर पक्षाचे नेते सर स्टॅफर्ड क्रिप्स खासगी भेटीसाठी हिंदुस्थानात आले होते. त्यांचे काँग्रेस नेत्यांशी स्नेहाचे संबंध होते. आज ना उद्या इंग्रज राज्यकर्ते हिंदुस्थानातील राजकीय पेच-प्रसंग सोडवण्यासाठी काँग्रेसशी वाटाघाटी करणार अशी बाबासाहेबांची अटकळ होती. त्या वेळी अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना डावलून राजकीय सौदा केला जाऊ नये असे बाबासाहेबांना वाटत होते. म्हणून ते जिनांसारख्या काँग्रेसविरोधकांशी सहकार्य करण्यास तयार झाले होते.

याचा अर्थ हिंदुस्थानची फाळणी करण्याच्या दृष्टीने जिना आखीत असलेली धोरणे बाबासाहेबांना मान्य होती असा करणे चुकीचे ठरेल. २५ डिसेंबर १९३९ रोजी बेळगावात बॅ. जिनांची मुस्लिम लीगतर्फे जयंती करण्यात आली. त्या निमित्ताने आयोजित केल्या गेलेल्या जाहीर सभेत बाबासाहेबांचे मुख्य भाषण झाले. बॅ. जिना हे दुसऱ्याच्या आहारी न जाणारे अग्रगण्य मुसलमान पुढारी असून ते कोणाच्या पैशाला भाळणार नाहीत; त्यांना विकत घेणे कोणालाही शक्य नाही अशा शब्दात बाबासाहेबांनी

जिनांचा गौरव केला. जिनांच्या अंगी असलेल्या या निर्लोभीपणाच्या गुणांमुळेच आपल्याला त्यांच्याविषयी आदर वाटतो असे सांगून बाबासाहेबांनी मुसलमानांना बजावले, "मुसलमानांनी आपण सर्वजण हिंदी आहोत ही गोष्ट विसरता कामा नये. या देशातच आपला जन्म झाला असून आपण येथेच मरणार आहोत हे निश्चित. देशाच्या स्वातंत्र्याच्या आड येणार नाही असेच धोरण आपण नेहमी ठेवले पाहिजे. मुसलमानांनी सर्व हिंदूंविरुद्ध ओरड करण्यात काही अर्थ नाही. इतर मागासलेल्या समाजाशी फटकून वागल्याने त्यांचे काहीही वाईट होणार नाही. म्हणून मुसलमान समाजाने इतर लहान गटांबरोबर सहकार्य केलेच पाहिजे असे माझे आग्रहाचे सांगणे आहे."[१६] सर्व हिंदूंचे वर्चस्व असलेल्या काँग्रेसबरोबर बाबासाहेबांचे भांडण असले तरी त्यामुळे या देशाच्या मातीशी असलेले लागेबांधे तोडून टाकण्यास ते कधीही तयार झाले नाहीत हे लक्षात ठेवावयास हवे.

१९४० च्या जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात मद्रास प्रांतातील जस्टिस म्हणजेच ब्राह्मणेतर पक्षाचे नेते इ. व्ही. रामस्वामी नायकरांनी मुंबईत ठिकठिकाणी सभा घेतल्या. धारावी येथे बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत रामस्वामी नायकरांनी जिनांच्या आणि आंबेडकरांच्या सहकार्याने आपण काँग्रेसला व ब्राह्मणशाहीला गाडून टाकू अशी गर्जना केली. संख्येने अवघे तीन टक्के असलेल्या मद्रास प्रांतातील ब्राह्मणांच्या मुठीत तेथील काँग्रेस पक्ष होता आणि म्हणून ते ९७ टक्के ब्राह्मणेतरांवर बिनदिक्कत अत्याचार करीत होते असे रामस्वामी नायकरांचे म्हणणे होते. एकीकडे जिना आणि रामस्वामी नायकरांसारख्या काँग्रेसच्या विरोधकांबरोबर बाबासाहेब हातमिळवणी करीत होते त्याच वेळी आधी ज्या कम्युनिस्टांशी बाबासाहेबांनी औद्योगिक कलह विधेयकाच्या वादात युती केली होती ती मोडू लागली होती. दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी काही दिवस आधी रशिया आणि जर्मनी यांच्यामध्ये अनाक्रमणाचा करार झाल्याने हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्षाने युद्धात ब्रिटनबरोबर सहकार्य न करता युद्धप्रयत्नात अडथळे आणण्याचे धोरण स्वीकारले. कम्युनिस्टांच्या हातात असलेल्या कामगार संघटनांनी संपासारखे हत्यार उगारून कारखाने बंद पाडण्यास सुरुवात केली. युद्धात गुंतलेल्या ब्रिटनच्या अडचणीत भर न घालण्याचे आणि सरकारबरोबर बिनशर्त सहकार्य करण्याचे बाबासाहेबांचे धोरण असल्याने वाटाघाटीद्वारा सामोपचाराने कामगारांचे प्रश्न सोडवण्यावर त्यांचा भर होता.

१९४० च्या मार्चमध्ये मौलाना आझादांच्या अध्यक्षतेखाली रामगडला भरलेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याखेरीज आपले अन्य कशानेही समाधान होणार नाही असे जाहीर केले आणि ते दिले जाईपर्यंत ब्रिटनबरोबर सहकार्य करणे शक्य होणार नाही या भूमिकेचा पुनरुच्चार केला. याउलट मुस्लिम लीगने त्याच महिन्याच्या अखेरीस लाहोरला भरलेल्या वार्षिक अधिवेशनात हिंदुस्थानची

फाळणी करून पाकिस्तान निर्माण केले जावे अशी मागणी केली. एप्रिल ते जून १९४० या तीन महिन्यांच्या काळात हिटलरच्या फौजांनी हॉलंड, बेल्जम, फ्रान्स वगैरे देशांत केलेल्या चढाईमुळे इंग्लंड अधिकच अडचणीत आले. त्यामुळे चेंबर्लेनऐवजी विन्स्टन चर्चिलने ब्रिटनच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतली. जूनमध्ये फ्रान्सने शरणागती पत्करली. १० जून १९४० रोजी मुंबईच्या गव्हर्नरने बोलावलेल्या नागरिकांच्या सभेत हिटलरिझमचा नायनाट झाला पाहिजे असे मत व्यक्त करून बाबासाहेबांनी मुंबई इलाख्यात मुलकी संरक्षक दल निर्माण करावे, तसेच मुंबई युद्ध साहाय्य-निधी उभारावा अशा सूचना केल्या.[१७] फ्रान्स जर्मनीला शरण गेल्यानंतर निर्माण झालेल्या नव्या परिस्थितीचा विचार करून २१ जून १९४० रोजी कॉंग्रेस कार्यकारिणीने नवा ठराव मंजूर केला आणि राष्ट्राच्या संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाल्यास आपण महात्मा गांधींप्रमाणे अहिंसेचा आग्रह धरणार नाही असे जाहीर केले. अंतर्गत अशांतता आणि परकीयांचे आक्रमण यापासून देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आपण सेनादलाचा उपयोग करणार नाही असे कॉंग्रेसने जाहीर करावे असे गांधीजींचे म्हणणे होते. ते कॉंग्रेस कार्यकारिणीने मान्य केले नाही.[१८] व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगोने २९ जून १९४० रोजी गांधीजींशी दिल्लीत वाटाघाटी केल्या. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील सभासदांची संख्या वाढवून भारतीयांना अधिक प्रतिनिधित्व देण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

ब्रिटनने शस्त्रे टाकून द्यावीत, हिटलर आणि मुसोलिनी यांना आपला देश तसेच आपल्या वसाहती यांचा ताबा घेऊ द्यावा आणि नंतर या आक्रमकांशी अहिंसक असहकार करून त्यांना ताळ्यावर आणावे असे गांधीजींनी सर्व ब्रिटिशांना आवाहन केले. कॉंग्रेस कार्यकारिणीने मात्र ३ जुलै १९४० रोजी नवा ठराव मंजूर करून ब्रिटनने हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याबाबतची घोषणा करावी आणि हिंदुस्थानात हंगामी राष्ट्रीय सरकार स्थापन करावे अशी मागणी केली. ती मान्य झाल्यास युद्धात ब्रिटन-बरोबर सहकार्य करण्याची कॉंग्रेसने तयारी दर्शविली. जुलै अखेर पुण्यात भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस अधिवेशनात ९५ विरुद्ध ४७ मतांनी या ठरावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ८ ऑगस्ट १९४० रोजी व्हाइसरॉय लॉर्ड लिन्‌लिथगोने युद्ध संपल्यानंतर हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य दिले जाईल आणि घटना तयार करण्यासाठी एक समिती नेमली जाईल अशी घोषणा केली. आपल्या कार्यकारिणीत नवे सभासद नियुक्त करून तिचा विस्तार केला जाईल. तसेच युद्धविषयक सल्ला देण्यासाठी समितीही तावडतोब नेमली जाईल असेही व्हाइसरॉयने जाहीर केले. कॉंग्रेसने हा देकार झिडकारला.

"आमच्याबरोबर या नाहीतर खुशाल तुरुंगाची वाट धरा" असे ब्रिटिश सरकारने कॉंग्रेसला सांगितल्याबद्दल बाबासाहेबांना समाधान वाटले.[१९] कॉंग्रेसने घातलेल्या अटी

मान्य करणे ब्रिटिश सरकारला अशक्य होते असे बाबासाहेबांना वाटत होते. स्वातंत्र्याचा प्रश्न तातडीचा करणे शक्य नव्हते. अल्पसंख्याक जाती व अन्य राजकीय पक्ष यांचे प्रतिनिधी राष्ट्रीय सरकारात घ्यावयाचे की नाही आणि घ्यावयाचे झाल्यास कोणाला घ्यावयाचे ते ठरविण्याचा अधिकार काँग्रेसने मागितला होता. ही मागणी मान्य करणेही अशक्य होते असे बाबासाहेबांना वाटत होते. गांधी आणि काँग्रेस कार्यकारिणी यांच्या युद्धाबाबतच्या भूमिका तंतोतंत सारख्या नसल्या तरी दोघांनीही भारतीय राजकारणाचा कसा विचका केला आहे याचे विश्लेषण करणारी लेखमाला बाबासाहेबांनी 'जनता' पत्रात प्रसिद्ध केली.[२०] हिंदुस्थानने ब्रिटनबरोबरच्या भांडणाची शहानिशा युद्ध संपल्यानंतर करून घ्यावी. मात्र युद्धामध्ये साहाय्य करताना अटीतटीचा व्यवहार करू नये या आपल्या १३ सप्टेंबर १९३९ च्या पत्रकातील भूमिकेचा बाबासाहेबांनी पुनरुच्चार केला. दिल्लीत तसेच मुंबईत त्यांनी व्हाइसरॉयबरोबर बोलणी केली आणि त्याबाबतचा तसेच व्हाइसरॉयबरोबर झालेल्या पत्रव्यवहाराचा तपशील त्यांनी १ सप्टेंबर १९४० रोजी स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत सांगितला.[२१] व्हाइसरॉयने त्यांच्या कार्यकारिणीत येण्याचे बाबासाहेबांना आमंत्रण दिले तर ते स्वीकारावे असा निर्णय कार्यकारी मंडळाच्या या बैठकीत घेण्यात आला.

१४ व १५ सप्टेंबर १९४० रोजी मुंबईत शिवडी येथे अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात महात्मा गांधींनी पुन्हा काँग्रेसचे नेतृत्व करावे अशी त्यांना विनंती करण्यात आली. भाषणस्वातंत्र्य हा स्वराज्याचा पाया असल्याने युद्धात गुंतलेल्या ब्रिटिश सरकारबरोबर सहकार्य करू नका असे सांगण्याचा हिंदुस्थानातील प्रत्येक माणसाला अधिकार आहे असे गांधीजी या अधिवेशनाचा समारोप करताना म्हणाले. आपल्याला भाषणस्वातंत्र्य मिळाले तरी पुरे ही गांधीजींची मागणी बाबासाहेबांना 'पाताळयंत्री' वाटली. गांधींच्या मागणीवर कडक टीका करताना 'जनता'कर्त्यांनी लिहिले, "हल्लीचा जो डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट आहे त्याचा भंग करावयाचा हा या मागणीचा एकच अर्थ आहे. कोणत्याही देशाने एकदा युद्धाच्या कैचीत सापडल्यानंतर त्या युद्धात कोणी सामील होऊ नये व युद्धाला मदत करू नये अशा प्रकारचे भाषणस्वातंत्र्य आपल्या प्रजाजनांना कधी दिल्याचे ऐकिवात नाही. युद्ध कशाकरता हा महत्त्वाचा प्रश्न असून युद्ध पुकारताना संमती घेतली की नाही हा गौण प्रश्न आहे असे आमचे मत आहे."[२२] २७ आणि ३० सप्टेंबर १९४० रोजी सिमल्यात लिन्‌लिथगो आणि गांधीजी यांच्यामध्ये बोलणी झाली तेव्हा तुम्ही शांततावादी असला तरी युद्धात इतरांनी सामील होऊ नये असा प्रचार करण्याचे स्वातंत्र्य तुम्हाला दिले जाणार नाही असे लिन्‌लिथगोने गांधीजींना सांगितले. काँग्रेसचे संस्थानिकांबरोबर तसेच मुस्लिम लीगच्या आणि अस्पृश्यांच्या प्रतिनिधींबरोबर जोपर्यंत एकमत होत नाही तोपर्यंत हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यास ब्रिटन मान्यता देऊ शकत नाही असेही व्हाइसरॉयने

गांधीजींना बजावले. तेव्हा अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या हिंदूंमध्ये अनेक जाती असून या सर्वांचे प्रतिनिधित्व कोणीही एक अस्पृश्य करू शकणार नाही असे गांधींनी मत व्यक्त केले. एवढेच नव्हे तर अस्पृश्यांच्या हिताचे रक्षण करणे ही काँग्रेसची खास जबाबदारी असून इंग्रज राज्यकर्त्यांपेक्षा काँग्रेसच ही जबाबदारी पार पाडण्यास अधिक योग्य आहे अशी पुस्तीही गांधीजींनी जोडली.[६३] लिन्‌लिथगोबरोबरची बोलणी निष्फळ ठरल्यानंतर काँग्रेस कार्यकारिणीतील सदस्यांशी विचारविनिमय करून गांधीजींनी आपण वैयक्तिक कायदेभंगाची मोहीम सुरू करणार असल्याबद्दल १५ ऑक्टोबर १९४० रोजी घोषणा केली आणि विनोबा भावे यांना या सत्याग्रहाचा शुभारंभ करण्याचा मान देण्यात आला.

युद्धकाळात सत्याग्रह करून ब्रिटनला अडचणीत आणण्याला जसा बाबासाहेबांनी तीव्र विरोध केला तसाच संप घडवून आणून उत्पादनाला खीळ घालण्याच्या कम्युनिस्टांच्या प्रयत्नांनाही त्यांनी प्रखर विरोध केला. हिंदुस्थानातील कम्युनिस्ट सदैव रशियाच्या तालावर नाचत असत हे त्यांना पसंत नव्हते. ७ नोव्हेंबरच्या रशियन क्रांतिदिनाच्या निमित्ताने बाबासाहेबांनी 'जनता' पत्रात खास लेख लिहून भारतीय कम्युनिस्टांना काही सवाल केले. "फ्रेंच क्रांती ही पोळी आहे. रशियन क्रांती हे पोळीतले पुरण आहे. फ्रेंच क्रांती ही कळी आहे. रशियन क्रांती हे विकास पावलेले फूल आहे. या युद्धात रशियाची वागणूक दुर्बोध आहे. रशियाच्या मुलुखगिरीमुळे (रशियाने पोलंड, फिन्‌लंडचे स्वातंत्र्यहरण केले होते तसेच एस्थोनिया, लॅटव्हिया आणि रुमानियाचा काही भाग गिळंकृत केला होता) हिटलरला मोठाच फायदा झाला. जर्मनीची पूर्वबाजूची सरहद्द निर्वैर झाली. हिटलरचा वृक्ष वाढला तर त्याचे सावट रशियावर पडून रशियाची वाढ खुंटल्याशिवाय राहणार नाही असा इशारा दिल्याखेरीज आमच्याने राहवत नाही. या लढाईतील रशियाचे वर्तन सदोष आहे. तुम्ही रशियन क्रांतीची उपासना करीत बसणार, की समतेच्या ध्येयाचे रक्षण करणार? क्रांती मोठी की ध्येय मोठे? रशिया सांगेल तो धर्म, रशिया करील ते कर्म अशी अंधभक्ती किती दिवस चालणार? रशियापासून नेहमीच धडे घेत बसण्यापेक्षा चुकेल त्या वेळी रशियाला धडा देणे योग्य होणार नाही काय?"[६४] बाबासाहेबांनी विचारलेल्या या प्रश्नांकडे कम्युनिस्टांनी दुर्लक्ष केले. जून १९४१ मध्ये हिटलरने रशियावर हल्ला चढवल्यावर युद्धाचे चित्र बदलले आणि तोपर्यंत हे दोन साम्राज्यवादी गटात चाललेले युद्ध आहे असे म्हणणाऱ्या येथील कम्युनिस्टांना ते 'लोकयुद्ध' असल्याचा साक्षात्कार झाला. देवळी, येरवडा येथील तुरुंगात इंग्रजांनी डांबलेले कम्युनिस्ट नेते आपण युद्धात इंग्रज राज्यकर्त्यांशी सहकार्य करावयास तयार आहोत अशी नारायण मल्हार जोशी यांच्यामार्फत इंग्रज राज्यकर्त्यांना आश्वासने देऊ लागले आणि बंदिवासातून मुक्त होण्यासाठी धडपडू लागले.

१९४१ सालच्या सुरुवातीस बाबासाहेबांचा ' थॉट्स ऑन पाकिस्तान ' हा ग्रंथ प्रकाशित झाला. खरे म्हणजे मुळात हा ग्रंथ म्हणजे एक अहवाल होत आणि तो ऑगस्ट १९४० मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यकारी मंडळाला सादर करण्यात आला होता. कार्यकारी मंडळाच्या निर्णयानुसार तो जसाच्या तसा प्रकाशित करण्यात आला होता. २६ मार्च १९४० रोजी मुस्लिम लीगच्या लाहोर-अधिवेशनात पाकिस्तानची मागणी मान्य करण्यात आल्यानंतर त्याबाबत आपली भूमिका कोणती असावी हे निश्चित करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या कार्यकारी मंडळाने बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली या मागणीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमली. प्रा. मो. वा. दोंदे, एस. सी. जोशी, राजाभाऊ भोळे, डी. जी. जाधव आणि अनंतराव चित्रे हे या समितीचे सदस्य होते तर डी. व्ही. प्रधान यांनी चिटणीस म्हणून काम पाहिले.[२२] या ग्रंथात पाकिस्तानची मागणी करणाऱ्यांची तसेच तिला विरोध करणाऱ्यांची अशा दोन्ही बाजू मांडण्यात आल्या असल्या तरी ग्रंथाचा बराचसा भाग बहुसंख्य हिंदूंना उद्देशून लिहिलेला होता. ज्या देशात हिंदू बहुसंख्य आहेत तेथे आपल्याला दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून वागवण्यात येईल असे मुसलमानांना वाटत असल्याने आपण ज्या प्रांतात बहुसंख्य आहोत त्यांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करावे अशी मुसलमानांची मागणी होती. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही जमाती आपापल्या धर्माशी निगडित असलेला भूतकाळ विसरायला किंवा तो पुसून टाकावयास तयार नाहीत आणि कधी काळी विसरण्यास तयार होतील अशी आशाही बाबासाहेबांना वाटत नव्हती. राष्ट्रीयत्व ही मूलतः जाणीव असते आणि अशी जाणीव ज्या लोकसमूहामध्ये निर्माण होते त्याला केवळ आपले प्रभुत्व असलेले भूक्षेत्र हवे असे वाटू लागले की राष्ट्रवादाचा जन्म होतो. मुसलमानांमध्ये तसा तो झाला आहे असे बाबासाहेबांना दिसत होते.

मुस्लिम लीग ही मुसलमानांची एकमेव प्रतिनिधी आहे असे मानण्यास काँग्रेस पक्ष तयार नव्हता आणि १९३७–३९ या वर्षांत लीगच्या प्रतिनिधींना बरोबर घेऊन प्रांतांमध्ये संमिश्र मंत्रिमंडळे बनवण्यास काँग्रेसने नकार दिला होता. काँग्रेसने मुसलमान तसेच इतर अल्पसंख्याक यांचे भले केले किंवा नाही हा प्रश्न महत्त्वाचा नसून स्वराज्यात हिंदू राज्य करणार आणि अल्पसंख्याकांना त्यांचे गुलाम म्हणून नांदावे लागणार काय हा खरा प्रश्न आहे अशी बाबासाहेब मांडणी करीत होते. काँग्रेस आणि हिंदूमहासभा या दोन्ही पक्षांमध्ये फार फरक आहे असे अल्पसंख्यांकाना वाटत नव्हते. काँग्रेसवर ज्याची निष्ठा नाही अशा व्यक्तीला सत्तेचा वाटा द्यायला काँग्रेस तयार नव्हती एकेकाळी हिंदुस्थानवर राज्य करणारे मुसलमान इंग्रजी राजवटीत हिंदूंप्रमाणेच गुलाम बनले. स्वराज्य मिळाल्यास हिंदू गुलाम न राहता मालक बनणार होते आणि मुसलमानांना हिंदूंच्या ओंजळीने पाणी पिण्याचे नामुष्कीचे जिणे जगावे लागणार आहे

असे वाटत असल्याने पाकिस्तानची मागणी केली जात होती असे बाबासाहेबांना वाटत होते.

पाकिस्तानच्या निर्मितीमुळे देशाचे ऐक्य भंग पावेल, संरक्षण व्यवस्था कमकुवत होईल आणि जातीय प्रश्नही सुटणार नाही या हिंदूंच्या युक्तिवादाचीही बाबासाहेबांनी चिकित्सा केली आहे. पाकिस्तानच्या मागणीला पर्याय म्हणून लाला हरदयाळांनी १९२५ साली सुचविलेली आणि हिंदू संघटन व मुसलमानांचे शुद्धीकरण यावर आधारलेली विजिगीषू हिंदू राज्याची योजना बाबासाहेबांनी फेटाळली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या हिंदुत्वाच्या संकल्पनेवर आधारलेल्या हिंदू राष्ट्राचा पर्यायही मुसलमान राजीखुषीने मान्य करण्याची सुतराम शक्यता नव्हती. मुसलमानांनी हिंदूंचे खून केले किंवा त्यांच्या बायका पळवल्या तरी त्याबद्दल त्यांचा निषेध न करता त्यांची मनधरणी करण्याचे गांधीजींचे धोरणही बाबासाहेबांना घातक वाटत होते. स्वतंत्र हिंदुस्थान अखंड असणार नाही. हे अटळ सत्य स्वीकारून हिंदूंनी पाकिस्तानच्या मागणीस मान्यता द्यावी आणि सुखासुखी त्यांनी ती दिली नाही तरी अखेर ती मान्य करणे हिंदूंना भाग पडेल असा बाबासाहेबांच्या विवेचनाचा सूर होता. देशाची फाळणी करण्यास हिंदूही तयार झाले तर हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांच्या प्रगतीचा मार्ग सुकर होईल. तसेच हिंदू आणि मुसलमान या भिन्नधर्मीय जमातींमधील वैमनस्यामुळे उसळणाऱ्या दंगली होण्याची पाकिस्ताननिर्मितीनंतर भीती उरणार नाही असे बाबासाहेबांना वाटत होते.

अस्पृश्यांचा प्रतिनिधी म्हणून व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत आपली नेमणूक केली जाईल अशी बाबासाहेबांची अपेक्षा होती. १९४१ च्या जुलैच्या सुरुवातीस मध्यप्रांत-वऱ्हाडच्या गव्हर्नरने बापूजी अण्यांशी आणि मुंबईच्या गव्हर्नरने बाबासाहेबांशी बोलणे करून त्यांची मते अजमावली. २२ जुलै १९४१ रोजी लिन्‌लिथगोने आपल्या कार्यकारिणीचा विस्तार केला. कार्यकारिणीत चार गोरे आणि आठ भारतीय सदस्य होते. भारतीय सदस्यांमध्ये नलिनीरंजन सरकार, रामस्वामी मुदलियार, फिरोझखान नून, सर सुलतान अहमद, सर अकबर हैदरी, माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे, होमी मोदी आणि इ. राघवेंद्रराव हे आठ जण होते. मात्र शिखांचा तसेच अस्पृश्यांचा एकही प्रतिनिधी लिन्‌लिथगोने कार्यकारिणीत घेतला नव्हता तेव्हा बाबासाहेबांनी सरकार वचनभंग करीत असल्याचा आरोप करून लिन्‌लिथगोच्या धोरणाचा निषेध करणारी तार भारतमंत्री अमेरीस पाठवली. तारेतील मजकूर असा होता, "व्यक्तिशः मी ब्रिटिशांचा पाठिंबा कधीच मागितला नाही किंवा त्यांच्या पाठिंब्यावर विसंबूनही राहिलेलो नाही. मला ब्रिटिशांनी कधी पाठिंबाही दिलेला नाही. भविष्यकाळातही त्यांच्या पाठिंब्याशिवाय मी कार्य करू शकतो. तुम्हाला निवड करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. दलितांसाठी मला न्याय हवा. कार्यकारिणीतील आपल्या प्रतिनिधित्वाच्या हक्कावर

पाणी सोडण्यास दलित तयार नाहीत."[२६] आंबेडकर-चरित्रकार धनंजय कीरांच्या म्हणण्यानुसार स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही लिन्‌लिथगोस तार करून आंबेडकरांचा कार्यकारिणीत समावेश करावा असे सुचवले होते.[२७] सावरकरांनी तार केल्याची बातमी कीरांना कोणी सांगितली होती कोण जाणे! पण ही बातमी धडधडीत खोटी होती असे उपलब्ध पुराव्यावरून दिसते. खरे म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी या वेळी स्वीकारलेल्या धोरणावर हल्ला चढविताना 'जनता'कारांनी म्हटले होते, "अस्पृश्य व शीख यांच्या प्रतिनिधित्वासंबंधानेही सावरकर यांच्या दृष्टिकोणात मोठाच फेरबदल झालेला दिसून येतो. गतवर्षी अस्पृश्य व शीख यांचे प्रतिनिधी कार्यकारी मंडळात घेतले पाहिजेत असे आग्रहपूर्वक सांगणारे सावरकर आज फक्त शीख लोकांचा प्रतिनिधी न घेतल्याबद्दल खेद प्रदर्शित करीत आहेत व शिखांवर झालेला अन्याय दूर करावा अशी मागणी करीत आहेत, परंतु अस्पृश्यांचा प्रतिनिधी न घेतल्याबद्दल त्यांनी एक चकार शब्द काढला नाही... या त्यांच्या वर्तनावरून हिंदुमहासभा ही संस्था सर्वस्वी ब्राह्मणशाहीच्या आहारी गेल्याचे दिसून येते. त्याशिवाय एवढा मोठा प्रमाद सावरकरांच्या हातून घडला नसता."[२८] यावरून सावरकरांनी केलेल्या तारेबाबतची कीरांची बातमी कपोलकल्पित होती हे उघड होते.

लिन्‌लिथगोने शिखांचा तसेच अस्पृश्यांचा एकही प्रतिनिधी आपल्या कार्यकारिणीत घेतलेला नसला तरी त्याने नेमलेल्या संरक्षण सल्लागार समितीत त्याने संस्थानिकांसकट सर्वांना प्रतिनिधित्व दिले होते. बाबासाहेब आंबेडकर आणि रावबहाद्दूर एम. सी. राजा या दोघांचीही त्याने या समितीचे सदस्य म्हणून नियुक्ती केली होती. या समितीचे सभासद होण्यापूर्वीच बाबासाहेबांनी भूदलात महार बटालियन पुन्हा निर्माण करावी यासाठी प्रयत्न चालवले होते. महारांची लष्करात भरती करण्यासंबंधीचे तसेच त्यांची वेगळी पलटण तयार करण्यासंबंधीचे इंग्रजांचे धोरण नेहमीच धरसोडीचे राहिले होते. शिवछत्रपतींच्या काळात तसेच पेशवाईतही महार, मांग, चांभार वगैरे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचे लढवय्ये रणांगणावर अतुल पराक्रम गाजवून धारातीर्थी पडल्याची उदाहरणे कागदपत्रात नोंदविलेली आढळतात. इंग्रजांच्या बाजूने रक्त सांडून पेशवाईचा अंत घडवून आणण्यात महार लढवय्यांनी कशी महत्त्वाची भूमिका बजावली होती हे सांगताना बाबासाहेबांनी म्हटले होते, "खर्ड्याच्या निर्णयात्मक लढाईमध्ये इंग्रजांना विजय मिळाला तो केवळ महार वीरांच्या साहाय्यामुळेच होय याची साक्ष कोरेगाव येथे उभारलेला विजयस्तंभ देऊ शकेल. त्या विजयस्तंभावर दोन नावे इंग्रजांची, चार पुरभाय्यांची आणि बाकीची सर्व नावे महार वीरांचीच आहेत."[२९] ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करात तसेच १८५७ नंतर व्हिक्टोरिया राणीच्या राजवटीतही महारांच्या बटालियन्स होत्या. १८९१ साली लॉर्ड किचनेर हे हिंदुस्थानचे सरसेनापती झाल्यानंतर त्यांनी हिंदी लष्कराची पुनर्घटना जातीय पायावर करण्याचे धोरण आखले

आणि १८९५-९६ सालापासून लष्करात महारांची भरती करावयाची नाही असे फर्मान काढले. त्याविरुद्ध न्यायमूर्ती रानड्यांच्या मदतीने एक अर्ज तयार करून सरकारकडे पाठवण्यात आला; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शिवराम जानबा कांबळे यांनीही १९१० मध्ये भारतमंत्र्याकडे अर्ज धाडून लष्करात महारांची भरती करण्यासंबंधी विनंती केली होती. पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतरही इंग्रज राज्यकर्ते आपले धोरण बदलण्यास तयार नसल्याचे दिसून आले तेव्हा कर्मवीर विठ्ठल रामजी शिंद्यांनी महारांची पुन्हा लष्करात भरती करावी अशी १९१६ साली मागणी केली. अखेर १९१७ च्या फेब्रुवारीत महारांना पुन्हा सैन्यात भरती करुन घेण्याचे इंग्रजांनी ठरविले आणि १११ क्रमांकाच्या महार बटालियनने युद्धात पराक्रम गाजवून आपल्याला मिळालेल्या संधीचे चीज केले.

पहिले महायुद्ध संपल्यानंतर लष्करात हळूहळू कपात करण्याचे धोरण अंमलात आणण्यास सुरुवात झाली. काटकसरीच्या धोरणाचा एक भाग म्हणून १११ क्रमांकाची महारांची बटालियन मोडून टाकण्याचे सरकारने ठरवले. ही कुणकुण लागताच २८ ऑगस्ट १९२२ रोजी रावसाहेब पापण्णा लिंगय्या नायडू वगैरे अस्पृश्य पुढाऱ्यांनी बेळगावात सरसेनापतींची गाठ घेतली. तेव्हा सरसेनापतींनी त्यांना सांगितले, " सरकारला काटकसर करणे भाग असल्यामुळे महारांची पलटण मोडावी लागत आहे. तथापि यापुढे महारांना पलटणीत घ्यावयाचे नाही हा पूर्वीचा निर्बंध काढून टाकण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर त्यांना हिंदुस्थानातील कोणत्याही पलटणीत नाव घालता येईल."[30] दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर इंग्रजांना हिंदी लष्करात सैनिकांची मोठ्या संख्येने भरती करावी लागणार हे ओळखून स्वातंत्र्यवीर सावरकर, अकाली दलाचे मास्टर तारासिंग यांच्याप्रमाणे बाबासाहेब आंबेडकरांनीही आपल्या अनुयायांना लष्करात भरती होण्याचे आवाहन केले. मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लम्ले यांच्यामार्फत बाबासाहेबांनी लष्करात महार बटालियन निर्माण करण्यासंबंधीची आपली मागणी व्हाइसरॉय लिन्‌लिथगोच्या गळी उतरविली. महार बटालियन तयार करण्याचा निर्णय घेतला जाताच या पलटणीत केवळ सैनिक म्हणून नव्हे तर अधिकारी म्हणूनही महारांची भरती केली जावी अशी बाबासाहेबांनी मागणी केली.

३ डिसेंबर १९४१ रोजी हिंदुस्थान सरकारने वैयक्तिक सत्याग्रह मोहिमेत भाग घेतल्याबद्दल कारावास भोगणाऱ्या सर्वांची मुक्तता केली. ७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने पर्ल हार्बरवर अचानक हल्ला चढविल्याने तोपर्यंत दुसऱ्या महायुद्धात तटस्थ राहिलेल्या अमेरिकेला युद्धात उतरणे भाग पडले. जपानच्या सैन्याने मलायातील ब्रिटिशांचा पाडाव करून रंगूनपर्यंत धडक मारल्याने युद्ध भारताच्या दरवाजाशी आल्याची सर्वांनाच जाणीव झाली. घबराटीमुळे कलकत्ता शहरातील रहिवासी सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी शहर सोडून जाऊ लागले. १ जानेवारी १९४२ रोजी संयुक्त

राष्ट्रांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. कॉंग्रेस कार्यकारिणीच्या तसेच अ. भा. कॉंग्रेस समितीच्या अधिवेशनात मंजूर झालेल्या ठरावावरून गांधीजी, राजाजी, जवाहरलाल नेहरू या कॉंग्रेस नेत्यांमध्ये मतैक्य नसल्याचे स्पष्ट झाले. १५ फेब्रुवारी १९४२ रोजी जपानने सिंगापूर जिंकल्यानंतर ब्रिटनमध्ये पंतप्रधान विन्स्टन चर्चिलने मंत्रिमंडळाची पुनर्रचना केली. मॉस्कोहून परतलेल्या सर स्टॅफर्ड क्रिप्सचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आणि त्याच्याकडे हाऊस ऑफ कॉमन्सचे नेतेपद देण्यात आले. हिंदुस्थानातील राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी तातडीने काही पावले टाकावीत अशी विनंती सर तेजबहाद्दूर सप्रूंनी चर्चिलला जानेवारीतच तार पाठवून केली होती. रंगून शहर जपानने काबीज केल्यानंतर चार दिवसांनी म्हणजे ११ मार्चला विन्स्टन चर्चिलने ब्रिटनचे भारतविषयक धोरण विशद करण्यासाठी सर स्टॅफर्ड क्रिप्सला हिंदी पुढाऱ्यांशी वाटाघाटी करण्यासाठी पाठविण्यात येणार असल्याचे जाहीर केले. २२ मार्चला क्रिप्स हिंदुस्थानात आले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी अंदमान बेट जपानने काबीज केल्याचे जाहीर झाले.

जपानशी युद्ध सुरू झाल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी लिन्‌लिथगोने आपल्या कार्यकारिणीतील काही सदस्यांकडे सोपविलेल्या खात्यांचे फेरवाटप करण्याचे ठरविले. तसेच बाबासाहेब आंबेडकरांचा कार्यकारिणीत समावेश करून त्यांच्याकडे टपाल आणि तारखाते सोपविण्याचा मनोदयही त्याने भारतमंत्र्यांना २९ जानेवारी १९४२ रोजी लिहिलेल्या पत्रात व्यक्त केला.[३१] आंबेडकरांना टपाल आणि तारखाते देण्याऐवजी मजूर खाते द्यावे असे भारतमंत्री अमेरीचे मत होते.[३२] क्रिप्स भारतात येण्यापूर्वी ९ ते २२ फेब्रुवारी १९४२ या काळात चीनच्या कोमिंटांग पक्षाचे नेते आणि तेथील लष्कराचे सरसेनापती चँग कै शेक यांनी भारतास भेट दिली. चँग कै शेक हे गांधीजी आणि नेहरू यांच्याशी चर्चा करण्यासाठी आले होते. त्यांनी कॉंग्रेस, मुस्लिम लीग या पक्षांच्या नेत्यांप्रमाणेच आंबेडकरांनाही भेटावे आणि आंबेडकरांची आणि चँगची भेट घडवून आणण्यात लिन्‌लिथगोने पुढाकार घ्यावा असे सुचवण्यात आले. १ फेब्रुवारी १९४२ रोजी भारतमंत्र्याने ब्रिटनच्या मंत्रिमंडळास सादर केलेल्या टाचणात व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत आंबेडकरांचा आणि शिखांच्या एका प्रतिनिधीचा समावेश करावा अशी शिफारस करण्यात आली होती. अस्पृश्यांचा प्रतिनिधी कार्यकारिणीत घ्यावयाचा झाल्यास डॉ. आंबेडकर हे एकटेच त्यासाठी योग्य आहेत अशी व्हाइसरॉयचीही खात्री झाली होती.[३३] व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत त्याच्यासकट एकूण सोळा सदस्य असावेत. त्यांपैकी तीन गोरे, सहा हिंदू, चार मुसलमान, एक पार्शी आणि एक शीख सभासद घ्यावा असे भारतमंत्र्यास वाटत होते. कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग यांनी कार्यकारिणीत आपले प्रतिनिधी पाठवण्याचे मान्य केल्यास सहा हिंदूंपैकी तीन हिंदू कॉंग्रेसमधून निवडावेत आणि चार मुसलमानांपैकी

दोघे मुस्लिम लीगचे असावेत असेही भारतमंत्र्याने सुचवले होते. एखाद्या प्रश्नावर सहा हिंदू, एक शीख आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये एकमत झाले तरी चार मुसलमान, तीन गोरे आणि एक पार्शी अशा आठ सदस्यांची तुल्यबल दुसरी फळी सरकारच्या बाजूने राहील आणि अशा तऱ्हेने समसमान मतदान झाल्यास व्हाइसरॉयला निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल असे अमेरीचे म्हणणे होते.[३४] हिंदुस्थानात युद्धकाळात राष्ट्रीय मंत्रिमंडळ बनवावयाचे झाल्यास त्यात मुसलमानांना पन्नास टक्के प्रतिनिधित्व दिले पाहिजे अशी जिनांनी मागणी केली तेव्हा ती 'राक्षसी' असल्याचे बाबासाहेबांनी मत दिले आणि व्हाइसरॉयने ती फेटाळून लावल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

३० मार्च १९४२ रोजी क्रिप्सने बाबासाहेब आंबेडकर आणि रावबहादूर राजा यांच्याबरोबर बोलणी केली. युद्धानंतर अस्तित्वात येणाऱ्या घटना परिषदेसाठी निवडणूक घ्यावयाचे ठरविल्यास अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बहुतेक जागी काँग्रेस उमेदवारच निवडून येतील अशी भीती बाबासाहेबांनी आणि राजांनी क्रिप्सच्या भेटीत बोलून दाखविली. हिंदुस्थानातील अस्पृश्यांची वांशिक व धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये गणना केली जाईल की नाही या प्रश्नाला क्रिप्सने होकारार्थी उत्तर दिले आणि राष्ट्रसंघाने अल्पसंख्याकांबाबत केलेल्या तहनाम्यांच्या धर्तीवर अस्पृश्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी घटनेत तरतुदीही केल्या जातील असे आश्वासन क्रिप्सने बाबासाहेबांना आणि राजांना दिले. दरम्यान व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत अस्पृश्यांचा एक प्रतिनिधीही घेतला जाईल असे क्रिप्सने आश्वासन दिले. मात्र कार्यकारिणीचा विस्तार करण्यापूर्वी हिंदुस्थानातील समाजाचा एक प्रमुख घटक म्हणून अस्पृश्यांच्या प्रतिनिधीबरोबर व्हाइसरॉयने आधी विचारविनिमय करावा या बाबासाहेबांच्या सूचनेला क्रिप्सने वाटाण्याच्या अक्षता लावल्या.[३५] आपल्याला अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बोलावले असल्याची क्रिप्सने ग्वाही दिल्याबद्दल आणि सरकार अस्पृश्यांना गौण लेखीत नसल्याचे सांगितल्याबद्दल बाबासाहेबांनी १ एप्रिल १९४२ रोजी पत्र लिहून क्रिप्सचे आभार मानले. त्याबरोबरच क्रिप्स योजना मान्य नसल्याचेही त्यांनी कळवले.

क्रिप्सने सादर केलेली योजना मानवेन्द्रनाथ रॉय यांचा रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष वगळता बाकी सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी फेटाळली. पाकिस्तानच्या मागणीस निःसंदिग्धरीत्या त्यात मान्यता दिली नसल्याने मुस्लिम लीगने नाक मुरडले तर आडवळणाने पाकिस्तान निर्माण केले जाण्याची शक्यता क्रिप्स योजनेत अंतर्भूत केलेली असल्याने काँग्रेसला ती त्याज्य वाटली. महात्मा गांधींनी तर क्रिप्स योजना म्हणजे 'बुडणाऱ्या बँकेच्या नावावर देण्यात आलेला पुढच्या तारखेचा हा चेक आहे' अशी तिची संभावना केली. स्वतंत्र मजूर पक्षानेही क्रिप्स योजना फेटाळली. आपली भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेबांनी सांगितले, सर स्टॅफर्ड क्रिप्स यांनी काहीही भीडमुर्वत न ठेवता

जाहीर करून टाकले की क्रिप्स योजनेत अंतर्भूत असलेला कोणताही घटनाविषयक बदल घडवून आणण्यास केवळ मुसलमान आणि हिंदू यांची संमती पुरेशी आहे. अस्पृश्यांच्या संमतीची आवश्यकता नाही. स्पष्ट शब्दात सांगावयाचे म्हणजे भारताच्या राष्ट्रजीवनात अस्पृश्यांना स्वतंत्र महत्त्वाचा घटक म्हणून दिलेली मान्यता आता काढून टाकलेली आहे. सहा ते सात कोटी अस्पृश्यांचे केवळ काही महिन्यांच्या अवधीतच राष्ट्राचे मुख्य घटकत्व नाहीसे कसे होते ही गोष्ट कोणाच्याही आकलनाच्या पलीकडे आहे. ब्रिटिश सरकारने मारलेली ही कोलांटउडी आहे. अस्पृश्यांचा भयानक विश्वासघात आहे."[३६] क्रिप्स योजना फेटाळली गेल्यानंतर लिन्‌लिथगोने आपल्या कार्यकारिणीचा विस्तार करून आंबेडकरांचा समावेश करण्याच्या कल्पनेला पुन्हा एकदा चालना दिली.

अस्पृश्यांना आणि त्यांचे प्रतिनिधी असलेल्या आपणास कसलेच महत्त्व द्यायला क्रिप्स तयार नाही; तो फक्त कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग या दोन पक्षांनाच महत्त्व देतो हे त्याच्याशी बोलताना लक्षात आल्याने बाबासाहेब संतापले होते आणि दुखावले गेले होते. मुंबईच्या गव्हर्नरशी याबाबत बोलताना बाबासाहेबांनी आपला ब्रिटिश सरकारच्या धोरणाबद्दल भ्रमनिरास झाल्याचे सांगितले. राष्ट्रीय संरक्षण सल्लागार समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्याचा विचारही मनात आल्याचे त्यांनी गव्हर्नर लम्लेला सांगितले. तो जरी त्यांनी विचारांती बदलला तरी युद्धविषयक सरकारी धोरणास पाठिंबा देण्याचा उत्साह आता राहिलेला नाही असेही बाबासाहेबांनी गव्हर्नरला म्हटले. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचा १९४१ साली विस्तार करण्यात आला तेव्हा त्याने आंबेडकरांचा समावेश केला नाही. त्यामुळे तेव्हापासूनच आंबेडकर नाराज आहेत आणि महारांनी सैन्यात भरती व्हावे यासाठी देखील ते आपले वजन खर्च करण्यास तयार नाहीत असा लम्लेचा त्यांच्याशी झालेल्या बोलण्यावरून समज झालेला होता. आणि तो त्याने लिन्‌लिथगोस कळवलाही होता.[३७] अस्पृश्यांना आपलेसे करण्यासाठी आंबेडकरांना व्हाइसरॉयने कार्यकारिणीत घ्यावे अशी लम्लेने लिन्‌लिथगोस पुन्हा एकदा सूचना केली. ही सूचना भारतमंत्री अमेरीनेही उचलून धरली. तेव्हा आंबेडकरांचा कार्यकारिणीत समावेश करण्याचा आपलाही बरेच दिवसांपासून इरादा असल्याचे लिन्‌लिथगोने लम्लेला कळवले.[३८] १९४२ च्या मे महिन्याच्या सुरुवातीस लिन्‌लिथगोने भारतमंत्र्यास धाडलेल्या कार्यकारिणी सदस्यांच्या यादीत आंबेडकरांचे नाव होते आणि त्यांच्याकडे मजूरमंत्रिपद द्यावे असेही लिन्‌लिथगोने सुचवले होते. भारतमंत्र्याने तसेच ब्रिटनच्या मंत्रिमंडळाने लिन्‌लिथगोची शिफारस तावडतोब स्वीकारली.

२२ जून १९४२ रोजी लिन्‌लिथगोने भारतमंत्र्यास पाठवलेल्या पत्रात आपण आंबेडकरांना मजूर खाते स्वीकारण्याविषयी विचारले असल्याचे नमूद केलेले आढळते.

३० जून १९४२ रोजी भारतमंत्र्यांच्या कार्यालयाने डॉ. आंबेडकरांसकट कार्यकारिणीच्या सदस्यांच्या नेमणुकीविषयीच्या घोषणेचा मसुदा तयार केला. २ जुलै १९४२ रोजी मजूरमंत्री म्हणून बाबासाहेबांची नेमणूक होणार असे जाहीर झाले तरी जुलैअखेरपर्यंत कार्यकारणीचा सदस्य म्हणून रुजू होणे आपल्याला जमणार नसल्याचे बाबासाहेबांनी लिन्‌लिथगोस कळविले.[३९] लिन्‌लिथगोने कार्यकारिणीचा विस्तार केला या घटनेचा कॉंग्रेसवर कसलाच परिणाम झाला नाही. कॉंग्रेस कार्यकारणीने १४ जुलै १९४२ रोजी मंजूर केलेल्या ठरावामुळे सरकारसमोर एक नवे आव्हान उभे राहिले. हिंदुस्थानातील इंग्रजी राजवट ताबडतोब संपुष्टात आणली पाहिजे अशी मागणी या ठरावात करण्यात आली होती आणि ती फेटाळल्यास महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली अहिंसात्मक लढा पुकारला जाईल असा इशाराही कॉंग्रेस कार्यकरिणीने दिला होता. 'चले जाव' चळवळीबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत अ. भा. कॉंग्रेस समितीचे अधिवेशन भरणार असल्याचेही ठरावात नमूद करण्यात आले होते. सरकारला आणखी एक संधी द्यावयास गांधीजी तयार नव्हते आणि आपण उघड उघड बंड करणार असल्याची घोषणाही गांधीजींनी १६ जुलै १९४२ रोजी केली होती. इंग्रज सरकारविरुद्ध गांधीजी रान उठवीत असलेले पाहून त्यांच्या प्रचार मोहिमेस पायबंद घालण्यासाठी कॉंग्रेस आणि गांधीजी यांच्या विरोधकांनी संकल्पित चळवळीचा निषेध करणारी पत्रके काढावीत यासाठी लिन्‌लिथगोने भारतमंत्र्याच्या संमतीने प्रयत्न सुरू केले.

मुंबईचे गव्हर्नर सर रॉजर लम्ले यांनी बाबासाहेबांशी कॉंग्रेसच्या चढाईच्या पवित्र्याबाबत बोलणे केले तेव्हा कॉंग्रेसने लढा पुकारल्यास मजुरांचा त्याला फारसा पाठिंबा मिळणार नाही असे बाबासाहेबांनी मत दिले. तसेच कॉंग्रेसला एकूण फारच थोडा पाठिंबा मिळणार असल्याने ती पुकारणार असलेल्या लढ्याकडे दुर्लक्ष करणे शक्य होईल असेही बाबासाहेबांनी लम्लेला सांगितले. लिन्‌लिथगोने १६ जुलैस लम्लेस पाठवलेल्या तारेत केलेल्या सूचनेनुसार कॉंग्रेस आणि गांधीजी पुकारणार असलेल्या 'चले जाव' चळवळीचा आंबेडकरांनी जाहीर निषेध करावा असा निरोपही बाबासाहेबांना १७ जुलैस देण्यात आला.[४०] लिन्‌लिथगो आणि लम्ले यांनी केलेल्या सूचनेला बाबासाहेबांनी तत्परतेने प्रतिसाद दिला आणि गांधीजी व कॉंग्रेस लढा पुकारून देशाचा विश्वासघात करीत असून जर्मनी, जपान, वगैरे शत्रुराष्ट्रे जो खेळ खेळत आहेत तसाच खेळ कॉंग्रेस खेळत असल्याचा त्यांनी आरोप केला. कॉंग्रेसने चळवळ सुरू करण्याचा प्रयत्न केल्यास तिला सर्व शक्तीनिशी विरोध करणे हे प्रत्येक भारतीय देशभक्ताचे कर्तव्य आहे असे उद्‌गार बाबासाहेबांनी काढल्याचे वृत्त तारेने येताच लिन्‌लिथगो खूष झाला. बाबासाहेबांच्या या निवेदनाला इंग्लंडमध्ये व अमेरिकेत प्रसिद्धी द्यावी आणि त्याचा चांगला उपयोग करावा असे व्हाइसरॉयने भारतमंत्र्यास सुचविले.[४१] इंग्रज

राज्यकर्ते आपल्या साम्राज्यवादी राजकारणाच्या पटावरचे हत्ती म्हणून बाबासाहेब आंबेडकरांचा चातुर्याने उपयोग करून घेत होते हे सत्तांतरासंबंधी प्रकाशित झालेल्या अस्सल कागदपत्रांवरून उघड दिसते. बाबासाहेबांची मजूरमंत्री म्हणून करण्यात आलेली नेमणूक ही धूर्त इंग्रजांनी खेळलेली एक चाल होती.

बाबासाहेबांच्या ज्या भाषणामुळे लिन्‌लिथगो बेहद्द खूष झाला ते भाषण त्यांनी २२ जुलै १९४२ रोजी मुंबईत समता सैनिक दलाने आयोजित केलेल्या स्वागत समारंभात केले होते. त्याआधी ते १८ व १९ जुलै १९४२ रोजी नागपूरला भरलेल्या अ. भा. अनुसूचित जातींच्या परिषदेस हजर राहून मुंबईत परतले होते. नागपूरच्या परिषदेचे अध्यक्षस्थान बाबासाहेबांनी स्वीकारले तेव्हा त्यांच्या व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील नियुक्तीबाबतची अधिकृत घोषणा झाली नव्हती. मात्र २ जुलैस ती करण्यात आल्यानंतर त्यांच्यावर जबाबदारीची बंधने आल्यामुळे त्यांच्याऐवजी रावबहादूर एन. शिवराज यांच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ घालण्यात आली. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील अधिकारपद स्वीकारल्याने आपणास प्रत्यक्ष चळवळीत भाग घेणे शक्य होणार नसले तरी आपण अनुसूचित जातींच्या हक्कासाठी चळवळ करणाऱ्यांना मदत आणि सल्ला देऊ असे बाबासाहेबांनी परिषदेसाठी जमलेल्या श्रोत्यांना वचन दिले. नागपूरच्या परिषदेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावानुसार ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन या नव्या पक्षाची स्थापना करण्याचे ठरले. व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीतील अधिकारपदावर रुजू होण्यापूर्वी बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्ष गुंडाळून त्याच्याऐवजी शे. का. फेडरेशन या नव्या अखिल भारतीय पक्षाची मुहूर्तमेढ रोवली.

आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात बहिष्कृत हितकारिणी सभेपासून करून १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली आणि अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातीबाहेरच्या कष्टकरी शेतकरी-कामगारांचे प्रश्न धसाला लावण्याचा सहा वर्षे त्यांनी आपल्या परीने प्रयत्न केला. या काळात व्यापक स्वरूपाचे राजकारण करण्याची त्यांनी कसोशीने धडपड केली तरी त्यांच्या विरोधकांनी तसेच पाठीराख्यांनी त्यांच्याकडे अस्पृश्यांचे पुढारी म्हणूनच पाहिले. अस्पृश्यांचे पुढारीपण हे जसे त्यांचे शक्तिस्थान होते, तसेच ते त्यांचे मर्मस्थानही होते. नागपूरच्या परिषदेत बोलताना त्यांनी सांगितले, “अस्पृश्य लोक हिंदूंचा एक विभाग अथवा उपविभाग नसून भारताच्या राष्ट्रीय जीवननिष्ठेतील तो एक स्वतंत्र आणि ठळक असा घटक आहे हा सिद्धान्त माझ्या राजकारणाचा पाया आहे. मुसलमान हिंदू समाजापासून जितके स्पष्टपणे वेगळे आहेत तितकेच अस्पृश्यही वेगळे आहेत आणि मुसलमानांप्रमाणेच हिंदूपासून वेगळे असे राजकीय हक्क मिळण्याचा त्यांचा अधिकार आहे. ही माझ्या राजकारणाची गुरुकिल्ली आहे.”[२२] मुसलमानांचे वेगळेपण मान्य करण्यास गांधीजी व कॉंग्रेस यांच्याप्रमाणेच इंग्रज राज्यकर्तेही तयार होते त्यामुळे भारतीय राजकारणातील खरा पेचप्रसंग

म्हणजे हिंदू आणि मुसलमान यांच्यामधील संघर्ष असे समजून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात असे. याउलट हिंदू, मुसलमान आणि अस्पृश्य मानले गेलेले लोक असा भारतीय राजकारणाचा त्रिकोण आहे असे बाबासाहेबांचे म्हणणे होते. म्हणूनच जीनांसारख्या मुसलमान नेत्यांबरोबर वाटाघाटीच्या वेळी आपल्यालाही वेगळे स्थान दिले जावे असा त्यांचा आग्रह असे. अस्पृश्यवर्ग हा हिंदू समाजाचाच एक अविभाज्य भाग आहे अशी गांधीजींची आणि कॉंग्रेसची धारणा असल्याने अस्पृश्यांना भारतीय राजकारणातील स्वतंत्र घटक म्हणून वेगळा दर्जा देण्याची त्यांची तयारी नव्हती. इंग्रज राज्यकर्तेही प्रथम आंबेडकरांना अस्पृश्यांचे एकमेव प्रतिनिधी मानीत नसत. असे असले तरीही बाबासाहेबांच्या म्हणण्यानुसार ८ ऑगस्ट १९४० च्या व्हाइसरॉयच्या घोषणेपर्यंत अस्पृश्य वर्ग हा भारतीय राजकारणातील स्वतंत्र व ठळक घटक असल्याने त्याच्या संमतीशिवाय घटनेत बदल करता येणार नाही असे इंग्रज राज्यकर्ते म्हणत असत. मात्र त्यानंतर घटनाविषयक बदल घडवून आणण्यास केवळ 'हिंदूंची आणि मुसलमानांची संमती पुरेशी आहे; अस्पृश्यांच्या संमतीची गरज नाही असे क्रिप्सने जाहीर केले. त्यामुळे अस्पृश्य किंवा अनुसूचित जातींची अखिल भारतीय स्वरूपाची संघटना बांधून आपल्या वेगळ्या अस्तित्वाची भारतीय राजकारणाशी संबंधित सर्वच पक्षांना जाणीव करून देणे बाबासाहेबांना आवश्यक वाटले असावे; म्हणून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष विसर्जित करून शे. का. फेडरेशनचा पाया घालण्याचा निर्णय घेतला असला पाहिजे. अस्पृश्यांचे एकमेव प्रतिनिधी म्हणून त्यांची व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीत नियुक्ती करण्यात आली तरी पुढे १९४६-४७ साली राजकीय सत्ता भारतीयांच्या हाती सोपवण्याच्या दृष्टीने वाटाघाटी करताना इंग्रज राज्यकर्त्यांनी कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग या दोनच पक्षांमधील मतैक्याला व तडजोडीला महत्त्व दिले. सत्तांतराच्या वेळी इंग्रजांनाही अस्पृश्यवर्गाच्या पूर्वसंमतीची आवश्यकता वाटली नाही हे विसरून चालणार नाही.

## संदर्भ


१. जनता, २३ जुलै १९३८

२. कित्ता.

३. एस. एस. नरवडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद संस्थान, १९८८, पृ. २६-२७

४. कित्ता, पृ. ३१

५. जनता, १३ जानेवारी १९४०

६. व्ही. बी. कुलकर्णी, प्रिन्सली इंडिया अँड लॅप्स ऑफ ब्रिटिश पॅरामाऊंटसी, १९८५, पृ. १६४

७. डी. जी. तेंडुलकर, महात्मा, खंड ५, १९५२, पृ. ४२
८. कित्ता, पृ. ८९–९०
९. राणी धवन शंकरदास, द फर्स्ट काँग्रेस राजः प्रॉव्हिन्शिअल ऑटॉनॉमी इन बाँबे, १९८२, पृ. २४६
१०. जनता, १६ सप्टेंबर १९३९
११. बाँबे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली डीबेट्स, खंड ७, भाग २७, २५ ऑक्टोबर १९३९, पृ. १९७३
१२. कित्ता, २६ ऑक्टोबर १९३९, पृ. २०३२–२०३३
१३. राणी धवन शंकरदास, उपरोक्त, पृ. २४९
१४. महाराष्ट्र सरकार, सोर्स मटेरियल ऑन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अँड द मुव्हमेंट ऑफ अनटचेबल्स, खंड १, १९८२, पृ. २००
१५. मा. फ. गांजरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ४, १९७५, पृ. ८९
१६. जनता, ३० डिसेंबर १९३९
१७. मा. फ. गांजरे, उपरोक्त, पृ. ११३
१८. डी. जी. तेंडुलकर, उपरोक्त, पृ. ३५५
१९. जनता, १० ऑगस्ट १९४०
२०. कित्ता, ३, १० व २४ ऑगस्ट १९४०
२१. कित्ता, ७ सप्टेंबर १९४०
२२. कित्ता, २१ सप्टेंबर १९४०
२३. डी. जी. तेंडुलकर, उपरोक्त, पृ. ४२५
२४. जनता, ९ नोव्हेंबर १९४०
२५. बी. आर. आंबेडकर, थॉट्स ऑन पाकिस्तान, १९४१, प्रोलॉग, पृ. १
२६. सोर्स मटेरिअल, उपरोक्त, पृ. २३३
२७. धनंजय कीर, डॉ. आंबेडकरः लाइफ अँड मिशन, १९५४, पृ. ३२६
२८. जनता, ९ ऑगस्ट १९४१
२९. कित्ता, २३ ऑगस्ट १९४१
३०. सुबोध पत्रिका, ३ सप्टेंबर १९२२
३१. निकोलस मॅनसर्घ (संपादक) उपरोक्त, खंड १, पृ. ९२
३२. कित्ता, पृ. ९८
३३. कित्ता, पृ. २११
३४. कित्ता, पृ. २२५
३५. कित्ता, पृ. ५५२-५५३

३६. मा. फ. गांजरे ( संपादक ) उपरोक्त, खंड १, पृ. ८६
३७. निकोलस मॅनसर्घ, उपरोक्त, पृ ८४७, ८६८ आणि ८७३
३८. निकोलस मॅनसर्घ ( संपादक ) द ट्रान्सफर ऑफ पॉवर, १९४२, खंड दुसरा, १९७१, पृ. १७, ४० आणि ७५
३९. कित्ता, पृ. ३१६
४०. कित्ता, पृ. ४०५
४१. कित्ता, पृ. ४३६–४३७
४२. मा. फ. गांजरे, बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे, खंड १, १९७७, पृ. ८२

# साधनांची सूची


## ( अ ) मूळ साधने

**अस्सल अप्रकाशित सरकारी कागदपत्र**

( १ ) मुंबई सरकारच्या गृहखात्याच्या विशेष शाखेच्या १९३२ ते १९३९ या काळातील पुढील फायली : क्र. 355 (64) IV A Part I, II, III, IV, V, VI फायली क्र. 776 आणि 927 A

( २ ) हिंदुस्थान सरकारच्या गृह-राजकीय खात्याच्या खालील फायली क्र. ३६३ : १९२५; क्र. ७/२/१९३४, ५/२/३९

## ( ब ) बिनसरकारी संघटनांचे कागदपत्र

ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसच्या खालील फायली क्र. १, ६१

## ( क ) प्रकाशित सरकारी कागदपत्र

बॉम्बे लेजिस्लेटिव असेंब्ली डीबेट्स १९३७–१९३९

## ( ड ) अस्सल अप्रकाशित खासगी पत्रव्यवहार

( १ ) बा. गं. खेर ( २ ) अमृतराव रणखांबे

## ( इ ) दुय्यम साधने : वृत्तपत्रे

**मराठी :** (१) कोहिनूर (२) जनता (३) पतितपावन (४) भाला (५) सुबोधपत्रिका

**इंग्रजी :** ( १ ) टाइम्स ऑफ इंडिया ( २ ) द सर्वंट ऑफ इंडिया ( ३ ) बॉम्बे क्रॉनिकल

( इ ) निवडक इंग्रजी पुस्तके

( 1 ) Ambedkar B. R., **What Congress And Gandhi Have Done to the Untouchables**, 1945, Bombay, Thacker and Co.

( 2 ) Birla G. D., **In the Shadow of the Mahatma**, Second Edition, 1972, Bombay, Vakils, Feffer And Simons

( 3 ) Chopra P. N., **Towards Freedom**, 1937–47, Vol. I, 1985

( 4 ) Dhavan Rani Shankardas, **The first Congress Raj Provincial Autonomy In Bombay**, 1982, Delhi, MacMillan India Ltd.

( 5 ) Desai Valji Govindji, **The Diary of Mahadeo Desai**, Vol. I **YERAVADA PACT EVE** 1932, 1953 Ahmedabad, Navjiwan Publishing House

( 6 ) Govt. of Maharashtra (A) **Source Material on Dr. Babasaheb Ambedkar and the Movement of Untouchables**, Vol. I, 1982 Bombay (B) **Dr. Babasaheb Ambedkar : Writings and Speeches**, Vol, 2, 1982, Bombay

( 7 ) Gupte Vasant, **Labour Movement In Bombay**

( 8 ) Keer Dhananjay, **Dr. Ambedkar– Life and Mission**, 1954, Bombay A. V. Keer

( 9 ) Kulkarni V. B., **Princely India and lapse of British Paramountcy**, 1985

(10) Mansergh Nicholas, **The Transfer of Power**, 1942-47. Vol. I and II, 1971, London

(11) Maurya Babulal ( ed ), **Mahatma Gandhi's Letters to P. N. Rajbhoj**, 1967, Pune K. P. Rajbhoj

(12) Morris M. D., **The Emergence of an Industrial Labour Force in India : A Study of the Bombay Cotton Mills**, 1854-1947, Bombay

(13) Tendulkar D. G., **Mahatma**, Vol. 3 and 5, 1952, V. K. Jhaveri and D. G. Tendulkar

## निवडक मराठी पुस्तके

(१) अमरसिंग भाई (बर्वे शंकरदास), (अ) अस्पृश्याच्या चळवळीतील सावळा-गोंधळ १९४० (ब) वतनदार महार समाजास इषारा : स्वतंत्र मजूर पक्षाची गुंडगिरी, १९३९

(२) आंबेडकर भी. रा., महार आणि त्यांचे वतन अथवा विसाव्या शतकातील गुलामगिरी, दुसरी आवृत्ती १९३८, मुंबई

(३) कुलकर्णी वामनराव, वेड्या मना तळमळशी, १९८९, पुणे, श्रीविद्या प्रकाशन

(४) कुंटे नाना, वाटचाल, १९८२, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

(५) केळशीकर वि. ल., हुतात्मा देवरूखकर, १९४८, मुंबई

(६) खरात शंकरराव (संपादक), कर्मवीर भाऊराव व दादासाहेब गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे, १९६१, पुणे, ठोकळ प्रकाशन.

(७) खैरमोडे चां. भ., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र

(अ) खंड ३, १९६४, मुंबई, प्रताप प्रकाशन

(ब) खंड ४, १९६६, मुंबई, डॉ. आंबेडकर एज्युकेशन सोसायटी

(क) खंड ६ व ७, १९८५, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

(८) गणवीर रत्नाकर (संपादक)

(अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख, १९८५, नागपूर, रत्नमित्रा प्रकाशन

(ब) 'बहिष्कृत भारतातील डॉ. आंबेडकरांचे स्फुट लेख,' १९८१, नागपूर, रत्नमित्रा प्रकाशन

(क) विलायतेहून डॉ. बाबासाहेबांची पत्रे, द्वितीयावृत्ती, १९८४, नागपूर, रत्नमित्रा प्रकाशन

(९) गांजरे मा. फ., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ४ आणि ५, १९७५ व १९७६, नागपूर, मा. फ. गांजरे

(१०) जाधव भि. शि., अस्पृश्यांचे धर्मांतर, १९३८

(११) नरवडे एस. एस., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबाद संस्थान, १९८८

(१२) पानतावणे गंगाधर, वादळाचे वंशज, १९८२, कोल्हापूर प्रचार प्रकाशन

(१३) फडके भालचंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, १९८५, पुणे, श्रीविद्या प्रकाशन

(१४) फडके य. दि., (अ) शाहू छत्रपती आणि लोकमान्य, १९८६, पुणे, श्रीविद्या प्रकाशन (ब) विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड १, १९८९, पुणे, श्रीविद्या प्रकाशन

(१५) भार्गवे भावना, पद्मश्री दादासाहेब गायकवाड, १९६८, नाशिक, शांताबाई दाणी

(१६) वैद्य प्रभाकर, डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म, १९८१, मुंबई, शलाका प्रकाशन

(१७) सुरवाडे विजय (संपादक), पत्रव्यवहारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, खंड २, १९८९, कल्याण, तथागत प्रकाशन

(१८) हवलदार ग. रा., रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक याचे चरित्र, भाग १, १९२७

●

# विषय-सूची


ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस ८६, १०१-१०२, १०५, ११७
ऑल इंडिया शेडयूल्ड कास्टस् फेडरेशन ८३
उंदेरी खटला ८५, १३९-१४०
एक दिवसाचा सार्वत्रिक संप ११७-१२१
औद्योगिक कलह विधेयक ११५-११७
कनिया समितीचा अहवाल १२०-१२२, १२४
काळाराम मंदिर सत्याग्रह ३-१३, १८-२०, २३, २७-३३, ३५, ३७-३८, ४२-४८, ५०—५५, ६२-६५, ७१-७३
क्रिप्स योजना १८१-१८२
खोती विरुद्ध मोहीम १२९, १३६-१४४
गोलमेज परिषद २४-२७
चले जाव चळवळीस विरोध १८३
जस्टिस पार्टी १७२
थॉट्स ऑन पाकिस्तान १७६-१७७
दुसरे महायुद्ध १६७-१६८, १७९
नॅशनल ट्रेड युनियन फेडरेशन ८६, ११७
पस्तीसचा कायदा ८४, ८९, १००, १६२-१६३
पर्वती—सत्याग्रह ४
पुणे करार ५६-५८
बहिष्कृत हितकारिणी सभा ८३
मनमाडची अस्पृश्य रेल्वे कामगारांची परिषद ११४-११५
महार वतन १२९-१३४, १३६
महाड सत्याग्रह ४
मिठाचा सत्याग्रह ७, १८, २२-२३
मुंजे—राजा करार ५२
मुस्लिम लीग १६९-१७१, १७६
म्युनिसिपल कामकरी संघ ११४
येवला परिषद ७१, ७३, ९०
रथयात्रा १४-१६, ६६-७१
रशियाबद्दलची भूमिका ११०, १३०, १७५

राजकोट प्रकरण १६५-१६७
रामगड कॉंग्रेस १७२
रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टी १८१
विडी कामगारांचे प्रश्न १२५-१२६
वैयक्तिक कायदेभंगाची मोहीम १७५
शीख धर्माचा स्वीकार व प्रचार १५३-१५५
शेतकरी संघ ८६
सावकारी नियंत्रण विधेयक १३५-१३६
संस्थानांचे प्रश्न १६३-१६७
स्वतंत्र मजूरपक्ष
(अ) उद्दिष्टे व कार्यक्रम ८९-९०
(आ) उमेदवारांच्या निवडीचे निकष ९०-९१
(इ) तिकीट वाटपावरून वाद ९१-९९
(ई) नामकरणाचे स्पष्टीकरण ८५
(उ) मध्यप्रांत वऱ्हाडातील शाखा १००-१०१
(ए) रणनीती ८९, ९९-१००, १०२, १३४
(ऐ) लोकल बोर्डाच्या निवडणुका १४९-१५२
स्वतंत्र हरिजन पक्ष १५१
हिंदुमहासभा १३, ६९, १७८

# नाम-सूची


अणे मा. श्री. ( बापूजी ) १७७
अभ्यंकर ज. पां. ४४
अमीनुद्दीन सय्यद ७०
अमेरी १७७, १८०-१८२
अय्यर सी. एस. रंगा ५२, ६२-६३, ६७
अर्विन २८
अहिरे ज. स. २३
आकूत वा. बा. ५, ६, १०, ३७, ४३, ४५, ५४
आझाद अबूल कलाम १७२
आपटे ह. ना. ३६
आळवे १०९, ११२
आंबेडकर भी. रा. (बाबासाहेब) ३-८, १०-१२, १४-३८, ४१, ४४, ४७, ५०, ५२-५३, ५५-६५, ६८, ७०-७६, ७८-७९, ८३-१०५, १०८-१११, ११४-१२६, १२९-१३१, १३३-१३७, १३९-१४४, १४६-१६०, १६२, १६५, १६७-१८५
आंबेडकर मुकुंद १५३
आंबेडकर यशवंत १५३
आंबेडकर रमाबाई ७०
इब्राहिम करीमभॉय १७१
इंडियन सोशल रिफॉर्मर १९
उदगावकर मा. भै. १३
उद्धव शिवशरण ९२
उद्धारे श्री. गो. ४३
उपशाम शां. अ. १३०, १४६, १५३
एल्फिन्स्टन १३७
ऐदाळे जि. सु. ९२, १०२, १५९
ओढेकर रंगराव ६
ओतुरकर रा. वि. २०, ४४
अंधृटकर ना. ब. ४४
अंधृटकर रा. भा. ४७
कर्णिक व. भ. ११८, १२७
कद्रेकर भास्करराव १७, ३५, १५८
कनिया एच. जे. १२०
करंदीकर शि. ल. १४१-१४२, १४४
कवळे भा. रा. १४२-१४३

काजरोळकर नारायणराव ७१
काणेकर पु. गो. १५३
कान्हेरे दा. अ. १४०
कासले ३१२
काळे तुळशीराम संभाजी २२, २६, ९६
काळे पावली संभू ५१
काळोखे कृ. म. ९०, १०२
कांदळकर ११२
कांबळे अंबाजी शिवराम ९२, १५७
कांबळे बापूसाहेब ८३
कांबळे शि. जा. ४, ९१-९२, १५७
कॉलिन्स जी. एफ. एस. १२, १४, १७-१८, ३२, ७४
काँग्रेस सोशॅलिस्ट ११८
क्रांती ११७
किचनेर १७८
किसनसिंग १५५
क्रिप्स स्टॅफर्ड १७१, १८०-१८२
कीर धनंजय ३, ७६, ८३, १७८
कुर्तकोटी ( शंकराचार्य ) ४, ७
कुलकर्णी ग. आ. ( खान महंमद ) ३०
कुलकर्णी वामनराव १११-११२, १२७
कुंटे द. का. १४१
केनेडी बी. सी. ५४
केलप्पन ५७-५८
क्लेटन एच. बी. ४१, ४३, ७६
कॅमेरॉन १२५
कोठावाला ६७
कोसंबी धर्मानंद २५
कोहिनूर ४, १३, ७३-७४
खरात शंकरराव १११
खांबे र. धों. १४२-१४३
खेडगीकर रामभाऊ १०५, ११६
खेर बा. गं. (बाळासाहेब) ७, १०, १८, ३३, ११३-११७, १२३, १६८-१६९
खैरमोडे चां. भ. ३, ७४-७६, ८३, १०६, १५४
खोब्रागडे दे. भि. १००, १०२
खंडारे शं. अं. १००
गर्गे ल. ह. ४७
गजभिये सीतलप्रसाद १२५
गझनवी ६०
गडकरी विनायकराव ९९, १०२, १०५
गणवीर रत्नाकर ३, ७३-७६, ७८, १२७
गद्रे र. ह. ६, ४४-४५
गवई ग. आ. ५२, ५७
गवळे रामचंद्र १४
गाडगीळ ध. रा. ११४
गाडगीळ न. वि. ४
गाडगीळ ना. चि. ४
गायकवाड गीताबाई १५१
गायकवाड भा. कृ. ( दादासाहेब ) ५, ७, १०, १८, २०, २२, २६-२८, ३०, ३२, ३५, ३८-४४, ४६-५१-५३, ५५, ६४-६५, ७०, ७२, ९२, ९८, १०२, १३३-१३४, १४४, १४९-१५१, १५४-१५५
गायकवाड रा. ह. १५६
गायकवाड सयाजीराव १६५
गायधनी ग. वा. ४३
गांधी कस्तुरबा १६६
गांधी देवदास ५६, ६७

गांधी मो. क. (महात्मा) १०, १४, १८, २२-२३, २८, ३४-३८, ४०, ४२, ४७, ५२-६२, ६५, १११, ११३, १२८, १६५-१६८, १७३-१७५, १७७, १८०, १८३-१८५
गांधी राजीव ६८
गॉर्डन आर. जी. ६, ९-१९, २१, २७, ३३, ३८-३९, ४५-५०, ७३-७४, ७६-७७
ग्वायर मॉरिस १६६, १६७
गिब्सन १६६
गिल्डर १०२
गुणे मधुमालती ९९
गुप्ते भा. म. (बापूसाहेब) ९९, १५७
गोखले गो. कृ. ३५
गोपिकाबाई ६
घाटगे गंगाराम १०२
घाटगे सुभेदार ९१
घोडीचोर रा. गं. १००, १०२, १२६
घोलप ज्ञा. ध्रु. ६४
घोषाळ जे. एन. ९-११, ७३-७४
चर्चिल विन्स्टन १७३, १८०
चव्हाण चंद्रभान १४८
चव्हाण भैरू रावजी ११९
चव्हाण यशवंतराव १३३
चित्राव सिद्धेश्वरशास्त्री ६९
चित्रे अनंतराव ८६, ९९, १०२, १०५, १४२, १४४, १५८-१५९, १७६
चित्रे कमलाकांत १३०, १४६, १५३
चुडासामा ४०
चेंबर्लेन नेव्हिल १७३
चॅप्लिन १३७
चँग कै शेक १८०
चनानी एच. के. १२०
चौबळ वि. बं. १००
चंद्रमोरे ना. रा. (पळसेकर) ४१
चंद्रात्रे रा. म. ६६
छगला. एम. सी. १२०
जनता ७५, ८४-८५, ८७, ९३, ९९, १०३, १०६-१०७, ११२, १२६-१२८, १४०, १४४, १४६-१४७, १५१-१५२, १५७-१६०, १७५-१७८
जयकर मु. रा. २८, ५८
जयनारायणजी १०१
जयरामदास दौलतराम ११४
जयवंत (भाई) १४८
जवळकर दि. शं. ३०, ४०, ४५, ४७ ७२
जाजू रामकृष्ण १५७
जाटव देवीदास ५७
जाधव गणपतबुवा ३५, ११४
जाधव दौ. गुं. ९१, १०२, १२४, १७६
जाधव पुंजाजी ३५
जाधव वि. शि. १५८, १६१
जाधव शि. गो. ९६
जाधव स. ता. १४
जाधव ह. रा. ५१
जानोरकर म. वा. ४६
जिना महमदअली १४६, १६२, १६७, १७०-१७२
जेधे केशवराव ४, १५७
जोगळेकर के. एन. १०१-१०२, १०५, १०९, ११७
जोशी जे. पी. ३४, १०२

जोशी ना. म. ८६, ८७, ११२, ११७, १२३, १२८, १७५
जोशी एस. एम. ४
जोशी एस. सी. ११५, ११९, १२५, १५३, १७६
झाबवाला एस. एच. १०९, ११६
झेटलंड १६८
टाइम्स ऑफ इंडिया ९, १३, १७,४०, ७४, ७६-७९, १७०
टिपणीस सु. गो. (सुरबानाना) ९९, १४२-१४३
टिळक बा. गं. (लोकमान्य) १३८, १७१
ठक्कर अमृतलाल (ठक्कर बाप्पा) ३४, ५९, १५७
ठवरे जी. एम. ५२
ठेंगे कृ. रा. ६८
ठेंगे रा. पुं. २४
डावरे वि. ब. ६५-६७, ६९
डांगे श्री. अ. १०२, १०७, १०९, ११७
डोळस रेवजीबुवा १५३
तटणीस रामभाऊ ३७
तळकर १०२
तळाजिया रा. के. ४४, ४८
तारापोरवाला विकाजी १२०
तांबे ल. गो. १४०
थॉमस जी. ए. ४९, ७७
थोरात रा. भा. १००, १४९
दरबार बीरावाला १६५, १६६
दाणी सावळाराम बा. २६, ३९, ५१, ५३-५४, १४९-१५०
दीक्षित द. दि. ५१
दीक्षित पु. वि. ४६
दीक्षित श्री. प. ३२
दीक्षित स. का. ४२
देवधर गो. कृ. ३५-३६
देवरूखकर बा. जा. १८, २४-२५,५२, ६४, ७१,१०१-१०२, १५२-१५३
देशपांडे गो. ह. २१, ३७, ४४, ४६
देशपांडे ल. मा. २३
देशपांडे शं. वा. १०९
देशपांडे ह. श्री. १५२
देशमुख पंजाबराव १००
देशमुख महंमदखान १३९
देशमुख विमलाबाई १०१
देसाई भुलाभाई १४६, १६३
देसाई महादेवभाई ३५
देसाई मोरारजी १३३, १४१, १४४
देहेलवी अली महंमदखान १६९-१७०
दोंदे मो. वा. १२५, १४७, १५३,१७६
धडफळे भालचंद्र १३
धर्मेंद्रसिंह (राजकोटचे ठाकोरसाहेब) १६५-१६७
नरीमन के. एफ. ४४
नाईक देवराव ५, ७, ३०, ३१, ३८, ५०, १४९
नाईट हेन्री ७०-७१, ७८-७९
नाझिर अहमद ३२
नायकर इ. व्ही. रामस्वामी १७२
निकाळजे रा. स. १३०, १५७-१५८
निकाळे भादूजी १४९
निंबकर र. शि. १०१-१०२, १०९, ११७

नून फिरोझखान १७७
नेहरू जवाहरलाल ६८, ७३, ८७-८८, १०२, १०७, ११३, १८०
नंदागवळी कालीचरण १२५
नंदा गुलझारीलाल ११३
पटेल वल्लभभाई ( सरदार ) ३५, ४४-४५, १०२-१०३, ११९, १२३-१२४, १२८, १४१, १६५-१६७
पतितपावन २०-२३, २७, ७४-७५
पतितपावन दास ( केशव नारायण देव ) २, ७, २०-२२, ३८-४०, ५१, १००
परांजपे १२३
परिचारक जी. बी. १००, १५२
परुळेकर शामराव ८६, ९९, १०२, १०५, ११६-११७, १२३-१२४, १४४
पवार ज्ञा. सु. १००
पाटणकर चिं. नी. ४४
पाटणकर नी. पां. ५-७
पाटसकर ह. वि. ११६
पाटील के. तु. १००
पाटील दशरथ लक्ष्मण १०३, १४८
पाटील ना. बा. ८६
पाटील वा. गो. १५६-१५७
पाटील स. का. ११६-११७
पानतावणे गंगाधर ३१
पापण्णा रावसाहेब १७९
पारोळेकर नथूभाऊ ११८
पालवणकर ( पी. बाळू ) ५७, १०१-१०२
पांडे आर. जे. १५, ३७, ४५
पिल्ले मुन्नुस्वामी ५२
पुजाधिकारी स. अ. ५, ७३
पुजारी ग. रा. ६९
पुजारी रा. का. ६९
पुराणिक दाजी ४२
पेंडसे लालजी १४३
पंचाक्षरी बा. वा. ४४
प्रधान गो. रा. १३६
प्रधान द. वि. ११७, १५३
प्रधान भा. वि. ३५, ९९
प्रधान रा. ग. ४४
प्रभात ४७
प्राइड ए. डब्ल्यू ११३, १२७
फडके जी. के. १४३
फडके ना. वा. १२३-१२४
फडके भालचंद्र ३, ३३, ८३
फारूकी एन. ए. ६९, ७९
फॉसेट १०९
फुले रा. ना. १००, १२५
फ्रॅन्सिस १३७
बखले रघुनाथराव ८६-८७, ९९, ११२
बजाज जमनालाल ३३
बडवे ३९-४०
बर्वे ल. गो. ४३, ४८
बर्वे शंकरदास ( सरदार अमरसिंग ) ५, ७, १०६, १५२-१५६
बहिष्कृत भारत ४, ८, २१-२२, ७५, १०९, १३०
बापट पां. म. ( सेनापती ) ७
बारसे दौलत भीमसेन १००
बॉंबे क्रॉनिकल ३३-३४, ७७-७८
ब्राऊन एल. एन. ३९-४०, ४३-४६ ४९-५०, ५३-५५, ६३, ७६-७८
बिऱ्हाडे ९१-९२

बिर्ला घनःश्यामदास ५८, ६०, ७८
ब्रूमफील्ड १०४
बेडसे शं. चिं. १००
बेंडके बाळा १४०
बेंडके सीताराम १४१
बेल आर. डी. ६९, ७९
बेले र. अ. ४८
बॅप्टिस्टा जोसेफ १३०
ब्रेबर्न ६९-७०, ८५, १०६, १२७
ब्रेलवी सय्यद अब्दुल्ला ११४
बैरागी बिहारीदास ४७
बोमन बेहराम जहांगीर १००
बोमंट जॉन ६७
बोले सी. के. १३०
बोस सुभाषचंद्र १६३, १६६
भगत डी. के. १००, १०२-१०३, १४८
भातनकर रा. गं. ९६, १०२
भारत ६४
भाला ६३, ७७-७८
भालेराव बा. रा. ९८
भावे विनोबा १७५
भुस्कुटे वि. म. ४
भोपटकर भा. व. (भालाकार) ६३, ६६, ९९
भोपटकर ल. ब. (अण्णासाहेब) ६९, ९९, १००, १०३
भोळे राजाभाऊ ९२, १०२, १७६
मणियार महंमद झकेरिया ३२
मनमोहनदास रामजी ४८
मर्फी ६३
मराठे ना. बु. १००
मराठे बा. ज. ७, २१, ३७
मसानी मिनू ११८, १२८
महाडेश्वर स. बा. २५
महार गं. गो. ४०
महार तुळशीराम ४४-४५
महार तुळाजी ४३
महार सीताराम १०३
माऊंटफर्ड १३९
मालवीय मदनमोहन ५६
मावळणकर ग. वा. १६९
मॉंटेग्यू १७१
मिरजकर शां. सा. ११७, १२६, १२८, १४३
मिंढे पाटील गो. अ. ५, ३२
मीर उस्मान अलीखान (निजाम) १६४
मीराबेन ३६
मुथाडे चिमा ४३
मुदलियार रामस्वामी १७७
मुन्शी क. मा. ११३, ११६, ११९, १२२, १२८, १३५, १४६
मुल्ला दिनशा २९
मुंजे बा. शि. २१-२२, ५२
मेढे ९१
मेश्राम गोविंदराव १४९
मेहता जमनादास ११६-११८, १२०, १७०
मेहता वैकुंठभाई ११४
मॅकाय ए. डब्ल्यू. डब्ल्यू. ११-१२, १४, २१, २७-२९, ७४, ७६
मॅक्डोनल्ड रॅम्से ५२, ५५-५६
मॅक्लिऑड नॅर्मन १०८
मॅक्सवेल आर. एम. ४९, ५२, ७७-७८
मोडक स. ना. ४७

मोदी होमी १७७
मंडन मोहन १६७
मंडलिक वि. ना. १३७-१३८
रणखांबे अमृतराव ५, २३-२४, २६, ३५, ३९, ४४, ५१, ५३-५४, ६८-७२, ९२-९८, १३३-३४, १४७, १४९-१५१, १५४-१५७
रणछोड आत्माराम ४२, ४५
रणदिवे चिं. त्रि. ९९
रणदिवे बी. टी. १०९, ११७
रफिउद्दिन अहमद १३०
राऊत द. वा. १००, १०२, १०५
राघवेंद्रराव इ. १७७
राजभोज पां. ना. (बापूसाहेब) ४, ७, १३, ३०, ३२, ५२-५३, ५७, ६५, ७१-७२, १०१-१०२
राजा एम. सी. ५२, ५५-५७, ५९-७१, १७८, १८१
राजाजी ६१, ६७
राजाराम महाराज १६५
राजेन्द्र प्रसाद ७१
राठोड ३३
रानडे देशदास ४
रानडे म. गो. (न्यायमूर्ती) १७९
रास्ते (सरदार) ६, ६९, ७१
रॉबिन्सन ४०, ४४, ५४, ७७
रॉय मानवेंद्रनाथ ११७, १८१
रे नॉल्डस १०, १७
रोकडे रा. स. ९७-९९
रोकडे शं. रा. १५१
रोकडे सं. ये. ९७
रोहम प्र. ज. ५३, ६३, ७७, ९२, ९७, १०२
लम्ले रॉजर १६०, १६९-१७०, १८२-१८३
लाड मा. म. १००
लाल जे. ४०
लालचंद नवलराय ५८
लिन्लिथगो ८५, १०६, ११३, १६०-१६३, १६६, १६८ १६९, १७३-१७४, १७५, १७९-१८०, १८२-१८४
लेले पु. रा. ३३
वनमाळी १५२
वराळे ब. ह. १०२
वाड (डॉक्टर) १०३
वाघ दे. स. १४९
वाघ पी. डब्ल्यू. १२२
वाघ राणूजी २३
वाघमारे भागोजी ११९
विंगेट १३७
वॅडिंग्टन १३७
वैद्य प्रभाकर १०४-१०५, १३७
वंडेकर रा. वि. ४४
शहा पोपटलाल १५७
शहा वीरचंद पानाचंद २५
शास्त्री हरिहरनाथ ११०
शाहू छत्रपती १३१
शिरवाडकर वि. वा. (कुसुमाग्रज) ४६
शिवतरकर सी. ना. ३५, १५२-१५३
शिवराज एन. १८४
शिंदे वि. रा. १७९
श्रीनिवासन २५, ५२, ५७, ५९, ७१, १०३
श्रीनिवासशास्त्री ३५
शुक्ल सखाराम आबाजी ४८

शौचे गोविंद आबाजी ४८
सप्रू तेजबहादूर २८, ५६, १८०
सबनीस पां. जि. २०
समर्थ एम. बी. १४६
सरकार नलिनीरंजन १७७
सर्व्हंट्स ऑफ इंडिया १२३
सवादकर विश्राम १०२, ११८-११९, १४०, १४६, १४९
सहस्रबुद्धे गं. नी. ७, ८६, ११४,१५३, १५८
साईक्स फ्रेडरिक २३
साने पां. स. (साने गुरुजी) ११८
सारडा हरबिलास ५८
सावरकर ना. दा. १३
सावरकर वि. दा. ६६, ७१, १७८
सावंत ख. स. १०२, १५९
साळवे क. म. ७
साळवे चिं. स. ७, १५६
साळुंखे बी. एम. १५८
सिम्मिंग्टन १२५
सीतारामय्या पट्टाभी १६६
सुब्बरायन पी. ५८, ६१
सुबोधपत्रिका १८६
सुरवाडे विजय १०६-१०७
सेन के. सी. (न्यायमूर्ती) ६७
सोनगावकर एस. जी. १०५, १५२
सोनवणे के. मा. २४, ७५
सोनवणे डी. एस. ९२
सोळंकी पी. जी, २६-२७, ४९, ५७, ७१, ७७, ९४, १५७-१५८
स्टार्ट २३
स्वामी आनंद ७, १८, ४२, ४४
हरदयाळ लाला १७७
हरदास एल. एन. १००-१०२, १२५-१२६, १४८-१४९
हरिजन ६१
हॉटसन अर्नेस्ट ९-१०, १२, १७-१९, ७४
हिटलर १६८, १७३, १७५
हिरेमठ आर. एस. १४२
हैदरी अकबर १६४, १७७
होअर सॅम्युअल ११२, १२७
होलर आर. एस. १०२

REFBK-0026127

३३५५

# शुद्धिपत्र

| पृ. क्र. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | वरून १० वी | बाबसाहेबांच्या | बाबासाहेबांच्या |
| ११७ | वरून १२ वी | सावळाराम मिरजकरांच्या | शांताराम सावळाराम मिरजकरांच्या |
| १२३ | खालून १ ली | ना. वि. फडके | ना. वा. फडके |
| १२४ | वरून २ री | ना. वि. फडक्यांनी | ना. वा. फडक्यांनी |
| १३७ | वरून ६ वी | शिवाजी महारांच्या | शिवाजी महाराजांच्या |
| १५८ | वरून १० वी | भि. शि. जाधव | वि. शि. जाधव |
| १६१ | खालून ११ वी | भि. शि. जाधव | वि. शि. जाधव |

श्रीविद्या प्रकाशन

# आंबेडकरी चळवळ

